म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा
दा. क्र. २०३८

# ाडे

## भाग दुसरा

२०३८

ना. धों. ताम्हनकर

किंमत ४ रुपये

# निवाडे

## भाग २ रा

लेखक

**ना. धों. ताम्हनकर**

★

मराठी ग्रंथ संग्रहालय
३०६९१
अनुक्रम
विभाग २६९१
क्रमांक
नों. दि.

१९४४
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
वा. क्र. 2036 नों. दि.
वि. क्र.

किंमत ४ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार पेठ, पुणें २

संचालक
भ. व्यं. देशमुख
बी. ए., एल्‌एल्. बी.

◆

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन.

मुखपृष्ठावरील चित्र श्री. विश्वनाथ चव्हाण यांचें आहे.

◆

एकमेव विक्रेते :
पंडित अनंत कुलकर्णी
मु. पो. लोहारा
जि. उस्मानाबाद

मुद्रक
जनार्दन गणेश जोशी
जनार्दन सदाशिव लिमिटेडचा प्रेस,
३९४ सदाशिव पेठ, पुणें २

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| फुलें आणि दगड (आ.दुसरी) | १॥। |
| घरट्याबाहेर | १॥। |
| पहिली लाट | ३ |
| स्त्री आणि पुरुष | २ |
| कालचीं स्वप्नें | ३ |
| कलिका | २। |
| मृगजळांतील कळ्या | २। |
| पहिलें प्रेम ( आ. दुसरी ) | ३ |
| क्रौंचवध ( ,, ) | ५ |
| पांढरे ढग ( ,, ) | ४। |
| दोन ध्रुव ( आ. तिसरी ) | ५ |
| हिरवा चांफा ( ,, ) | ५ |
| जळलेला मोहोर | ३ |
| सहा भाषणें | २ |
| फुलें आणि कांटे | २। |
| सायंकाल ( आ. २ री ) | २॥ |
| अविनाश | १॥। |
| मंदाकिनी | १॥। |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | |
|---|---|
| अवशेष | २ |
| माझी नभोवाणी | २ |
| व्यक्तिरेखा | २। |
| नागकन्या | २ |
| नवे संसार ( जप्त ) | ४ |
| चंदनवाडी | ६॥ |

## ना. धों. ताम्हनकर

| | |
|---|---|
| तात्या भाग १ ला | २॥ |
| तात्या भाग २ रा | ३ |
| निवाडे भाग १ ला | २॥ |
| निवाडे भाग २ रा | ४ |
| चकमकी | १॥ |
| बच्चा नवरा | १॥ |
| अनेक आशीर्वाद | ३। |
| दाजी भा. १ ला | ३॥ |

## चिं. वि. जोशी

| | |
|---|---|
| आणखी चिमणराव (आ. २री ) | ४ |
| नवें भारूड | २ |
| स्टेशनमास्तर | २ |

## साने गुरुजी

| | |
|---|---|
| पुनर्जन्म ( आ. दुसरी ) | ३ |
| आस्तिक ( ,, ) | ३ |
| सोन्यामारुति ! ( आ. २ री ) | २ |
| गोड निबंध ( भाग १ ) | ३ |

**दत्तु बांदेकर**

सख्याहरी ( आ. दुसरी ) १॥

नवी आघाडी १॥

तूं आणि मी २।

**प्र. के. अत्रे**

साखरपुडा १॥

ललितवाङ्मय ३॥

**द. र. कवठेकर**

अपुरा डाव ३

रेशमाच्या गांठी ३

**वा. म. जोशी**

स्मृति–लहरी २

विचार–लहरी २।

**पु. य. देशपांडे**

नवें जग ! २॥

**भाई बेके**

रॉयचरित्र १॥

**परिचयलेखक वि. स. खांडेकर**

काव्यज्योति १

**आनंदीबाई जयवंत**

पारंब्या २

**लक्ष्मणराव सरदेसाई**

ढासळलेले बुरुज २

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

यक्तिचित्रें २॥

**ना. ह. आपटे**

फसगत १॥

**शकुंतला परांजपे**

भिल्लिणीचीं बोरें ३

**कृष्णाबाई मोटे**

मीनाक्षीचें जीवन २।

**र. गो. सरदेसाई**

चलतीं नाणीं २

**रा. श्री. जोग**

सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८

**ना. म. पटवर्धन**

हितपत्रें ३

वा. म. जोशी यांचें चरित्र ४।

**वि. वि. बोकील**

बेबीची बहीण ३

**सत्याग्रही**

ग्रह आणि तारे ४॥

**अनंत काणेकर**

धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ३

पिकलीं पानें ( दु. आ. ) १॥

**काकासाहेब कालेलकर**

ब्रह्मदेशचा प्रवास १॥

**य. दि. पेण्ढरकर**

प्रापंचिक पत्रें ३

घायाळ २

**वि. म. भुस्कुटे**

स्टॅलिन ३॥

**कमलाबाई टिळक**

आकाशगंगा २॥

**रामतनय**

साखरगोटी ५



ती. अंताजीपंत तात्या व गोविंदभट्ट काका

यांचे स्मृतीस

# सादर समर्पण

—ना. धों. ताम्हनकर

[illegible]

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

[illegible]

मागील पानावरील

# मोडी मजकुराचें बालबोध

## रूपांतर

-+++-

श्री जगदंबा प्रसन्न

चिरंजीव रा|| नारायणराव ताम्हनकर यासी प्रती केसो बच्चाजी कुलकर्णी आनेक आसीर्वाद उपरी मि|| आश्विन शु|| ५ पावेतो मुकाम नसेगा येथें क्षेम असो विशेष. तुमचे पत्र पोचलें. कुशलवर्तमान कळलेनें आनंद जाहला. यम सभेंतील निवाडे सांगणेस कधी याल असे विचारता येविशी कळविणेचे म्हणजे येथील कामे अद्याप उरकत नसलेने तिकडे येणे लांबणीवर टाकणे भाग जाले आहे. मागें प्रसंगोपात सांगितलेल्या गोष्टीं लिहून काढून त्यांचे बुक केले ते लोकांना आवडलेचे समजून आनंद जाहला बाकीच्या गोष्टी सांगणेब|| लोक तुम्हाला आग्रह करतात म्हणून लिहितां म्हणून आणखी काही खटली मीच लिहून अल्लाहिदा पाठविली आहेत. पोचलेचें कळविणे. नीट जमवून वाचणे. वृद्धापकाळामुळें हात कापतो अक्षर नीट येत नाहीं. म्हणून काळजीपूर्वक नकल करणे. भारुड जाले असलेस कमी करणेस हरकत नाहीं. पण महत्वाचे भागास धका लागो न देणे. क्षेमसमाचार वरचेवर कळवून संतोषवीत असावे. लोभ असो हे आसीर्वाद. तुमचे सौभाग्यवती कुटुंबास आणि चिरंजीव मुलास आसीर्वाद

केसो बच्चाजी कुलकर्णी

अनुक्रम ३५५७१
विभाग भाषा
क्रमांक २६८९
नों. दि. ५।१२।६१
ग्रंथालय

## पी. ग. दाणी, संपादक



" याचं नांव पीतांबर गणेश दाणी. " ज्ञाननिर्झर " नांवाच्या साप्ताहिकाचा हा संपादक होता. यानं कादंबऱ्या, नाटकं, काव्य आदिकरून बहुविध ललित साहित्य लिहिलेलें आहे. याच्यावर अपेक्षाभंग व लोकद्रोह असे दोन आरोप मी ठेविलेले आहेत. त्याला हे मान्य आहेत कीं अमान्य आहेत तें विचारून घ्यावं. मान्य असतील तर प्रश्नच नाहीं. पण अमान्य असतील तर याचं म्हणणं ऐकून घेऊन धर्मपीठानं न्याय्य तो निवाडा करावा अशी मी प्रार्थना करितों. "

चित्रगुप्त अभिवादन करून खालीं बसल्यावर यमधर्मांनीं दाणीला त्याचं म्हणणें काय आहे तें विचारलें. संपादक दाणीनें धर्माला आणि न्यायपीठाच्या सदस्यांना प्रणाम करून बोलायला सुरवात केली.:—

" सज्जन हो..."

" पीतांबर, " चित्रगुप्त त्यास अडवून म्हणाला. इथं जन कोणीहि नाहीं; ही देवसभा आहे. म्हणून जन लोकांची भाषापद्धति इथं तुला अवलंबिता येणार नाहीं. जनसमूहांतील तुझं अलौकिक वाक्चातुर्य मला माहीत आहे. आवेशपूर्ण आणि ओघवती भाषेच्या जोरावर अपराधी असूनहि 'भले भले' असे धन्यवाद तूं श्रोतृवृंदाकडून मिळवीत होतास. पण येथें वाक्चातुर्यानं ही धर्मसभा भुलणार नाहीं. वक्त्याच्या भाषाशैलीपेक्षां वस्तुस्थितीच्या सत्यासत्यतेकडेच या धर्मसभेची दृष्टि असते. यासाठीं नरलोकाच्या भाषणबाजीपेक्षां सत्यकथन हा एकच हेतु ठेवून तूं जें कांहीं सांगायचं असेल तें सांगावंस अशी मी तुला प्रारंभींच सूचना देतों."

चित्रगुप्ताची ही सूचना ऐकतांच पीतांबर दाणीचा विरस झाल्यासारखा दिसला. ज्या भाषणपटुत्वावर आपण आजपर्यंत अनेक आणीबाणीचे प्रसंग निभावून नेले, त्याच भाषणपटुत्वानें आपण ही सभाहि जिंकूं अशी उमेद त्याला वाटणें स्वाभाविक होतें. पण चित्रगुप्तानें त्याच्या या उमेदीवर विरजण घातल्यानें 'प्रथमग्रासे मक्षिकापात' म्हणतात तशांतली याची

अवस्था झाली कीं काय कोण जाणे। तो बोलूं लागला—" धर्म महाराज, चित्रगुप्तानीं दोन आरोप माझ्यावर केले आहेत. ते दोन्हीहि मला मान्य नाहींत. मी कोणाचाहि अपेक्षाभंग जाणून बुजून केलेला नाहीं. अपेक्षा-भंग झाला असेल तर माझाच झाला आहे. ज्या अदबीनं लोकांनीं माझ्याशीं वागायला पाहिजे त्या अदबीनं ते माझ्याशीं वागले नाहींत. माझा ज्या मानानं त्यांनीं जयजयकार करायला पाहिजे होता, त्या मानानं त्यांनीं केला नाहीं आणि माझ्या वाङ्मयाला प्रकाशकांनीं जें मोल द्यायला पाहिजे होतं तें त्यांच्याकडून मला मिळालं नाहीं असा खरा प्रकार आहे. "

" लोकद्रोहाचा प्रकारहि असाच कांहींसा झालेला आहे. मी होऊन कोणचाहि द्रोह केलेला नाहीं. कांहीं विघ्नसंतोषी लोकांना माझा उत्कर्ष पाहवेना. आणि ते माझा द्रोह करूं लागले तेव्हां स्वसंरक्षणार्थ मला त्यांच्यावर प्रहार करावे लागले. स्वसंरक्षण हा प्राणिमात्राचा जन्मसिद्ध हक्क आहे. आणि तो या धर्मसभेलाहि अमान्य नसावा. स्वसंरक्षण म्हणजे लोकद्रोह असं भासवून चित्रगुप्त प्रमाद करीत आहेत असं मी नम्रपणें सांगतों. "

" चित्रगुप्ता, पीतांबरवर केलेले आरोप संदिग्ध आहेत असं मला वाटतं. यासाठीं तूं हे आरोप कोणत्या कारणामुळें केले आहेस हें सप्रमाण सांगितलंस तर या धर्मसभेचं न्यायदानाचं काम सुकर होईल. " यमधर्माच्या या आज्ञेवर चित्रगुप्त म्हणाला,

" धर्माज्ञा सेवकाला शिरसामान्य आहे. पीतांबर दाणीचा अपेक्षाभंग किती झाला याचा विचार मी नंतर करीन. पण त्यानं लोकांचा अपेक्षाभंग किती केला हें मी या न्यायसभेला प्रथम निवेदन करितों.:—

" पंचावन्न वर्षांपूर्वी भयानक नामक दिवाभीत या सभेपुढें आला होता, हें देवाधिदेवांना स्मरत असेल. पाश्चात्यांच्या सरस्वती देवीचं आपण आवडतं पांखरूं असून देखील आपल्याला बुद्धीचा आणि ज्ञानाचा प्रसाद तिच्याकडून मिळूं शकला नाहीं. आणि आपणांस लोकरंजन करितां आलं नाहीं, उलट आपल्या वाणीनं लोक भयभीत मात्र होत असं गार्‍हाणं यानं धर्मसभेपुढें मांडलं होतं. देवाधिदेवांना तें पटलं आणि 'विश्वसंपन्न व

दि.

भाषापंडित हो ’ असा आशीर्वाद देऊन याला मनुष्यजन्माला घालण्यांत आलं. देवाधिदेवांचा हा आशीर्वाद याला पुरेपूर फलद्रूप झाला.

“ बुद्धिमान म्हणून यानें विद्यार्थिदशेंतच मान्यता मिळविली. आणि त्या बुद्धीच्या सहाय्यानं हा विद्यासंपन्न झाला. याच्या गुरुजनांनीं याच्या बुद्धिमत्तेची बहुजनसमाजांत वाहवा केली. त्यामुळें लोकहि याच्याकडे कुतूहलानें पाहूं लागले. आपल्याला याच्या विद्वत्तेचा लाभ मिळून आपल्याला अभ्युदयाचा मार्ग हा दाखवील अशी अपेक्षा ते आपल्या मनाशीं बाळगूं लागले.”

“ याचं लालित्यपूर्ण लेखन आणि रसपूर्ण भाषण यांनीं लोकांचीं मनं अल्पावधींतच लुब्ध होऊन गेलीं आणि त्यामुळेंच याच्याविषयींच्या लोकांच्या आकांक्षा बळावल्या; पण अखेर त्या विफल झाल्या. जेणेंकरून लोक प्रगतीच्या मार्गावर जातील असं हा कांहीं लिहीना व बोलेना. उलट पराक्रमी आणि धैर्यशाली बनविण्याऐवजीं लोकांना दुर्बल व विषयलंपट करणारं वाङ्मयच याच्या लेखणी नि वाणींतून निर्माण होऊं लागलं ! आणि याचं वर्तनहि याच थाटाचं होऊं लागलेलं पाहून लोकांच्या याच्याविषयींच्या आकांक्षा ढासळूं लागल्या. ”

“ पीतांबरनं मघाशीं विघ्नसंतोषी लोकांचा उल्लेख केला. पण याचा उत्कर्ष न पाहवल्यामुळें त्याला हे प्रतिस्पर्धी निर्माण झाले ही त्याची समजूत खरी नाहीं. यांच्या भाषण–लेखनांतून प्रतीत होणाऱ्या दोषांची गय करण्याचा कंटाळा येऊन कांहीं लोक त्यांवर टीकाप्रहार करायला लागले. तेवढ्यावर सावध होऊन यानं योग्य ती सुधारणा करायला पाहिजे होती. पण, तसं न करितां “ मला अक्कल शिकविणारे हे कोण मोठे लागून गेलेत ” अशा गुर्मीनं हा त्यांची हेटाळणी करूं लागला आणि त्यांना खिजविण्यासाठीं म्हणा, किंवा त्यांच्या सूचना स्वीकारल्या तर आपण त्यांच्याहून हीन ठरूं अशा भयानं म्हणा, हा अधिकाधिक गलिच्छ लिहूं बोलूं लागला. लोक याच्यावर टीका करायला लागले ते विघ्नसंतोषी वृत्तीनं किंवा मत्सरानं नव्हे. एकादा तसा असेलहि; पण सामान्यतः सर्वांची टीका प्रांजलपणाची होती व तिच्या बुडाशीं यानं केलेला अपेक्षाभंग होता.

“ यावर हा पीतांबर असं म्हणेल कीं, ‘ लोकांनीं पाहिजे त्या अपेक्षा

चाळगल्या म्हणून त्या पूर्ण करण्याची सक्ती आपल्यावर कां व्हावी ? आपल्यावर असा हक्क गाजविण्याचा त्यांना काय अधिकार ? ”

“ पण याची ती तक्रार मान्य होण्यासारखी नाहीं. विद्यासंपन्न मनुष्य हा स्वतःच्या मालकीचा रहात नाहीं. विद्या हें स्वतःच्या प्रयत्नानं मिळविलेलं धन असलं तरी तें एक प्रकारचं ऋण असतं ! या ऋणाच्या सहाय्यानं स्वतःचं सुख आणि स्वास्थ्य संपादण्याचा त्याला अधिकार असेल तर आपल्या इतर बांधवांची उत्क्रांति करण्याच्या कामीं या विद्याधनाचा उपयोग करणं हें त्याचं कर्तव्य ठरतं. पीतांबराच्या पूर्वपण्डितांनीं ‘ दुसऱ्यासी शिकवावें, आणि शहाणे करूनी सोडावें, सकल जन ’ हें विद्यावंतासाठीं लिहून ठेवलेलं वचन पीतांबराला ठाऊक होतं, एवढंच नव्हे तर त्यानं तें आपल्या लेखन भाषणांत उद्धृतहि केलेलं आहे. त्यामुळेंच हा विद्यावंत आपणांस ज्ञानामृत पाजून अभ्युदयाचा योग्य मार्ग दाखवील अशी अपेक्षा याच्या सामान्य बांधवांनीं मनाशीं धरली. परंतु यानं ती पूर्ण केली नाहीं. उलट अभ्युदयाचा मार्ग दाखविण्याऐवजीं ते अधोगतीकडे ढकलले जातील अशी उक्ति आणि कृति याच्या हातून घडली आहे. याच्यावर मी अपेक्षाभंगाचा आरोप केला तो यासाठींच ! ”

“ देवाधिदेवा, चित्रगुप्तांच्या या खुलाशावर माझं समर्थनहि श्रवण करावं अशी मी या धर्मपीठाला प्रार्थना करितों. मी संपादन केलेली विद्या ही माझ्या सुखस्वास्थ्यासाठींच केवळ आहे असं मी कधींहि समजलों नाहीं. आपल्या देशबंधूंपैकीं सर्वांनाच विद्यासाधन करितां येत नाहीं आणि आपल्या व आपल्या समाजाच्या हिताचं कर्तव्य कोणतं याचं आकलन त्यांना होत नाहीं, म्हणून आपण संपादिलेल्या ज्ञानाचा प्रदीप पाजळून त्यांना योग्य मार्गदर्शन केलं पाहिजे हें माझं कर्तव्य मला माहीत होतं ! लोकांनीं माझ्याकडून अशा अपेक्षा बाळगिल्या नसत्या, तरी कर्तव्य म्हणून मीं हें कार्य केलंच असतं आणि केलंहि आहे ! चित्रगुप्तांना माझं कर्तव्यपालन दिसत नसलं तरी मी हें प्रत्यक्ष पुराव्यानं सिद्ध करून द्यायला तयार आहें. माझा आतांपर्यंतचा लेखनसंभार हाच माझ्या कर्तव्यपालनाचा प्रत्यक्ष पुरावा आहे. माझ्या ठिकाणीं विद्यार्थिदशेंतच ही कर्तव्यजागृति झाली आणि मी पूर्ण विद्यासंपन्न होण्याची वाट बघत न बसतां

तेव्हांपासूनच माझं लेखन सुरू केलं. माझं लेखन लोकप्रिय झालं आहे आणि विद्यमान लेखकांत आज माझा प्रथमश्रेणींत उल्लेख होतो ही गोष्ट चित्रगुप्तांनाहि मान्य करावी लागेल." "पीतांबर," चित्रगुप्त म्हणाला. "मानवलोकांत शब्दांच्या कसरतीनं न्यायदेवतेची दृष्टि धुंद करतां येतें आणि खरी वस्तुस्थिति पाहण्याची कुवत तिच्या ठिकाणीं उरत नाहीं. पण इथं दिव्यदृष्टीचे धर्ममहाराज आणि आपल्या ज्ञानदृष्टीनं दृष्टीपुढलंच नव्हे तर दृष्टीआडचंहि विश्व शोधून पाहाणारे देवगुरुसारखे सदस्य उपस्थित आहेत. तूं अखंड आणि विपुल ग्रंथलेखन केलंस. आणि त्यामुळं पहिल्या श्रेणींतला लेखक असा तुझा बोलबाला झाला आहे असं तूं म्हटलंस, तें मलाही मान्य असलं तरी तुझ्यावरील दोषारोप दूर होऊं शकणार नाहींत. तूं किती लिहिलंस हा प्रश्न नाहीं. काय लिहिलंस हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्या देशांत तुझा जन्म झाला तो देश दुर्दैवानं परवशतेचे प्रहार सहन करीत आहे. परवशतेच्या या यमयातनांतून मुक्त होण्याचं सामर्थ्य आपल्या देशबांधवांत येईल अशा तऱ्हेचं तेजस्वी साहित्य तूं निर्माण केलं आहेस काय ? संपत्ति आणि सत्ता यांच्या हव्यासानं बहुजनसमाजावर बलात्कार करणाऱ्या वर्गाच्या तावडींतून आपल्या देशबांधवांना कसं मुक्त होतां येईल आणि समान अधिकारानं सर्वांना सुखानं कसं राहतां येईल याचा मार्ग तूं त्यांना कधीं दाखविला आहेस काय ? भाबड्या धर्मकल्पनांच्या आणि अडाणी रूढीच्या चिमट्यांत सांपडून जनता प्रज्ञाहत होत असतांना त्यांची विचारजागृति करण्यासाठीं तूं कधीं आपली वाणी आणि लेखणी राबविली आहेस काय ? तूं निर्माण केलेल्या साहित्यांतून अशा तेजस्वी वाङ्मयाचे चार दोन चुटके काढून दाखविलेस तरी मी तुझ्यावरील आरोप मागें घेईन. तुझ्या वाङ्मयांतून बलशाली वर्गाची स्तुतिस्तोत्रं, आषुकमाषुकांच्या शृंगारचेष्टा, आणि आपल्याच लाग्याबांध्याच्या मंडळींच्या कुचेष्टा भरलेल्या आहेत. श्रीमंतांकडून मिळणाऱ्या लांचलुचपतींच्या हव्यासानं तूं त्यांच्यावर, त्यांच्या राण्यांवर आणि पोराबाळांवर स्तुतिसुमनं उधळलीं आहेस. सत्ताधारी अधिकाऱ्यांना नसते गुण चिकटवून तूं त्यांचीं मानपत्रें लिहून काढलीं आहेस. त्यांनीं केलेल्या गरिबांच्या गांजणुकीकडे आणि त्यांनीं

केलेल्या अमानुष अत्याचाराकडे तुझी दृष्टि वळलेली नाहीं, किंवा त्या विषयापुरतं तूं डोळ्यावर कातडं ओढून घेतलंस. एवढंच करून तूं थांबला नाहींस, तर आपल्यावर होत असलेल्या जुलूमजबरदस्तीचा त्वेष त्यांच्या मनांत भडकूं नये म्हणून तरुणतरुणींच्या प्रेमकथा त्यांच्यापुढं फेंकून तूं त्यांतच त्यांना गुंगवून ठेवण्याचा अपराध केलास. धनमदानं आणि सत्ताबलानं शेफारलेल्या लोकांना दटावण्याचं धैर्य आपल्या देशबांधवांत उत्पन्न करण्याचं कार्य तुला करतां आलं असतं. देवधर्माच्या भाबड्या कल्पनांनीं भारावलेल्या, रूढीच्या बंधनानं जखडलेल्या, आणि म्हणूनच हतबल बनलेल्या देशबांधवांना तूं विचारसंपन्न आणि कर्तृत्वशाली बनवूं शकला असतास. तुझ्याकडून याच महत्कार्याची अपेक्षा तुझ्या बांधवांनीं बाळगिली होती. पण ती तूं सर्वस्वी विफल केली आहेस!"

"माझ्या काव्यकथासंग्रहावर आणि कादंबऱ्यांवर अलीकडील कांहीं कुत्सित टीकाकारांनीं केलेल्या टीका वाचून चित्रगुप्तांनीं माझ्यावर हे आरोप केले आहेत असं मला वाटतं. पण लोकजागृतीसाठीं मीं कांहींच केलं नाहीं असं त्यांना म्हणतां येणार नाहीं. मी काढलेलं आणि कित्येक दिवस चाललेलं "ज्ञान-निर्झर" हें पत्र याची साक्ष देईल. जगाचा दैनंदिन जीवनक्रम लोकांना स्पष्टपणें दाखवून जग कुठं चाललं आहे याचं ज्ञान ज्ञाननिर्झराच्या द्वारें मी माझ्या देशबांधवांना दिलेलं आहे. आठवड्यांतून एकदांच वाचकबंधूंची सेवा करून माझी तृप्ति होईना म्हणून मी ज्ञाननिर्झर द्विसाप्ताहिक केला. आणि तो दैनिक करून लोकजागृतीचं कार्य प्रत्यहीं करण्याची माझी महत्त्वाकांक्षा होती. परंतु ज्ञानामृत पाजूं लागलों तरी तें पिण्याला माझे देशबंधूच उत्सुक नव्हते. त्यांनीं मला अवश्य तें प्रोत्साहन दिलं नाहीं. या प्रोत्साहनाच्या अभावीं माझ्या अंगांत होतं तेवढं सामर्थ्य संपेपर्यंत मी दम धरला आणि अखेर "गाढवापुढं गीता गाण्यांत अर्थ नाहीं" ही अक्कल शिकून मी ज्ञाननिर्झर बंद करून टाकला. देवाधिदेवा, अपेक्षाभंग झाला असेल तर माझा झाला आहे. लोकद्रोह झाला असेल तर लोकांनींच माझ्याशीं द्रोह केला आहे."

"देवाधिदेवा, 'पडला तरी नाक वरच आहे' असं म्हणून वितंडवाद खेळणारी संपादकीय खोड या पीतांबर दाणीच्या रक्तांत भिनून गेल्यामुळें

पुरावा उलट गेला तरी हा आपला पराजय कबूल करणार नाहीं. परंतु याच्या ज्ञाननिर्झराचीं पापं नांवनिशीवार धर्मपीठापुढं मांडल्यावर तरी हा आपले अपराध मान्य करतो कां हें मी पाहणार आहे. हें मला अनुज्ञा असावी."

धर्मराजांनीं अनुज्ञा दिल्यावर चित्रगुप्त आणि पीतांबर दाणी यांचीं प्रश्नोत्तरें सुरु झालीं.

"दहा वर्षांमागं 'वाळूतलं तेल' नांवाची तुझी कादंबरी प्रसिद्ध झाली आणि ती तुझ्या अपकीर्तीला कारण झाली—"

"खोटी गोष्ट. "माझ्या 'वाळूतलं तेल'चा तडाखेबंद सेल झाला. एक वर्षांत दुसरी एडीशन काढावी लागली आणि ती मी काढलीहि"

"चित्रगुप्ता, 'तडाखेबंद सेल' आणि 'एडीशन' असं यानं कायसं म्हटलं! देववाणीजन्य मराठी ही मायबोली देऊन याला नरलोकीं पाठविण्यांत आलं होतं ना! त्या मराठी मायबोलींत हे शब्द नाहींत. मग हा अशी भाषा कां बोलतो?" देवगुरूच्या समीप बसलेल्या ज्ञानी आणि तपःसंपन्न सदस्यांनीं विचारिलें.

"पीतांबर," चित्रगुप्त म्हणाला. या धर्मपीठाला प्राणिमात्रांची कोणतीही भाषा अवगत आहे. भारतवर्षांतील तुम्हां विद्वानांना परधार्जिणी भाषाभेसळ पांडित्यदर्शक वाटली तरी या धर्मसभेला मायबोलीशीं केलेली ती प्रतारणा वाटते. म्हणून तुझ्याकडून हा प्रतारणादोष घडूं नये याबद्दल तूं दक्षता घेणं योग्य नाहीं का?"

"प्लीज एक्स्क्यूज!" पीतांबर शरमून बोलूं लागला.

"पुनः तोच प्रमाद!" चित्रगुप्तानें त्याला मध्येंच अडविलें आणि धर्मपीठाला प्रार्थना केली. "भाषाव्यभिचार हा वर्षानुवर्षे याच्या रक्तांत इतका भिनला आहे कीं, तो त्याचा स्वभावच होऊन बसला आहे. माझ्या एकाद्या सूचनेनं त्याची पकड ढिली होणार नाहीं." देवगुरुप्रभृतींनीं हा जसें बोलेल त्यांतून याचं मनोगत समजून घ्यावं"

"तथास्तु." म्हणून देवगुरूंनीं अनुमति दिल्यावर पीतांबर बोलूं लागला—

"माझं 'वाळूतलं तेल' बघतां बघतां खपलं! त्याची दुसरी आवृत्ति

काढावी लागली, हें मला सांगायचं होतं. पुस्तकाची अशी विक्री आणि त्याचं पुनःप्रकाशन या गोष्टी लेखकाला अपकीर्तीकारक नाहींत. "

" पण पुस्तकांशीं एवढ्याच गोष्टींचा संबंध असतो असं कां तुला सांगायचं आहे ? तुझी कादंबरी तूं एका प्रकाशकाला देऊं करून अधिक पैशाच्या आशेनं दुसऱ्याला दिलीस आणि आपल्या पुस्तकाच्या लोकप्रियतेची आणि खपाची खोटी जाहिरात करण्यासाठीं शिलकी प्रतींवरच ' दुसरी आवृत्ति ' अशीं अक्षरं छापलींस. तुझ्या या लबाडीचा बभ्रा झाला. तूं उत्तर देण्याची धडपड केलीस पण मुद्रकांनीं आणि पुस्तकविक्रेत्यांनीं तुझ्या विरुद्ध साक्षी दिल्या. तूं लोकप्रिय लेखक म्हणून मिरवतां मिरवतां लबाडीचा डाग लावून घेतलास ! होय ना ? "

पीतांबर चरकला. त्याची चर्या पडली. चित्रगुप्ताच्या प्रश्नाला ' होय ' हें उत्तर देण्यावांचून गत्यंतर नव्हतें. पण लबाडीचा आरोप मान्य केला तर नवेंच एक लफडें चिकटेल अशी त्याला भीति वाटली आणि तो धर्मराजांना उद्देशून म्हणाला:—

" देवाधिदेवा, माझ्यावर चित्रगुप्तांनीं अपेक्षाभंग आणि लोकद्रोह असे आरोप केले आहेत. त्याच्याशीं या व्यवहाराचा कांहींहि संबंध नाहीं. मुद्दा सोडून भलत्याच गोष्टी उकरून काढण्यांत हे धर्मपीठाचा बहुमोल काळ वायां दवडीत आहेत. मुख्य गोष्टीशीं संबंध नसणारे प्रश्न यांनीं मला विचारतां कामा नयेत अशी देवाधिदेवांनीं चित्रगुप्तांना आज्ञा करावी. "

" पीतांबर, अशा आज्ञेची मला अवश्यकता नाहीं. अकारण कालहरण करायचं नाहीं ही गोष्ट मला कळते; कारण थोड्या वेळांत अनेक जीवांचे निवाडे या पीठाला करायचे असतात; म्हणून योग्य कारणासाठींच प्रत्येक क्षण आम्हांला वेंचावा लागतो. परंतु तुझ्यासारखे वितंडवादी प्राणी भेटल्यावर वेळेची उधळपट्टी करण्यावांचून गत्यंतर उरत नाहीं. केलेले आरोप निर्विवादपणें पदरांत टाकल्यावांचून धर्मपीठाचा निर्णय दिला जात नाहीं. निर्णय देण्यांत घाई केली तर आपला पुरावा देण्यास आपणाला भरपूर संधि मिळाली नाहीं अशी आरोपीची तक्रार राहातें. या पीठांत तक्रारीला जागा राहतां कामा नये, अशी धर्ममहाराजांची आज्ञा आहे. म्हणूनच सकृद्दर्शनीं मूळ मुद्यांशीं असंबद्ध पण त्यांवर अवश्य तो प्रकाश

पाडणारे प्रश्न विचारणं मला भाग पडत आहे. " वाळूंतलं तेल " या तुझ्या कादंबरीचें प्रकरण मी एवढ्याचसाठीं काढलं आहे कीं त्यामुळें उडालेला तुझ्या लोकप्रियतेचा बोजवारा झांकण्यासाठीं तूं ज्ञाननिर्झर सुरू केलास. लोकांची विचार-जागृति करणं हा तुझा खरा उद्देश नव्हता. आपल्या भगतगणांतल्या कांहीं श्रीमंत तरुणांना जमवून तूं त्यांना सांगितलंस, कांट्यानं कांटा काढायचा झाला तर टीकाकार-वृत्तपत्रांना, वृत्तपत्रीय टीकेनंच गप्प बसविलं पाहिजे आणि त्यासाठीं स्वतःचं वृत्तपत्र पाहिजे. पैसा असता तर मी असं पत्र काढलं असतं ! विरोधकांचीं तोंडं गप्प केलीं असतीं ! या तुझ्या आमिषावर भाळून तुझ्या श्रीमंत भगतगणांनीं ज्ञाननिर्झर काढायला तुला द्रव्यसहाय्य केलं. "

" माझा वैयक्तिक फायद्याचा असा हेतु असला तरी 'लालित्य व सुविचारपूर्ण वाङ्मयाचा समाजास लाभ देण्याचा उद्देश मी ज्ञाननिर्झराच्या प्रथमांकांतच घोषित केला होता; व तो मी केव्हांही विसरलों नाहीं. परमार्थ साधतां साधतां स्वार्थ साधला तर तो अपराध होतो काय ? "

" नाहीं. प्राणिमात्र स्वहिततपर असतो तसाच तूंहि असलास तर तो दोष नव्हे. पण प्रश्न आहे तो तूं स्वार्थ साधण्यासाठीं परमार्थाचा घात केलास कीं काय हा आहे. आणि तसा तूं केलास हा माझा दावा आहे. ज्ञान-निर्झरांतील तुझ्या घोषणेमुळं खरोखरच आतां लालित्यपूर्ण आणि सुविचार-परिप्लुत वाङ्मयाची मेजवानी झोडायला मिळणार अशी अपेक्षा लोकांच्या मनांत प्रादुर्भूत झाली. परंतु तूं तिचा चक्काचूर केलास. तुझ्यावरील टीका परतविण्यासाठीं तुझ्या टीकाकारांवर तूं प्रतिटीका सुरू केलीस. दुसऱ्याचे दोष दाखविले म्हणजे आपण निर्दोषी ठरूं हा तुझा विचार सुविचार नसून कुविचार होता. स्वतःच्या समर्थनासाठीं तूं ज्ञाननिर्झराचे एकदोन रकाने प्रसंगविशेषीं खर्चीं घातले असतेस तर तें क्षम्य ठरलं असतं ! परंतु टीका-कारांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यांतच तुझी सर्व शक्ति वायां जात होती. आघातास प्रत्याघात हा जगाचा नियम, तसा प्रत्याघाताला फिरून आघात हाहि नियम मानावा लागेल. पण विचारी म्हणविणाऱ्या आणि सुविचार प्रचाराचं व्रत स्वीकारलेल्या तुझ्यासारख्या विद्यावंतानं आघात प्रत्याघातांची धमाल अखडपणें चालूं ठेवणं असमंजसपणाचं आहे हें समजायला नको?

काय? खरे ज्ञानी लोक वादाच्या फंदांत पडत नाहींत आणि पडले तरी तत्त्वापुरताच वाद करून मोकळे होतात. पण तूं वाद हें आपलं वैशिष्ट्य मानून वादच खेळत राहिलास. तुझ्या टीकाकारांनाही तूं त्यामुळें वादलोभी बनवलंस! वृत्तपत्रसंस्थेचं पवित्र कर्तव्य म्हणजे जनतेच्या सार्वजनिक हिताहिताच्या प्रश्नांची चर्चा करून करून सन्मार्गदर्शन करणें हें! परंतु, तूं स्वतः आपली प्रतिष्ठा वाढविण्यासाठीं आणि प्रतिस्पर्ध्याची टवाळी करण्यासाठीं आपल्या वृत्तपत्राचा दुरुपयोग केलास! आणि प्रतिस्पर्ध्यालाहि तो करायला लाविलास! एकाऐवजीं दोन वृत्तपत्रांचा दुरुपयोग केल्याचा दोष तुझ्याकडेच आहे. पवित्र वृत्तपत्रसंस्थेचं विडंबन तूं केलं आहेस. तूं धर्मराज असशील किंवा तुझे प्रतिस्पर्धी दुर्योधन असतील. तुम्हीं दोघेहि धर्मराज आणि दोघेही दुर्योधन असलां तरी लोकांचा त्याच्याशीं काय संबंध होता? लोकांना पाहिजे होतं 'आपल्या पोटाचा प्रश्न कसा सुटेल?' देशभर पसरलेल्या मतामतांच्या गलबल्यांत ग्राह्य कोणतं व अग्राह्य कोणतं हें तुम्हीं सांगावंत! यासाठींच, वर्गणीचं मोल देऊन त्यांनीं तुमचीं पत्र विकत घेतलीं. पण तुम्हीं त्यांची फसगत केली. सन्मार्ग दाखविण्याऐवजीं 'गाढवांचा गोंधळ' मात्र दाखविला! सुशिक्षितांनीं ग्राम्यपणा कसा करावा याचा वस्तुपाठ दिलात! वादाच्या कैफांत संस्थेच्या पावित्र्याकडं जसं तुमचं दुर्लक्ष झालं तसं दिलेल्या लालित्यपूर्ण वाङ्मयानं जनमनाचं रंजन करण्याऐवजीं सामान्यजनांना, गालिप्रचुर ओंगळ भाषा मात्र तूं शिकविलीस. साध्या नामाक्षरांतूनही शिव्या निर्माण करण्याचं तुझं कौशल्य अभिनव असलं, तरी स्वागतार्ह खचित नाहीं. रामचंद्र मोरेश्वर शितूत या आपल्या व्यवसायबंधूची "रा. मो. शी." संपादक म्हणून तूं कुटाळकी केलीस तर त्यानं "पि. ग. दाणी" म्हणून तुझी विटंबना केली. बहुजन समाजांत सदभिरुचि वाढवावी हें तुझं कर्तव्य होतं आणि तूं तें करशील अशी लोकांची अपेक्षाहि होती. तूं तिचा भंग केलास! सरस्वतीची वाङ्मय सुमनांनीं पूजा करण्याऐवजीं तूं तिच्यांवर शिवीगाळीचा शेणकाला फेंकलास! लोकांनाहि फेंकायला लावलास! मी सांगितल्या या गोष्टी झाल्या आहेत ना?"

चित्रगुप्तानें दहावीस पळें पीतांबराच्या उत्तराची वाट पाहिली, व तो कांहींच बोलत नाहींसें पाहून तो पुढें म्हणालाः—

"तुझ्या मौनावरून माझा आरोप तुला अमान्य तरी करतां येत नाहीं असं स्पष्ट दिसतं. आतां दुसऱ्या आरोपांविषयींचे माझे पुरावे मी न्यायपीठापुढें मांडतों.

"तुझा 'ज्ञाननिर्झर' सुविचारप्रसारासाठीं तूं निर्माण केलास असं तूं सांगितलं आहेस. तुझ्या जन्मभूमीला विकल करणारे प्रश्न इतके असंख्य आहेत आणि जनता त्यानं इतकी भांबावून गेली आहे कीं शहाण्यांना देखील काय करावं हें कळत नाहींसं झालं आहे. एकेक प्रश्नावर प्रकाश पाडून तेवढ्यापुरतं मार्गदर्शन करायला देखील तुझ्या ज्ञाननिर्झराएवढी शेंकडों पत्रं लागतील. पण तुझ्या ज्ञाननिर्झराची चिमुकली शक्ति तरी अशा उपयुक्त कार्याकडं तूं वेंचलीस काय? तुझ्या पत्राच्या आठ पृष्ठांतल्या चार पृष्ठांचा उपयोग तूं जाहिरातींकडे केलास. जिवंत राहण्याचं साधन म्हणून जाहिराती घ्यावयास लागणार हें मला मान्य आहे. शिवाय राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीला प्रसिद्धि पाहिजेच असल्यानें जाहिराती देणं ही राष्ट्रसेवाच होय असं मानायलाहि मी तयार आहें. पण प्रसिद्धीकरण देखील गुणांचं व्हावं; दुर्गुणांचं नव्हे हा सारासार विचार संपादकाला पाहिजे. जीवितांतील वाजवी उणीव भरून काढण्याचं सात्त्विक समाधान देण्याचं सामर्थ्य ज्या वस्तूंत किंवा कार्यांत असेल त्याची प्रसिद्धि मी कधींच निषिद्ध म्हणणार नाहीं. पण वशीकरण यंत्र, मंतरलेले ताईत, ज्यांना वैद्यशास्त्राचं ज्ञान यथायथाच अशा लोकांनीं बनविलेलीं आणि मुळींच गुण न देणारीं किंवा अपाय करणारीं औषधें यांच्या जाहिराती नियतकालिकांनीं प्रकाशित करणं हा तीव्र स्वरूपाचा लोकद्रोह होय. अशा जाहिरातींतून उरलेली जागा तरी योग्य कारणीं लावायची दक्षता तूं घ्यावयास पाहिजे होतीस. पण प्रथम सांगितलेल्या परस्परांच्या गालिप्रचुर ओंगळ मजकुरानं तूं ती खराब करीत आलास. आपलं पत्र हें विशाल जनसमूहाच्या सेवेसाठीं आहे ही संपादकाची खरी जबाबदारी लक्षांत न घेतां वर्तमानपत्र हें माझी एकट्याची खुमखुमी जिरविण्यासाठीं आणि माझ्या प्रतिस्पर्ध्यांची बदनामी करण्यासाठीं आहे, असा अहंकार तूं आपल्या मनांत बळावूं दिलास. पीतांबर दाणी मेला काय आणि रामभाऊ शितूत चिरंजीव झाला काय लोकांना त्याचं सुतक तितकेंच. आज मरून इथं परलोकांत आला आहेस पण तुझी

आठवण सुद्धां उद्यां लोकांना होणार नाहीं. तुझीच नव्हे, तुझ्यासारख्या सर्व संपादकांची ही अवस्था असते,ही गोष्ट तुझ्यासारख्या बुद्धिमान् व विद्यासंपन्न माणसानं ध्यानांत ठेवायला हवी होती, व स्वतःचं फाजील स्तोम माजवायला नको होतं. आत्मस्तुति आणि परनिंदा यातून उरलेली जागा चित्रपटांची स्तुति — ओकारी येण्याइतकी आणि येण्यासारखी स्तुति—करण्याकडे तूं खर्चिलीस. खरी कलाकृति आणि खरे कलावंत यांचं कौतुक करणं, त्यांना प्रोत्साहन देणं, उचित कर्तव्य आहे. पण गुणावगुण न पाहतां गुणगानच करीत सुटणं हें विवेकशून्यतेचं आणि लाचारपणाचं निदर्शक आहे. चित्रपट सदभिरुचीला आल्हाद देण्याइतका कलापूर्ण, सामाजिक, उत्कर्षप्रेरक असेल तर त्याची प्रशंसा जशी करायची तशीच समाजांतल्या हीन प्रवृत्ति बळावणाऱ्या सुधारणेऐवजीं कुधारणेकडेच लोटणाऱ्या चित्रपटांचा धिक्कार करणं तुझं नैतिक कर्तव्य होतं. पण तूं तें प्रामाणिकपणें बजावलं नाहींस विचारवंतांच्या कपाळावर आठ्यांचं जाळं पसरेल अशा गचाळ शब्दांनीं व चित्रांनीं बुजबुजलेल्या चित्रपटांचाहि ' महान् बोलपट ' म्हणून तूं जयजयकार करीत सुटलास. ज्यावेळीं चित्रपटगृहं प्रेक्षकांवांचून ओस पडलेलीं असत, त्यावेळींहि त्या बोलपटाचा ' तुफान गर्दीचा आठवडा ' म्हणून डांगोरा पिटीत सुटलास. ज्ञानप्रसाराची आणि सदभिरुचीच्या वाढीची लोकांची भूक भागविण्याऐवजीं अडाणीपणांत लोकांना गुरफटून ठेवून ओंगळाची चटक तूं त्यांना लावलीस यांत लोकांचा अपेक्षाभंग आणि लोकांचा द्रोह हे दोन्ही अपराध तुझ्या हातून घडले.

" पीतांबर, तुझ्या कर्तव्यच्युतीचा आणखी एक दाखला देऊन मी माझं भाषण आटोपतं घेणार आहे. खोट्या आणि म्हणूनच फसव्या जहिरातींनीं तूं आपल्या बांधवांची बुद्धि-हत्या केलीस तशीच भविष्यकथनांनींहि केलीस. मनुष्य हा स्वतःच्या दैवाचा नियंता आहे. अब्जावधि कोसांवरील आकाशस्थ ग्रहांचा तो अंकित नाहीं हें सुशिक्षितांनीं अशिक्षितांना पढवणं आणि स्वतःच्या भाग्योदयासाठीं त्यांना कार्यप्रवृत्त करणं हें त्यांचं कर्तव्य आहे. परंतु, जीं कधींच खरीं ठरत नाहींत अशीं भविष्यें देऊन तूं त्यांना दैववादी, पराक्रमशून्य बनविण्याचा घोर अपराध केला आहेस. एकाद्याचा शिरच्छेद करण्यापेक्षां, भाबड्या दैववादाच्या विषानं लक्षावधि लोकांची

अशी बुद्धिहत्त्या करणं हें तुझ्यासारख्या विद्यावंताचं महत्पातक होय; यांत नुसता लोकद्रोहच नाहीं तर लोकहत्त्या आहे.

“ ज्ञाननिर्झर आटला तो लोकांना त्याची योग्यता पटली नाहीं म्हणून, असं तूं म्हणालास; पण ही गोष्ट निखालस खोटी आहे. वाघाचं कातडं पांघरून वाघ होण्याचा अव्यापारेषु व्यापार तूं केलास; आपणहि टिळक गांधीसारखेच वीरपुरुष आहों असं दाखविण्याची तुला हुक्की आली. इतर कारणांमुळं ओढवून घेतलेली अप्रीति दूर करण्यासाठीं देशाभिमानाचं नाटक करणं तुला अवश्यहि वाटलं असेल. राज्यकर्त्यांना झोंबणारीं चारदोन वाक्यें तूं खरडलींस आणि जामिनकीचं लफडं आपल्यामागें लावून घेतलंस तें तुझ्या पथ्यावरच पडलं ! तुझा, आखडत आलेला आणि लोकांच्या मनांतून उतरलेला ज्ञाननिर्झर सरकारच्या निषेधार्थ तुला यामुळं बंद करतां आला. अनेकांचीं तुंबलेलीं देणीं डुबवितां आलीं. फायदा करून घेऊन नुकसानीचं नाटक रंगवितां आलं. तुझा तूं म्हणतोस तसा द्रोह कोणीहि केलेला नाहीं. धर्म महाराज, आणि देवर्षि–सदस्यहो, पीतांबर दाणीची जीवनकथा मी निवेदन केली. मी सांगितलेल्या गोष्टी घडलेल्याच नाहींत असं याचं म्हणणं असेल तर याच्या पापाचं माप निर्विवादपणें याच्या पदरांत घालण्यासाठीं मला कांहीं साक्षीदार बोलावण्याची अनुज्ञा व्हावी; प्रथमतः भूलोकावरून इकडे आलेलेच कांहीं साक्षीदार बोलवीन. माझा पहिला साक्षीदार भोलाराम करमरकर आहे. पीतांबराच्या “ प्रेमपूर्ति ” कादंबरीनं याला माणसांतूनच नव्हे तर मनुष्यलोकांतूनहि उठवलेलं आहे. ‘ मनांत आलेल्या युवतीची प्राप्ति करून घेण्यांतच प्रीतीचं खरं साफल्य आहे हें प्रेमपूर्तीच्या नायकाचं म्हणणं भोलारामाच्या मनांत भरलं आणि आपणांस हवीशी वाटणाऱ्या एका ख्रिस्ती तरुणीशीं यानं अतिप्रसंग केला. तिनं खेटरपूजा बांधल्यामुळं वैतागून यानं तलावांत आत्महत्त्या केली. आतां तो नरकवासांत काल कंठीत आहे. माझी दुसरी साक्षीदारीणहि अशीच कोठेंतरी नरकयातना भोगीत असून तिचं नांव ‘ मंदा गुंडाळे ’ आहे. पीतांबरच्या कादंबरींतील नायिका ती आपणच अशी समजूत करून घेऊन तिनं आपल्या जन्माचा खेळखंडोबा करून घेतला आहे—”

" पण स्वत: माझी इतकी शोभा केल्यावर या साक्षीदारांकडून माझ्या वर निंदा-वर्षाव करण्याची अवश्यकता काय? चित्रगुप्तांनीं कथन केल्या-प्रमाणें गोष्टी घडल्या हें मी नाकारीत नाहीं. मला सांगायचं आहे तें इतकंच कीं, नरकलोकांतला मीच एकटा या मार्गानं गेलेला नाहीं. दहा-जणांनीं जें केलं, दहाजण जसें चालले तसाच अकरावा! "

" पीतांबर, " देवगुरू म्हणाले " दहाजणांतला एक असणं म्हणजे निरपराधी असणं नव्हे. प्रत्येक प्राणी स्वतंत्र असतो आणि त्याच्या पाप-पुण्याप्रमाणें त्याला गति मिळायची असते. एकदा विद्याहीन प्राणी समुदा-याप्रमाणें चालल्याची सबब सांगेल तर ती विचारांत घ्यावी लागेल. कारण, बरंवाईट निवडण्याइतकी पात्रताच त्याच्या ठिकाणीं नसणार—ही गोष्ट धर्म-निर्णयाच्या वेळीं विसरतां येणार नाहीं. पण बुद्धिमान् आणि विद्वान् माण-साला ही पळवाट मिळूं शकत नाहीं. यमधर्मा, चित्रगुप्ताच्या म्हणण्याप्रमाणं पीतांबर दाणी हा प्राणी अपराधी आहे असं माझं मत आहे आणि त्याला शासन करणं हें कर्तव्य तूं करावंस असं माझं म्हणणं आहे. "

" देवगुरु, बुद्धिमान् आणि विद्वान् असून हा निर्बुद्धासारखा वागला. आणि स्वबांधवांच्या अनहिताचं कार्य याच्या हातून घडलं! याचं हें वर्तन म्हणजे महापातकासारखं मला वाटतं! म्हणून याला सूर्यमानाप्रमाणं एक संवत्सरभर प्रत्यहीं एक घटका तप्त शूलावर बांधून ठेवण्यांत येईल. या कालानतर गृध्रजन्म घेऊन मृतपशूंच्या कुजक्या मांसावर याला जीव जगवावा लागेल आणि कर्दमस्थ कृमिकीटकांच्या शतजन्मानंतर याला कोणत्या उच्च योनींत जागा देतां येईल हें सांगितलं जाईल. चित्रगुप्ता, पीतां-बरची पाठवणी योग्य स्थलीं कर आणि दुसऱ्या प्राण्याला धर्मनिर्णयार्थ सादर कर. "

" धर्ममहाराज, या प्राण्याचं नांव सुकुमार मदने; हा हिंदुस्थानांतल्या एका महाविद्यालयांत प्राध्यापक होता. गतजन्मीं हा पॅरिस या विलासी शहरांतल्या एका वेश्येचा आवडता कुत्रा होता. याचा देह खिशांत घालून मिरवितां येण्यासारखा चिमुकला होता. त्या संपन्न वेश्येच्या लोभामुळं याला खाद्यपेयांची चंगळ होती. इतरांच्या दृष्टीनं याचं जीवन वैभवशाली आणि विलासपूर्ण होतं. परंतु तिच्या घरीं याच्या वांट्यास सक्तीचं ब्रह्मचर्य आलेलं होतं. मालकिणीच्या आणि तिच्या वल्लभांच्या शृंगारचेष्टा याच्या नजरेस सदैव पडत, आणि त्या याला बोलून दाखवितां येत नसल्या, तरी याच्या अंतर्यामींच्या स्वाभाविक प्रेरणा, त्या उद्दीपित करीत. त्यांची तृप्ति करून घेण्याची शक्यता मात्र याच्या हयातींत निर्माण होऊं शकली नाहीं. एक तर मालकीण याला आपल्या नजरेआड होऊं देत नसे, आणि क्वचित् प्रसंगीं एखादी शुनी पाहून हा तिच्या लोभानं तिच्याजवळ गेला, तरी शरीरवैषम्यामुळं याला हिरमुसला होऊन परत यावं लागे. ती श्वानसुंदरी वल्लभ म्हणून याच्याकडं पाहण्याऐवजीं बाहुली समजून याच्याशीं खेळूं लागे आणि आपल्या पोटापायांखालून याला नाचवून ती आपल्या मनाचं रंजन करून घेई. तुल्यदेही जोडीजारीण याला कधींच मिळूं शकली नाहीं आणि स्त्रीसुखापुरता हा उपाशीच राहिला. धनीणीशीं करावी लागणारी लाचारी आणि नैसर्गिक क्षुधेची उपासमार या दोन छलांबद्दल यानं धर्मपीठापुढं गाऱ्हाणं मांडलं आणि तें वाजवी वाटलं म्हणून धर्ममहाराजांनीं याला हिंदभूमींतील महाराष्ट्र नामक प्रदेशांत नरजन्म दिला. कारण या प्रदेशांत बायकोवांचून पुरुष सहसा राहूं शकत नाहीं. मानानं जगतां येईल अशी विद्यासंपन्नता याला प्राप्त व्हावी असं वरदानहि धर्ममहाराजांनीं याला दिलं; पण नरजन्मांत गेल्यावर यानं या दोन्ही वरांचा सदुपयोग केला नाहीं. विद्यासंपन्न होऊनही हा मूर्खच राहिला, आणि अनुरूप सहचारिणी लाभली असूनहि हा सुखी होऊं शकला नाहीं, तिला सुखी करूं शकला

नाहीं. या जन्मांत यानं अनंत दुष्कर्मं केलीं. त्यांतल्या एकेकाबद्दल स्वतंत्र निवाडा द्यावयाचा झाला तर धर्मपीठाचं अमर्याद कालहरण होईल, म्हणून सर्व अपराधांची गोळाबेरीज म्हणतां येईल असा ' अमानुषता ' हा एकच आरोप मी याच्याविरुद्ध मांडतों, आणि धर्मपीठानं तेवढ्यावरच निवाडा करावा अशी मी प्रार्थना करितो. "

" सुकुमार, चित्रगुप्ताचं म्हणणं तूं ऐकलंस. तुझ्या हातून अनंत दुष्कर्मं घडलेलीं असलीं तरी त्या प्रत्येकाबद्दल तुला जबाब द्यायला लावावं अशी चित्रगुप्ताची इच्छा नाहीं. याबद्दल तूं त्याचे आभारच मानले पाहिजेस. पण चित्रगुप्तानं तुझ्यावर ठेवलेला अमानुषता हा आरोप साधा-सुधा नसून गंभीर स्वरूपाचा आहे हेंहि तूं लक्षांत ठेवलं पाहिजेस. मनुष्य असून मनुष्यासारखं न वागणं किंवा मनुष्य असून पशूसदृश आचरण करणं अशी अमानुषतेची सुटसुटीत व्याख्या करतां येईल. तुझं मनुष्य जन्मांतलं आचरण या व्याख्येंत बसूं शकत नाहीं, हें तुला दाखवून देतां येत असेल तर पहा! तूं आपलं निरपराधित्व सिद्ध करूं शकलास तर तुझ्याहून चित्रगुप्ताला अधिक आनंद होईल. भूलोकींच्या कोतवालांना ताबडींत सांपडलेला आरोपी दोषमुक्त होऊन सुटला तर मरणप्राय दुःख होतं. एका आरोपांतून तो निरपराधी ठरला, तरी दुसऱ्या आरोपाखालीं त्याला जखडून ठेवण्याची कारवाई ते करितात. पण चित्रगुप्त तसा क्रूर प्रकृतीचा नाहीं. आरोपी निर्दोषी ठरला तर आपल्याकडून चूक होणार होती ती टळली असं समाधान त्याला वाटतं. निर्दोषी ठरून त्याला हें समाधान प्राप्त करून देणं तुला शक्य आहे काय ? "

" धर्मराज, चित्रगुप्तानं केलेला अमानुषतेचा आरोप खोटा ठरवायला मला फारच थोडे श्रम पडतील. विद्यासंपादन करून पंडित-पदवी मिळवणं ही अमानुषता ठरतें काय ? महाविद्यालयांत यशस्वी प्राध्यापक म्हणवून घेणं म्हणजे मानवानं पशूसारखं आचरण केलं असं होतं काय ? अध्यापन म्हणजे कां पशुकार्य आहे ? ग्रंथलेखन कां पशु करूं शकतात ? विश्वविद्या-लयाच्या कारभारी—मंडळांत निवडणूक पशूची कां होते ? धर्ममहाराज, या गोष्टी माणूसच करू शकेल आणि ज्याअर्थी मी त्या केलेल्या आहेत

त्याअर्थी मी मनुष्यच आहें—मनुष्येतर कोणी नाहीं हें सिद्ध होत नाहीं काय ? ”

आपण सभा जिंकली, आपण घातलेल्या या पेंचातून चित्रगुप्त, यमधर्म किंवा बाकीचे सदस्य सुटणें शक्यच नाहीं अशा विजयी चर्येनें सुकुमारनें सर्वांकडे पाहिलें. पण पराभूत होऊन खालीं मान घालून बसण्याऐवजीं चित्रगुप्त हंसत असलेला पाहून तो चपापला. चित्रगुप्ताच्या त्या हास्यांत, अडाण्याच्या बडबडीला ज्ञात्यानें हंसावें, अशी छटा होती. चित्रगुप्त बोलूं लागला:—

“ देवाधिदेवा, प्रा. सुकुमार मदने यानं स्वतःची कर्तबगारी सांगून आपलं मनुष्यत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला हें एका अर्थी चांगलंच झालं ! याचा त्याच्यापेक्षां मलाच अधिक उपयोग होईल, असं मला वाटतं. तो कसा हें सांगण्यापूर्वी याला कांहीं प्रश्न विचारण्याची मला अनुज्ञा असावी. आमचीं जीं प्रश्नोत्तरं होतील त्यावरून मी याच्यावर करतों आहे तो आरोप रास्त आहे कीं याचा निरपराधीपणा भक्कम आहे हें ठरविणं पीठाला सुलभ होईल, असं मला वाटतं. ”

अशी प्रार्थना करून यमधर्मांनीं अनुज्ञा दिल्यावर चित्रगुप्त प्रश्न विचारूं लागला:—

“ सुकुमार, आपण मनुष्यच आहों हा तुझा दावा आहे. बालपणीं मातापित्यांच्या छायेखालीं रहावं आणि पोक्तपणीं स्वतःचा प्रपंच थाटावा अशी विचारी मानवांनीं मान्य केलेली जीवनपद्धति तुला मान्य आहे काय ? ”

“ आहे. याच पद्धतीनं मी माझी जीवितयात्रा पुरी केली आहे. ”

“ म्हणजे तूं काय काय केलंस ? तुला कळूं लागल्यापासूनची जीवनकथा संक्षेपानं तुला सांगतां येईल काय ?

“ अवश्य. वडील म्हणतील तितकं मी शिकलों. आठव्या वर्षापासून चोविसाव्या वर्षापर्यंत मी अखंड विद्याभ्यास केला आणि विश्वविद्यालयाची उच्चतम पदवी वरच्या वर्गांत मिळविली. मुलगा विद्वान् व कीर्तिवान् व्हावा ही माझ्या आईवडिलांची महत्त्वाकांक्षा मीं पूर्ण केली. प्राध्यापकाची मानाची जागा मला मिळाली हें एकच माझ्या कीर्तीचं कारण नव्हतं ! वक्तृत्व

व लेखन यांच्या जोरावर मी लोकांकडून धन्यवाद मिळवलेले त्यांनीं पाहिले. मीं विवाह केला, मला मुलं झालीं; बायकोचं आणि मुलांचं पालनपोषण मीं चांगल्या प्रकारें केलेलं आहे."

"विद्वान् आणि कीर्तिवान् होऊन तूं मातापित्याची महत्त्वाकांक्षा तृप्त केलीस याबद्दल मीसुद्धां तुला धन्यवाद देतों. पण अविद्वानालाच शक्य आहे असं वर्तन केल्यामुळं तुझी अपकीर्ति आणि मानहानि पहाण्याचा प्रसंग त्यांच्यावर कधींच आला नाहीं काय?"

"मला नाहीं वाटत तसं कांहीं झालं असेलसं!"

"एका रात्रीं तूं रस्त्यावर गैरशुद्धींत बडबडत लोळत पडला होतास. तुझ्या शेजाऱ्यांनीं तुला ओळखून तुला उचलून तुझ्या घरीं आणलं. त्यानंतर तुझ्या वडिलांनीं तुझी पंगत वर्ज्य केली, ही गोष्ट खरी कीं खोटी?"

"मी मद्यासक्त नसलों तरी मद्यद्वेष्टाहि नाहीं. मौजेनं म्हणून प्रसंगविशेषीं मद्यसेवन करणं शिष्टसंमत झालेलं आहे. माझे वडील जुन्या अमदानींतले गृहस्थ असल्यानं त्यांनीं त्या गोष्टीला भलतंच महत्त्व दिलं, त्याला मी जबाबदार कसा?"

"तुझी आई थोर आचारविचाराची साध्वी होती. तिनंहि अखेरचा काल, तुझ्यापासून दूर राहून संपविला. त्याला कांहीं कारण असेलच."

"माझं बरं न पाहवणाऱ्या लोकांच्या चावटपणाचा तो परिणाम होता. त्यांनीं माझ्या आईला माझ्याबद्दल कागाळ्या केल्या."

"पण त्या कागाळ्या खोट्या कां? घरच्या तरुण मोलकरणीशीं तूं शृंगारचेष्टा करीत होतास, त्या प्रत्यक्ष पाहूनच ना तुझ्या आईनं घर सोडलं?"

"ती मोलकरीण असली, तरी मोठी गोड होती आणि तिचं माझ्यावर प्रेमहि होतं."

"तुझ्यावर कीं तुझ्याकडून मिळणाऱ्या देणग्यांवर? पण करायचं काय तें घेऊन? बरं तुझी बायको—म्हणजे लग्नाची बायको—कुरूप, दुर्वर्तनाची किंवा कठोर स्वभावाची होती काय?"

"मुळींच नाहीं. तिच्यासारख्या हंसतमुख गोड स्वभावाच्या आणि थोर मनाच्या स्त्रिया जगांत दुर्मिळ असतील आणि तिची योग्यता ओळखून मीं

तिला वस्त्र–भूषणांचं दैन्य कधींहि भासूं दिलं नाहीं. तिच्याविषयीं मला वाटणारं प्रेम व आदर व्यक्त करण्यासाठीं मी माझा 'नीतिसंपदा' हा ग्रंथ तिला अर्पण केला."

"पत्नीचं आयुष्य सुखमय व्हायला पतीकडून मिळणारीं वस्त्रभूषणं आणि प्रेमादराचं शाब्दिक प्रदर्शन एवढ्याच गोष्टी पुऱ्या होऊं शकत नाहींत. 'पतिपत्नींचा परस्परांवर अनन्यलोभ असेल तरच त्यांचं वैवाहिक जीवन सुखमय आणि आनंदपूर्ण होतं,' असं तूं आपल्या विद्यार्थ्यांना सांगत होतास हें मला माहीत आहे. तूं आपल्या धर्मपत्नीशीं अशा अनन्य लोभानं वागलास काय? घरच्या गोंडस मोलकरणीशीं तूं केलेला अत्याचार तुला मान्य आहेच. आणि आपल्या विद्यार्थिनींतल्या कांहीं मुलींशींहि तूं अतिप्रसंग केल्याचा बोभाटा झालेला आहे. अशा स्थितींत पतिव्रता+पत्नी-विषयींचं आपलं कर्तव्य तूं निर्दोष रीतीनं आचरलंस असं म्हणतां येईल काय?"

"परंतु माझ्या पत्नीवरील माझा लोभ कमी होता हें तरी तुम्ही म्हणूं शकतां काय? एक व्यक्ति एकाच व्यक्तीवर प्रेम करूं शकेल असा कृपण-पणा, भावनांचं वांटप करितांना, निसर्गानं केलेला नाहीं. शेंकडों मित्रांशीं स्नेहबुद्धीनं वागणं, अनेक मुलांमुलींवर वात्सल्याचा वर्षाव करणं मनुष्य-मात्राला शक्य आहे; आणि प्रेमभावनांची अशी खैरात करणं, हें माणसाच्या मनोविकासाचं द्योतक आहे."

"मी मान्य करतों हें तुझं विधान. मैत्री आणि अपत्यवात्सल्य या बाबतींत माणसानं एकट्यानं दिमाख दाखविण्याचं कारण नाहीं. पशुपक्षीहि कळपांतल्या असंख्य जोडीदारांशीं ममत्वानं वागतात आणि आपल्या असंख्य पिलांवर मायाममता करितात. यांतच अंतःकरणाचं मांगल्य प्रतीत होतं. मैत्री आणि प्रेम यांतल्या निष्ठेबद्दलचा हा दाखला देऊन तूं आपल्या व्यभि-चाराचं समर्थन करूं पाहण हें तुझ्यासारख्या विद्यासंपन्न माणसाला मुळींच शोभण्यासारखं नाहीं. कारण, अपत्यप्रेम आणि मित्रप्रेम यांपेक्षां पतिप्रेम व पत्नी-प्रेम यांचं स्वरूप भिन्न आहे, असलंहि पाहिजे, हें तुला कळायला पाहिजे आणि कळतंहि. अनेक स्त्रियांवर करून उरलेलं प्रेम तूं आपल्या पत्नीवर केलंस आणि तेंच विपुल असून त्यावर तिनं संतुष्ट रहायला पाहिजे होतं

असं तुझं म्हणणं आहे. पण ही सवलत तूं पत्नीला द्यायला तयार झाला असतास काय ? तीहि मनुष्य आहे, आणि तिच्या अंतर्यामींहि प्रमाथी विकार उद्भवणं अशक्य नव्हतं. सुंदर स्त्रीदेह दिसतांच त्यांना कवटाळ-ण्याचा हव्यास जसा तुला वाटे, तसा तुझ्या पत्नीला—धर्ममहाराज, मला अत्यंत खेद होतो त्या साध्वीविषयीं वादापुरतंहि भलते शब्द उच्चारतांना! पण मला याला विचारणं भागच पडलं म्हणून विचारतों—सुकुमार, तुझ्या पत्नीनं देखण्या तरुणाकडं नुसतं पहात राहणंहि तुला खपलं असतं काय ? तुझ्या पत्नीनं तिच्या चुलत-मावस भावांशीं हास्य विनोद केलेलाहि तुला खपला नाहीं. त्यांना आपल्या घरीं येण्याला तूं मज्जाव केला होतास हें खरं कीं खोटं ? ”

प्राध्यापक सुकुमार मदने प्रयत्न करीत होता पण चित्रगुप्ताच्या या सवालाचें उत्तर त्याच्या तोंडाबाहेर पडलें नाहीं, तेव्हां चित्रगुप्तानें दुसरा प्रश्न विचारला:--

“ हा घाणेरडा विषय येथेंच थांबवून मी तुला दुसरा प्रश्न विचारतों:-गुरुशिष्य संबंध हे पिता-पुत्र संबंधच होत हें मत तुला मान्य आहे कीं अमान्य ? ”

“ मला हें मान्य आहे. विद्यार्थ्याला पितृदेवाइतकेंच आचार्यदेवहि पूज्य वाटले पाहिजेत ! ”

“ विद्यार्थ्याला गुरुदेव पूज्य वाटले पाहिजेत पण विद्यार्थ्यांच्या मनांत गुरूंविषयीं पूज्य बुद्धि निर्माण होईल असं गुरूंचंहि आचरण असलं पाहिजे. तुझं वर्तन तसं होतं काय ? विद्यार्थी-विद्यार्थिनींना आपल्या पुत्र-कन्या समजून तूं त्यांच्याशीं वागलास काय ? आपलें विद्यार्थी जगांतलीं थोर माणसं ठरतील याबद्दल तूं कोणती दक्षता घेतलीस ? ”

“ माझ्या वांट्यास आलेल्या विद्यार्थी वर्गांत ज्याची बुद्धि ज्या दर्जाची होती त्याप्रमाणं त्यांना मी विद्यादान केलं. माझ्या अनेक विद्यार्थ्यांनीं प्रथम श्रेणींतल्या पदव्या मिळवल्या. एकादोघांनीं तर आधीं कोणासहि मिळालीं नव्हतीं अशी विद्या-पीठांतलीं पदकं आणि पारितोषिकं मिळविलीं. ”

आपल्या विद्यार्थ्यांना तूं उत्तम पोस्टमैना बनवलंस हें मी मान्य करतों.

पण त्यांची माणुसकी टिकून राहील एवढी तरी दक्षता तूं घेतलीस काय ? तुझा विद्यार्थी विद्याधर ' आचार्य सुवर्ण पदक ' संपादून लौकिकवान् झाला, तरी आपल्या जन्मदात्या वृद्ध पित्याला अपशब्द बोलला हें तुला माहीत आहे. प्रथमश्रेणींत उत्तीर्ण होणारा तुझा विद्यार्थी चंद्रकांत तुझ्या-समोर धूम्रपान आणि मद्यपानहि करीत होता, आणि तारा—प्राध्यापक सुकुमार, स्त्रीजनांविषयीं दु:शब्द उच्चारणं मला महाकठिण कर्म वाटतं; गुरु हा पित्यासमान असतो.—पण ताराला परीक्षेंत प्रथमश्रेणी मिळवून देण्याच्या आमिषानं आकर्षित करून तिच्याशीं तूं आणि तुझ्याशीं तिनं केलेले चाळे हे बापानं मुलीशीं आणि मुलीनं बापाशीं करावे असे होते काय ? पिता-पुत्री—बंधु-भगिनी, यांतील शुद्धता माणसांनाच पाळतां येते आणि माणसांनीं पाळलीहि पाहिजे. ती न पाळणारे प्राणी मानवदेहधारी असले तरी त्यांना मनुष्य म्हणतां येईल काय ? ''

प्राध्यापक सुकुमार मदने कांहीं बोलत नाहींसें पाहून चित्रगुप्तानें आपले प्रश्न पुढें चालू केले.—'' तूं ज्या महाविद्यालयांत प्राध्यापक होतास त्या महाविद्यालयाचा कारभार सुसूत्र चालावा आणि त्याची प्रतिष्ठा वाढावी हें तुला मान्य आहे ना ? आणि त्यासाठीं आपल्या वांट्याचं कर्तव्य तूं योग्य प्रकारें पार पाडीत होतास काय ? ''

'' अगदीं नि:संशय. मीं माझ्याकडे सोंपविलेले विषय उत्तम प्रकारें निरलसपणें शिकविले. माझ्या अध्यापनकौशल्यामुळं विद्यार्थीवर्ग आकर्षित होऊन माझ्या महाविद्यालयाची संपन्नता वाढली आणि माझ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेंतील यशामुळं त्याचा बोलबालाहि विपुल झाला. ''

'' त्याच गोष्टी फिरून फिरून सांगण्यांत काय अर्थ आहे ? तुझं अध्यापनकौशल्य मी अमान्य करीत नाहीं. मीं तुला प्रश्न विचारला तो तुझ्या विद्यालयाच्या कारभारांत तूं सचोटीनं वागलास कां ? संमेलनं, मंडळं, ग्रंथसंग्रह किंवा क्रीडा-विभाग यांतील पैशाचा व्यय तूं अगदीं चोखपणानं केलास काय ? मनगटी घड्याळ, रेशमी कापडाचा डगला, तुमान अशासारख्या चैनीच्या आणि दिमाखाच्या वस्तु तूं खरेदीत आलास त्या आपल्या पगाराच्या पैशांतून की संस्थेच्या आणि सार्वजनिक पैशांतून ? ''

'' अशा बाबतींत इतरांनीं कांटेकोर दृष्टि ठेवायची असते असा कायदा

नसला तरी रिवाज आहे. या विभागांचें अधिकारपद वांट्याला येईल त्यानं आपली हौस थोडीफार पुरवून घ्यायची पूर्वापार परंपरा आहे. मीं कांहीं केलें असेल तर तें या परंपरेला धरून."

"परंपरा असेल किंवा नसेल. आणि असली तरी अन्याय्य परंपरा मोडून टाकणं तुझं कर्तव्य होतं. तें तुला करतांहि आलं असतं. पण स्वार्था-मुळं तूं पापांतच घुटमुळत राहिलास. बरं, तें जाऊं दे. मला दुसरा प्रश्न तुला असा विचारायचा आहे कीं, तुझ्या सहप्राध्यापकांत व प्रमुख-प्राध्या-पकांत तूं वितुष्ट निर्माण केलंस कां? मुख्य प्राध्यापकाशीं लाळघोटेपणा करून सहप्राध्यापकांचा अवमान करणं, त्यांच्यांत फूट पाडून स्नेहभावनेऐवजीं वैमनस्य वाढविणं या गोष्टी तूं केल्यास कीं नाहीं? चार वर्षांपूर्वी एकाच वेळीं तुझे पांच सहप्राध्यापक संस्था सोडून गेले त्याच्या मुळाशीं तुझी कारवाई होती, आणि गेल्याच वर्षी ज्यांच्याशीं प्रारंभीं तूं हांजीहांजी करीत होतास ते प्रमुख प्राध्यापकहि चालते झाले ते संस्थेच्या कारभारी मंडळाचे कान तूं फुंकल्यामुळंच."

"पण माझे सहप्राध्यापक, प्रमुख प्राध्यापक, किंवा कारभारी मंडळीं-तील शिष्ट काय अडाणी लोक होते? कोणीं कांहीं सांगितलं तरी त्यांनीं काय म्हणून ऐकावं? न्याय्यान्याय्य आणि इष्टानिष्ट हें त्यांनीं आपलं आपण कां पाहूं नये?"

"त्यांच्या निवाड्याच्या प्रसंगीं मी हा प्रश्न त्यांना विचारीन. पण म्हणून वितुष्ट निर्माण करून एकाद्या संस्थेला खिळखिळी करण्याचा तुझ्या-वरील आरोप तुला कसा अमान्य करितां येईल? पशुपक्ष्यांनाहि एकजुटीचं महत्त्व कळतं. मनुष्यानं "ऐक्यभाव म्हणजेच सामर्थ्य" असं सुभाषित निर्माण करून ठेवलं आहे. पण तुझ्यासारखे पढतमूर्ख फाटाफुटी करण्यांतच धन्यता मानतात. हें कृत्य माणसाला साजेसें तर नाहींच पण पशूंनाहि कमीपणा आणणारं आहे असं कोणी म्हटलं तर तें चूक होईल कां?"

"चित्रगुप्ता," देवगुरु बोलूं लागले. "आतां सुकुमारला अधिक प्रश्न विचारून त्रास देऊं नको. याला तुझ्या प्रश्नांचीं सरळ उत्तरं देणं कठीण जात असल्याचं दिसत आहे. यानं मनुष्यजन्मांत ज्या गोष्टी केल्या असं तुझं म्हणणं आहे, त्या आपण केल्या नाहींत असं हा हट्टानं म्हणत असला

तरी तीं पापं याच्या हातून घडलीं आहेत, आणि तीं माणुसकीला साजेशीं नाहींत, असंच कोणीहि सुविचारी मत देईल. अर्थात् मनुष्य असून माणसासारखं न वागण्याबद्दल याला जें शासन करणं धर्मराजाला योग्य वाटेल तें त्यांनीं करावं. पण तें करतांनाहि कठोरपणाचा दोष आपल्याकडे न येईल अशी दक्षता, यमधर्मा, तुला घ्यायला पाहिजे. सुकुमारच्या पाप-पुण्याचा निवाडा करितांना मनुष्यजन्मांतल्या त्याच्या दोन भूमिका तूं विचारांत घ्याव्यास. पहिली आणि प्रमुख भूमिका मनुष्य ही असून दुसरी प्राध्यापकाची आहे. मनुष्यानं अवश्य संभाळला पाहिजे तो संयम याच्या ठिकाणीं मुळींच नव्हता. आपले विकार व वासना यांना लगाम घालून कह्यांत ठेवण्याऐवजीं त्यांना यानं मोकाट सोडलं. आणि व्यभिचारां-तच पुरुषार्थ मानला. ज्या समाजांत वावरला, ज्या घरांत नांदला, त्याचं स्वास्थ्य बिघडेल असे स्वैराचार यानं केले. आपण करतों तें पाप आहे, हें न उमगण्याइतका हा विद्याविहीन नव्हता. मातापिता, पत्नी-मुलं आणि शेजारी, यांचीं अंतःकरणं न दुखविणं हें माणसाचं कर्तव्य यानं पाळलं नाहीं आणि याबद्दल तुला सुकुमारला असंच शासन केलं पाहिजे कीं त्यामुळं स्वैराचाराकडे झुकणाऱ्या याच्या इतर बांधवांनाहि दहशत बसावी.

" आतां याच्या दुसऱ्या भूमिकेंतल्या—म्हणजे प्राध्यापकीय दुराचरणा-बद्दल मला थोडं सांगायचं आहे. प्रमुख आणि सहकारी यांच्यांशीं यानं हेवादेवा केला आणि आपल्या विद्यार्थीवर्गाला यानं विद्या शिकविली तरी ज्ञान दिलं नाहीं असा चित्रगुप्तानं याच्यावर दावा केला आहे पण हा सर्वस्वीं याचाच दोष आहे असं मला वाटत नाहीं. याच्या देशांत प्राध्या-पकत्व ही सामाजिक जबाबदारी मानण्याऐवजीं वैयक्तिक उदरंभरणाची सोय मानली जाऊं लागली आहे आणि त्यामुळेंच आपलं वेतन निर्वेधपणें कसं मिळत राहील व तें मिळवितांना आपली प्रतिष्ठा कशी वाढेल यापलीकडे याचे विचार जाऊं शकले नाहींत. वरच्यांना खालीं ओढून आणि बरोबरी-च्यांना कोंपरखळ्यांनीं बाजूस सारून आपण पुढं घुसण्याची धडपड यानं केली ती याच्या जीवनकलहांतील सर्वसामान्य गोष्ट होती. "

" पण देवगुरो, " चित्रगुप्त हात जोडून म्हणाला, " सुकुमार सर्वसामान्य मानवांप्रमाणं वागला हें तरी न्याय्य ठरेल कां? हा विद्यासंपन्न झाला

अर्थात् श्रेयस्कर कोणतं, अश्रेयस्कर कोणतं हें तारतम्य याला असावयालाच पाहिजे होतं. श्रेयस्कर तें करावं आणि अश्रेयस्कर तें टाळावं, हें याचं कर्तव्य होतं आणि याला प्राध्यापकाची पदवी मिळाल्यामुळं तर याची जबाबदारी सामान्यः जनांहून मोठी झाली होती. राष्ट्राच्या—फार काय जगाच्या ज्ञानसंपत्तींत भर घालावी, निदान ज्यांचं गुरुपण आपणांकडे आलेलं आहे, त्यांना विद्यासंपन्न आणि आचारसंपन्न करावं हें याचं कर्तव्य होतं; तसं यानं केलं आहे काय ? जर यानं केलं नसेल तर सामान्य जनांच्या दाखल्याप्रमाणं याला निर्दोषी ठरवणं कसं न्याय्य ठरेल ?"

"चित्रगुप्ता, तुझी शंका योग्य अशीच आहे." देवगुरु म्हणाले, "सामान्य जनांच्या मापानं मी प्राध्यापक सुकुमाराचं जीवितकार्य मोजूं लागलों तर तें त्याला धर्मपीठानं निर्दोषी ठरवावं म्हणून नव्हे, तर हा त्याचा प्रमाद मुलखावेगळा नाहीं, एवढंच मला दाखवावयाचं होतं. प्राध्यापक ही संस्था भरतखंडांत विकृत स्वरूपाची बनली आहे. ज्ञानार्थी आणि विज्ञानार्थी पंडितच ज्या उच्चासनावर बसावा तेथें केवळ पोटार्थी लोक बसविले जात आहेत. ज्ञानविज्ञानाचं संशोधन करून अधिकाधिक ज्ञान संपादन करावं आणि आपल्या राष्ट्राचं—ज्या जगांत आपण नांदतों त्या जगाचं—सामर्थ्य वाढवावं हें प्राध्यापकाचं कर्तव्य आहे, असं भरतखंडांतील विद्यापीठं मानीत नाहींत. संशोधन किंवा ग्रंथलेखन केलं नाहीं, तर त्याच्या कपाळीं लावलेला प्राध्यापकत्वाचा मानाचा टिळा पुसून टाकून त्याला सामान्य जगांत ढकलण्याची प्रथा पृथ्वीतलावर कांहीं समर्थ राष्ट्रांच्या विद्यापीठांत आहे असं मी ऐकतों. भरतखंडांत मात्र प्राध्यापकीय पदवी गोंदवणासारखी आमरण चिकटून राहते. ज्ञानविज्ञानाच्या संवर्धनाची सक्ती भरतवर्षांतील विद्यालयं आणि विद्यापीठं करीत नाहींत म्हणूनच बहुसंख्य प्राध्यापक विद्यार्थीदशेंत संपादन केलेल्या ज्ञानसंग्रहावरच आपलं अध्यापनकार्य रेटून नेतात, आणि पोटाची सोय लावतात.

"यमधर्मा, भारतवर्षांतल्या विद्यापीठांचं, संस्कृतिविकास हें मुख्य उद्दिष्ट आहे असं म्हणतात आणि नियोजित अभ्यासक्रम संपवून स्नातक बाहेर पडला कीं तो विद्या व संस्कृति—संपन्न झाला असा टिळा त्याच्या कपाळीं लावून मोकळीं होतात. परंतु उत्तर आयुष्यांत हा स्नातक संस्कृतिसंरक्षण

करितो कीं नाहीं, हें तीं पाहत नाहींत. विद्यापीठाची मान्यता मिळवून बाहेर पडलेला स्नातक झाला तरी मनुष्यच असतो, आणि त्याच्या हातूनहि प्रमाद घडणं शक्य असतं. कोणा स्नातकानं मनुष्यालाहि खालीं मान घालायला लावणारं असंस्कृत आचरण केलं आणि तें जाहीर झालं तरी विद्यापीठानं शासन म्हणून दिलेलं प्रशस्तिपत्र काढून घेतलं जात नाहीं. म्हणूनच सुकुमार मदने यासारखे विद्यासंपन्न पण शिथिल मनाचे लोक असंस्कृत स्वैराचार करितात. असंस्कृत आणि अमानुष आचरणाचा धाक दाखविण्याचं नाटक कांहीं विद्यालयं केव्हां केव्हां करतात. थोड्याच वर्षांपूर्वी या पीठापुढं आलेल्या एका प्राध्यापकानं सांगितलेली करुण कहाणी, यमधर्मा, तुला स्मरत असेल. एका विद्यार्थिनीशीं टेनीस नांवाचा खेळ खेळला आणि ज्याला उच्छृंखल विकारांचा वासहि नाहीं असा स्नेहभाव ठेवला, म्हणून त्याच्या सहकाऱ्यांनीं पराचा कावळा केला आणि आपल्या विद्यालयांतून त्याची हकालपट्टी केली आणि या अपमानाच्या वेदना त्या शुद्धशील मानवाला दुःसह झाल्यामुळं त्याचं आयुष्य कमी झालं असं त्याचं गाऱ्हाणं होतं. ज्या विरोधकांनीं त्याच्याविरुद्ध काहूर उठविलं त्याच विरोधकांत उघडपणें मद्यपान, परदारागमन करणारी मंडळी आहेत असंहि तो म्हणाला होता.

"यमधर्मा, या सर्व गोष्टींचा निष्कर्ष एवढाच निघतो कीं, एखाद्या अपवादभूत प्राध्यापकाच्या व्यक्तिगत जीवनक्रमाकडे विद्यालयं आणि विद्यापीठं कोतवाली दृष्टि क्वचित् प्रसंगीं फेंकीत असलीं तरी त्यांच्या दुराचाराकडे दुर्लक्ष करण्याकडंच त्यांची प्रवृत्ति आहे. आपण ठराविक वेळीं, ठराविक मुलापुढं, ठराविक पुस्तकावर प्रवचन झोडलं कीं, कर्तव्य संपलं, इतर वेळीं आपण मन मानेल तसं वागलों तरी आपलं कोणी कांहींहि करूं शकत नाहीं अशा निर्धास्तपणामुळंच सुकुमारसारख्यांचे स्वैराचार जन्म घेतात.

"विद्यार्थी म्हणजे उद्यांचे नागरिक आणि प्राध्यापक हा त्यांचा आदर्श. प्राध्यापकाकडून मिळणारे पुस्तकांतले पाठच मुलें घेत नाहींत, तर, तो दिसतो तसंच दिसावयाचा, तो चालतो तसंच चालण्याचा, त्यांना हव्यास

असतो. म्हणूनच प्राध्यापकानं अंतर्बाह्य सदाचारी असायला पाहिजे, याची जाणीव कांहीं प्राध्यापकांना असते. पण सुकुमार मदने याच्यासारखे कांहीं प्राध्यापक ती जाणीव ठेवीत नाहींत. आणि ती जाणीव न ठेवल्याबद्दल त्यांना शासनहि होत नाहीं. म्हणून, यमधर्मा, सुकुमारच्या प्राध्यापकीय प्रमादांकडे तूं क्षमाबुद्धीनं पहा आणि मनुष्य या नात्यानं त्यानं केलेल्या अमानुषतेबद्दल तुला जें कांहीं शासन उचित वाटेल तें तूं याला कर, असं माझं तुला सांगणं आहे."

"देवगुरो, आपण केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी आपला ऋणी आहें. मानवाच्या जीवनांत मनुष्य आणि व्यावसायिक अशा दोन भूमिका असतात आणि त्या दोहोंतील भेदरेषा इतकी सूक्ष्म असते कीं, कोणतं कर्म कोणत्या भूमिकेचं हें ठरवणं विचारवतांनाहि कठीण पडावं. सुकुमारच्या जीवनग्रंथाचीं हीं दोन प्रकरणं आपण मला विशद करून दाखविलीं आणि प्राध्यापकीय भूमिकेंत तो प्रवाहपतितासारखा वागल्यामुळं त्याच्या प्रमादाकडे मी क्षमादृष्टीनं पाहावं असा मला उपदेश केला तो स्मरणांत ठेवूनच मी पुढीलप्रमाणं निर्णय देतों.

"अमर्याद विषय–लंपटता हा याचा प्रमुख अपराध आहे असं मला वाटतं. याबद्दल याला मी यापुढील दहा जन्म महिषाचे देतों. महिषजन्मांत याची बालपणींच खच्ची करण्यांत येईल आणि सक्तीचं ब्रह्मचर्य याला अनुभवावं लागेल.

"घरचं आणि ज्या समाजांत हा वावरला त्या समाजाचं सौंदर्य आणि पावित्र्य, यानं नष्ट केलं असल्यानं, महिषजन्मांत नगरपालिकेच्या घाणीच्या गाड्यांना याला जुंपण्यांत येईल.

"मातापिता आणि पत्नी मुलं याविषयींचीं आपलीं कर्तव्यं न उमगून यानं त्यांचा द्रोह केला आहे म्हणून महिषजन्मांत याच्याच स्वजनांच्या चमड्याच्या वाद्यांचे चाबूक याची पाठ फोडतील.

"क्षमादृष्टीनं पाहिलं तरी देखील याचे प्राध्यापकीय दुराचार मला उपेक्षणीय वाटत नाहींत. विद्यार्थी विद्यार्थिनींशीं आणि सहकाऱ्यांशीं यानं

केलेलं वर्तन ओंगळ आणि तिरस्करणीय आहे. त्यासाठीं घाणींतून उद्भव-णारे, घाणीवरच जगणारे आणि घाणीचाच प्रसार करणारे दहा मक्षिकाजन्म याला भोगावे लागतील. या जन्मांत ऐदी आणि निरुद्योगी श्रीमंतांकडून मार खाण्याचा अपमान याला सोसावा लागेल. जें जें मंगल व मधुर तें तें याच्या स्पर्शानं ओंगळ व त्याज्य ठरेल. आणि म्हणूनच जगाचं स्वास्थ्य संभाळणारे सज्जन विषारी औषधांच्या माऱ्यानं याचा उच्छेद करतील.

" चित्रगुप्ता, सुकुमारला योग्य स्थळीं पाठवून दुसऱ्या जीवांस निवा-ड्यासाठीं पीठापुढं सादर कर."

---

## गंगाबाई काशीकर . ३

" या बाईचं नांव गंगाबाई काशीकर. अमंगलाचरण आणि स्वजनपीडा हे दोन आरोप हिच्यावर आहेत. "

चित्रगुप्ता, या स्त्रीची संक्षिप्त जीवनकथा निवेदन कर; आणि त्यांतील कोणत्या गोष्टींवर तुझे आरोप आधारलेले आहेत तें सांग, म्हणजे निर्णय देण्याचं धर्मसभेचं काम सुकर होईल."

" आज्ञा महाराज. गतजन्मीं हिला शूकरयोनि प्राप्त झालेली होती; आणि ओंगळ जिणं जगावं लागलं होतं. त्याचप्रमाणं असंख्य अपत्यांच्या प्रसूतीचे क्लेश हिला सहन करावे लागले होते. हिच्या दुर्दशेची कींव येऊन धर्ममहाराजांनीं हिला मनुष्यजन्म दिला. सुखसमृद्धिपूर्ण गृहजीवन आणि मर्यादित संततीचं वरदानहि दिलं. त्याप्रमाणं ही श्रीमान् पित्याची कन्या, संपन्न व अधिकारी पतीची पत्नी आणि सुशील व बुद्धिमान् पुत्रकन्यांची माता झाली. पण हें सौभाग्य लाभलं असून तें हिनं टिकवलं नाहीं. आप-ल्याबरोबर पतिपुत्रांचं आणि कन्यास्नुषांचं जीवन हिनं कष्टपूर्ण केलं. ही स्वतः तर आयुष्याच्या उत्तरार्धांत अंमगळांत बुड्या मारीत राहिली होती."

" मेल्यांनो ! वाटेल तें बोलायला लाजा कशा वाटत नाहींत म्हणतें मी ! " गंगाबाई कडाडली.

" गंगाबाई, " यमधर्माच्या सिंहासनाशेजारीं उभा असलेला दंडधारी काळभैरव ओरडला. " तोंड बंद कर. या धर्मपीठापुढं, विचारल्यावांचून बोलणं हा घोर प्रमाद आहे. पहिली खेप म्हणून यावेळीं तुला क्षमा व्हावी अशी मी धर्मपीठाला विनंति करतों. अपराधाची पुनरावृत्ति झाल्यास गय केली जाणार नाहीं, म्हणून सावधानता राख ! "

" काळभैरव, उभ्या जन्मांत हिनं भाषासंयम केलेला नाहीं. मनांत येईल तें आणि मनांत येईल त्यावेळीं बोलून टाकायच्या स्त्रीस्वभावामुळं कुणापुढं कसं बोलावं याचं तारतम्य हिला पारखं झालेलं आहे. तुझ्या धाकानंहि हिचं तोंड बंद राहणार नाहीं. म्हणून हिच्याकडून निर्बंधभंग होऊं नये, यासाठीं मीच हिला बोलायची अनुज्ञा देतों. गंगाबाई, चित्रगुप्तानं तुझ्यावर अमंगळ आचरण आणि स्वजनपीडा असे आरोप केले आहेत, ते तूं ऐकलेच आहेस. त्यांचा खोटेपणा सिद्ध करावयाचा असेल तर अवश्य कर. ते आरोप ज्यायोगें खोटे ठरतील असं कोणतं धर्माचरण तुझ्या हातून घडलं असेल तर आणि तुझं जीवन निर्लेप ठरेल अशा गोष्टी तूं केल्या असशील तर त्या या धर्मसभेला निवेदन कर. संकोच किंवा भय मुळींसुद्धां बाळगूं नको. तुझ्या निवेदनावरून तूं निरपराधी आहेस असा निर्णय देतां आला, तर मला आणि सर्व सदस्यांना समाधान वाटेल. "

ही धर्माज्ञा ऐकतांच गंगाबाई हात जोडून म्हणाली:—

" देवाधिदेवा, साऱ्या जन्मांत मला कुणीं नांवं ठेवलीं नाहींत, पण इथं या चित्रगुप्ताकडून भलतं सलतं बोलून घ्यायची पाळी माझ्यावर आली आहे. ' या कलियुगांत धर्म कुठं राहिला असेल तर तो काशीकरांच्या घरांत आणि तोहि गंगाबाईसारख्या साध्वीनं टिकवला म्हणून. ' असं आमचे उपाध्येबुवाच काय, पण आमच्या पंचक्रोशींतले वैदिक आणि शास्त्री-पुराणिक हमेशा म्हणत होते. सगळं जग चळलं तरी मी रीत सोडलेली नाहीं. माझ्या आईचं वळण मी गिरवीत राहिलें. बाबा मला शाळेंत घालून इंग्रजी शिकवणार होते, परंतु आईनं दहाव्याच वर्षी माझं लगीन करायला लावलं ! मोठेपणीं यांच्याबरोबर मी चाकरीच्या गांवीं स्वतंत्र

संसार मांडल्यावर मला शिकविण्याची यांनाहि लहर आली होती; पण मीं त्यांना दाद दिली नाहीं. शिकायची गोष्ट काढल्यावर मी साफ 'नाहीं' म्हणून सांगितलं. शिकलेल्या माणसांत सोंवळया ओंवळयाचा विधिनिषेध उरत नाहीं, हें मी बघत होतें. ह्यांनींच मुकस्याला रजा दिली होती आणि धोतरावर सदरा घालून पानावर बसायला यांना कांहीं वाटत नव्हतं. शिक्षणामुळं असा भ्रष्टाकार माजलेला दिसत असून मीहि तें पाप करायला कशी तयार होऊं?

"देवा, मी शिकलें नाहीं आणि सुधारकी चाळयांना बळी पडलें नाहीं. तुळशीला पाणी, बाळकृष्णाची पूजा, आणि वेंकटेशस्तोत्र म्हटल्यावांचून मी तोंडांत पाणी घातलं नाहीं. सगळीं व्रतं यथासांग पाळलीं, सर्व प्रकारच्या वाती लावल्या, दर चातुर्मासांत नवा नेम करीत आलें आणि त्याचं चांगल्या प्रकारें संपूर्ण केलं. फुलांचे लक्ष वाहिले. हे होते तोंपर्यंत मीं दानधर्म घसघशीत केला. एका सोमवतीला अष्टोदशें भटांना धोतरजोड्या आणि त्यांच्या बायकांना मंगळसूत्रं दिलीं. हजार रुपये लागले त्याला! सोमवारचीं सोळा मेहुणं, अधिक महिन्याचे तीस-तीन ब्राह्मण माझ्या घरीं पांचपांचदां तरी जेवले असतील, पुरणावरणाच्या नैवेद्यावांचून माझी द्वादशी कधीं सुटली नाहीं. आणि मोदकाशिवाय संकष्टी झाली नाहीं. कार्तिकस्नान, माघस्नान, मीं हमेशा करीत आलें. हे गेल्यावर सारीं माणसं नको नको म्हणत असतांना मी सोंवळी झालें आणि एकभुक्त राहिलें. रात्रीं फराळ केला तरी धाबळी नेसून केला. चारी धामाच्या यात्रा मीं केल्या आणि दर यात्रेचं मावंद केलं तर दोनदोनशें पान जेवलं. योगीराज ब्रह्मानंद महाराजांचा मी गुरूपदेश घेतला. गुरुमंत्राचा दहा लाख तरी जप मीं केला. गुरुपौर्णिमा अखंडपणें साजरी केली. भागवताच्या सप्त्याला तीनदां बसलें. कोटिलिंगार्चनं झालीं तर मी लिंग करायला नेमानं गेलें. जवळपासच्या काय पण दूरच्या गांवांतहि यज्ञ आहे असं कळलं तरी मी गेल्याशिवाय राहिलें नाहीं."

"गंगाबाई, तुझीं हीं सगळीं कृत्यं माझ्या वहीला जमा आहेत." चित्रगुप्त बोलूं लागला. त्यास मध्येंच अडवून गंगाबाई उद्गारली:—

"आणि तरी देखील अमंगळ आचरणाचं पाप माझ्या माथीं मारणार

तुम्हीं! मग त्या शीताबाईसारखी मास्तरीण आणि कमळाबाईसारखी नर्स आली इथं तर त्यांचे काय धिंडवडे कराल हें दिसतंच आहे. सोंवळं म्हणजे काय तें जन्माला ठाऊक नाहीं त्यांच्या. म्हारापोरांत वावरून चहूंकडं विटाळ कालवतात मेल्या! ती कमळी तर बाळंतपणं करते, पण आंगसुद्धां धुवत नाहीं!"

"गंगाबाई, वेळ येईल तेव्हां त्या आपापल्या कर्मांचा झाडा देतील. त्या विषयांत तुला लक्ष घालायचं कारण नाहीं. तूं आपल्यापुरतं पहा. तुझ्या आचरणाची कल्पना धर्मपीठाला आतां आली. यानंतर 'स्वजनपीडा' या चित्रगुप्तानं केलेल्या दुसऱ्या आरोपाबद्दल तुला कांहीं सांगायचं असेल तर सांग. आपल्या परिवारांतील मंडळींची गांजणूक तुझ्याकडून मुळींच झाली नाहीं असं तुला सांगतां येईल का?"

"चोरी आहे कीं काय तसं सांगायला?" यमधर्माच्या प्रश्नाला गंगाबाई आवेशानं उत्तर देऊं लागली:—

"यांच्या पासूनचं सांगतें तुम्हांला—हे मामलेदार होते आणि यांची बारा महिने तेरा काळ फिरती चालू असायची. तर चिवड्याचा डबा भरून द्यायची मी बरोबर. कधीं आजारी पडायचं झालं तर बरे होईपावतर एकादशणी चालू ठेवीत होतें देवाला. निळू विठू शिकत होते दर परीक्षेला सत्यनारायण मागून घेत होतें. म्हणतील तें आणि मागतील तेव्हां खायला दिलं मी त्यांना करून. मुलींचं दिखील कांहीं कमी केलं नाहीं मीं! जरीच्या परकराशिवाय परकर नेसली नाहीं आमची विठी आणि मथी. अलीकडल्या घोडनवऱ्यासारख्या वाढवल्या नाहींत मी माझ्या मुलींना. बारावं सरून तेरावं लागतं तों लगीन करून मोकळी. आणि लग्नं केलीं तीं सुद्धां अशीतशीं नव्हेत हो! विहिणींनाच काय, पण विहिणींच्या जावानणंदांचे आणि लेकीसुनांचे घसघशीत मान करून! विठीच्या सासूला पायघड्या, रासनहाणीं दिलीं तर मध्यान्हीपास्नं हंडा उकळत होता पाण्याचा, नि पांसरीभर वासाचं तेल खर्च झालं. संध्याकाळपर्यंत कासार बांगड्या भरत होता त्यांच्याकडल्या बायकांना! तुम्ही म्हणाल, लेकींचं केलं त्यांत काय नवल झालं? पण सुनांचं सुद्धां कांही म्हटल्या कांहीं कमी केलं नाहीं मीं! निळूची दुर्गा पहिल्या खेपेला गर्भार झाली तर तिसऱ्या महिन्यापासनं

डोहाळजेवणं केलीं. सातव्या महिन्यांत मोठं डोहाळजेवण केलं तर गांवांतील एकूण एक बाई बोलावली होती. हा ढीग पडला होता ओटीच्या खणांचा नि नारळांचा ! विठूच्या रखमाईचं दिखिल तस्संच करणार होतें, पण तें भूत ऐकेल तर ना ? देवानं दिलं तरी भोगायला नशीब लागतं ! तिच्या नशीबांत नसलं तर मी तरी काय करणार ? माझ्याकडून मी चुकलें नाहीं हें देवाच्यापुढं सांगतां आलं म्हणजे झालं ! ”

“ झालं तुझं सांगून गंगाबाई ? ” चित्रगुप्त म्हणाला. “ आतां मी तुला कांहीं प्रश्न विचारतों तेवढ्यांचीं उत्तरं दे म्हणजे झालं. ”

“ नवऱ्याच्या मताप्रमाणं चालणं हें साध्वी स्त्रीचं कर्तव्य आहे ही गोष्ट तुला मान्य आहे; मग तू आपल्या नवऱ्याच्या मताप्रमाणं वागत होतीस काय ? तुझ्या नवऱ्यानं तुझ्या बऱ्याकरितां म्हणून सांगितलेल्या गोष्टीहि तूं धिःकारल्यास असा पुरावा माझ्यापाशीं आहे. तूं नुकतीच आजारांतून उठली होतीस. अशा स्थितींत ‘ थंडींतनं माघस्नान करूं नको ’ असं काशीकरांनीं तुला सांगितलं पण तूं तें मनावर घेतलं नाहींस. त्याचं प्रायश्चित्त तुला भोगावंहि लागलं. तुला संधिवात झाला आणि तुझ्या औषधपाण्यासाठीं तुझ्या नवऱ्याला बराच द्रव्यदंड सोसावा लागला. खरं ना ? ”

“ माझे सांधे धरले ते माघस्नानामुळंच कशावरून ? ‘ माणसाचं भोक्तृत्व असतं आणि तें त्याला या ना त्या निमित्तानं भोगावं लागतं ’ असं आमचे ब्रह्मानंद महाराज म्हणाले; आणि त्यांनीं अंगारातीर्थानं दुखणं बरं होईल असं सांगितलं. पण यांनीं बडेबडे डाक्तर आणले आणि त्यांच्या डोंबलावर पैसे घातले, त्याला मी काय करूं ? देवाधर्माचं नांव निघालं कीं मोडता घालायची यांना संवयच होती. मी कांहीं नेमधर्म करायला निघालें कीं यांनीं भलतंसलतं कांहीतरी सुचावायचं ! मला नाहीं पटायचं तें आणि तेवढ्यापुरतं मी माझ्या मताप्रमाणं चालायची. इतरवेळीं हे म्हणतील तसं मी वागलेंय् कीं नाहीं तें तुम्हीच सांगा. ”

“ गंगाबाई, काशीकर हे अडाणी होते कीं शहाणे होते ? ”

“ नवलच वाटतंय् तुमच्या विचारण्याचं ! अडाणी माणूस मामलेदार नि प्रांत होईल कां कधीं ? सरकारी कामापुरतीच हुषारी नव्हती इकडची.-

शास्त्री पंडितांच्या सभेंत चर्चासुद्धां करायचे. पुण्याचे महामहोपाध्याय रत्नाकरशास्त्री यांच्या बरोबर वेदांताचे ग्रंथ वाचायचे— "

" मग, असा बहुश्रुत आणि विद्वान् मनुष्य एकाद्याला अनीतीचा आणि अधर्माचरणाचा उपदेश कसा करील ? तुला काशीकर जें करूं नको म्हणत किंवा जें करायला सांगत त्यापासून तुझं अकल्याण झालं असतं असं कशावरून म्हणतेस ? "

" तुम्हीच बघा ! देवापुढं वाती लावतें म्हटलं तर यांचं सांगणं असायचं ' कापसाची नि तुपाची यांत फुकट नासाडी होते. ' उपासतापास करायला लागलें तर म्हणायचे शरीरक्लेशानं धर्मापेक्षां अधर्मच होतो. ब्राह्मणभोजनाचं नांव काढलं कीं सच्छील आणि गरजू ब्राह्मणांबरोबर दुराचारी आणि उद्दाम भटांना जेवायला घालावं लागतं आणि त्यांत पुण्यापेक्षां पापच घडतं ! यांचं हें मी ऐकत गेलें असतें तर धर्माचं नांवच काढायला नको होतं. अहो, साधी ब्रह्मानंदमहाराजांच्या गुरूपदेशाची गोष्ट–पण तिलासुद्धां यांनीं खंडीभर आढेवेढे घेतले. महाराजांना हज्जार नांवं ठेवायला झालीं. उच्चारसुद्धां करवत नाहीं त्यांचा. "

" नेमधर्मांत आणि व्रतवैकल्यांत पैसा खर्च होतो म्हणून कां काशीकर त्यांना विरोध करीत होते ? "

" तसं मात्तर नाहीं हं ! यांचं म्हणणं या गोष्टीपेक्षां अधिक कल्याणकारक गोष्टी आहेत त्यांत आपला पैसा खर्च करावा. गरीब विद्यार्थ्यांना फी-पुस्तकांला पैसे द्यावे, लोकाश्रयावर चाललेल्या शाळांना देणग्या द्याव्यात. यांनीं म्हाराचांभारांच्या शाळांना आणि बालविधवांच्या विद्यालयाला कितीतरी देणग्या दिल्या. मलाहि म्हणत होते कीं, धर्मार्थ प्रसूतिगृहाला देणगी दे म्हणून. पण मी आपली गुरुपूजेला ब्रह्मानंद–महाराजांना जरीची शालजोडी घेऊन दिली दोनशें रुपयांची. "

" तुझे ब्रह्मानंदमहाराज दुराचारी होते. आपल्या एका तरुण विधवा शिष्येला त्यांनीं गोत्यांत आणलं असा बोभाटा झालेला तुला कळला होता ना ? "

" पापी लोकांना सगळीं माणसं पापी दिसतात. त्यांच्या तोंडाला कुणी

हात लावायचा ? निंदकांना उलट उत्तरं देऊं नये आणि त्यांच्यावर रागावूंहि नये असं महाराज म्हणायचे. ज्या शिष्यिणीबद्दल महाराजांना पापी माणसं नांवं ठेवीत, ती दुसरीतिसरी कोणी नव्हती. महाराज पूर्वीच्या अवतारांत क्रिष्ण होते आणि सती मायावती ही त्यावेळीं राधा होती. त्यावेळीं तिला श्राप झाला होता म्हणून यावेळीं तिचं नांवापुरतं दुसऱ्याबरोबर लगीन झालं पण पंधरवड्याच्या आंत तिचा नवरा गेला आणि मग महाराजांनीं तिचा उद्धार केला. सती मायावती आणि महाराज म्हणजे खरोखर मायाब्रह्माचे अवतार होते."

" तूं ज्या तीर्थयात्रा केल्यास त्याच्या पायीं तुझ्या मुलांना त्रास झाला ही गोष्ट खरी कां ?"

" त्यांचा त्यानीं त्रास करून घेतला त्याला मी काय करूं ? म्हाताऱ्या आईला बरोबर घेऊन तीर्थयात्रा कराव्या हें मुलांचं कर्तव्य निळू विठूनीं पाळायला नको होतं कां ? बरं, आपण यायचं राहिलं पण मी दुसऱ्यांच्या सोबतीनं जायला निघालें; तर यांनीं खर्चाबद्दल खळखळ करायची म्हणजे काय ? बायकांचं ऐकून हे मेले आईविरुद्ध जायचे ! पण मी बसलेंय् त्यांचं ऐकायला ! माझे निळू विठू तसे वाईट नाहींत हो ! पण या मेल्या राक्षसणी—"

" म्हणजे तुझ्या सुना, होय ना ? लोकांच्या लेंकींना, ज्या तुझ्या मुलांच्या जीवनांत आनंद निर्माण करतात, त्या गोड मुलींना तूं नांवं ठेवावींस हे गैर आहे. तूं काशीयात्रेचा हट्ट धरून बसलीस आणि निळूपाशीं पैसा तर नव्हता. त्यावेळीं तुझ्या सुनेनं हातांतले ब्रिलवर काढून दिले. इतका स्वार्थत्याग करणाऱ्या सुनेलाहि तूं राक्षसी म्हणतेस ?"

" थोरली आहे त्यांतल्या त्यांत बरी ! पण धाकट्या रखमाबाई म्हणजे नमुना आहे एक. हरताळकेदिवशीं चक्क शाबूदाण्याची खीर गिळतीय् आणि चातुर्मासांतसुद्धां कांदालसूण खायला घालतीय् नवऱ्याला. मी किती किती बोललें पण सुधारणा करायच्या ऐवजीं इचीं थेरं वाढतच चाललीं. मी नसलें म्हणजे ओंवळ्यानं सैपाक करायची आणि नवराबायको ओंवळ्यानं गिळायचीं. आमच्या यांच्या अंगांत ताप असला तरी मुकटा नेसायला लावीत होतें मी."

" आणि तुझ्या सुनेलाहि तूं या सोंवळ्याच्या वेडामुळं खूप छळलं आहेस. एके दिवशीं तूं सुनेला दोनदां डोक्यावरून पाणी घ्यायला लावलंस आणि त्यामुळं संध्याकाळीं तिला ताप भरला. "

" चित्रगुप्ता, आतां तुमचीं प्रश्नोत्तरं पुरेत. गंगाबाईचं गृहिणीजीवन कशा रीतीनं संपलं याची या धर्मपीठाला एवढ्यावरून चांगली कल्पना आली. आतां तूं करतो आहेस ते आरोप इच्यावर कसे सिद्ध होतात हें तिला आणि या पीठालाहि विशद करून सांग, म्हणजे निवाडा देतां येईल. "

" आज्ञा. " म्हणून चित्रगुप्त बोलूं लागला:—

" देवाधिदेवा, गंगाबाईनं माझ्या प्रश्नाचीं दिलेलीं उत्तरं आपण सर्वांनीं ऐकलीं आहेत. त्यांवरून सद्बुद्धींनंसुद्धां दुराचार कसे होऊं शकतात हें धर्मपीठाच्या निदर्शनाला आलं असेल. गंगाबाईनं पुण्य समजून पाप केलं आहे, असा तिच्याविरुद्ध माझा दावा आहे.

" अमुक प्रसंगीं अमुक प्रकारचं आचरण करणं, अमूक एक प्रकारच्या अन्नाला आरोग्यविघातक असलं तरी विहित मानणं, अमूक एक प्रकारच्या वस्त्राला तें ओंगळ आणि असुखकारक असलं तरी सोंवळं मानणं, सत्कार्यापेक्षां विशिष्ट जातीच्या माणसांना त्यांची पात्रापात्रता न पाहतां द्रव्य देणं, अशा गोष्टींतच धर्म भरलेला आहे आणि या धर्मपालनानं मोक्ष मिळेल हें वेड हिनं आमरण सोडलं नाहीं. हिच्या आई आजीनं हें वेड हिच्या डोक्यांत कोंबलं असलं तरी तें सोडण्याचा सदुपदेश हिला मिळाला होता. हिचा सुविद्य आणि सुविचारी पति हा सद्गुरु हिला लाभला होता. ' शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् । ' हा सुबोध त्यानं हिला केला. सत्कार्य आणि सत्पात्र पाहून दान करावं, दगडाधातूंच्या मूर्तींना देव समजून गंधफुलं वाहात राहाण्यापेक्षां जिवंत अनाथ अपंगांची सेवा करण्यांतच खरी देवपूजा होते, पाण्याची शिवाशिव क्वचित्‌च होणाऱ्या मुकटा-धाबळीपेक्षां निर्मल धूतवस्त्रांत—आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे सोज्ज्वळ मनांत खरं सोंवळं आहे असा सदुपदेश हिच्या पतीनं आणि पुढं पुत्रांनींहि हिला केला. पण हिनं कुणालाहि दाद दिली नाहीं. उलट घरच्या गुरूचा हितोपदेश धिक्कारून ब्रह्मानंदासारख्या दुराचरणी माणसाला ही

शरण गेली आणि त्याच्या चिथावणीनं हिनं विविधरूपानं त्याला द्रव्यदान केलं. त्याच्या नांवाचा जप करण्यांत दुर्मिळ आयुष्यांतला बहुमोल काल वायां दवडला. म्हणूनच मी हिच्यावर अमंगलाचरणाचा आरोप करतों."

"दुसऱ्याचे क्लेश हलके करतां आले नाहींत तरी दुसऱ्याला क्लेश देऊं तरी नयेत असं हिला हिच्या नवऱ्यानं परोपरीनं सांगितलं पण हिनं तिकडं लक्ष दिलं नाहीं. मोलकरणीवर ही तोंडसुख घेईल यांत आश्चर्य नाहीं; पण लेकीसुनांनादेखील वाटेल तसं वाक्ताडन हिनं केलेलं आहे. रडत असलेलं मोलकरणीचं मूल उचलून घेऊन हिच्या मुलीनं त्याला उगी केलं, त्याबद्दल तिचं कौतुक करायचं सोडून तिला विटाळ झाला म्हणून हिनं स्नान करायला लावलं. सुनेच्या लुगड्यावर हिला कसलं सूत दिसलं; तेवढ्यानं हिचं सोंवळं विटाळलं आणि त्याबद्दल हिनं सुनेला ओलेत्यानं स्वयंपाक करायला लावला. दवाखान्यांतल्या औषधांत विटाळाचं पाणी असतं म्हणून हिनं सुनेला तें औषधच घेऊं दिलं नाहीं आणि तिचे दुखण्याचे कष्ट लांबविले. फुलाच्या पाकळीवर पाय पडला तरी खरकट्या शितावरच पाय पडला अशा संशयानं हिनं सुनेला स्वयंपाकघरांतून बाहेर हकललं आणि दुःशब्दांच्या मारानं तिच्या डोळ्यांतून टिपं पाडलीं.

"हिच्या देवाधर्माचं वेड हिच्या पतिपुत्रांना अन्य तऱ्हेनंहि उपद्रवकारक झालं आहे. त्यांची प्राप्ति बरी असली तरी उधळपट्टी करण्याइतकी गडगंच नव्हती. आपली कुवत ओळखून झेंपेल तितकाच दानधर्म करावा इतका पोंच गृहिणी या नात्यानं हिला असायला पाहिजे होता, पण तसा तिनं कधींच ठेविला नाहीं. एकाद्या श्रीमंताच्या बाईनं अमूक एक गोष्ट केली कीं तशी गोष्ट तिला खालीं पहायला लागेल इतक्या थाटामाटानं आपण करायची असा हिला हव्यास. ब्रह्मानंदासारखे स्वार्थी आणि भोंदू गुरु हिचं हें वैगुण्य ओळखून हिला भरीस घालीत आणि ही अधिकाधिक उधळपट्टी करी. यामुळं सत्कार्याला मदत करायची हिच्या नवऱ्याची सदिच्छा जागच्याजागीं जिरे! हिच्या तीर्थयात्रेच्या हट्टापायीं हिच्या सुनांच्या अंगावर तोळाभर सोनं टिकलं नाहीं, हें हिनंच कबूल केलं आहे."

"पण चित्रगुप्ता," एक सदस्य बोलले. "हिचा पति आणि पुत्र

हिचे वेडे हट्ट पुरवीत कशासाठीं होते ? त्यांनीं हिच्या मागणीला निक्षून नकार कां नाहीं दिला ? "

" महाभाग, ही गोष्ट वाटते तितकी साधी नाहीं. नरलोकांतल्या प्रापंचिकांच्या अडचणी त्यांच्या त्यांनाच माहित. बायकांवर अरेरावी गाजविणारे असा त्यांचा आधींच दुर्लौकिक झालेला आहे. कांहीं तसे अरेराव असतात. नाहीं असं नाहीं. पण या दुर्लौकिकाला भिणारे गृहस्थहि पुष्कळ असतात. मनांत येईल तें झालंच पाहिजे. नाहीं झालं तर केलंच आकाशपाताळ एक; अशा बायकांपुढं त्यांना नमतं घेण्यावांचून गत्यंतर उरत नाहीं. आपली कुचंबणा ते सोसतात पण आईबायकोवरील आपल्या अरेरावीचा बोभाटा व्हायला नको अशी त्यांची वृत्ति असते. पतिपुत्रांच्या लोकापवादाच्या धास्तीचा गंगाबाईसारख्या बायका पुरेपूर फायदा घेतात."

" चित्रगुप्ता, बरोबर आहे तुझं म्हणणं ! गंगाबाईसंबंधीं तुला सांगायचं होतं तें सांगून झालं आहे, असं मला वाटतं. देवगुरो, या प्रकरणीं आपला अभिप्राय कळला म्हणजे निर्णय देण्याचं माझं काम सुलभ होईल. आपलं मत सांगण्याची कृपा व्हावी. "

" यमधर्मा, " देवगुरु बोलूं लागले, " गंगाबाईनं पुण्य समजून केलेल्या गोष्टीच पापांत कशा जमा होतात हें चित्रगुप्तानं योग्य प्रकारें समजावून दिलं आहे आणि त्याचं मत मलाहि मान्य आहे. गंगाबाई भूलोकांत धर्मशील आणि सदाचरणसंपन्न म्हणून गाजलेली असली तरी इथं अधर्मशील आणि दुराचरणी ठरत आहे. शिवाय, इच्या या आचरणामुळं ब्रह्मानंदबुवासारख्या कांहीं स्वार्थलोलुप माणसांची चंगळ चालली असली तरी गंगाबाईनं आपल्या समीपच्या परिवाराची गांजणूक केली ही गोष्टहि सिद्ध आहे. म्हणजे 'अधर्माचरण आणि स्वजनपीडा' हे चित्रगुप्तानं हिच्यावर केलेले आरोप रास्त असेच आहेत, आणि त्याबद्दल हिला तूं योग्य तें शासन करावंस. पण तें करतांना, एक गोष्ट लक्षांत घ्यावीस; आणि ती ही कीं, गंगाबाईचे हे प्रमाद तिच्या दुष्ट हेतूंतून उद्भवलेले नसून तिच्या मूर्खपणांतून निर्माण झालेले आहेत. हिचा मूर्खपणा झाडून टाकण्याचा हिच्या नवऱ्याचा प्रयत्न हिनं निष्फळ ठरविला हा झाला तरी हिचा मूर्खपणाच. दुष्ट हेतूनं केलेले अपराध आणि मूर्ख-

पणामुळं घडलेले अपराध, एकाच तोलानं तोलतां कामा नयेत हें तूं जाणतोसच. ”

“ देवगुरूंची सूचना शिरसामान्य करून मी असा निर्णय देतों कीं:—

“ ज्ञानदीपाच्या प्रकाशांत राहूनहि हिनं अज्ञानसेवनच केल्याबद्दल हिला पुढील जन्म पालीचा देण्यांत यावा. दीपप्रकाशांत वावरून कृमि-कीटक खाऊन हिनं जगावं. स्वजनांना पीडा दिल्याबद्दल पालीच्या जन्मांत लोकांकडून हिचा तिरस्कार केला जाईल. हिचा शब्द आणि स्पर्श अशुभसूचक ठरेल. चित्रगुप्ता, दुसरा प्राणी निर्णयासाठीं सादर कर. ”

---

## चिंतोपंत लिखिते ४

“ धर्ममहाराज आणि सर्व सदस्यहो, चिंतोपंत लिखित्याला निवाड्यासाठीं पीठापुढं सादर करितांना मी गोंधळल्यासारखा झालों आहे. कारण याला अपराधी ठरवून शासनाची मागणी करावी, कीं निरपराधी आणि सदाचारी म्हणून त्याच्यासाठीं धर्मपीठाकडून कृपाप्रसाद मागावा हेंच मला कळेनासं झालं आहे. ”

“ चित्रगुप्ता, अशा संभ्रमांत याची जीवनकथा साद्यंत निवेदन करून मोकळं होणं हेंच तुला रास्त ठरेल. ती ऐकल्यावर धर्मन्यायसंपन्न देवगुरु योग्य तें मार्गदर्शन करतील आणि मला निर्णय देणं सुलभ होईल. ”

धर्माज्ञेप्रमाणं चित्रगुप्त आपली वही पाहून चिंतोपंताचा जीवनेतिहास निवेदन करूं लागणार तोंच स्वतः चिंतोपंत हात जोडून यमधर्मांना म्हणाला:—

“ देवाधिदेवा, चित्रगुप्तमहाशयांना तसदी पडूं नये म्हणून मी माझी जीवनकथा समग्र लिहून काढली आहे. माझा हा नेहमींचाच शिरस्ता होता. वरिष्ठांकडून माझ्या कामाची तपासणी व्हायची वेळ आली कीं,

त्यांना लागणारी सर्व प्रकारची माहिती मी आधींच लिहून तयार ठेवीत असें. आतांहि तशी लिहून ठेवली आहे. या पद्धतीमुळें अधिकाऱ्यांचं काम सुलभ होतं असा त्यांनीं अभिप्राय दिलेला आहे. आज्ञा होत असेल तर लिहून आणलेली माहिती मी धर्मपीठाला सादर करीन. ”

“ चित्रगुप्ता, चिंतोपंताची मागणी मान्य करायला तुझी कांहीं हरकत आहे काय ? दोष दडवून ठेवून गुण तेवढेच सांगत सुटायचा प्राणिमात्राचा स्वभाव चिंतोपंताच्या ठिकाणींहि असणं शक्य आहे; आणि म्हणून यानं सांगितलेली जीवनकथा पूर्ण सत्य असेलच असं नाहीं; म्हणून तुझी हरकत नसेल तरच याचीं स्वलिखित जीवनकथा धर्मपीठ स्वीकारील. ”

“ देवाधिदेवा, ” चित्रगुप्त अभिवादन करून म्हणाला, “ चिंतोपंताची मागणी मान्य करायला माझी हरकत नाहीं. मनुष्यस्वभावाप्रमाणं दोषाचा अनुल्लेख आणि गुणवर्णनाचा पाल्हाळ यानं केलाच असेल, तर त्या ठिकाणीं मी खुलासा करीन. तथापि यानं असं केलं नसेल असं मला वाटतं. कारण दोष दडवायलासुद्धां चातुर्य आणि मनाचा बेडरपणा लागतो. चिंतोपंताच्या अंगीं हा बेडरपणा नाहीं हें मला दिसून आलं आहे. वैयक्तिक गोष्टींत वाटेल तसल्या अवघड परिस्थितीस तोंड देण्याचा निर्भयपणा याच्या अंगीं असला, तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांपुढं याच्याइतका भित्रा नोकर क्वचित्‌च आढळेल. ज्या चुका अत्यंत चाणाक्ष अधिकाऱ्याच्याहि दृष्टोत्पत्तीस सहजासहजीं येणार नाहींत, त्या हा आपण होऊन त्यांच्या निदर्शनाला आणीत असे. म्हणून याच्या निवेदनांत सत्यापलाप होईल अशी धास्ती मला वाटत नाहीं. देवाधिदेवांनीं याचं निवेदन अवश्य स्वीकारावं. ”

“ चिंतोपंत, तुझं हस्तलिखित दे पाहूं ? ”

चिंतोपंताचं हस्तलिखित हा धर्मसभेच्या कौतुकाचा विषय होऊन गेला. काय लिहिलें आहे, हें वाचून पहाण्याचं भानच कोणाला उरलें नाहीं. कलाकुसरीचा एकादा पदार्थ सौंदर्यप्रेमी माणसांनीं खालून वरून निरखून पहावा, तसें यमधर्म त्या चिंतोपंताच्या चोपडीकडे पहात राहिले. त्यांनीं ती देवगुरूंच्या हातीं दिली आणि सर्वच सदस्यांनीं क्रमाक्रमानें तिचें अपूर्वाईनें निरीक्षण केलें. मुद्रणालयांत तयार करून आणलेल्या पुस्तका-

पेक्षांहि त्या चोपडींत अधिक देखणेपणा होता. जांभळ्या मखमलीची बांधणी, तिच्यावर जरतारी वेलबुट्टी काढण्यांत आलेली ! बहिरंगापेक्षांहिं अंतरंगाची सजावट अधिक मोहक केलेली. प्रत्येक पृष्ठावर हिरव्या पिवळ्या शाईनं चौकट आंखून घेतली होती. आंखीव ओळीवर कोरीव अक्षरांत सर्व लिखाण करण्यांत आलें होतें. दर एक परिच्छेदाच्या पहिल्या शब्दाचें पहिलें अक्षर लाल शाईनें ठळक लिहिलें होतें. शताधिक पृष्ठांत एकहि शाईचा ठिपका किंवा एकदांहि खाडाखोड नव्हती ! हें लेखनसौंदर्य पाहून देवगुरु म्हणाले:—

" यमधर्मा, लेखनकर्मावर जगणाऱ्या कारकून वर्गावर भूलोकांत असा एक प्रवाद रूढ झालेला आहे कीं त्याचं लिखाण सौंदर्यशून्य आणि दुर्बोध असायचंच ! सुबक हस्ताक्षर आणि स्वच्छ लिखाण, कारकून करूंच शकणार नाहीं अशी मानवलोकीं ठाम समजूत होऊं पहात आहे. अशा परिस्थितींत चितोपंतासारख्या कारकूनपेशाच्या मानवानं इतकं सौंदर्यपूर्ण लेखन करावं ही कौतुकाची गोष्ट आहे. मानव लोकाच्या याच्या वरिष्ठांनीं याच्या लेखनकौशल्याबद्दल यथोचित प्रशंसा केली असेल किंवा नसेल, पण या देवसभेंत त्याचं चीज झालं पाहिजे असं मला वाटतं. धर्मनिर्णयाचं कार्य पूर्ण झाल्यावर ही पुस्तिका देवी सरस्वतीच्याकडं पाठवावी. आपल्या अलंकारसंग्रहांत ही चीज समाविष्ट करण्यांत सरस्वती देवीला आनंदच वाटेल. बाबा चिंतोपंता, हें लिखाण करायला तुला किती वेळ लागला ? किती श्रम पडले ? "

" माझं इकडं यायचं निश्चित झाल्यावर मी हेंच एक काम केलं. बायकोमुलांच्या, भाउबंदांच्या, स्नेह्यासोबत्यांच्या हितसंबंधाच्या अनेक गोष्टी मला करायच्या होत्या आणि त्याबद्दल तीं तीं मंडळी मला सूचनाहि देत होतीं. परंतु मी तिकड लक्ष दिलं नाहीं. वरिष्ठांना सादर करायचीं पत्रकं लिहायला घेतल्यावर तीं पुरीं होईपर्यंत दुसरं कांहीं मला सुचतच नाहीं. फार काय, भुकेच्या व निसर्गाच्या दुसऱ्या हांकाहि मला ऐकू येत नाहींत. अशा कामाची मला निशा चढल्यासारखी होते. यावेळींहि तशी चढली होती. या निशेच्या अमलांत मला शीण असा जाणवतच नाहीं. "

यमधर्माच्या चर्येवर स्मित दिसलें. ते म्हणाले:—

" चिंतोपंत, दुसऱ्यांनीं वाचून दाखवण्यापेक्षां ज्याचं लिखाण त्यानंच वाचावं. कारण लेखक आपलं हृद्गत वाचनांत व्यक्त करूं शकतो. तुझं लेखन तूंच वाचलंस तर तुझं अंतरंग धर्मसभेला स्पष्टपणें दिसेल. मात्र तुला एक सूचना करायची आहे. तुझं हें दीर्घलेखन सगळंच्या सगळं वाचण्यांत तुला श्रम होतील आणि धर्मपीठाचाहि फार वेळ मोडेल. म्हणून या लिखाणांतील असा महत्त्वाचा भाग निवडून तूं वाच कीं, त्यामुळें तुझ्या जीवनाचा चित्रपट सर्व सदस्यांच्या डोळ्यापुढं उभा राहील. हं, प्रारंभ कर. "

धर्माज्ञेप्रमाणं चिंतोपंत वाचूं लागला.

" प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण होतांच माझं लग्न झालं आणि मला नौकरीहि लागली. नौकरीच्या प्रारंभींच्या काळांत मला 'मी चुकेन कीं काय' असं सारखं भय वाटे. आणि या भयामुळंच मी माझं काम लक्षपूर्वक आणि आळस न करितां करूं लागलों. प्रथमतः एका लहान गांवाच्या टाण्यावर माझी नेमणूक झाली होती. तें ठिकाण अगदीं अनोळखी होतं. तिथं मला कोणी स्नेहीसोबती नव्हते. मला बायको आणि बायकोला मी! पण नोकरीचीं कामं करण्यांत माझा इतका वेळ जाई कीं बायकोबरोबर घटका-भर बोलायलाहि फुरसद मिळायची नाहीं. चार लोक येत जात त्यामुळं मला एकलकोंडं वाटायचं नाहीं. पण माझ्या बायकोला घरांत अष्टौप्रहर एकटं राहावं लागल्यामुळं जिवाला अगदीं कंटाळवाणं होई. "

" माझी पहिली तपासणी जवळ आलेली पाहून मी माझं दप्तर अगदीं आरशासारखं स्वच्छ करून ठेवलं. कचेरींतील प्रत्येक वस्तू घासूनपुसून आणि जागच्याजागीं ठेवली. कचेरींतील बैठकहि नीटनेटकी मांडली. कचे-रींत एकटा मी ठाणेंअंमलदार आणि माझ्या हाताखालीं एकच शिपाई. त्याला त्याचं काम रगड असायचं, म्हणून सामानासुमानाची स्वच्छता आणि सुबक मांडणी मीच आपल्या हातानं केली. माझ्या आधींचा ठाणे अंमलदार ऐदी आणि गबाळ्या असल्यानं हिशेबाच्या वह्यांत चिताड झालेलं होतं आणि त्यांचीं वेष्टनंहि मळलीं फाटलेलीं होतीं. मी नवीं सुबक वेष्टनं पदरच्या पैशानं घातलीं. माझ्या लेखनांत हलगर्जीपणाचा संशयसुद्धां येऊं द्यायचा नाहीं अशी दक्षता घेत राहिलों. सरकारी पैशाची शिल्लक बरोबर

होतीच; पण त्यांत एकहि जुनी नोट, जुना रुपाया किंवा चवलीपावलीचं जुनं नाणं मी ठेवलं नाहीं. गांवांतल्या दुकानांत जुन्या नोटा, नाणीं देऊन बदलून आणलीं. उद्यां तपासणी तर आजच मी कचेरींत आपल्या हातानं रंगरंगोटी करून टाकली. कचेरीच्या दारांत शेजाऱ्यापाजाऱ्या घरच्या कुंड्या आणून ठेवल्या. दोन दिवस मी धड जेवलोंहि नाहीं कीं, दोन तासाच्यावर झोंप घेतली नाहीं. एका गुजर शेटजींच्या गिरणींतून किन्तान रंगवून आणलं आणि दरवाजापासून साहेबांच्या खुर्चीपर्यंतची त्याची पायवाट मी सजवून ठेवली.

" खुळखुळेसाहेब तपासणीला आले. त्यांनीं कसून तपासणी केली. चूक तर कुठं सांपडलीच नाहीं. पण माझी टापटीप आणि दक्षता पाहून ते अगदीं खूष झाले. त्यांनीं माझ्या पाठीवर थाप देऊन म्हटलं, ' तरुण मुलांत चोहोंकडं दिसून येणारी कामाची चालढकल आणि हलगर्जीपणा मला तुमच्या कचेरींत दिसला नाहीं. असंच चोख काम करून वाहवा मिळवा. "

' खुळखुळेसाहेब पुढं दुसरीकडं मोठ्या हुद्यावर बदलून गेले. तरी माझ्यावरचा त्यांचा हा लोभ अखेरपर्यंत टिकून राहिला."

चित्रगुप्त मध्येंच म्हणाला: — " चिंतोपंत, यावेळची एक गोष्ट माझ्या वहींत नोंदलेली आहे. ती तुझ्या निवेदनांत दिसली नाहीं. तुझ्या कचेरीच्या सजावटींत तूं आपल्या बायकोकडं दुर्लक्ष केलं होतंस. त्या लहान मुलीला रात्रीं एकटं रहायला भीति वाटे. तिनं सोबतीला राहण्याबद्दल तुझी परोपरीनं विनवणी केली, पण कचेरीपुढं तूं ती मनावर घेतली नाहींस. तूं इकडं कचेरींत झाडलोट करीत बसलास आणि शिफारसपत्रामुळं तुला घटकाभर समाधान वाटलं खरं, पण आधीं झालेल्या राबणुकीनं तुला आठ नि आठ दिवस अंथरुणावर लोळवलं. तुझ्या बायकोलाहि भीति आणि जागरणामुळं आजारी पडावं लागलं हें तुला आठवतं का ? "

" झालंहि असेल तसं कदाचित्. आतां त्या पुढील आठदहावर्षांचा इतिहास मी संक्षेपानं तोंडींच सांगतों. खेड्यांतल्या लहान ठाण्याऐवजीं मोठ्या गांवच्या ठाण्यांवर माझ्या नेमणुका होऊं लागल्या. माझा पगारहि कालपरिमाणाप्रमाणं वाढत गेला, वर्षादोनवर्षांनीं वरिष्ठ बदलून येत होते. मी आत्मप्रौढी सांगतों असं कृपा करून समजूं नये. कोणीहि वरिष्ठ आला

तरी तपासणींत माझं काम प्रशंसनीयच ठरलं; कारण खुळखुळे साहेबांनीं चोख काम करण्याबद्दल मला बजावलं होतं आणि त्यांचा तो सदुपदेश मी कधींहि विसरलों नाहीं. शिवाय कामांत मी सराईत होत गेलों, तरी चुका होण्याची धास्ती पहिल्या खेपेइतक्याच प्रबळतेनं माझ्या मनांत ठाण देऊन बसली आहे ती मला आजतागाईतहि चैन पडूं देत नाहीं. पण ही धास्ती एका दृष्टीनं मला उपकारकच झाली आहे. हिच्यापायीं कां होईना, पण कामांत कसूर होत नाहीं आणि सुंदर काम केल्याबद्दल वरिष्ठांची शाबासकी हमखास मला मिळते."

"या कालांतली तुझी प्रापंचिक परिस्थिति कशी होती?"

"या मुदतींत मला कन्यापुत्रांचा लाभ झाला."

"म्हणजे तुझं जीवित सुफलित झालं. आपल्या या कन्यापुत्रांना कडेखांद्यावर मिरवण्यांत, त्यांचं कोडकौतुक करण्यांत तूं आपलं मन रमविलं असशीलच?"

"मी त्यांचं कांहीं कमी पडूं दिलं नाहीं. त्यांची आई आपल्या हौसेप्रमाणं त्यांना कपडे करीत होती, दागिने घेत होती आणि त्यांचे सणसोहाळे साजरे करीत होती. तिला मी कधीं मोडता घातला नाहीं."

"तें मीं विचारलं नव्हतं. पुत्रकन्याविषयींची तुझी वत्सलता कोणत्या रूपानं प्रगट होत होती हें मला काढून घ्यायचं होतं आणि त्या बाबतींत तूं अरसिकच होतास हें मला दाखवायचं होतं. माझा हा हेतु तुझ्या उत्तरानं सिद्धीला गेला. पुत्रकन्यांचं संगोपन आणि लालनपालन योग्यप्रकारें झालं पाहिजे याची जाणीव तुला होती. त्यांना पडसं खोकला आला तरी तूं कासावीस होत होतास हेंहि खरं आहे. पण त्यांना हंसवून खेळवून व अंगाखांद्यावर नाचवून, बाप जो अनन्यसाधारण आल्हाद अनुभवूं शकतो, तो आल्हाद तूं कधींहि अनुभविला नाहींस. लेंकरांनीं लडिवाळपणें तुझ्याजवळ यावं पण त्याचवेळीं कचेरींतलीं कोष्टकं आवरण्यासाठीं तूं कचेरीकडं धांव घ्यावी! मुलगी गाणं म्हणून दाखवायला हौसेनं तुझ्यापुढं आली असतांना गाणं न ऐकतां सरकारी तिजोरीच्या कुलपांना बासो लावायला तूं निघून गेलास ही गोष्ट माझ्या वहींत नमूद झालेली दिसते. सुटीच्या दिवशीं मुलगा 'फिरायला जाऊं' म्हणत असतांना त्याची मागणी धुड-

२०३५

कावून लावून वरिष्ठांच्या स्वागतार्थ कचेरीच्या दारांत कमान उभारायला तूं गेलास."

"आधीं कचेरीचं काम आणि मग घर, हें धोरण मी ठेवलं असल्या-मुळं अशा गोष्टी प्रसंगविशेषीं झाल्या असतील. यानंतरच्या माझ्या जीवन-कथेंत सांगण्यासारखा एक प्रसंग घडला आहे त्याची हकीकत अशी:—

"आमच्या विभागावर मलझाडो नांवाचा एक खिस्ती अधिकारी आला. हाताखालच्या नोकरावर डुगाण्या झाडणं हा त्याचा जन्मस्वभाव. ज्या ज्या ठाण्यावर तो तपासणीला जाई, त्या त्या ठाणेदारांना त्यानं चपराकच लगावली. त्याचा हा लौकिक मीं कर्णोपकर्णीं ऐकला तेव्हां माझी छाती धडधडूं लागली. आजपर्यंतची माझी प्रशंसनीय नोकरी हा मलझाडो साहेब मलिन करतो कीं काय या चिंतेंत मी चूर होऊन गेलों. कचेरींतील दप्तर केव्हांहि चोख असे, पण माझ्या हाताखालच्या मंडळींच्या कामांत वेळप्रसंगीं हलगर्जीपणा होई. म्हणून त्यांचंहि काम मी रात्रवेरात्र बसून स्वच्छ करून ठेवलं. कचेरीची रंगरंगोटी, सामानसुमानाची साफ-सफाई इतकी केली कीं, लांकडी कपाटांच्या दारांतहि आरशासारखा चेहरा दिसूं लागला. दस्ताभर वाळूचे कागद या घासाघाशीला लागले; आणि तपासणी होऊन गेल्यावर पंधरा दिवस दंड दुखत होते. खिस्ती माणूस पुष्पप्रेमी असतो म्हणून दारांत उभारलेली स्वागताची कमान साध्या पानांची न उभारतां फुलवेलींची उभारली. मलझाडो साहेबांच्या टेबलावर फुलदाणी सजवून ठेवली. आणि त्याला सकाळदुपार ताज्या गुलाबांच्या गेंदांचा गुच्छ दिला. पण माझी ही तपश्चर्या फलद्रूप झाली नाहीं. दप्तराच्या कामांत त्याला खोड काढतां आली नाहीं तरी "ठाण्यासमोरच्या झाडाखालीं लोक गाड्या सोडून घाण करतात आणि तिथं उनाड पोरं खेळतांना गोंगाट करतात या गोष्टीकडं ठाणेदाराचं—म्हणजे माझं—लक्ष नाहीं. ठाण्याच्या आजूबाजूचं वातावरण स्वच्छ व शांत राखण्याच्या कामीं ठाणेदारांनीं मुळींच दक्षता घेतलेली दिसत नाहीं," असा नापसंतीचा शेरा त्यांनीं खरडलाच! मला अत्यंत दुःख झालं!"

"ज्यांचा खरोखर माझ्या कर्तव्यांत अंतर्भाव होऊं शकत नाहीं. त्या गोष्टींबद्दल वरिष्ठानं मला दोष कां द्यावा आणि दिला तरी मी तो मान्य

कां करावा, असा विचार मी माझ्या मनांत येऊं दिला नाहीं. उलट वरिष्ठानं आपल्यावर ठपका ठेवला त्याची खंतच मला झोंबली. आणि मनाचा उद्वेग कमी झाल्यावर मी प्रतिज्ञा केली कीं या मलझाडो साहेबाचं प्रशस्तिपत्र मी मिळवीनच मिळवीन !

" पुढच्या तपासणीच्या वेळीं मी माझी ही प्रतिज्ञा खरी करून दाखविली. त्याच्या चपराश्याकडून आणि स्वैंपाक्याकडून मी त्याच्या स्वभावांतील खाचाखोंचा समजावून घेतल्या. ठाणेदारांकडून आपली सरबराई तर भरगच्च व्हावीच पण त्या त्या ठिकाणीं मिळणाऱ्या प्रपंचोपयोगी वस्तूंचे नजराणेहि ठाणेदारांनीं द्यावें असा त्याचा हव्यास असल्याचं मला कळलं; म्हणून कचेरीची व्यवस्था उत्कृष्ट ठेवूनच मी थांबलों नाहीं, तर आमच्या गावच्या दुकानांत मिळालेला एक पेलेबशांचा—चहादाणीसह—संच खरेदी करून मी त्यांना नजर केला. त्यांच्या मडमेला हिन्दु खाद्यपदार्थ आवडतात असं कळल्यामुळं सौभाग्यवतीकडून तुपांतला चिवडा आणि डिंकाचे लाडू करून साहेबांबरोबर डबा भरून दिला. आणि तो मेमसाहेबांकडं पोंचता करण्याची मलझाडो साहेबांना विनंति केली. या सर्व गोष्टींचा अनुकूल परिणाम होऊन मलझाडो साहेबानंहि माझ्या कामावर 'समाधानकारक' असा शेरा मारला. मलझाडोसाहेब आणि शाबासकी या गोष्टी, व्यापारी आणि सचोटीसारख्याच अपूर्व असल्यामुळें मला मिळालेला हा शेरा पाहून माझ्या विभागांतील सर्व ठाणेदार आश्चर्यचकित झाले; आणि 'चिंतोपंत, वेताळाला वठणीवर आणायचा तुमचा मंत्र आम्हाला सांगा तरी,' अशी माझी मनधरणी करूं लागले."

" देवाधिदेवा, यापुढील भाग मी वाचून दाखवूं काय ? कारण, त्यांतहि मुख्यत: याच गोष्टी आहेत. श्री. गुजराथी, श्री. प्रभू, मुल्लासाहेब, आदिकरून श्रेष्ठ अधिकाऱ्यांना मी माझं कार्यकौशल्य कसं पटवून दिलं, प्रसंगोपात त्यांच्या घरच्या अडीअडचणींत आणि उत्सवसमारंभांत मी किती परिश्रम केले आणि त्यांनीं माझी पाठ कशी थोपटली, याचा आज तागायतचा इतिहास यापुढं आहे, आणि त्यांत माझ्याखेरीज इतरांना नाविन्य किंवा कुतूहल वाटेलच असं नाहीं. म्हणून आज्ञा होत असेल तरच मी पुढील भाग वाचून दाखवितों."

" नको. चिंतोपंत, निर्णयार्थ आलेल्या प्राण्याची, आपलं निवेदन पुरतं ऐकून घेतलं नाहीं, अशी तक्रार राहू नये म्हणून, त्यांना सांगायच असेल तें आणि तितकं सांगू द्यायचं, असा या धर्मपीठाचा शिरस्ता आहे. तुला आपलं निवेदन पुरेसं झालं असं वाटत असेल तर बाकीचं तुझं लिखाण तुला वाचायला लावायचं अशी सक्ती धर्मपीठाकडून मुळींच होणार नाहीं. चित्रगुप्ता आणि सर्व सदस्यहो, चिंतोपंताकडून आणखी कांहीं माहिती पाहिजे असेल तर ती आपण त्याला विचारून घ्यावी."

" यमधर्मा ", देवगुरु बोलूं लागले. " या चिंतोपंताची आतांपर्यंतची जीवनकथा म्हणजे त्याचा नोकरीचा इतिहास झाला. माणसाच्या आयुष्यांत वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, असे अन्य भागहि असतात. त्याबद्दल यानं जवळजवळ मुग्धताच स्वीकारली आहे. पण तो भागहि धर्मसभेला कळणं आवश्यक आहे. त्या त्या भूमिका यानं कशा पार पाडल्या हें कळल्यावरच चिंतोपंताचं जीवितकार्य प्रशंसनीय झालं कीं तें दोषास्पद आहे हें ठरवितां येईल."

देवगुरूंच्या या सूचनेवरून चित्रगुप्त बोलावयास उठला; तो म्हणालाः— " चिंतोपंत कौटुंबिक दृष्ट्याहि निर्दोषी ठरेल असं मला वाटतं. यानं बायकामुलांचं संगोपन चांगल्या प्रकारें केलं आहे. मुलींना योग्य वर, आणि मुलांना भरपूर विद्या यानं मिळवून दिली आहे. याच्या जातींतले इतर लोक आद्याकडं लक्ष न देतां हवा तसा खर्च करितात आणि कर्जा-खालीं चेंगरून जातात. पण चिंतोपंतानं कर्जाचा विटाळ आपल्याला होऊं दिलेला नाहीं. आप्तस्वकीय किंवा इष्टमित्र यांना मदत करतांना यानं कधीं कुचराईहि केली नाहीं. या सर्वांना चिंतोपंत म्हणजे सत्तेचं आश्रयस्थान वाटे. सामाजिक हिताचं एकादं महत्कार्य याच्या खात्यावर नोंदलेलं दिसत नाहीं. पण समाजहिताला बाधक होईल असं कोणतं दुष्कृत्यहि यानं केलेलं दिसत नाहीं. वैयक्तिकदृष्ट्या याच्या अवतारकार्याकडं पाहिलं तरी शरमेनं मान खालीं घालावी, असा प्रकार आढळत नाहीं. हा निरोगी राहिला. साहित्यकलांचा चाहता होता; आणि त्यांतला रसास्वादहि यानं बराच घेतला. तरीदेखील याचं वैयक्तिक जीवन सर्वांगसुंदर होतं असं मी म्हणूं शकत नाहीं. त्यांत बोट ठेवून दाखवावा असा दुर्गुण आढळत नसला, तरी

त्यांत उघड न दिसण्यासारखे कांहीं दोष असलेच पाहिजेत; असा संशय घ्यायला जागा आहे. कारण, याच्या नांवावर अगणित उसासे आणि हजारों निद्राहीन रात्रीं खर्च पडल्या आहेत. अशा स्थितींत चिंतोपंताला अपराधी म्हणून संबोधावं कीं सन्मानार्ह म्हणून गौरवावं याचा मला स्पष्ट बोध होईनासा झाला आहे. धर्मसभेनंच काय तें ठरवावं, अशी मी प्रार्थना करितों."

चित्रगुप्ताची ही प्रार्थना ऐकून यमधर्माची मुद्रा विचारमग्न झाली. क्षणभरानें धर्मराज देवगुरूंना म्हणाले:—

" देवगुरो, चिंतोपंतानं केलेलं आत्मनिवेदन आणि त्याला चित्रगुप्तानं जोडलेली पुरवणी ऐकून मीसुद्धां गोंधळल्यासारखा झालों आहे. चिंतोपंताच्या कृतकर्मांचं तात्त्विकदृष्ट्या अधिक विश्लेषण झालं पाहिजे आणि तें आपणच करूं शकाल; चिंतोपंतांच्या जीवनकथेंतील जो भाग अद्यापि अस्पष्ट राहिला असेल त्याचं आपण प्रज्ञाचक्षूनीं निरीक्षण करावं आणि त्याच्या एकंदर अवतारकार्याचे गुणदोष मला समजावून द्यावे अशी माझी विज्ञप्ति आहे. आपल्या या सहाय्यानंच मी योग्य असा निर्णय देऊं शकेन."

यमधर्माची ही विनंति ऐकून देवगुरूंनीं कांहीं काल डोळे मिटून विचार केला आणि नंतर त्यांनीं आपल्या भाषणास प्रारंभ केला. ते म्हणाले:—

" यमधर्मा, चिंतोपंत हा दक्ष गृहस्थ, सज्जन नागरिक आणि कर्तव्यनिष्ठ नोकर होता, या गोष्टीबद्दल कोणासहि शंका घेतां येणार नाहीं. नरलोकांतील आजच्या मानववर्गाकडे पाहिलं तर सद्गुणांचा अभाव सर्वांशीं किंवा मोठ्या प्रमाणांत आढळून येतो. कित्येक मानवांच्या ठिकाणीं यांतला एकादा सद्गुण असला तरी दुसऱ्याचा अभाव असतो आणि त्या अभावामुळंच असलेले सद्गुणसुद्धां तेजोहीन होतात. चिंतोपंताच्या जीवनांत हे तीनहि सद्गुण कमीअधिक प्रमाणांत दृग्गोचर होतात आणि याबद्दल या धर्मसभेनं याला गौरवावं असं माझं मत आहे.

" तरीदेखील एका दृष्टीनं याचं चारित्र्य मला दूषणीयहि वाटतं हें सांगताना मला खेद होतो. त्याचा माझ्या दृष्टीला दिसणारा दोष पापभावनेतून निर्माण झालेला नाहीं हें मी आधींच सांगून ठेवतों. सद्गुणांचा अतिरेक हा सुद्धां दोषास्पद ठरतो; आणि चिंतोपंत त्याच दृष्टीनं दोषी

आहे असं मला वाटतं. याच्या जीवनांत नोकरी हाच प्रधान विषय आहे. प्रथम नोकरी, आणि त्या नोकरींतून बुद्धि आणि शक्ति उरलीच तर स्वतः, प्रपंच आणि आप्तस्वकीय, अशी याच्या अंतरंगाची ओढण होती किंवा यानं स्वतःच ती करून घेतली होती. पत्करलेली नोकरी निष्ठाभावानं करणं हा प्रशंसनीय सद्गुण खचित आहे. पण त्याची गणना वेडांत होईल इतका त्याचा अतिरेक करणं हा दोषच मानला पाहिजे. चिंतोपंताच्या हातून हा दोष घडला आहे.

" एक काल असा होता कीं, नोकरीपेशा पत्करलेल्या माणसानं धमक असेल तेवढी चाकरी करावी. चाकरीचं स्वरूप जेवढं भव्य तेवढं वैभवहि चाकराला मिळे. साधा सैनिक पराक्रम गाजवून सेनापति होई आणि साधा कारकून अक्कलहुषारी दाखवून पंतप्रधान होई. पण आज नरलोकांवर—विशेषतः भारतवर्षांत—आणि त्यांतल्या त्यांत इंग्रजी राज्ययंत्रांत नोकरी आणि तिचा मोबदला, या ठराविक साच्याच्या गोष्टी होऊन बसलेल्या आहेत. थोडक्यांत सांगायचं म्हणजे नोकरी ही कोष्टकबद्ध केली गेली आहे. चिंतोपंतासारख्या ठाणेदाराच्या कर्तव्याचं जसं ठरलेलं कोष्टक, तसं त्याला मिळणाऱ्या मुशाहिऱ्याचंहि ठरलेल कोष्टक. कोष्टकांत नमूद असलेलीं कामं केली कीं कोष्टकांत नमूद असलेला मोबदला मिळा-यचाच. नोकराच्या अवांतर वर्तनावर नाराज झाला तरी वरिष्ठाच्या प्रपितामहाला देखील त्याचा ठरलेला मुशाहिरा दिल्यावांचून गत्यंतर नाहीं. कोष्टकबद्ध कर्तव्यंहि अक्कलहुषारीनं नि कलापूर्ण पद्धतीनं केली पाहिजेत असंहि नाहीं. तीं केलीं नाहींत असं वरिष्ठाला म्हणतां आलं नाहीं म्हणजे खालचा नोकर आपल्या जबाबदारींतून सुटला आणि मुशा-हिऱ्याचाहि अधिकारी झाला.

" या कार्यपद्धतींत खालच्या नोकराकडून ठराविक कामाव्यतिरिक्त अन्य गोष्टींची अपेक्षा जशी वरिष्ठांना करतां येत नाहीं, तशीच खालच्या नोकरानं दाखविलेल्या अधिक तत्परतेबद्दल किंवा अक्कलहुषारीबद्दल अधिक मुशाहिरा देण्याची शक्तिहि त्याच्या अंगीं नाहीं. याचं प्रत्यक्ष उदाहरण या चिंतोपंताचंच देतां येईल. याच्या बरोबरचे दुसरे ठाणेदार काम केलं नाहीं असा दोष न येण्यापुरतंच काम करीत होते आणि हा

चिंतोपंत तेंच काम सजवतां येईल तितकं सजवून आणि फुलवतां येईल तितकं फुलवून करीत आला. पण दोघांचा मुशाहिरा एकच राहिला. ज्याचं लिखाण त्यालाहि वाचतां आलं नाहीं आणि ज्याला वरिष्ठाच्या प्रश्नाला सरळ उत्तर देतां आलं नाहीं अशा याच्या जडबुद्धि आणि निष्काळजी सहकाऱ्याला—त्यानं ठराविक कोष्टकं भरलीं एवढ्या अधिकारावर—कालपरिमाणाप्रमाणं मिळायचा तितका मुशाहिरा मिळत राहिला आणि या चिंतोपंतानं रात्रीचा दिवस करून कोरीव कातीव लिहून आणि नमूद नसलेलीं लफडीं आपल्यामागं चिकटवून घेऊन त्या उसाभरींत रक्ताचं पाणी केलं, तरी याला परिमाणाबाहेरची कपर्दिकहि याचे वरिष्ठ देऊं शकले नाहींत! लहान नोकरानं जास्तींत जास्त काम करून दाखवावं, असं धूर्त अधिकारी सांगतात आणि आपल्या म्हणण्यास 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या भगवदुक्तिचा आधारहि देतात. पण या फसवेगिरीला बळी न पडण्याची धूर्तता कनिष्ठ नोकरांनींहि घेतली पाहिजे. जास्तींत जास्त राब म्हणून सांगणाऱ्या वरिष्ठाला 'केलेल्या कामाचा जास्तींत जास्त नको, पण योग्य असा तरी मुशाहिरा देण्याची सिद्धता आहे काय?' असं कनिष्ठानं चक्क विचारलं पाहिजे. आपल्या परिश्रमाचा आणि कार्यकौशल्याचा वाजवी मोबदला मिळतो कां हा विचारहि चिंतोपंतानं मनांत येऊं दिला नाहीं आणि हा नुसता राबत राहिला. हा त्यानं स्वतःवर केलेला बलात्कार होय असं मला वाटतं; आणि दुसऱ्यावर केलेल्या बलात्काराइतकाच स्वतःवर केलेला बलात्कार निषेधार्ह आहे असं माझं स्पष्ट मत आहे.

"आपल्या कामांत वैगुण्य राहील या भयानं विहित कर्तव्यातिरिक्त गोष्टीहि हा करीत होता असं यानं सांगितलं आहे. पण चिंतोपंताला अशी भीति तरी कां वाटली? आत्मविश्वासाचा अभाव हेंच याचं कारण आहे आणि आत्मविश्वासाचा अभाव हा कांहीं सद्गुण मानतां येणार नाहीं. उलट विहित कर्तव्याबाहेरच्या गोष्टींत यानं जी शक्ति खर्च केली, वरिष्ठांना पायघड्या घालून, पुष्पगुच्छ देऊन किंवा लाडूचिवडा यांचे नजराणे देऊन यानं त्यांच्याविषयीं जी आदरभावना दर्शविली, ती लाचारींतच जमा होईल. मनुष्य—मग तो कनिष्ठ नोकरा असला तरी—लाचार असूं नये.

' वरिष्ठाला यानं दिलेले नजराणे कनिष्ठ भावनेनं दिले नसून गृहस्थोचित आतिथ्यदृष्टीनं दिले ' असं हा म्हणेल. पण तेंहि मान्य होण्यासारखं नाहीं. गृहस्थोचित आतिथ्य हें एकानंच करायचं नसतं. आपण आतिथ्य केलं तर आपलंहि आतिथ्य झालं पाहिजे अशी त्यांत अपेक्षा असते. पण चिंतोपंतांच्या एका तरी वरिष्ठानं पेलाभर गार पाणी तरी देऊन त्यांच्या आतिथ्याविषयींची कृतज्ञता दर्शविली आहे काय ? एका वरिष्ठाच्या घरच्या मंगलकार्यांत यानं बायकोमुलांसह राबून हौसेमौजेचे पदार्थ पुरविले होते. पण याच्या मुलांमुलींचीं लग्नमुंजींचीं निमंत्रणपत्रिका गेल्यावर अभीष्ट-चिंतनाचे दोन शब्दहि कोणी लिहून धाडले नाहींत. एका महाभागांच्या सौभाग्यवतींनीं तर यानं दिलेला चिवडा साजूक तुपांत तळलेला नव्हता म्हणून नाकं मुरडलीं, ही गोष्ट याला अज्ञात असली तरी माझ्या दृष्टो-त्पत्तीस आल्यावांचून राहिली नाहीं. "

" आपल्या कामाबद्दल घमेंड बाळगणं हा अक्षम्य अपराध आहे. त्यापेक्षां आपल्या कामाबद्दल सदैव साशंक राहणं सुरक्षितपणाचं असं म्हणून याला निरपराधी ठरवायचा असेल तर ठरवितां येईल. त्याचप्रमाणं आतिथ्यबुद्धीच्या नांवाखालीं याचा वरिष्ठांना दिलेला करभार क्षम्य मानला तरीहि मी विरोध करणार नाहीं. पण चिंतोपंताच्या या वर्तनक्रमापायीं घडून आलेल्या अनिष्ट परिणामांचा याच्यावरील दोष, उपेक्षणीय नाहीं. कचेरीच्या फाजील वेडापायीं कौटुंबिक आनंदाला हा कित्येकदां मुकलेला आहे. वरिष्ठागमनाचा वेध लागला कीं महिना महिना हा बेभान झाल्या-सारखा होई. त्या मुदतींत घरच्या सणासमारंभाची मौज याला पारखी होई. घरधनी जो आनंद उपभोगूं शकत नाहीं तो आनंद बाकीच्यांना तरी कसा उपभोगतां येणार ? दिवाळींत तपासणी येणार असं याला महिनाभर आधीं कळलं, तर दसऱ्याची पोळी याच्या घशाखालीं उतरेना. कोजागिरीच्या दुधाचं नुसतं आचमन घेऊन हा कचेरीकडं धांवला आणि तपासणीच्या ऐन धामधुमींत याचीं त्रेधातिरपीट इतकी उडाली कीं, हात खरकटा करून पानांवरून उठण्यापलीकडं याच्या जेवणाची मजल जाऊं शकली नाहीं. याच्या सौभाग्यवतीनं फराळाच्या पदार्थांनीं डबे भरून ठेवले होते,

पण यानं एकहि पदार्थ उष्टावला नाहीं. किती विरस झाला असेल बिचारीचा ! आणि तिचा असा विरस करण्याचा दोष चिंतोपंताकडंच नाहीं काय ? सुखोपभोगाला आपण मुकणं आणि त्यामुळं परिवारांतल्या इतर मंडळींचा विरस करणं हे प्रमाद यानं बुद्धया केलेले नसतील, पण ते याच्याकडून घडले आहेत हें कांहीं खोटं नाहीं ! ”

“ फाजील कामसू वृत्तीमुळं आणि वरिष्ठांना खूष करण्याच्या हौसेपायीं चिंतोपंतानं आपल्या व्यवसायबंधूंचा मार्ग अवघड केला ही गोष्ट बारीक नजरेनें पहाणाऱ्याच्या दृष्टोत्पत्तीस आल्यावांचून राहणार नाहीं. या गोष्टींची श्रेष्ठाधिकाऱ्यांना एकानं चट लावली कीं दुसऱ्यानंहि ती पुरी करावी असा हव्यास त्यांना वाटूं लागतो. तो त्यांना उघडपणें बोलून दाखवितां येत नसला तरी, ज्याच्याकडून तो पुरविला जात नाहीं त्या ताबेदारावर ते अप्रसन्न झाल्यावांचून रहात नाहींत. प्रसन्न होऊन कल्याण करण्याचं सामर्थ्य आणि सदिच्छा यांच्या ठिकाणीं नसली, तरी अप्रसन्न झाल्यावर अंकितांना चिमटे घेण्याइतका अधिकार आणि हलकं मन त्यांच्यापाशीं असतंच ! म्हणून त्यांना नसत्या गोष्टींची चटक न लावण्याची सावधगिरी प्रत्येक नोकरानं घ्यायला पाहिजे. ही सावधगिरी चिंतोपंतानं घेतली नाहीं. ”

“ चिंतोपंतांच्या जीवनकथेचा विवेचक बुद्धीला काढतां येईल तो निष्कर्ष असा कीं:—घरासाठीं नोकरी हा सरळ हिशेब याला कळला नाहीं आणि नोकरींतून फावेल तेव्हांच घर अशी याची दिशाभूल झाली. अर्थातच घराकडं याचं दुर्लक्ष झालं. घरच्या रहिवाश्यांना यानं अन्नवस्त्राचं दैन्य जाणवूं दिलं नसेल, पुत्रकन्याविषयींच्या लौकिक जबाबदाऱ्या यानं चांगल्या प्रकारें पाडल्या असतील, तरी पण गृहसौख्याचा आस्वाद याला मनमुराद घेतां आलेला नाहीं आणि देतांहि आलेला नाहीं. ”

“ सुखोपभोगाला आपण मुकलों ही गोष्ट चिंतोपंताला अद्यापिहि पटेल असा विश्वास मला वाटत नाहीं. तो म्हणेल, ‘ कचेरींतलं काम तुम्हांला कष्टप्रद वाटलं पण मी त्यांतच रमलों—अगदीं खराखुरा रमलों—मग मी स्वतःवर बलात्कार केला असा आरोप लोकांनीं कां करावा ? ’ पण

याचं हें समर्थनहि मान्य होण्यासारखं नाहीं. मद्यसेवनांतहि मनुष्य रमतोच; म्हणून मद्याला कल्याणकारक मानतां येईल काय? मद्यपी मदिरेंत, तसा चिंतोपंत नोकरींत गुंग होऊन राहिला होता. त्यापायीं त्याला खरा जीवनानंद हाताशीं असूनहि विपुलतेनं चाखतां आला नाहीं. यमधर्मा, मी काढलेला चिंतोपंताच्या अवतारकार्याचा निष्कर्ष तुला पटत असेल तर त्या अनुरोधानं योग्य तो निर्णय दे. मी पुनश्च सांगतों कीं, चिंतोपंत कुटिल मनाचा दुराचारी नाहीं. लौकिकदृष्ट्या तो सद्‌गुणीच ठरेल पण एका सद्‌गुणाच्या अतिरेकामुळं याचं जीवन निखालस आनंदमय होऊं शकलं नाहीं. तेवढ्यापुरता तो दोषी आहे पण तो दोषहि सौम्य स्वरूपाचा आहे."

"देवगुरो, आपण केलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी आपणांस कृतज्ञतापूर्वक अभिवादन करतों. चिंतोपंत सेवातत्परता या गुणाच्या आहारीं गेला आणि याची सेवातत्परता कधीं कधीं स्वाभिमानशून्य लाचारी इतक्या हीनावस्थेस जाऊन पोंहोचली. हा प्रमाद याच्या हातून घडला असला, तरी त्याबरो-बरच कौटुंबिक जीवनांतील आनंदाला पारखा होण्याची शिक्षाहि यानं भोगली. म्हणून आतां याला कठोर स्वरूपाचं शासन, मला आवश्यक वाटत नाहीं. इतर बाबतींत याचं जीवन निरपवाद आहे, हें मतहि मीं मान्य करितों आणि याची मी पुनरपि नरलोकांतच स्थापन करतों. हा संपन्न कुलांत जन्म घेईल, बुद्धिवान आणि कलोपासक होईल पण स्वसुखाकडं डोळेझांक केल्याच्या प्रमादाबद्दल याला अंधत्व प्राप्त होईल. अंधत्वामुळं याला गृहबद्ध व्हावं लागेल तथापि आपल्या संगीत कलोपासनेंत श्रेष्ठ-प्रकारचा आनंद याला उपभोगतां येईल आणि सभोंवारच्या माणसांनाहि हा तो दिव्यानंद चाखवील."

"चित्रगुप्ता, शारदादेवीचा वीणाझंकार याच्या कानांत नादवून चिंतो-पंताला फिरून नरलोकीं पाठवून दे आणि दुसरा प्राणी निर्णयार्थ सादर कर."

---

" प्रबलमुष्टि ! तुझ्या स्वाधीन केलेल्या प्राण्याला धर्मपीठापुढं उपस्थित कर. "

चित्रगुप्ताच्या आज्ञेप्रमाणें प्रबलमुष्टि पुढें आला. त्याचा देह विशाल आणि रांकट केसांनीं भरलेला होता. दाढीमिशांच्या गर्दीतून त्याचे इंगळासारखे लाल डोळे आणि वाघनखासारखे तीक्ष्ण दांत तेवढे बाहेर दिसत होते. त्याचे बाहु म्हणजे लोहदंडच जणू ! मिटलेली मूठ त्यानें पुढें केली, तेव्हां एकाद्या योद्ध्यानं गदा सरसावल्याचा भास झाला. मुठींत दाबून ठेवलेला कीटक यमधर्मांना दाखविण्यासाठीं त्यानें आपली मूठ उघडली पण ती रिकामीच !

आपल्या स्वाधीन केलेला प्राणी निसटला हें प्रबलमुष्टीला कळून चुकलें. कर्तव्यांत कसूर झाल्याच्या जाणीवेनें तो यमदूत खजील झाला, भ्याला. कर्तव्यच्युति हा धर्मसभेंत घोर अपराध मानला जातो आणि त्याबद्दल कठोर शासन केलें जातें, हें त्याला माहीत होतें. प्रथमतः जळजळीत दिसणारे त्याचे डोळे निस्तेज दिसूं लागले. त्याची मान खालीं झुकली.

" काय झालं ? " चित्रगुप्तानें विचारिलें.

" सेवकाकडून घोर अपराध घडला. यमदूतानं पकडलेला प्राणी त्याच्या हातून कधीं सुटत नाहीं. यमदूताच्या या कीर्तीला मी आज कलंक लावला. मी धरून ठेवलेला सूचिशुंड मत्कुण माझ्या मुठींतून निसटला ! या प्रमादाबद्दल प्रभू करतील तो दंड भोगायला हा दास सिद्ध आहे. "

दूताच्या या निवेदनामुळं सर्व धर्मसभा स्तिमित झाली. सर्वांच्या चर्या खिन्न झाल्यासारख्या दिसल्या. कारण यमधर्मांच्या आज्ञेप्रमाणं पकडून आणलेला प्राणी यमदूतांना चुकवून पळून जाण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. हा प्रकार दूताला तसाच यमधर्मांना आणि बाकीच्या सदस्यांनाहि लांछनास्पद वाटला. कर्तव्यच्युत प्रबलमुष्टीला शासन करण्यापेक्षां आपल्या

राज्याची जाऊं पहाणारी अब्रू सांभाळण्याचा विचारच यमधर्मांच्या डोक्यांत खळबळ करूं लागला. ते गर्जून म्हणाले:—

"चित्रगुप्ता, प्रबलमुष्टीच्या हातावर तुरी देऊन एक यःकश्चित् कीटक परागंदा होतो म्हणजे काय गोष्ट आहे! आणि एका दूताच्या तावडींतून तो निसटला तरी दुसरे दूत काय झोंपा घेत होते? तें कांहीं नाहीं. तो जीव प्रथम धरून आणला पाहिजे. दशदिशांना दूत पाठव. एक क्षुद्र कीटक सर्वसामर्थ्यवान् कालशक्तीला पराभूत करूं पहात आहे ही गोष्ट आम्हांला सहन होणं कदापि शक्य नाहीं."

"यमधर्मा, क्रोध आवर!" देवगुरु गंभीर स्वरांत म्हणाले, "सामर्थ्य-सुद्धां तारतम्यानं उपयोजावं लागतं. बलिष्ठांना केवळ दांडगाईनं दुर्बलांना अंकित ठेवतां येत नाहीं. हत्ती बांधायला सांखळदंड लागतो पण त्याच सांखळदंडानं मुंगीची जखडबंदी करतां येणार नाहीं. सिंहाला ज्या पिंजऱ्यांत बंदिस्त करायचं, तोच पिंजरा उंदीर पकडायला निरुपयोगी ठरतो. एकाद्या प्रमत्त मानवासाठीं प्रबलमुष्टीसारख्याची योजना योग्य असली, तरी सूचि-शुंडासारख्या चिमुकल्या कीटकावर हें शस्त्र प्रभावी होणार नाहीं. प्रबल मुष्टीच्या हातून हा कीटक निसटला हा प्रबलमुष्टीचा दोष नसून त्याची योजना करणाऱ्या अदूरदर्शी दूताधिकाऱ्याचा आहे. ज्या अदूरदृष्टीमुळं हा अनिष्ट प्रकार घडला, त्याच अदूरदृष्टीनं तो सुधारतां येणार नाहीं. म्हणून माझी सूचना अशी कीं निष्कारण धांवपळ नको. पळून गेलेला प्राणी दुसरीकडं कुठं गेलेला नाहीं. नुकत्याच येऊन गेलेल्या एका वायुलहरी-बरोबर मत्कुणीय दुर्गंधाची झुळुक आल्याचा मला भास झाला. म्हणून इथल्या इथंच बारीक नजरेनं शोध करा. हें कार्य यमलोकींच्या अक्राळ-विक्राळ दूताऐवजीं भूलोकांतून निर्णयासाठीं इथं येऊन बसलेल्या एकाद्या मानवाकडून करून घ्यावं. त्यांच्या बारीक नजरेला तो चटकन् दिसेल, आणि त्यांच्या बारीक बोटांच्या बारीक चिमटींत तो चटकन सापडेलहि. शिवाय ढेंकणाच्या पळपुटेपणाइतकंच ढेंकूण पकडण्याचं मानवी कौशल्यहि सुप्रसिद्ध आहे. ज्याचं काम त्याच्यावरच सोंपविणं उचित नाहीं काय?"

देवगुरूंची ही सूचना यमधर्मांना योग्य वाटली, आणि निर्णयार्थ आण-लेल्या व दूतांच्या पहाऱ्यांत बसविलेल्या आम्हां मानवाकडे त्यांनीं आपली

नजर वळवली. त्या नजरेंतील आशय माझ्या ध्यानांत आला आणि त्यांना अपेक्षित असलेली सेवा करायची संधि साधतां आली तर साधावी, अशी इच्छा माझ्या मनांत उत्पन्न झाली. मी ढेंकणाच्या शोधार्थ आजूबाजूला पाहूं लागलों. मला फार वेळ शोध करावा लागला नाहीं. माझ्यापासून थोड्याच अंतरावर सुंद होऊन बसलेला 'उमराव उपहारगृहा'चा धनी शंभूराव पोटे एकाएकीं अस्वस्थ होऊन मानेपाशीं खाजवूं लागला. तिथें सावजाचा शोध लागेल हें मी ताडलें, आणि चटकन् पुढें सरलों. शंभूरावाचें उत्तरीय थोडेसें उचलून पाहतांच त्याला चिकटून राहिलेला ढेंकूण मला दिसला. त्याला पकडण्याचे दोनतीन प्रयत्न फसले, तरी शेवटीं तो माझ्या चिमटींत आला. मी विजयी मुद्रेनें धर्मसिंहासनापुढें जाऊन तो फरारी आरोपी खालीं ठेवूं लागलों पण चिमूट सोडली तरी तो भूमीवर उतरला नाहीं. माझ्या पकडींतूनहि तो निसटला कीं काय अशी मला भीति वाटली; आणि खरोखरीच तो निसटून गेला असेल तर देवकार्य करून धन्यवाद मिळविण्याच्या ऐवजीं देवसभेची फसगत केल्याबद्दल रोष पत्करायला लागायचा, या भयानें माझी चर्या मलूल झाली.

मी या फजीतींतून आपला बचाव करण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून आपला पंजा खालून वरून निरखून पाहूं लागलों आणि माझें दैव अनुकूल म्हणून तो माझ्या बोटांच्या बेचक्यांत छपून बसलेला मला दिसला. आतां त्याला दुसऱ्या हाताच्या चिमटींत पकडून भुईवर झाडणें भाग होतें. पण भुईवर पडतां पडतांहि तो कोठें तरी अदृश्य होईल अशी मला शंका आली म्हणून त्याला न चाळवतां, होता तिथेंच ठेवून मी म्हणालों:—

" देवाधिदेवा, आपला फरारी आरोपी माझ्या हस्तगत झाला आहे. त्याला धर्मसभेपुढं उभा करणं सोपं नाहीं आणि सोयीचंहि नाहीं. याच्या देहाची सूक्ष्मता याला फरारी होण्याला उपकारक होणारी आहे. शिवाय याचं चापल्यहि असामान्य आहे. सांपडला असं समजून याच्यावर बोट दडपायला जावं तर हा वीतभर तरी पुढं सरकलेला आढळेल. भूलोकांतले आम्ही मानव याच्या जातभाईंना जिवंत पकडण्याचे प्रयत्न फारसे करत नाहीं. दिसेल तिथं चिरडून यांचा चेंदामेंदा करायचीच पद्धत बहुतेक ठिकाणीं अवलंबिली जाते. इथंहि तिचा अवलंब मी केला असता, पण

त्या पद्धतीमुळं हा नामशेष होईल आणि धर्मसभेपुढं आत्मनिवेदन करायला आणि तिचा निर्णय ऐकायला हा शिल्लक राहणार नाहीं. शिवाय नामशेष होण्याच्या जागीं आपली निशाणी उमटविल्यावांचून हा रहात नाहीं. भूलोकींच्या आम्हां मानवांच्या नजरांना ढेंकणांच्या निशाण्यांची फारशी खंत वाटेनाशी झाली आहे. शिवाय रक्तस्नानाबरोबर दुर्गंधानं आसपासचं वातावरण दूषित करण्याची याला संवय आहे. या दुर्गंधाला मानवी घ्राणें-द्रियं सरावलेलीं असतात. पण या निर्मल धर्मसभेंत तो कलंक आणि तो दुर्गंध दुःसह होईल म्हणून निर्णय देऊन होईपर्यंत हा अभंग रहावा. याचा सूक्ष्म देह सहज छपून बसतां न येण्याइतका मोठा करावा आणि त्याची चलनवलन शक्तीहि बधिर करून ठेवावी."

माझ्या विनंतीला यमधर्मांनीं मान्यता दिली; आणि माझ्या सूचना प्रत्यक्षांत उतरविण्याबद्दल अवश्य ते मंत्रोपाय करण्याची देवगुरूंना विनंति केली. देवगुरूंनीं क्षणभर मंत्रजप करून 'तथास्तु' असा आशीर्वाद उच्चारतांच ढेंकूण माझ्या हातावरून आपोआपच गळून पडला आणि आश्चर्य हें कीं रोमन योद्धयांच्या तसबीरांत दिसतात तशा त्यांच्या ढाली-सारखा नि ढालीएवढा त्याचा देह विस्तारला! जमिनीवर पडतांच पळूं लागायचा त्याचा जन्मस्वभावहि सुटला आणि एकाद्या श्रीमंताचें लाडाव-लेलें सुस्त पोर जसें ठेवल्याजागीं बसून राहतें, तसा तो जागच्याजागीं स्थिर राहिला. त्याचें तोंड आतां चंबूसारखें दिसत होतें आणि त्याला दाभणा-सारखी अणकुचीदार सोंड लटकलेली होती. त्यानें यमधर्माकडे तोंड वळ-विलें आणि पुढले दोन पाय जुळविले. त्याच्या त्या मुखांतून ध्वनि उमटलाः—

"देवाधिदेवांना आणि सकल सभासदांना माझे सहस्रशः प्रणाम असोत!"

"चित्रगुप्ता, या प्राण्याची जीवनकथा निवेदन कर." धर्माज्ञा झाली.

"देवाधिदेवा, हा दिसायला चिमुकला आहे तसा याचा जीवनकाळ-देखील चिमुकला म्हणजे दीडदोन वर्षांचाच आहे. अर्थात्च याची जीवन-कथाहि अगदीं अल्प अशी आहे. याच्या जातींत माणसासारखी व्यक्तिगणिक नांवं ठेवण्याची पद्धत नाहीं. यामुळं हाहि आमरण अनामिकच राहिला. पण इथं निर्णयकार्यात सोईचं व्हावं म्हणून याच्या गुणानुरूप "सूचिशुंड"

असं नांव मी याला दिलेलं आहे. आपल्या सुईसारख्या तीक्ष्ण शुंडेनं यानं भूलोकांत कहर उडवून दिला."

"इतर कीटकाप्रमाणं याचं जीवित इतरांपासून अलिप्त नव्हतं! मानवप्राण्याशीं आमरण याचा संबंध होता. आणि हा संबंध त्यांना सुखदायक नसून उपद्रवकारक होता. यानं आपल्या उभ्या आयुष्यांत सुख असं कुणालाहि दिलेलं नाहीं. उलट ज्या ज्या मानवाला हा चिकटला त्याचं त्याचं रक्तशोषण यानं केलं. मनुष्याचं रक्तप्राशन करून त्याला सतावून सोडण्यांतच यानं समाधान मानलं नाहीं; तर मनुष्याला मूल्यवान वाटणाऱ्या आणि त्यानं जीवापाड जतन केलेल्या हिऱ्याचाहि भंग यानं केला. खाल्लेल्या अन्नाबद्दल कृतज्ञ रहावं हा नीतिनियम यानं झुगारून दिला होता आणि ज्याचं रक्तप्राशन केलं, त्याच्या अंगाची आग करून, त्यांचा निद्रानाश करून, दुर्गंधीनं हैराण करून, यानं त्याचा विविधप्रकारें छळ केला. माझे हे आरोप खोटे असतील तर यानं तें धर्मसभेला पटवून द्यावं याला ते खोडून काढतां आले नाहींत तर माझे आरोप सिद्ध झाले असं समजून योग्य तें शासन धर्ममहाराजांनीं याला करावं, अशी माझी प्रार्थना आहे."

चित्रगुप्त आपलं भाषण संपवून खालीं बसल्यावर यमधर्म म्हणाले:—

"सूचिशुंडा, चित्रगुप्तानं तुझ्यावर ठेवलेले आरोप तूं ऐकलेस. त्यांतून स्वतःचा बचाव करण्यासाठीं तुला कांहीं सांगायचं असेल तर सांग. सत्य असेल ती कोणतीहि गोष्ट सांगण्याचं स्वातंत्र्य तुला आहे. आपण एक क्षुद्र कीटक, देवलोकाच्या या श्रेष्ठ महाभागापुढं आपण कसं बोलायचं, असं मानायचं कारण नाहीं. इथं आल्यावर कीटकसुद्धां स्वरक्षणापुरतं भाषास्वातंत्र्य उपभोगूं शकतात. आत्मनिवेदनार्थ अवश्य तें धैर्य व सामर्थ्य तुला प्राप्त होवो, असा मी तुला आशीर्वाद देतों."

"या कृपाप्रसादाबद्दल मी देवाधिदेवांना कृतज्ञतेनं प्रणिपात करितों." असा प्रारंभ करून सूचिशुंड बोलूं लागला:—

"देवाधिदेवा, चित्रगुप्तानीं माझीं जीं दुष्कर्मं सांगितलीं तीं माझ्याकडून घडलीं आहेत हें मी मान्य करितों. पण तीं करूनसुद्धां मी अपराधी ठरूं शकत नाहीं हें मी या धर्मपीठाला सांगूं इच्छितों. निसर्ग प्राणिसृष्टि निर्माण करतो तेव्हां प्रत्येक प्राण्यासाठीं कांहींतरी कार्य नियोजित करीत असतो.

मनुष्यप्राणी निर्माण करण्यांत निर्मल जीवनाचा आदर्श जगाला द्यावा, हा निसर्गाचा अभिप्राय आहे. परंतु आपलं जीवन निर्मल राखण्यांत माणसाइतकी कुचराई अन्य प्राणी क्वचित्च करीत असतील. वरचा थाटमाट तेवढा झकपक ठेवायचा पण त्या झगझगीत प्रावरणाखालीं ओंगळपणाला ऊत आलेला असायचा हाच प्रकार शंभरांतल्या नव्वद् माणसांचे ठिकाणीं दिसून येतो.

" देवाधिदेवा, निसर्ग हा जसा प्रेमळ आहे तसा कठोरहि आहे. त्यानं घालून दिलेल्या नियमाप्रमाणं वागणाऱ्या मानवाला आरोग्यादिक अमोलिक सुखं ज्याप्रमाणं तो पुरवतो, त्याप्रमाणंच नियमभंग करणाऱ्याला जिथल्यातिथं योग्य तें शासन करण्यांत तो कसूर करीत नाहीं. ज्या ज्या ठिकाणीं तो स्वच्छतेकडं दुर्लक्ष करील त्या त्या ठिकाणीं शासनाची उपाययोजना निसर्गानं करून ठेवलेली असते. अस्थिचर्म आणि जठर निर्मळ राखण्यांत मानवप्राणी अक्षम्य हलगर्जीपणा करतो किंवा असंहि म्हणतां येईल कीं हे शरीरावयव मलपूर्ण ठेवण्यांतच त्याला मौज वाटते. पण याचा परिणाम असा होतो कीं त्या त्या ठिकाणीं निसर्गाकडून संहारक कृमींची स्थापना होते. हे कृमि त्या अस्वच्छ भागाला पोखरायला प्रारंभ करितात आणि तेवढ्यावर त्यांची क्षुधा भागेनाशी झाली कीं, शिरकाव होऊं शकेल त्या भागावर ते हल्ला चढवूं लागतात. ऐन तारुण्यांत दंतहीन झालेले, जठररोगांनीं पीडलेले, क्षयजंतूंच्या भक्ष्यस्थानीं पडलेले लक्षावधि मानव भूलोकावर विकलावस्थेंत काल कंठीत असतात, आणि तो दुर्दैवाचा कोप मानतात. पण तो खरोखर निसर्ग नियमाचा भंग केल्याबद्दल, निसर्गानं केलेला दंड असतो. मानवाविरुद्ध मी घेतों आहे हा आक्षेप त्यांनाहि अमान्य करतां येणार नाहीं. त्यांच्यामधील बुद्धिमान् संशोधकांनीं रोगकारणांचे शोध लावलेले आहेत व त्या शोधांनीं हें सिद्ध केलं आहे कीं, बहुतेक प्राणघातक रोग जंतुजन्य असतात. आणि या जंतूंचा संभव त्यानं निर्मलतेकडं दुर्लक्ष केल्यामुळं झालेल्या ओंगळपणांतून होतो."

" देवाधिदेवा, आत्मसमर्थनार्थ बोलायचं सोडून मानवप्राण्याच्या दोषांवर मी प्रवचन करतों आहे, याबद्दल कांहीं सदस्यांना मी कांहींतरी निरर्थक बडबड करीत आहे, असा संशय आलेला दिसतो. पण तसा प्रकार

मुळींसुद्धां नाहीं. माझ्या जीवनकथेचं सत्यस्वरूप धर्मसभेला स्पष्टपणें कळण्यासाठीं या प्रस्तावनेची आवश्यकताच आहे. मानवाच्या शारीरिक अस्वच्छतेंतून ज्याप्रमाणं रोगजंतु निर्माण होतात त्याप्रमाणं त्याच्या वस्त्र पात्रांच्या आणि घरादारांतल्या ओंगळपणांतून माझ्यासारखे कीटक जन्म घेतात. किंवा असंहि म्हणतां येईल कीं, आम्ही स्वेच्छेनं जन्म घेत नसून माणूस निसर्गाकडून आम्हांला जन्माला घालवतो. माणसानं घरांत घामट-पणाला वाव दिला कीं, त्याला शासन करण्यासाठीं तिथंच आमची पाठवणी निसर्गाकडून होत जाते. आणि आम्ही निसर्गानं आज्ञापिलेली शिक्षा मानवाला देतों. डांस पिसवादिकांचा प्रकारहि असाच आहे. मी कसा झालों आणि कां झालों हें देवसभेच्या आतां ध्यानांत येईल अशी मला आशा आहे."

"देवाधिदेवा, आतां मी कुठं निर्माण झालों हें निवेदन करतों. एका श्रीमंतांच्या घरीं त्याच्या पुत्रामागून दीड दोन महिन्यांत माझा जन्म झाला. श्रीमंतांची नवप्रसूत पत्नी ज्या अंधाऱ्या आणि कोंदट खोलींत ज्या बाजेवर झोंपे, त्याच खोलींत, त्याच बाजेवर मी माझ्या मातापित्यासह आणि भावांबहिणींसह वास्तव्य करीत होतों असं मला आठवतं. आधींच ती खोली हवा प्रकाशापासून अलिप्त आणि त्यांत शेगडीची आंच. त्यामुळं बाळंतीण घामानं निथळत असे. त्यांतच तेल हळदीचा लेप तिच्या अंगावर दिवसां-तून दोनदां चढे. तिच्या शरिराप्रमाणं तिचीं वस्त्रंहि साहजिकच घामट नि तेलकट असत. त्यांना एक प्रकारचा उग्र दर्प येई. त्यांत शेगडीच्या धुराचा वासहि भर घाली. माझ्या मातापित्यांना असं ठिकाण साऱ्या आयुष्यांत लाभलं नव्हतं असं ते म्हणत."

"मी जन्मलों तेव्हां इतका लहान होतों कीं खसखशीच्या एका दाण्यांत माझ्यासारखे दहाजण सामावले असते. त्यावेळीं मी आतांसारखा कृष्ण-वर्णी नसून गोरापान होतों. मला पाय फुटून मी त्यांवर उभा राहूं लागलों तेव्हां माझे आईबाप म्हणाले, 'बेटा आतां तुझा आमचा संबंध संपला. आतां स्वतःचं पोषण आणि संरक्षण तुझं तूंच केलं पाहिजे. वाटेल तिथं जा, सुखानं रहा. आम्ही तुला शुभाशीर्वाद देतों."

" इतक्या लहान वयांत आईबापांनीं माझी हकालपट्टी करावी याचं मला वाईट वाटलं. त्यांच्या प्रेमाच्या सांवलींत खूप दिवस सुखांत रहावं असं मला वाटत होतं. माझी ही इच्छा त्यांना सांगितली. माझी कष्टी चर्या पाहून ते म्हणाले, ' बेटा, माणसाच्या सहवासामुळं तुला अशा वासना होणं साहजिक आहे. माणसाला आपलीं पिलं जवळ बाळगण्यांत आनंद वाटतो आणि त्या पिलांनाहि आईबापांच्या सावलींत वर्षानुवर्षं रहाण्यांतच समाधान वाटत असतं. पण यामुळं ती देहानं वाढलीं तरी धैर्यशाली आणि सामर्थ्यसंपन्न होत नाहींत. सांवलींतलं झाड फोंफावत नाहीं, हा निसर्गाचा नियम माणसं लक्षांत घेत नाहींत. पण आमची पूर्वापार परंपरा अशी कीं, पुत्रकन्यांना जन्म दिल्यावर आईबापांची सर्व जबाबदारी पूर्ण होते. आणि अपत्य संगोपनाचं कार्य करीत बसण्याइतकं दीर्घायुष्य त्यांना लाभेलच अशी शाश्वतीहि नसते. मानवाची निर्दय नजर आणि कठोर हात त्यांच्यावर केव्हां पडेल याचा नेम नसतो. म्हणून मत्कुण आपल्या पिलांवर व आप्तेष्टांवर जीव जडवून ठेवत नाहींत आणि पिलांनींहि त्यांच्यावर प्रेम करीत रहावं असं त्यांना वाटत नाहीं. आपल्या पायांवर चालूं लागलेल्या ढेंकणानं आपल्यापुरतं पहावं, आपलं पोट भरावं, आपला जीव जगवावा, आपल्याकडून होईल तितकी वंशवृद्धि करावी. 'आपल्या पुरतां आपण ' हा ढेकणांचा परंपरागत धर्म आहे. "

" माझ्या मात्यापित्यानीं असा उपदेश करून यशस्वी जीवनाचा गुरुमंत्र मला सांगितला तो असा कीं, जास्तींत जास्त जिवंत राहण्याचा प्राणिमात्राचा जन्मसिद्ध अधिकार आहे. ढेकूणहि तो अधिकार उपभोगूं शकतात. पण त्यासाठीं त्याना सावध रहावं लागतं. मनुष्यासारखा प्रचंड प्राणी त्याचा पोशिंदा आहे तसाच तो त्याचा वैरीहि आहे. अजाणतां तो हवं तितकं रक्त पाजील पण आमच्या आस्तित्वाची त्याला जाणीव झाली रे झाली कीं तो आमचा संहारहि करून टाकील. म्हणून त्याच्या गैरसावधपणाचा फायदा घ्यावयाचा. इतर वेळीं त्याच्या वाटेस जायचं नाहीं, अशा सावधगिरीनं तूं वाग. चतुर ढेंकूण मुख्यतः निद्रिस्त मानवाचं रक्त प्राशन करितात किंवा त्याला जागृतावस्थेंतहि ते दंश करितात पण आपली निवाऱ्याची जागा आपल्या आटोक्यांत ठेवून. दंशाची जाणीव होऊन मानवदेह

थरथरला कीं निमिषार्धात ढेकणानं आपलं भुयार गांठलं पाहिजे. सावधगिरीची आणखी एक बाब अशी कीं, आहारांत अधाशीपणा कधींच करावयाचा नाहीं. दांडगाई तर नाहींच नाहीं करायची. दंश करावयाचा तो असा हळुवार करायचा कीं मानवाला त्याचा उमजच पडूं नये. शुंडाप्रवेशांतच ढेकणाचं खरं चातुर्य. तो जितक्या नाजुकपणानं करतां येईल तितकी स्वस्थता आणि तितका निर्धास्तपणा त्याला लाभेल. निर्वेधपणें प्राशन करतां आलं म्हणून हवं तितकं रक्त पितां कामा नये. ढेकूण चपटा राहील तितका तो सुरक्षित समजावा. अधाशीपणानं बेसुमार रक्त प्राशून तो फुगला कीं मानवाच्या साहजिक चलनवलनांत तो चिरडला जाण्याचा संभव असतो. शिवाय फाजील आहार अंगावर आल्यावर त्याला जडत्व येऊन तो मानवाच्या चिमटींत सांपडण्याचा धोका असतो. म्हणून स्थूलता न येईल, जाड्य न वाढेल, आणि चापल्य कमी न होईल हे नियम कांटेकोरपणें पाळून दीर्घायुषी होण्याचा त्यांनीं मला आशीर्वाद दिला. ”

“ मातापित्यांचा हा आशीर्वाद घेऊन उदरंभरणाच्या पहिल्या स्वारीवर मी निघालों. मला फार पायपीट करावी लागली नाहीं. बाळंतीण लेंकराला कुशींत घेऊन आराम करीत होती. त्या लुसलुशीत बालकाच्या मधुर रक्तान मी अन्नग्रहणाचा मुहूर्त केला. माझ्या बालबुद्धीमुळं असो किंवा मिष्टान्नाचा मोह आवरणं कठिण आहे म्हणून असो, मातापित्यांनीं केलेला मिताहाराचा उपदेश माझ्या स्मरणांत राहिला नाहीं. आणि मी त्या कोंवळ्या कातडींत खुपसलेली माझी शुंडा किती वेळ तरी बाहेरच काढली नाहीं. रक्त पितां पितां मी इतका फुगलों कीं, मूळचा माझा पुष्पपरागासारखा सूक्ष्म देह मोहरीएवढा आणि मोहरीसारखा दिसूं लागला. तितक्यांत तें पोर चुळबूळ करूं लागलं आणि त्याची आई त्याला थोपटूं लागली. तिची ती थप्पड आतां माझ्यावर पडणार आणि मातापित्यांच्या हितोपदेशाकडं दुर्लक्ष केल्यामुळं पहिल्याच पावलीं आपली इतिश्री होणार अशी मला धास्ती वाटली. आणि त्या धास्तीनंच कीं काय कोण जाणे, मी चिकटल्या जागेवरून निखळून पडलों आणि माझं गंडांतर टळलं. मी धांववेल तितक्या त्वरेनं बाजेच्या कोपऱ्यांतलं आश्रयस्थान जवळ केलं. त्या प्रसंगाची मला इतकी धडकी भरली होती कीं, पुढं दोनतीन

दिवस मी जागा सोडली नाहीं. शिवाय, त्या भरगच्च रक्तप्राशनामुळं मला भुकेची बाधाहि झाली नाहीं. ”

“ असेच आठपंधरा दिवस गेले. मी कधीं बालकाचं तर कधीं त्याच्या मातेचं रक्तप्राशन करून कालक्रमणा करीत होतों. माझं ठीक चाललेलं पाहून माझे अनेक जातभाई तिथं गोळा झाले. गर्दीमुळं त्यांना वेंचून काढणं आणि खालच्या शेगडींत त्यांच्या आहुती देणं बाळंतिणीला सुलभ होऊं लागलं. तरी देखील जातिवंत ढेंकूण तिला दाद देईनात. स्वतःचा बचाव करूनच ते थांबले नाहींत तर संततिनिर्मितीचं कार्यहि त्यांनीं विपुलतेनं चालविलं. मला जोडीदारीण मिळाली आणि मीहि त्या वंश-विस्ताराचं कार्य करूं लागलों. एके दिवशीं आमच्या बुजबुजाटावर उपाय-योजना करण्याचे बाळंतिणीचे बेत माझ्या कानांवर आले. त्यांतून कसं निसटायचं याचा मी विचार करूं लागलों. आमचं निवासस्थान उघड्या-वर नेऊन त्यावर कृमिनाशक तेल आणि अधणाचं पाणी ओतण्याचे प्रयोग करायचं ठरलं. आम्हांला चाहूल लागतांच जे चाणाक्ष होते ते तेलपाणी पोंचूं शकणार नाहीं इतक्या खोलखोल छपून राहिले. मी अधिक सावध-गिरी ठेवली. मी मुळीं बाजेवरील जागा सोडली आणि भिंतीचा आश्रय घेतला. कितीहि श्रीमंताचं घर असलं तरी त्याच्या भिंती टवके उडालेल्या असतातच. आणि तीं आमचीं आरामशीर निवासस्थानं होतात. मलाहि त्या बाळंतघरांत तसं एक ठिकाण मिळालं. ”

“ मीहि महिनाभर तिथं मजेंत राहिलों. नव्या बाजेवर आणि अधून-मधून पाळण्यावर स्वारी करून मी निरनिराळ्या जातीच्या रक्ताची चव घेत होतों. या मुदतींत माझे अनेक भाऊबंद खोलींत जमले. भिंतीचा टवकान् टवका मत्कुणमय झाला. बाळंतीण झोंपेवांचून रात्री घालवूं लागली. तिचं बाळहि तळमळूं लागलं. तिनं दुसरं सत्र सुरू केलं. काकडे लावून ती आमचीं घरं जाळूं लागली. आतां स्थलांतर करून जीव जगव-ण्याची आवश्यकता मला तीव्रतेनं भासूं लागली. सुदैवानं तशी संधि लवक-रच मिळाली. त्या घरीं एक पाहुणे आले. त्यांच्या बिछान्यांत मी शिरलों आणि तिथंहि घामटपणा भरपूर असल्यामुळं मी तिथं रमलों. पाहुण्यांच्या बिछान्यांतून मी त्यांच्या गांवीं येऊन दाखल झालों.

" त्या नव्या ठिकाणीं मला एकलकोंडं रहावं लागलं नाहीं. तिथल्या रहिवाशांची आणि माझी ओळख झाली आणि लौकरच आम्ही आपला प्रभाव त्या घरच्या मालकाला आणि त्याच्या बायकामुलांना दाखवूं लागलों. इथं आमचा हल्ला चुकविण्यासाठीं माणसांनीं काढलेली एक नवी युक्ति आम्हांला समजली आणि त्या युक्तीवर प्रति युक्ति योजून आम्हीं ढेंकणांचं युद्धकौशल्य प्रगट केलं. त्या मानवांनीं जो आम्हांला उल्लंघितां येणार नाहीं असा राखुंडीचा चारचार बोटं उंचीरुंदीचा तट आपल्या अंथरूणांभोंवती उभारून आमचा रस्ता अडविला. मग आम्हीं तुळयांवर चढून झोंपलेल्या माणसांवर अलगद उड्या घेऊं लागलों. या आमच्या युक्तीवरूनच अलीकडच्या युद्धांत छत्री सैनिकांची कल्पना माणसांना सुचली असली पाहिजे."

" या ठिकाणाहून आमचं उच्चाटन होण्याची पाळी अखेरीस आलीच. घरधनी आपल्या बायकामुलांसह सुटींत देशपर्यटनाला गेला; आणि उपाशीं राहण्यावांचून आम्हांला गत्यंतर उरलं नाहीं. दोनतीन महिने मी रक्तपानावांचून राहिलों. माझ्या अंगांतील सर्व आर्द्रता वाळून गेली आणि त्वचेचा नुसता पापुद्रा शिल्लक राहिला. " मी मेलों कसा नाहीं?" याचं माझं मलाहि आश्चर्य वाटतं. इतका दीर्घकालीन उपवास काढून विशालदेही मानवालाहि जगता येत नाहीं. पण मी जगलों. आतांपर्यंत सांठवलेल्या रक्तसंचयावरच माझे प्राण तग धरून राहिले असले पाहिजेत. आणखी दोन दिवस रक्तपानावांचून गेले असते तर कांहीं माझी धडगत नव्हती. पण मला मरूं देण्याचं देवाच्या मनांत नव्हतं म्हणून त्यानं माझ्यासाठीं एक मानवप्राणी माझ्यापुढं आणून उभा केला. घरधनी ठिकाणावर नाहीं अशी संधि साधून कोणी चोर तिथं शिरला. आणि ज्या पेटीच्या फटींत मी घर करून राहिलों होतों ती पेटीच पळवून त्यानं आपल्या घरीं नेली. मला नवी जागा आणि नवं भक्ष्य मिळालं. लौकरच मी पहिल्यासारखा टणटणीत झालों."

" चोराच्या कपड्याबरोबर मलाहि कोतवालकचेरींत जावं लागलं. तिथून मी तुरुंगांतहि गेलों. तुरुंगांतील चोरापासून शिपायापर्यंत, शिपायापासून कारकुनापर्यंत आणि कारकुनापासून अधिकाऱ्यापर्यंतहि मी मजल मारली

आणि त्याच्याबरोबर राजधानीच्या शहराची सफर करायचीहि मला संधि मिळाली. बारीकसारीक गांवापेक्षां शहराचं वास्तव्य माणसांना आल्हाद-दायक वाटतं; मग मला कां वाटूं नये ? मी तिथंच राहायचं ठरवलं. पण तिथलीं घरं मला लहान गांवांतील घरांसारखी सोयीचीं वाटलीं नाहींत. मुख्य गोष्ट म्हणजे त्यांत उजेड आणि हवा जास्त. मला तें मानवेना म्हणून एके दिवशीं एका तरुणीच्या साडीला चिकटून एका चित्रपटगृहांत गेलों. तिथल्या खुर्च्या मला आवडल्या आणि त्यांपैकीं एकींत मी आपलं ठाणं ठेवलं. तिथं उजेड असेल तेव्हां कोणी फिरकायचं नाहीं, आणि जेव्हां माणसांची गर्दी जमेल तेव्हां तिथं उजेड असायचा नाहीं. मला मनापासून पाहिजे होती तशी तिथली परिस्थिति होती. मी त्या ठिकाणीं सहा महिने मजेत काढले. नित्य नव्या माणसाचं रक्त मला प्यायला मिळालं. मी गव्हासारखा लांबरुंद झालों. त्या सुबत्तेच्या आणि सुरक्षित ठिकाणांत कायमची वस्ती केली असती तरी मला कोणी नको म्हणणार नव्हतं; पण माणसांप्रमाणं आम्हा ढेंकणांनाहि एकच एक स्थितीचा कंटाळा येतो; मलाहि तसा आला आणि एका प्रेक्षकाच्या अंगावर चढून मी बाहेर पडलों. ”

“ तो गृहस्थ एखाद्या घरीं जाण्याऐवजीं आगगाडीच्या डब्यांत शिरला. मला तें बरंच वाटलं. माझ्यासारख्या क्षुद्र कीटकाला जगत्संचार करण्याची संधि मिळाली तर आनंद कां वाटूं नये ? मी त्या अग्निरथाचा कायमचा रहिवासी झालों. तिथं माणसांची ये जा अष्टौप्रहर चाले. अर्थात्च मला अन्नाची ददात मुळींसुद्धां भासली नाहीं. चार महिने हें आनंदमय जीवन मी उपभोगलं. पण आनंदामागून दुःख आणि जीवनामागून मरण हा निसर्गनियम मला तरी कसा चुकेल ? ज्या डब्यांत मी घर केलं तो डबाच धांवतां धांवतां आज पेटला. माणसांनीं गाडी थांबवून उड्या टाकल्या आणि थोड्याशा दुखापतीवर त्यांनीं जीव वांचविले. मला मात्र त्यांतून निसटता आलं नाहीं आणि मी भूलोकींचं वास्तव्य संपवून इथं दाखल झालों. ”

“ देवाधिदेवा, ही माझी जीवनकथा आहे. या कथेंत नररक्तपान हें एकच कार्य मी केलं आहे. पण हें काम मी दुष्टबुद्धीनं केलेलं नाहीं.

मानवी ओंगळपणाबद्दल त्याला शासन करण्यासाठीं निसर्गानं माझी योजना केली आणि माझ्याकडं सोंपविलेलं कार्य मी उत्तम प्रकारें बजावलं. स्वच्छतेचे नियम धिक्कारले कीं त्याचं प्रायश्चित्त निसर्ग आमच्याकरवीं देत असतो. मोकळ्या स्वच्छ हवेंत, भरपूर उजेडांत जीवनक्रम उरकण्याऐवजीं घामट मळकटपणांत मनुष्य आनंद मानूं लागला कीं त्याला आम्हीं चिकटतों. निर्मळ ठिकाणीं आमची स्थापना निसर्ग सहसा करीत नाहीं. यावरून धर्म सभेला दिसून येईल कीं मी माणसांशीं वैरबुद्धीनं वागलेला नाहीं.

" दुसरी गोष्ट, या धर्म सभेनं विचारांत घ्यावी ती ही कीं, नररक्त हें एकच एक अन्न माझ्यासाठीं निसर्गानें नियोजित केलं होतं. जीव जगविण्यास अन्न आवश्यक आहे आणि जीव जगविण्याचा प्राणिमात्राला म्हणजे मलाहि अधिकार आहे. त्या अधिकारावर मी माझं निसर्गनिर्मित अन्न–नररक्त–प्राशन केलं. याबद्दल मी अपराधी कसा होऊं शकेन? माझ्या दुर्गंधाबद्दलहि इथं तक्रार झाली. पण हा तरी माझाच दोष आहे कां? याचा धर्मसभेनं विचार करावा. ज्या वातावरणांत प्राणी नांदतो आणि तो जें अन्न सेवन करितो त्याचा परिणाम त्याच्या शरीरावर होतो. माझ्या ठिकाणीं दुर्गंध असलाच तर तो माझा नसून माणसाच्या सान्निध्याचा आणि माणसांच्या रक्ताचा परिणाम होय असं मी म्हटलं तर तें चूक ठरेल काय? "

" मी अपराधी नाहीं. उलट मी सत्कृत्यंच केलीं हेंहि या धर्मपीठापुढं नम्रपणें सांगूं इच्छितों. माणसासारखा थोर आणि शक्तिबुद्धिमान् प्राणी अडचणींनीं गांगरतो. संकटांतून पार पडण्याची धडपड करण्याऐवजीं बहुतेक मानव कंबर खचून बसतात आणि संकटाचे प्रहार सोसून प्रसंगीं नामशेषहि होऊन जातात. पण मी सदैव मृत्यूच्या दारांत राहून टिकून राहिलों. दिवसानुदिवस अन्नावांचून राहून टिकाव धरण्याचा चिवटपणा मी दाखवला. माझं चापल्य आणि हुलकावण्या दाखवण्याचं कौशल्य या धर्मसभेलाहि दिसलं आहे. लपंडाव आणि सुरपाट हे खेळ मानव आमच्यापासूनच शिकला असला पाहिजे. कळूंसुद्धां न देतां रक्तशोषण करायचं कसब आणि मृततुल्य अवस्था झाली तरी टिकून राहून संधि येतांच

फिरून जोमानं उलटण्याची आमची चिकाटी दुसऱ्या कोणांत नाहीं असं मानव लोकांतच चाणाक्ष लोक बोलतात. जीवनांत आवश्यक त्या कला मी मानवाला शिकविल्या, हें त्याच्यावर माझे उपकार नव्हेत काय? गुरुदक्षिणे-वांचून मानवाला विद्या संपादितां येत नाहीं मग त्याला अशा उपयुक्त विद्या शिकविल्याबद्दल त्यानं मला बिंदुमात्र रक्ताची दक्षिणा दिली आणि ती मी घेतली, तर मी अपराधी कसा ठरतों?"

सूचिशुंड ढेंकणाचें हें बचावाचें भाषण ऐकल्यावर यमधर्मांनीं देवगुरु-प्रभृति सदस्यांचें मत विचारिलें. सर्वांनीं "निरपराधी" असा निर्णय दिल्यावर यमधर्मांनीं आज्ञा दिली:—

"या प्राण्याला स्वतंत्र जीवित नव्हतं. निसर्गाशीं केलेल्या प्रतारणे-बद्दल मानवप्राण्याला मिळालेला हा शाप होता आणि तो त्याला भोंवला. मानवांच्या दुःखाला कारणीभूत होण्याचं दुर्भाग्य याच्या वांट्याला आलं, हा एक प्रकारें याचाच छल मानला पाहिजे. यामुळं जन्मभर याला लोकांचा तिरस्कार सहन करावा लागला. म्हणून यापुढं याला लोकांच्या कौतुकाचा विषय होईल असा फुलपांखराचा जन्म मी देतों. मत्कुणजन्मांत प्रकाश आणि मोकळी हवा याला उपभोगतां आली नाहीं. मनुष्यनिर्मित मालिन्यांत याला वास्तव्य करणं भाग पडलं. फुलपांखराच्या उद्याच्या जन्मांत यानं रानावनांत मनसोक्त स्वैरविहार करावा. फुलांबरोबर हंसावं, फुलांबरोबर खेळावं, ओंगळ मानव रक्ताचा वीट घालविण्यासाठीं फुलांतले पराग आणि मधुबिंदू यानं आकंठ सेवन करावे. ढेंकणाच्या जन्मांत यानं लोकांकडून तिरस्कार सोसला, या जन्मांत याचं रमणीय स्वरूप आणि पुष्प सृष्टींतला याचा रमणीय विहार पाहून रसिक लोक याचं कौतुक करीत राहतील. याच्यावर काव्यं रचतील. चित्रगुप्ता, याला योग्य ठिकाणीं पाठविण्याची व्यवस्था कर आणि दुसरा प्राणी निर्णयासाठीं पुढं बोलाव."

---

" चित्रगुप्ता, हा दीन आणि विकल चर्येचा मानव कोण आहे? भूलोकाचं याचं जीवन परमावधीचं यातनामय झालं असावं असं याची चर्या सांगते आहे. याच्या यातना याच्या दुष्कृत्यामुळं ओढवलेल्या असतील, तर याची कींव करण्याचं कारण नाहीं. पण कित्येक वेळां सदाचारसंपन्न माणसासहि दुसऱ्या माणसाच्या कौटिल्यामुळं दैन्यावस्था भोगावी लागते. याला विनापराध आपत्ति भोगाव्या लागल्या असतील तर त्यांचं निवारण करून, दुसरं सुखपूर्ण जीवन याला प्राप्त करून देणं, हें धर्मपीठाचं कर्तव्य आहे, आणि तें मला विनाविलंब केलं पाहिजे. चित्रगुप्ता, याच्या या शोचनीय अवस्थेचं कारण सत्वर निवेदन कर."

ही धर्माज्ञा ऐकतांच चित्रगुप्ताच्या मुद्रेवर स्मित उमटलें. तें पाहून यमधर्म म्हणाले, " चित्रगुप्ता, तुला नवल वाटण्यासारखं मी कांहीं चमत्कारिक बोललों काय ? "

" देवाधिदेवा, मनुष्यासारखा नाट्यकुशल प्राणी जगतांत दुसरा नाहीं. आपल्या मुद्राभिनयाच्या सहाय्यानं तो लोकांची फसगत हमेशा करीत असतो. या मानवाला ही कला उत्तम साधलेली आहे. हा दीन नाहीं, दुःखजर्जर नाहीं. वैभवाची विपुलता, मानमरातब आणि अमर्याद सत्ता यानं उपभोगिली आहे. परंतु राजदरबारांत जातांना दुःखीकष्टी चर्या करूनच जायचा नियम यानं कसोशीनं पाळला आहे. या युक्तीनं यानं अधिकाधिक राजकृपा संपादिली. या उच्चतम सिंहासनापुढंहि तेंच नाटक करून देवकृपा पदरांत पाडून घ्यावी, असा याचा इरादा आहे. भूलोकींच्या याच्या प्रभूची याच्या नाटकीपणानं फसगत होऊं शकली, तरी इथं हा प्रयोग यशस्वी होणार नाहीं, याची याला कल्पना आली नाहीं. माणूस माणसाला फसवूं शकला, तरी देवाला फसवूं शकत नाहीं, याचा आतां याला अनुभव येईल."

" चित्रगुप्ता, याचं हें दैन्य दिखाऊ असून सत्यस्थिति उलट असल्याचं तूं सांगतोस, त्याचा स्पष्ट बोध होण्यापूर्वी याची जीवनकथा या धर्मसभेला कळणं अवश्य आहे. ती तूं सांग आणि याच्यावर तुला कांहीं आरोप करायचे असल्यास ते कोणते, तेहि सांगून मोकळे हो."

" स्वामींची आज्ञा सेवकाला शिरसामान्य आहे " असें विनयपूर्वक बोलून चित्रगुप्तानें आपलें कथन सुरू केलें; तो म्हणालाः—

" मानवी कालगणनेप्रमाणं सुमारें बावन्न वर्षांपूर्वी या धर्मपीठापुढं, कथेकऱ्याचा एक तट्टू निर्णयासाठीं आला होता हें सर्वांना स्मरत असेल असं मला वाटतं. इतर हरदासी तट्टांप्रमाणं आपण खोडकर नव्हतों, हरदासबुवांनीं दिलेल्या सत्त्वहीन आणि अपुऱ्या वैरणीवर आपण जीव जगवला, आणि बुवांना पाठीवर घेऊन गांवोगांव भटकलों, अंगांत होती तेवढ्या शक्तीप्रमाणं आपण दौडहि केली, परंतु आपण पुरेशा वेगानं धांवत नाहीं असा गैरसमज करून घेऊन अधिक वेगानं आपणांला पळविण्यासाठीं बुवांनीं आपल्या बरगड्यावर टांचेचे सतत प्रहार केले. श्रम केले तरी पोटभर अन्न नाहीं, याचं आपणाला फारसं वाईट वाटलं नाहीं; तरी पण विनापराध होत असलेल्या धन्याच्या लत्ताप्रहारांचा अपमान आपणाला दुःसह झाला, अशी यानं तक्रार केली; ती या धर्मपीठाला पटली आणि त्याच्या दुःखाचा परिहार होण्यासाठीं याला सुखसमृद्धिपूर्ण मानवजन्म देण्यांत आला."

" देवाधिदेवा, मानव लोकांत हा भिकाजीपंत गायतोंडे या नामोपनामांनीं ओळखला जातो. गरीबाच्याच घरीं हा जन्मला पण शिक्षण संपादन करून यानं प्रथम अध्यापकाचं काम पत्करलं. त्यांत यानं चांगलं नांव मिळवलं. पण ज्यापासून मानव मुबलक सौख्य मिळवूं शकतो तो पैसा याला बेताचाच मिळे. भरपूर पैसा मिळवून मनमुराद सुखोपभोग घेण्याची हांव याला होती तीहि लौकरच तृप्त होण्याचा सुयोग आला. एका संस्थानच्या युवराजाचा शिक्षक म्हणून याला नेमण्यांत आलं. राजपुत्राचा शिक्षक हा शिकविण्यासाठीं नसून राजवैभवाच्या अनेक चिन्हांपैकींच तो एक असतो, हें याला दिसून आलं; आणि हा युवराजांना विद्यादान करण्याऐवजीं त्यांच्या लहरी पुरविण्यांतच कालक्रमणा करूं लागला. आपल

वेतन आपल्याला बिनबोभाट मिळालं म्हणजे झालं. तें काम करण्यापेक्षां न करूनच मिळत असेल तर बिघडलं कुठं ? असं यानं आपलं मत बनवून टाकलं ! अभ्यासाची तसदी न लावणारा, फार काय आपल्या लहरीप्रमाणं चालणारा शिक्षक कोणत्या राजपुत्राला अप्रिय होईल ? युवराजांनीं गायतोंडे मास्तरांच्या चांगुलपणाचे आपल्या वडिलापुढं तोंडभर गोडवे गावे, आणि महाराजांनीं त्यांची पगारवाढ करावी असा क्रम चालला. गायतोंडे मास्तरांनीं युवराजांना काय शिकवलं, आणि युवराज काय शिकले, याची प्रवेशपरीक्षेच्या वेळीं कसोटी लागली असती; पण त्याच संधीस राजेसाहेबांची अवतारसमाप्ति झाली आणि युवराजांचे "राजेसाहेब" बनले. आतां मन मानेल तसं वागायला त्यांना कोण अडवणार होतं ? त्यांनीं नांवापुरतंहि शिकायचं सोडलं. पण हिंदी संस्थानिकांवर नजर ठेवण्यासाठीं इंग्रज सरकारनं नेमलेल्या रेसिडेंट नांवाच्या अधिकाऱ्याला चकविण्यापुरतं नाटक चालवलं. गायतोंडे मास्तर राजेसाहेबांच्या परिवारांत राहिले. त्यांचा पगार सुसूत्रपणें मिळत गेला."

"राजेसाहेब वयांत येऊन राज्यसूत्रं त्यांच्या हातीं येईपर्यंतच्या काळांत रेसिडेंट आणि राजेसाहेब यांच्यातल्या मध्यस्थाची भूमिका गायतोंड्यांकडं आली. साहेबाकडं जाऊन आला कीं, 'साहेब खूप रागावले, पण मी त्यांची समजूत घातली' असं हा सांगे; आणि त्या अप्रबुद्ध मुलाला तें खरं वाटून आपला हा नांवाचा शिक्षक पण खरोखरीचा हितचिंतक आणि रक्षणकर्ता आहे, अशी त्याची समज होई."

"साहजिकच राज्यसूत्रं हातीं आल्यावर शिक्षकाची याची भूमिका बदलून याच्याकडं आपल्या सल्लागाराची भूमिका राजेसाहेबांनीं दिली. पगार वाढला. राज्याच्या आणि राज्याच्या कल्याणाच्या गोष्टी करणाऱ्याचं चीज होत नाहीं. मात्र, राजाला भलत्या लफड्यांत गुंतविणाराची चहा होते, ही गोष्ट दुसऱ्यांच्या उदाहरणांवरून आणि अनुभवावरून यानं ओळखली. राजाकडून दुष्कर्म हेतुपुरस्सर घडवायचीं आणि त्यांचा बभ्रा झाल्याचा बागुलबुवा दाखवून त्याच्या निवारणार्थ म्हणून आपणच पैसा लाटायचा, असा याचा धूर्त कावा होता. पैसा मिळवूनच याची तृप्ति झाली नाहीं, तर, आपला मानहि त्या राज्यांत यानं वाढवून घेतला. अनुभवी आणि

सत्प्रवृत्त दिवाणाचा अडथळा याच्या कारस्थानाला होई. पण यानं खोट्या कागाळ्या सांगून राजेसाहेब आणि दिवाण यांचा वेबनाव आणला; आणि दिवाणांचं उच्चाटन करून स्वतःच ती जागा पटकाविली. पन्नास रुपये पगारावर नेमलेला मास्तर अवघ्या दहा वर्षांत दरमहा पांचशे रुपये मिळवणारा दिवाण झाला!"

"अधिकार वाढल्यावर द्रव्यसंपादनाचे याचे मार्गहि वाढले. नव-नव्या योजना यानं निर्माण कराव्या, त्यांतला संभवनीय फायदा राजे-साहेबांना दाखवावा आणि त्या योजना प्रत्यक्षांत आणण्याच्या नांवाखालीं लाटतां येईल तितका पैसा लाटावा असा उद्योग यानं अव्याहत चालविला. राजाला लुबाडूनच हा थांबला नाहीं तर प्रजेकडूनहि यानं अगणित पैसा उकळला. ज्या राज्याचं दिवाणपद याच्याकडं होतं त्या राज्यांत कायदा हा लिलावानं विकला जाऊं लागला. सोम्याची जमीन गोम्याला काढून दिल्याबद्दल गोम्याकडून पैसा उकळायचा, आणि गोम्याचं शेत राम्याला दिल्याबद्दल, राम्याला लुबाडायचा असा हा चौफेर हात मारीत होता. इतकी अप्रतिहत लूटमार करून देखील हा दिसायला दीन आणि साळसूद राहिला. तिऱ्हाइताला वाटावं, भिकाजीपंत हें याचं नांव, याच्या आई-बापांनीं ठेवलेलं नसून याच्या सद्यःस्थितीवरूनच याला तें प्राप्त झालेलं आहे; आणि गायतोंडे हें आडनांव देखील परंपरागत नसून याच्या विनय-शील भाषेवरून याला लोकांनीं चिकटवलेलं आहे. पण गोड बोलून गळा कापण्याचं कौशल्य याच्याइतकं, इतरत्र क्वचित्‌च आढळेल. या कौशल्याच्या जोरावर यानं आपल्या धन्याला आणि धन्याच्या धन्याला, म्हणजे प्रजेला, भरपूर लुटलं. स्वहित साधण्यासाठीं यानं सज्जनांचा द्रोह आणि अधमांची आराधना केली. स्वामिद्रोह, सज्जनछल आणि दुर्जन-पालन हेंच याचं अवतारकार्य आहे; आणि याच्यावर मी करणार आहे ते प्रमुख दोषारोप हेच आहेत."

"म्हणजे, कमी महत्त्वाचे असे दुसरे कांहीं आरोप याच्यावर तुला करावयाचे आहेत काय?"

"विचारवंतांच्या मतें कोणताहि अपराध सारखाच निषिध्य असतो. परंतु ज्याचं कारण व परिणाम कमी उपद्रवकारक त्या अपराधांना सौम्य

आणि ज्यांचा परिणाम अधिक उपद्रवकारक त्यांना गंभीर स्वरुपाचे असं मानण्याची रीत पडून गेली आहे. दिवाण भिकाजीपंत गायतोंडे यांच्याकडून वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक दृष्ट्या अगणित प्रमाद घडलेले आहेत आणि त्या प्रत्येकाबद्दल याला दंड केला तर याला युगानुयुगं नरकवासांत खिचपत पडावं लागेल. व्यभिचार, व्यसनासक्ति, गृहकलह, एक ना दोन! सहस्रावधि दुराचारांचा दोष याच्यावर येण्यासारखा आहे. पण सर्वांत गंभीर स्वरूपाचे आणि लोकांना तीव्रतेनें भोंवणारे जेवढे प्रमाद यानं केले तेवढ्यांचाच निर्देश मी धर्मपीठापुढं केला. ते याच्यावर सिद्ध झाले आणि त्यांबद्दल धर्मपीठानं याला योग्य असं शासन केलं, तरी तें पुरं होईल असं मला वाटतं."

"तुझं म्हणणं मी मान्य करितों. भिकाजीपंत, चित्रगुप्ताचं निवेदन तूं ऐकलंस. तें असत्य आणि निराधार आहे असं तुला सिद्ध करतां येत असेल तर कर. विनयशीलतेच्या आविर्भावानीं आणि मुद्रेवरील नाटकी दैन्यानं धर्मपीठाची दया तुला मिळवितां येणार नाहीं. या पीठापुढं सत्य ही एकच गोष्ट प्रभावी होऊं शकते. आणि असत्यांत सत्याचा आभास उत्पन्न करून मानवांप्रमाणं देवांची फसगत होऊं शकत नाहीं हें तूं लक्षांत घे. आतां तुला जें सांगायचं असेल तें सांग."

अशी धर्माज्ञा झाल्यावर दिवाण भिकाजीपंत हात जोडून बोलूं लागला.

"चित्रगुप्तांनीं माझ्यावर ठेवलेले आरोप मला अमान्य आहेत असं मी नम्रपणें सांगण्याची परवानगी घेतों. स्वामीद्रोहाचा माझ्यावरील आरोप खोटा आहे हें पटवून देण्यास मला फारच थोडे श्रम पडतील. भूलोकांतल्या ज्या संस्थानिकाची सेवा मी पत्करली, त्याची कृपाच मी संपादन केली. मी त्याच्याशीं द्रोह केला असता तर त्यानं मला पदव्या आणि पारितोषकं दिलीं नसतीं. आमच्या महाराजांनीं मला 'राज्यालंकार' अशी पदवी माझ्या राजनिष्ठेवर संतुष्ट होऊन दिली. एवढंच नव्हे, तर सेवानिवृत्त झाल्यावरसुद्धां माझा आणि माझ्या कुटुंबाचा योगक्षेम योग्यप्रकारें चालावा, म्हणून मला बागाईत जमिनी इनाम दिल्या. माझ्या राजावरहि ज्यांचं प्रभुत्व आहे, त्यांच्यावरील माझी निष्ठाहि मला त्यांच्याकडून मिळालेल्या 'दिवाणबहादूर' या पदवीवरून सिद्ध होईल. सम्राटांच्या प्रतिनिधीकडून मला ही पदवी

मिळालेली असली तरी लवकरच सम्राटांकडून मला ‘सर’ कीचा बहुमान मिळावयाचा ठरला होता. पण तो हस्तगत होण्याआधींच मला इकडं ओढून आणण्यांत आलं. माझ्या राजाचा आणि त्या राजाच्याहि राजाचा द्रोह माझ्याकडून झालेला नसून मी त्यांचा लोभच मिळविला ही गोष्ट सिद्ध करायला अधिक निवेदनाची आवश्यकता नसेल असं मला वाटतं. तरीदेखील मी माझ्या राजनिष्ठेचा आणखी पुरावा या धर्मपीठाला सादर करितों. माझ्या राजाचं राज्य चिमुकलं आहे. त्याच्या वडिलांच्या वेळीं राज्याचा वार्षिक महसूल फक्त पंधरा लक्षांचा होता. पण मी आतां तो पंचवीस लक्षांवर करून दिला आहे. राज्यांत उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देऊन त्यांची वाढ करविली आहे; आणि त्यामुळंच राज्याची प्रसिद्धीहि वाढली आहे. एवढं करूनच मी थांबलों नाहीं तर, माझ्या राजाचा मानहि मी वाढविला आहे. पूर्वी या संस्थानच्या अधिपतींस नुसतं—प्रमुख—किंवा इंग्रजी पद्धतीनं ‘चीफ्’ असं म्हणत. आतां त्यांना ‘राजा’ अशी पदवी वंशपरंपरा मिळालेली आहे. या कामीं माझं वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्यें असलेलं वजन आणि मी केलेले परिश्रमच उपयोगी पडलेले आहेत.”

“मी सज्जनांचा छळ केला असं चित्रगुप्त कसं म्हणू शकतात हेंच माझ्या लक्षांत येत नाहीं. माझ्या अमदानींत राज्यांत प्रतिष्ठित समजले जाणारे कांहीं लोक राज्याबाहेर काढण्यांत आले आणि प्रसंगीं तुरुंगांत डांबण्यांत आले, हेंच माझ्यावरील या आरोपाचं कारण असेल, तर तें समर्थनीय ठरणार नाहीं. राज्ययंत्र चालवितांना कायद्याचं हत्यार चालविणं अपरिहार्य होतं ही गोष्ट या धर्मसभेलाहि संमत होईल. कायदा हा सरळमार्गी लोकांना सहाय्यक असला तरी उपद्व्यापी लोकांना उपद्रवकारक ठरतो. आमच्या राज्यातले जे लोक हद्दपार केले गेले किंवा ज्यांना तुरुंगांत ठेवण्यांत आले, ते दिसायला सोज्वळ असले तरी चळवळे होते. राज्याच्या सुसूत्र कारभाराला आणि नागरिकांच्या स्वास्थ्याला विघातक असं वर्तन त्यांनीं केलं आणि तें न्यायालयांत सिद्ध झालं, तेव्हांच न्यायाला धरून त्यांना शिक्षा देण्यांत आल्या. न्यायालयांत सिद्ध न झालेल्या अपराधाबद्दल त्यांना शिक्षा दिल्या गेल्या आहेत कीं काय हें न्यायालयांतले निवाडे पाहून ठरवावं अशी मी या धर्मसभेला विनंति करतों.”

"सज्जनछळाचा माझ्यावरील आरोप कसा निराधार आहे हें या धर्मसभेला सिद्ध करून दिल्यावर मी सज्जनांचा सन्मानहि कसा केला आहे—करविला आहे, हें दाखवितों. विद्वान, कलावान आणि निःस्वार्थी लोकसेवक यांची पूजा मी सदैव करीत आलों. बोलून चालून मी हातावर पोट भरणारा सामान्य माणूस. द्रव्यदान करण्याइतकी संपन्नता मला कुठून असणार ? पण माझ्या श्रीमंत राजेसाहेबांकडून मी अशा थोरथोर सद्गृहस्थांचा गौरव करविला आहे, ही गोष्ट चित्रगुप्तांच्या वहींत नमूद असलीच पाहिजे. अबलोन्नतीसाठीं अहर्निश झटणारे आणि भारतीय कन्यांचे धर्मपिते म्हणून गणले जाणारे महाभाग धुंडिराज, यांचा गौरव आमच्या राजेसाहेबांनीं कसा केला, सिंहनाद, ज्ञानदीप, आदिकरून नियतकालिकांच्या संपादक मंडळांला राज्यांत मुद्दाम पाचारण करून त्यांच्या कार्याला वेळोवेळीं द्रव्य-सहाय्य कसं देवविलं, सुप्रसिद्ध चित्रकार, गुणी गायक आणि कसबी वादक-नर्तकांना मुबलक बिदागी मी राजेसाहेबांकडून कशी देवविली हें चित्रगुप्तांच्या वहींत टिपलेलं असेलच."

"देवाधिदेवा, चित्रगुप्तांनीं, मी राज्यांतील प्रजेचा—म्हणजे आपल्या राजाच्या राजाचा—द्रोह केला, असा आरोप जातां जातां माझ्यावर केला; त्यावर मला एवढंच सांगायचं आहे कीं, ज्या राजाची मी सेवा केली, त्या राजाच्या प्रजाजनांचा दर्जा, माझ्या अमदानींत वाढलेला आहे. आणि आत्मस्तुतीचा दोष पत्करूनहि मी असं म्हणतों कीं, प्रजेचा दर्जा माझ्या खटपटीनंच वाढविला गेला आहे. जग जाणतं होऊं लागलं आहे. कर देतो तो प्रत्येक नागरिक राज्याचा धनी असून राज्यकारभाराचा त्यालाहि अधिकार असला पाहिजे, असे नव्या विचारांचे वारे वाहूं लागतांच, माझ्या राजाकडून मी प्रजेला आपण होऊन अधिकारदान देवविलं. प्रजेनं अधिकार हिरावून घेण्यापर्यंत मजल जाऊं न देतां त्यांची मागणी येण्याआधींच हें अधिकारदान झालं, त्यामुळं राज्यांतलं स्वास्थ्य टिकून राहिलं, प्रजेचा दर्जाहि वाढला. या गोष्टी कोणत्याहि दृष्टीनं राजद्रोहाच्या ठरतील काय ? "

"आतां दुर्जनपालनाबद्दल खुलासा करून मी माझं निवेदन पुरं करतों. कांहीं हीनजातीय लोकांवर मी लोभ केला आणि कांहीं अल्पशिक्षित माणसांना मी सुशिक्षितापेक्षांहि योग्यतेला चढविलं ही गोष्ट खरी आहे.

पण जात आणि विद्यालयांत काढलेला काळ, यावरून माणसाची उच्चनीचता ठरविणं मला योग्य वाटत नाहीं. जो विश्वासघात करणार नाहीं, जो अवघड कार्यहि धैर्यानं आणि हुषारीनं चोख करून दाखवील, असा माणूस हलक्या जातीचा आणि कमी शिकलेला असला तरी तुच्छ लेखला नाहीं. उलट त्याच्या ठिकाणच्या सुप्त गुणांचा विकास होईल अशी अनुकूल परिस्थिति मी त्यांना प्राप्त करून दिली. यांत दुर्जनपालन हा निंद्य अपराध नसून गुणविकासाचं अवश्य कर्तव्यच माझ्याकडून घडलेलं आहे असं माझं नम्र निवेदन आहे."

" देवाधिदेवा, माझं भूलोकींचं जीवन अनीतिमय होतं, असंहि चित्रगुप्तानीं ध्वनित केलं आहे. यावर मी एवढंच सांगू इच्छितों कीं, मला सुपारीचंहि व्यसन नव्हतं, मग इतर व्यसनं दूरच राहिलीं. मी धर्मपत्नीव्यतिरिक्त सर्व स्त्रिया आयाबहिणी मानल्या. स्नानसंध्यादिक नित्यकर्म आणि परंपरागत कुळाचार पाळण्यांत मी हयगय केलेली नाहीं. ज्याला दुर्वर्तन म्हणतां येईल अशी कोणतीहि गोष्ट आपल्या हातून न घडावी, अशी दक्षता मी आमरण घेतलेली आहे. सदाचारी असून गौरविला जाण्याऐवजीं, दुराचारी म्हणून इथं माझ्यावर आरोप केला जावा यामुळं देवलोकींचा न्याय उलटा असतो, असा कोणाचा समज झाला तर तो चुकीचा ठरेल काय? देवसभेच्या न्यायदानाबद्दल प्राणिमात्राचा गैरसमज होऊं नये, यासाठीं माझ्यावर लादलेल्या वृथारोपांतून मला मुक्त करावं, आणि मी भूलोकीं संपादिलेल्या सन्मान्यतेला साजेसं श्रेष्ठपद इथंहि द्यावं अशी प्रार्थना करून मी माझं निवेदन आटोपतं घेतों."

दिवाण भिकाजीपंत गायतोंडे स्तब्ध झाल्यावर चित्रगुप्त म्हणाला:—

" भिकाजीपंत, आतां मी तुला कांहीं प्रश्न विचारतों त्यांचीं उत्तरं दे. तूं आपल्या राजाचा लोभ संपादन केलास तो कोणत्या गुणांवर हें तुला सांगतां येईल कां? "

" यांत अवघड काय आहे? धन्याला संतोषदायक होईल अशी सेवा केल्यावर त्याचा लोभ सेवकावर जडणार. मी राजकृपा संपादन केली ती या उपायानं."

" धन्याचा संतोष हें सेवावृत्तींतलं ध्येय असावं हें योग्य आहे पण तो संतोष सत्कृत्यजन्य असला पाहिजे अशी दक्षता विचारवंत सेवकानं तरी घ्यायला नको काय ? धनी खूष होतो म्हणून धूम्रपान मद्यपानाचे चोचले पुरवणं, फार काय त्या घाणेरड्या गोष्टींची त्याला चटक लावणं, आणि त्याला व्यभिचारांत रंगविणं, या गोष्टींनीं संतोषदायक स्वामीसेवेचं श्रेय सेवक मिळवूं शकेल काय ? तूं आपल्या धन्याचा सेवक असलास, तरी गुरुहि होतास. कारभारी हा राजाचा सल्लागार गुरूच असतो. म्हणून त्यानं राजाला श्रेयस्कर मार्ग दाखविला पाहिजे. तूं राजाचा मान वाढविला असशील, पण त्याच्या अनैतिक आचारापासून त्याला परावृत्त केलं नाहींस; उलट त्याला अधिकाधिक व्यसनलोलुप बनविलंस. परस्त्रीच्या मोहपाशांत तुझ्या राजाला तूंच अडकविलं नाहींस काय ? तुझ्या आश्रयाखालीं आलेली सुंदर मुलगी—तिच्यावर तुझ्या तरुण राजानं झडप घातली, ती तूं त्याला तशी सवड दिलीस म्हणूनच ना ? आणि अशा घाणेरड्या सेवेचं फळ म्हणूनच त्याची दिवाणगिरी तुला मिळाली ही गोष्ट तुला अमान्य करितां येईल काय ? तुझ्या राजाच्या मुंबई–दिल्लीच्या सफरी वारंवार होत त्यांत नव्या नव्या माशुकांची मजा लुटायची हाच हेतु असे. आणि तो हेतु तृप्त करण्यांत तुझं सहाय्य त्याला असे. तूं स्वतः व्यभिचारी नसलास तरी व्यभिचाराचा सहाय्यकर्ता खचित होतास. खून करण्याप्रमाणं, खुनाला मदत करणं हा, तूं शिकला आहेस त्या कायदेशास्त्रानं अपराधच मानला आहे. त्याच न्यायानं पापी मनुष्याचा मदतनीसहि पापी ठरणं न्याय्य नाहीं कां ? "

" पण अशी मदत करण्यांतहि मी माझ्या धन्याचं हितच साधलं आहे. राजा हा विलासी असायचा हा सर्वसामान्य नियम आहे. एकादा अपवाद असेलहि. पण सर्वसामान्य राजे महाराजांप्रमाणं आमचे राजेसाहेब रंगेल असले तर त्यांच्या रंगेलपणाचा बोभाटा होऊन ते लोकांचा टीकाविषय बनण्यापेक्षां त्यांच्या चाळ्यांवर पांघरूण घालण्याची दक्षता मी ठेवली, तरी ती योग्य अशी राजसेवाच नव्हे काय ? घरच्या घरीं—म्हणजे त्यांच्या राजधानीच्या शहरांत—त्यांच्या स्वैराचाराचा बोभाटा झाला असता. म्हणूनच अफाट वस्तीच्या शहरांत त्यांची हौस आम्हीं पुरवली आहे. राजे-

साहेबांचं हें वर्तन दोषास्पद असेल आणि दोषास्पद गोष्टीला सहाय्य करणं हेंहि दोषास्पद असेल, पण परिणामांवर नजर ठेवून—बेअब्रूच्या आपत्तींतून धन्याला वांचविण्याची सदिच्छा धरून—जर एकाद्यानं अशी गोष्ट केली तर तें दूषणीय ठरूं नये असं माझं म्हणणं आहे."

" भिकाजीपंत, हा कोळसा अधिक उगाळीत बसण्यापासून कांहीं लभ्यांश होण्यासारखा नाहीं; म्हणून हा विषय मी इथंच सोडून देतों आणि तुला दुसरा प्रश्न विचारतों. तुझ्या राज्यांत उद्योगधंद्याची वाढ करून तूं त्याचा लौकिक वाढविलास म्हणजे काय केलंस ? संस्थानच्या पैशानं कितीसे कारखाने काढलेस ? "

" सरकारी कारखाने काढले नाहींत पण व्यापारी लोकांना तसे कारखाने काढायला मी प्रोत्साहन दिलं."

" प्रोत्साहन शाब्दिकच ना ! त्यांना कराच्या सवलती कांहीं देवविल्यास कां ? कच्च्या मालाच्या आवकीवर आणि पक्क्या मालाच्या जावकीवर तूं कर बसविलेस. त्यांच्यावर प्रातीवरील करहि लादलास. राज्याचा महसूल वाढवून राजाचं कल्याण केल्याची बढाई तूं मघांशी मारलीस. पण ही वाढ निरनिराळे कर बसवूनच तूं साधलीस. मग उद्योग धंद्याच्या वाढीचं श्रेय तूं आपल्याकडं कां घ्यावंस ? "

" पण मी सुरूं करविलेले कर डोईजड नव्हते. तसे असते तर कारखानदारांना नफा झाला नसता आणि हा धंदा फायदेशीर नाहीं असं असतं, तर अधिकाधिक कारखाने निघालेच नसते. "

" कारखानदारांनीं नफा मिळविला तो आपल्या अक्कल हुषारीवर ! आणि उद्योगधंद्याची वाढ झाली तीहि त्यांच्या हिमतीवर ! या गोष्टींत तुझं किंवा तुझ्या राजाचं कसलंहि प्रोत्साहन नाहीं. तुम्हीं फुकटचा लौकिक आणि फुकटच्या मेजवान्या, पानसुपाऱ्या त्यांच्याकडून उकळल्यात. आतां या पुढील प्रश्न—आपल्या राज्यांत प्रधानमंडळ स्थापन करून तूं प्रजेचा दर्जा वाढविलास असं म्हणतोस. पण या प्रधानमंडळांत प्रजेचे खरे प्रतिनिधि किती आहेत ? "

" एकंदर सभासदांत अर्धे लोकांचे आणि अर्धे सरकारनियुक्त असावेत अशी घटना आहे. आणि त्याप्रमाणं अंमलबजावणी होतेहि. प्रजाजन आपले प्रतिनिधि निवडून देतात. "

" प्रजाजन निवडून देतात कीं तुम्हीं आपणाला प्रिय असतील तेच लोक त्यांच्याकडून निवडून आणतां ? "

" त्यांच्या निवडणुकींत संस्थानचं सरकार आपला अधिकार कांहींच चालवीत नाहीं. आम्हीं अधिकारी प्रतिनिधींची पात्रापात्रता प्रजाजनांना समजावून देतों. आणि योग्य माणसांची निवड करण्यांत त्यांना मदत करतों. "

" भिकाजीपंत, आतां शेवटचा एकच प्रश्न मी विचारतों. तुझी नोकरी तीस वर्षे झाली. आणि या मुदतींत तुझा पगार पन्नास रुपयापासून सातशें रुपयांपर्यंत होता. नोकरींतला पगार तुझं एकमेव उत्पन्न होतं. "

" तें कां ? आमच्या राजेसाहेबांनीं माझ्या कांहीं महत्त्वाच्या कामांवर खूष होऊन मला पांचपंचवीस हजारांची देणगीहि दिली आहे. "

" तीहि आपण जमेस धरूं. तुझा सरासरी पगार दरमहा चारशें रुपये पडला असं आपण समजूं. म्हणजे तुझी वार्षिक प्राप्ती पांच हजारांपर्यंत झाली. तीस वर्षांत तूं दीड लाख रुपये पगाराच्या रूपानं मिळविलेस. यांत देणगीचे पाव लाख आणि दुसरे कसले तरी पाव लाख भरतीस घालून तुझी न्याय्य अशी मिळकत दोन लाख रुपये होते. तुझ्या इभ्रती-प्रमाणं राहणी ठेवणं तुला अवश्य होतं. आईच्या तीर्थयात्रा, पत्नीच्या हौशी, मुलांचीं शिक्षणं आणि मुलींचीं लग्नकार्यं यासाठीं तुझा थोडाफार खर्च झाला असलाच पाहिजे. नित्याचा प्रपंच खर्चहि झालेला असणार. त्या सर्वांतून ऊर फारशी राहूं नये. पण तूं अत्यंत मितव्ययी असल्यानं आपली अर्धी कमाई तूं शिल्लक टाकलीस असं धरलं तरी, तुझी आजची शिल्लक एक लक्ष रुपयांच्या पलीकडं जाणं अशक्य दिसतं. आतां मला सांग, तुझी स्थावर जिंदगी किती आहे ? मुंबईची एकच चाळ तूं सव्वा दोन लाखांला विकत घेतली आहेस. साम्राज्य सरकारनं काढलेले कर्ज-रोखे तूं पाऊण लाखाचे घेतले आहेस. पन्नास हजारांचं तरी सोनं आणि जवाहिर तुझ्या घरीं आहे. म्हणजे कमीत कमी चार पांच लक्षांचा ऐवज

तुझ्या मालकीचा आहे. या ढोबळ हिशेबावरूनहि तूं अन्याय्य मार्गानं द्रव्य-संचय केलास असं ठरत नाहीं काय?"

चित्रगुप्ताचा हा सवाल म्हणजे भिकाजीपंतावर वज्रप्रहारच होता. त्याला यांतून निसटतां येण्यासारखं नव्हतंच ! तो कांहींतरी उत्तर देण्याच्या प्रयत्नांत होता पण त्याची ती तिरपीट पाहून देवगुरु म्हणाले:–"भिकाजी-पंत, अधिक बोलण्याचे कष्ट कशाला घेतोस ? यांत आपली बाजू सावरण्या-ऐवजीं तूं ती अधिकच ढांसळून टाकशील अशी मला भीति वाटते. आतां तूं स्वस्थ रहावंस हेंच मला श्रेयस्कर वाटतं. चित्रगुप्ता, तुला आणखी कांहीं सांगायचं आहे काय?"

"आतां अधिक कांहीं सांगण्याची वास्तविक आवश्यकता नाहीं. तरी पण दिवाण भिकाजीपंतानं सत्य गोष्टी, विकृत स्वरूपांत माझ्यापुढं कशा मांडल्या याबद्दल मला थोडासा खुलासा करायचा आहे. भिकाजीपंताच्या जीवित कार्याचं सत्यस्वरूप असं आहे—बुद्धिवान असून सद्सद्विवेक बुद्धीला यानं कायमची रजा दिली होती. साधेल त्या मार्गानं धन आणि सन्मान मिळवायचं एकच ध्येय यानं ठेवलं. धन्याचा अडाणीपणा, व्यसनाधीनता, आणि तिच्यापायीं निर्माण झालेला भित्रेपणा नौकराला उपकारक ठरतात हें त्यानं चाणाक्षपणानं हेरलं आणि म्हणूनच यानं आपल्या धन्याला शिक्षक होऊनहि अडाणीच राखलं. त्याला व्यसनी आणि विषयलंपट करून सदैव भीतिग्रस्त ठेवलं. राजेसाहेबांकडून एकादी घाणेरडी गोष्ट घडवावी, तिचा बोभाटा होईल आणि त्याबद्दल वरिष्ठ सर-कारची थप्पड बसेल हा नसता बाऊ त्यांच्यापुढं उभा करावा आणि त्या बागुलबुवाला पिटाळून लावण्याच्या निमित्तानं यानं खजिन्यांतले पैसे लांब-वावे असा याचा कार्यक्रम अखंडपणें चालू होता.

"भीतिप्रमाणं आमिष दाखवूनहि हा आपल्या धन्याला लुबाडीत होता. साम्राज्य सरकारकडून पदव्या मिळवून देण्याच्या निमित्तानं वरिष्ठ अधि-काऱ्याशीं संधान बांधायला म्हणून यानं हजारों, लाखों रुपये लांबवले. गुप्त कारस्थान या नांवाखालीं लांबवलेल्या पैशाचा हिशेबहि यानं कधीं दिला नाहीं. या खटाटोपांत यानं पैसा तर मारलाच पण राजाला नुसता राजा म्हणवून घेऊन स्वतःची रावबहादुरी आणि दिवाणबहादुरी मात्र यानं

पदरांत पाडून घेतली. राज्य म्हटलं म्हणजे अधिकाराबाबत कांहीं खटलीं असायचींच. त्याकामीं उत्कृष्ट कायदेपंडिताच्या मदतीची आवश्यकता भासवून आणि खुद्द सम्राटांच्या दरबारांत संधान जोडलं पाहिजे असा समज करून देऊन यानं राजाकडून विलायतच्या सफरीची आपली आणि आपल्या सौभाग्यवतीची हौस पुरवून घेतली. याची हौस किंवा याची एकादी योजना निघेल, तेव्हां खजिन्यांत पैसा असेलच असं नाहीं. परंतु जामदारखान्यांतलं जडजवाहिर किंवा कुठला तरी वाडा बाग विकायला लावून हा आपला डाव साधीत असे. आपल्या राज्यांत सोन्याची खाण लागणं शक्य आहे. आणि त्यासाठीं तज्ज्ञाकडून संशोधन करविलं पाहिजे अशी योजना यानं काढली आणि सुवर्णलोभांत राजाला गुंगवून पैसा लांबविला. ती खाण कधींच सांपडली नाहीं पण तिच्या निमित्तानं राज्याच्या तिजोरींतले अर्धापाऊण लाख रुपये फरारी झाले. याच्या लाग्याबांध्याच्या एका माणसाची खनिजतज्ज्ञ म्हणून नेमणूक झाली आणि 'त्वयार्धं मयार्धं' अशा भागीदारींत उभयतांनीं आपापलं काम उरकून टाकलं. मासल्यापुरती ही एकच योजना मी धर्मसभेपुढं ठेवली, पण ज्या सत्यसृष्टींत कधींच उतरूं शकल्या नाहींत अशा योजना काढावयाच्या आणि त्यांच्या नांवावर आपली तुंबडी भरून घ्यायची असा याचा क्रम अव्याहत चालू होता."

"याची ही डाकुगिरी ओळखणारे चाणाक्ष लोक राजाच्या चाकरींत होते. ते राजाकडं आपली चुगली करतील म्हणून त्यांना सेवानिवृत्त करून किंवा कसल्यातरी कारस्थानाच्या जाळ्यांत त्याना जखडून यानं आपला मार्ग निष्कंटक केला. आपल्याखेरीज इतर कोणाचा शिरकाव राजाच्या आसमंतात् होऊं न देण्याची खबरदारी यानं ठेवली. फार काय राणीसाहेबांची मात्राहि लागूं पडूं नये असा बंदोबस्त यानं करून ठेवला. आपला खरा कल्याणकर्ता कोणी असलाच तर तो भिकाजीपंत गायतोंडे दिवाण, असं मायेचं छत यानं आपल्या राजावर पसरून ठेवलं होतं. देवाधिदेवा, याचे इतर दुर्गुण दंडनीय असले तरी याची धूर्तता कौतुकास्पद आहे, असं मला वाटतं. राजपुत्र–राजकन्येसाठीं वधूवरसंशोधन करण्याचं स्वातंत्र्यसुद्धां यानं आपल्या राजाराणीकडं ठेवलं नव्हतं. ही याची कर्तबगारी अलौकिक नव्हे काय?"

" आतां यानं सज्जनसन्मान आणि दुर्जनपालन कसं काय केलं तें मी निवेदन करितों. राज्यांतले सरळमार्गी नोकर आणि स्वाभिमानी सज्जन, यानं सन्मानण्याऐवजीं त्यांची अवहेलनाच केली आहे. या राज्यांत आपणांपेक्षां दुसऱ्याचा वरचष्मा कोणत्याहि क्षेत्रांत राहतां कामा नये अशी याची राक्षसी महत्त्वाकांक्षा होती. आणि वाटेल त्या युक्तिप्रयुक्तीनं यानं ती पुरी केली. आपल्या डोळयांत खुपणाऱ्या हुषार आणि प्रामाणिक नोकरांची यानं कशी वाताहत केली हें मी आधीं सांगितलंच आहे. नागरिकांपैकीं ज्यांनीं याच्या इच्छेला मान्यता दिली नाहीं आणि जे सद्सद्विवेक बुद्धीला पटेल तेंच बोलूं चालूं लागले, त्यांच्यावर कसलीतरी तोहमत आणून त्यांना यानं देशोधडीला लावलं. आपण अत्यंत न्यायप्रिय कारभारी आहों असा लोकभ्रम उत्पन्न करण्यासाठीं यानं सज्जन नागरिकांवर भरलेले खटले बाहेरच्या न्यायाधीशांकडून चालविले आणि 'पाहुण्याकडून साप मारायचा' म्हणतात त्याप्रमाणं यानं परस्थांकडून नको असलेल्या लोकांची वासलात लावली. बाहेरचा न्यायाधीश कोणता बोलवायचा आणि तो आपल्याला हवा तसाच निकाल हमखास कसा देईल हें जाणण्याची बुद्धि आणि उपाय याच्यापाशीं सदैव सज्ज असत.

" स्वजनांशीं अशी दावेदारी करीत असला तरी, बाहेरचीं तोंडं, हा मोठ्या खुबीनं बंद करून ठेवी. लोकांत मान्यता पावलेल्या थोर गृहस्थांच्या गांठीभेटींत हा इतकं सौजन्य, इतकी नम्रता, आणि इतकी सद्भावना प्रगट करी, कीं त्या पुरुषाचा याच्या चांगुलपणाविषयीं हमखास अनुकूल ग्रह व्हावा. बाहेरच्या सार्वजनिक संस्थांना आपल्या राजाकडून भरगच्च देणग्या देववून राजापेक्षांहि आपलाच बोलबाला यानं करून घेतला. ' बाहेर लौकिकाचा नगारा झडूं लागला कीं घरची रडारड कुणाला ऐकूंच जात नाहीं. ' असं हा आपल्या खास बैठकींत बोलूनहि दाखवीत असे. यानं बाहेरच्या सज्जनांचा गौरव आणि पूजा केली अथवा करविली असेल तर ती भक्तिभावानं नसून आपला पापीपणा छपविण्याचा एक मार्ग म्हणून केली आहे. "

" सज्जनांची अशी वासलात लावल्यावर राहिलेल्यांतले पुंड आणि गुंड लोक हाताशीं धरून यानं आपलं राज्ययंत्र मन मानेल तसं चालविलं.

राज्यांतल्या हर एक खात्यांत यानं आपल्या डोळ्याच्या धाकांत राहतील, डल्ला मारून आपला हिस्सा आपल्या घरीं आणून पोंचवतील अशीं खात्रीचीं माणसं पेरून ठेवलीं. याच्या शब्दाप्रमाणं वाटेल तें दुष्कृत्य करण्याइतकं उलटं काळीजही याच्या हिशेबानं नोकराची मोठ्यांत मोठी लायकी होती. विद्वत्ता आणि शिक्षण यांची याच्यापुढं किंमत नव्हती. फार काय, हे गुण याच्या दृष्टीनं दुर्गुण मानले गेले होते. यामुळंच प्रजामंडळाच्या निवडणुकींत याच्या मर्जीतले पुंड उभे रहात आणि त्यांनाच हा निवडून आणी. याच्यावर दुर्जन पालनाचा आरोप मी करतों तो यासाठींच. भिकाजीपंत, तूं कोणत्या नालायक इसमाला कोणत्या अधिकार पदावर नेमलंस आणि कोणत्या पुंडाला तूं प्रतिनिधिमंडळाचा नामदार बनवलंस त्यांचीं नांवंच सांगायला पाहिजे असतील तर तशीहि माझी सिद्धता आहे. आणि अशा हस्तकांच्या द्वारां तूं कोणकोणतीं अवदानं घशांत घातलींस त्यांचा हिशेबहि मला देतां येईल. तुझा अगदीं उजवा हात बनून राहिलेला काळूराम फौजदार नुकताच इथं आलेला आहे. आणि रौरवांत सध्यां त्याचा मुक्काम आहे. इथं त्याला तुझ्या रागालोभाची कदर बाळगण्याची आवश्यकता नसल्यामुळं तुझ्या दुष्कृत्यांबद्दल साक्ष देऊन तो धर्मपीठाची खात्री करूं शकेल. त्याला इथं आणवूं काय ?”

चित्रगुप्ताच्या या प्रश्नानें भिकाजीपंत दिवाण भयभीत झालेला दिसला. काळूराम फायद्यापुरता मन धरून राहणारा असला तरी फायदा नसेल तेव्हां बापाला बापहि न म्हणण्याइतका उलट्या काळजाचा होता, ही गोष्ट दिवाणांना पुरती माहिती होती. तो खरोखरच साक्ष द्यायला आला तर घडलेलीं पापं तर सांगेलच पण न घडलेल्या गोष्टींना तिखटमीठ लावून आपल्या पापाचरणाची उग्रता वाढवील अशी त्याला भीति वाटली आणि तो चांचरत म्हणाला:—

“साक्षी पुराव्याची आवश्यकता काय आहे? मला काय सांगायचं होतं तें मीं सांगितलं आहे. चित्रगुप्तांनींहि आपली बाजू आपल्या दृष्टीनं सजवून, रंगवून, पुढं मांडली आहे. धर्ममहाराज आणि देवगुरु प्रभृति महाभाग या बाह्य वर्णनांतून अंतरंग शोधून पाहतील आणि योग्य तो

निर्णय देतील अशी मला खात्री आहे. मी निरपराधी असून, अपराध्याचं शासन माझ्यावर लादलं जाऊं नये एवढीच माझी प्रार्थना आहे."

भिकाजीपंताचं बोलणं थांबल्यावर यमधर्म म्हणाले:—

"देवगुरूंचं या आरोपीविषयीं काय मत आहे?"

"गतजन्मीं धन्याला पाठीवरून मिरवून यानं त्याच्या लाथा खाल्ल्या होत्या. त्याचं उट्टं यानं मानवजन्मांत काढलं. यानं धन्यावरच कुरघोडी करून त्याला मन मानेल तसं नाचवलं. नावेवर गाडा आणि गाड्यावर नाव असा प्रकार होतो म्हणतात, त्यांतलाच हा प्रकार झाला. तथापि याचे दुराचार समर्थनीय नव्हेत. चित्रगुप्तानं याच्यावर लादलेले आरोप सिद्ध झालेले आहेत, एवढंच नव्हे तर याच्यावर लागू होणारे सर्वच्यासर्व आरोप चित्रगुप्तानं कां सादर केले नाहींत हें मला समजत नाहीं. चित्रगुप्ताची ही क्षमाशीलता याच्या दीन चर्येमुळंच निर्माण झाली कीं काय असा मला संशय येतो. यमधर्मा, भिकाजीपंताच्या पापांबद्दल अवश्य तेवढं शासन तूं करावंस अशी माझी आणि माझ्या बरोबरीच्या सदस्य-महाभागांची इच्छा आहे."

देवगुरूंची आज्ञा मान्य करून यमधर्मांनीं निर्णय सांगितला:—

"भिकाजीपंत, वैभव आणि सन्मान यांच्या हव्यासामुळं तूं अमानुष अत्याचार केलेस. वैभव आणि मानमान्यता यांची इच्छा मनुष्याला असावी हें त्याच्या पुरुषार्थाचं द्योतक आहे. पण ती इच्छा त्यानं आपल्या सद्‌गुणांवर आणि सत्कृत्यांच्या जोरावर पूर्ण करून घेतली, तरच गौरवास्पद ठरेल. दुसऱ्याचा घात करून मनुष्यानं आपली प्रतिष्ठा वाढविणं हें घोर पातक असून तूं तें बुद्धिपुरस्सर केलं आहेस. म्हणून मी तुला शत संवत्सरपर्यंत दर्दुररूपानं जगण्याची शिक्षा देतों. अल्पावधींत मेलास तरी त्याच योनींत पुनर्जन्म होईल. निर्मल जलसंचय तुझ्या अंवती भंवती पसरला असला तरी त्यांत तुला सौख्य लाभणार नाहीं. सौंदर्यानं नटलेलीं आणि मकरंदानं भरलेलीं कमळं तुझ्या समीप फुललेलीं असलीं तरी तुला ओंगळ कर्दमावरच उदरंभरण करावं लागेल. तुझा स्पर्श नव्हे तर तुझ्या नुसत्या दर्शनानंहि दुसऱ्याला शिसारी येईल आणि तुझा सदैव तिरस्कार होत राहील. एखादे वेळीं तुला कर्दमाबाहेर पडण्याची बुद्धि होईल. याचं

प्रायश्चित्त म्हणून तुला सर्पमुखांत पडावं लागेल आणि शेवटच्या जन्मांत तूं माणसाच्या हातीं सांपडून वैद्यविद्यालयांतल्या प्रयोगांत तुझ्या शरीराची चीरफाड केली जाईल. त्या चीरफाडींत तुला तत्काळ मृत्यु येण्याऐवजीं तूं अधिकांत अधिक काल कसा जिवंत राहशील अशी दक्षता प्राध्यापक आणि विद्यार्थी घेतील. जिवंतपणीं मृत्यूच्या वेदना तुला सोसत रहावं लागेल पण यामुळं कां होईना लोकहितार्थ तुझा देह कारणीं लागेल. या पुण्याईच्या जोरावर हीन योनींतून तुझी मुक्तता होईल आणि तुला पुढं कोणता श्रेष्ठ जन्म द्यावयाचा तो निर्णय त्यावेळीं दिला जाईल. चित्रगुप्ता, याची नियोजित स्थळीं पाठवणी कर आणि दुसरा प्राणी धर्मपीठापुढं उपस्थित कर."

---

## शंभूराव पोटे

७

दोघां धिप्पाड यमदूतांनीं तें धूड आणून धर्मपीठापुढें ठेवलें. थोड्या वेळामागें तिथें आलेल्या बाईसाहेबांचाच तो पुरुषी नमुना दिसत होता.

" चित्रगुप्ता, हा मनुष्य आहे, महिष आहे कीं हत्तीचं पिलूं आहे ? " यमधर्मानें विचारलें.

" देवाधिदेवा, हा मानवच आहे. "

" कोणत्या भूमींत याचं वास्तव्य होतं ? "

" भरतभूमींत महाराष्ट्र नामक विभाग आहे तिथं हा जन्मला, तिथंच हा लहानाचा मोठा झाला आणि तिथूनच इथं आला. "

" चित्रगुप्ता, भारतांतले मानवप्राणी आपली उपासमार होत असल्याची आणि भुकेला बळी पडावं लागल्याची तक्रार इथं नेहमीं सांगत असतात. त्याचे अस्थिपंजर पाहिले म्हणजे त्यांची ती तक्रार खरी असावी असं वाटूं लागतं, परंतु नुकत्याच येऊन गेलेल्या बाईसाहेबांवरून आणि याच्यासारख्या मानवाकडं पाहून भारतीय मानवांची ती तक्रार खोटीच आहे कीं काय

अशी शंका वाटूं लागते. यांच्याकडं पाहिलें म्हणजे, भारतात अन्नाचं वैपुल्यच नव्हे, तर अन्नाचा अतिरेक असल्यासारखं वाटतं. ''

"धर्ममहाराजांची ही शंका बरोबर आहे. भारतांत अन्न मर्यादितच आहे. पण त्याची विभागणी समप्रमाणांत होत नसून विषम प्रमाणांत होते. म्हणून कांहीं भारतीयांना पात्रतेपेक्षां लाखोपटीनं अधिक अन्नसंचय संग्रह करतां येतो. आणि लाखों लोकांना अर्धपोटींच काय, पण उपाशी पोटानं मरावं लागतं. अन्नाची ही विषम विभागणी भारतीय मानवांना आतां दुस्सह वाटूं लागली आहे आणि ती समप्रमाणांत व्हावी, निदान अन्नाचा अभाव कोणासहि सोसावा लागूं नये, या दृष्टीनं कांहीं जाणते लोक धडपडहि करूं लागले आहेत. त्याचे ते प्रयत्न आज ना उद्यां फळाला येतील. त्यानंतर अत्यंत परस्परविरोधी अवस्थेंतील मानवदेह या धर्मपीठापुढं यायचे थांबतील. "

"तथास्तु ! आतां आपण प्राप्त कर्तव्याला प्रारंभ करूं या ! या प्राण्याबद्दलचं तुझं निवेदन धर्मपीठाला सादर कर. "

"या मानवाचं नांव शंभूराव पोटे असं आहे. आणि याच्यावरील महत्तम आरोप 'विषप्रयोगानं स्वबांधवांचा यानं वध केला' हा आहे. याच्यावर दुसरेहि आरोप मला करतां येतील. पण या महत्तम आरोपाची सिद्धता मला करतां आली नाहीं, किंवा यानं माझा हा आरोप खोटा ठरविला तरच ते मी धर्मपीठाला श्रुत करीन. विषप्रयोगाचा हा घोर अपराध यानं केला असं सिद्ध झालं आणि त्याबद्दल धर्मपीठानं याला अवश्य तें शासन केलं, तर दुसऱ्या लहानसहान पातकांचं प्रायश्चित्त याला मिळाल्यासारखं होईल. म्हणून या एका आरोपासंबंधीं याचं म्हणणं ऐकून घेऊन देवाधिदेवांनीं प्रथम निवाडा करावा, अशी मी प्रार्थना करितों. "

"ही तुझी प्रार्थना मी मान्य करितों. पण चित्रगुप्ता, या शंभूराव पोट्यावर विषप्रयोगाचा आरोप तूं कोणत्या आधारावर करतोस, हें प्रथम कळायला नको काय ? धर्मपीठाच्या दृष्टीनं तें आवश्यक आहेच पण आरोपीच्या दृष्टीनंहि तें अत्यावश्यक आहे. आधार कळल्यावांचून आरोप मान्य आहे कीं अमान्य आहे, हें हा कसं सांगूं शकेल ? म्हणून तूं करीत असलेल्या आरोपाची सिद्धता तुला विस्तारशः केली पाहिजे. "

" मानव जन्मांत याला शालेय शिक्षणाचा लाभ झाला नाहीं किंवा यानं तो घेतला नाहीं. आईबापांनीं याला शाळेंत घातलं होतं, पण पंतोजीं-कडून धडे शिकण्याऐवजीं बरोबरीच्या सोबत्यांच्या खोड्या काढण्याची आणि त्यांच्याशीं मारामाऱ्या करण्याचीच याला हौस होती. साहजिकच शाळेंत याला ठोंब्या ही पदवी प्राप्त झाली. चारपांच इयत्तांपर्यंत हा वर चढला. पण अभ्यासाच्या जोरावर नव्हे, तर कधीं बापाच्या रदबदलीनं आणि कधीं शिक्षकांनाच याला एकाच वर्गांत बसवून ठेवण्याचा कंटाळा आल्यामुळं. आपल्या शालेय जीवनांत यानं शाळेंत किंवा घरीं मार खाल्ला नाहीं असा एकादा दिवसहि गेला नसेल. हा जसजसा जाणता होऊं लागला, तसतसा याला या माराचा संताप येऊं लागला. ज्या कारणामुळं अशी आपली नाचक्की होते तें कारण याला कळत नव्हतं असंहि नाहीं. परंतु अभ्यास करण्याची आणि समजूतदारपणं वागण्याची इच्छा मात्र याला कधींच झाली नाहीं. म्हणून आपल्या मागचा माराचा त्रास चुक-विण्याचा यानं एक मार्ग शोधून काढला. हा घरांतून पळून गेला."

" याचा बाप निर्धन होता पण भला माणूस होता. तरी देखील याला शोधून परत घरीं नेण्याचा प्रयत्न त्यानं केला नाहीं. आपल्या मागची एक पीडा गेली म्हणून त्याला हायसंच वाटलं ! याची प्रेमळ माउलीहि मनांतून हळहळत असली तरी याच्या शोधाचा आग्रह तिनं आपल्या पतीला केला नाहीं. ज्या मुलाचा त्याच्या प्रत्यक्ष मातापित्यांनाहि तिटकारा वाटला, तो मुलगा किती गुणाचा असेल याची धर्मपीठाला कल्पना येईल."

" हा घरांतून पळून गेला तो एका तीर्थक्षेत्रीं. तीर्थक्षेत्रांत ऐदी, दुरा-चारी लोकांचा योगक्षेम सुखानं चालविण्याइतकी भाबडी बुद्धि हिंदुस्तानां-तल्या धनिकांत असल्यामुळं याचे कांहीं दिवस मजेंत गेले. यात्रेकरूंनीं घातलेल्या जेवणावळींत–निदान अन्नछत्रांत–पुख्खा झोडावा आणि नदी-देवळांच्या आसपास गरीब यात्रेकरूंशीं मस्ती करीत हिंडावं, असा याचा कार्यक्रम सुरू झाला. गोसावी बैराग्यांच्या फडांत मिसळून यानं भांग-गांजाची दीक्षाहि घेतली. एका क्षेत्रांतल्या वास्तव्याचा कंटाळा आला कीं, याचा दुसऱ्या क्षेत्राकडं मोर्चा वळे. वयाची विशी गांठायच्या आंत यानं

भारतांतलीं बहुतेक क्षेत्रं पादाक्रांत केलीं. पण पुनीत होण्याऐवजीं नवनव्या पातकांत हा सराईत झाला."

"कृष्णाकांठच्या एका क्षेत्रांत यानं एका कुलीन स्त्रीची कुचेष्टा केली आणि त्यापायीं याला लोकांनीं यथेच्छ बुकललं. तेवढ्या शिक्षेला दाद न देण्याइतका हा निगरगट्ट झालेला होता. परंतु आपली कंबक्ती करणारे लोक आपणांस तुरुंगाची हवा दाखविण्याच्या तयारींत असलेले पाहून हा घाबरला आणि यानं त्या क्षेत्रांतून पलायन करून मुंबई गांठली. एका नाटकमंडळीचा यानं आश्रय घेतला."

"चित्रगुप्ता, इतर किरकोळ आरोपाबद्दल तुझी फिर्याद नसून विष-प्रयोगाबद्दल आहे असं तूं आरंभीं सांगितलं आहेस. मग याच्या त्या-व्यतिरिक्त दुष्कर्मांची हकीकत कशासाठीं सांगतो आहेस?"

देवगुरूंनीं मध्येंच विचारलेल्या या प्रश्नावर चित्रगुप्तानें खुलासा केला--

"मी त्याच मुद्यांवर येणार आहे. पण त्या घोर अपराधापर्यंत याची मजल जाईपर्यंतची भूमिका कशी तयार होत होती, हें या धर्मसभेला कळावं म्हणून या गोष्टी मला सांगाव्या लागत आहेत. शिवाय धर्ममहाराजांनीं माझ्या दाव्याची सिद्धता मी विस्तारानं करावी, अशी मला आज्ञा केली आहे. माझ्या निवेदनांत नकळत पाल्हाळ झाला तर मला क्षमा व्हावी."

"नाटकमंडळींत शिरून हा नट झाला नाहीं. कारण नटालाहि भूमि-केचीं भाषणं पाठ करायला आणि अभिनयांत प्राविण्य मिळवायला अभ्या-साची आवश्यकता असते. आणि अभ्यासाचं तर याला वावडं. म्हणून केवळ राबणुकीचं काम याच्या वांट्याला आलं. दिवसां पाणी भरणं, पंगत वाढणं आणि रात्रीं रंगभूमीवरील पडदे ओढणं हें याचं काम ठरलं. तीर्थ-क्षेत्रांतल्या आयत्या चैनीपेक्षां ही राबणूक कष्टप्रद होती. पण इथं दुसरीं आकर्षणंहि होतीं. नाटकमंडळीचे मालक आणि प्रमुख नट यांच्या भजनीं लागलेलीं कांहीं माणसं ठिकठिकाणीं असतात त्यांत विलासी वृत्तीच्या स्त्रियाहि असतात. याच्या तारुण्यामुळं स्त्रीविषयक आकर्षण याच्या अंतर्यामीं निर्माण झालं होतं आणि स्वतः याच्यावर कोणी स्त्री आकृष्ट होईल हें शक्य नव्हतं. म्हणून दुसऱ्यांच्या प्रेमपात्रांची तैनात करण्याच्या आनंदांतच हा धन्यता मानूं लागला. नटमंडळींच्या जीवावर याची काडीविडीची

आणि भांगगांजाची तहान शांत होती. प्रसंगविशेषीं मद्याची लज्जतहि याला घ्यायला सांपडे."

"याच्या देशांतल्या संस्था एकजुटीनं सहसा चालविल्या जात नाहींत. एक संस्था थोडी नांवारूपाला येते न येते तोंच तिच्या घटकांत फाटाफूट होते आणि एकाच्या दोन, दोनीच्या चार होत होत सर्वच नामशेष होतात. याच्या मंडळीचीहि अशीच अवस्था होई, आणि वर्षसहा महिन्यांत हा एका मंडळींतून दुसरींत जाई. हा दहापांच मंडळ्यांबरोबर फिरला. याची प्रगति झालीच असेल तर ती म्हणजे हा वाढप्याचा आचारी झाला. कसा तें कोण जाणे; पण पाकशास्त्रांत याची बरी तयारी झाली! आणि त्यामुळं आत्मविश्वास निर्माण होंऊन स्वतंत्रपणें उद्योग करण्याची इच्छा याच्या मनांत उचल खाऊं लागली. नाटक मंडळ्यांचा धांवता आणि अनिश्चित जीवनक्रम चालू ठेवण्यापेक्षां कोठेंतरी स्थिर व्हावं आणि आपल्या नवीन हस्तगत झालेल्या कलेच्या जोरावर आपला जम बसवावा, असं यानं ठरवलं आणि जिथं याची नाटकमंडळी विराम पावली तिथंच यानं आपलं भोजनालय उघडलं."

"तो तालुक्याचा गांव होता. सर्व खात्यांच्या कचेऱ्या तिथं होत्या. व्यापारी पेठ बऱ्यापैकीं होती आणि आगगाडीचं ठाणं तिथं होतं. त्यामुळं माणसांची येजा तिथं बरीच असे. अशा ठिकाणीं एकादं भोजनालय नसावं ही आश्चर्याचीच गोष्ट होती, पण तें नव्हतं खरं! त्याची उणीव परस्थाप्रमाणं स्थानिक लोकांनाहि जाणवत होती आणि जेव्हां पोत्याची—म्हणजे याची—खाणावळ तिथं सुरू होणार असं कळलं, तेव्हां गरजू लोकांनीं सर्व प्रकारचं प्राथमिक सहाय्य त्याला दिलं. दहावीस कायमचे ग्राहक मिळाले आणि शंभूरावाच्या पाकनैपुण्याचा आस्वाद घेऊन ते संतुष्टहि झाले. हंगामी गिऱ्हाईकंहि शंभूरावाला मुबलक मिळूं लागलीं."

"वर्ष सहा महिन्यांत शंभूराव पोत्यानं उत्तम जम बसविला. या मुदतींत त्यानं लोकांना खरोखरच चांगलं जेवूं घातलं आणि त्याच्या हातांत चार पैसे खेळूं लागले. दिवसभर पुरून उरतील इतके काबाडकष्ट त्याच्या पुढं असल्यानं या मुदतींत व्यसन किंवा चैन करायला त्याला फुरसतच मिळाली नाहीं. आणि एकदां त्यांची मैत्री तुटली ती तुटली. यानंतरच्या

जीवनक्रमांत विडीपलीकडं त्याची व्यसनासक्ति वाढली नाहीं. मात्र त्याचं पैशाचं व्यसन सतत वाढत चाललं."

" प्रारंभीं आपला व्यवसाय हा लोकाश्रयावर आहे याची शंभूरावाला जाणीव होती आणि त्यासाठीं तो लोकांचीं मनं सांभाळण्याची दक्षता घेई. पण लौकरच आपणाला लोकांचा आश्रय नको असून, लोकांनाच आपला आश्रय पाहिजे आहे असा समज किंवा गैरसमज त्यानं करून घेतल्या-मुळंच आणि आपल्यावर अवलंबून राहणाऱ्या आश्रयदात्यांना आपल्या टप्प्यांत आलेली शिकार समजून त्यांच्याशीं हा चढाईनं वागायला लागला. त्यांनीं दिलेल्या पैशांचा जास्तींत जास्त मोबदला त्यांच्या पोटांत घालण्या-ऐवजीं त्यांतली जास्तींत जास्त ऊर स्वतःसाठीं कशी उरेल, हें धोरण त्यानं पत्करलं. हलक्या जातीचे तांदूळ घेऊन ते न निवडतांच हा भात करूं लागला; किडकी ज्वारी बाजरी, आणि कुजके गहूं, भाकरी पोळ्यांना येऊं लागले; वाशेळं तूप, आंबट ताक आणि तिखट तोंडीलावणीं, भोज-कांच्या पानांत पडूं लागलीं. स्वतः मुकादमी करून भाडोत्री स्वयंपाक्याकडं यानं चूल सोंपविली. ते शिजवतील तसं कच्चं किंवा करपलेलं अन्न हा आपल्या अन्नदात्यांना चारूं लागला. लोक घाईनं जेवले तर पोटभर जेवणार नाहींत, आणि कमी अन्नावर भागेल, या विचारानं हा जेवण तयार करण्याला उशीर करूं लागला. प्रवासी गिऱ्हाइकांची तर गाडीची घंटा झाल्यावांचून हा पानं मांडीत नसे, आणि त्यांचे दोन घांस खाऊन होतात न होतात तों ठाण्यावर गाडी येऊन उभी राही. साहजिकच हात नुसता खरकटा करून त्यांना गाडीकडं धांव घ्यावी लागे. अशा गिऱ्हाइकां-कडून पैसे प्रथम वसूल करण्याची सावधगिरी हा घेत असे."

" देवाधिदेवा, अन्न हें अमृत असतं, पण तें यथाप्रमाण तयार केलेलं व यथाप्रमाण सेवन केलं तर! शंभूरावाचे ग्राहक प्रमाणाबाहेर अन्नभक्षण करण्याची शक्यताच नव्हती. कारण त्यांनीं 'पु'... म्हणून 'रे'... म्हणा-यच्या आंत याचे वाढपी चार पानं पुढं गेलेले असत. आणि जरी त्यांनीं भरपूर वाढलं असतं, तरी तें त्यांच्या घशाखालीं उतरण्याइतकं रुचकर—निदान विनासायास खातां येण्यासारखं—नव्हतं. न खातां जगतांच येणार नाहीं म्हणून ते थोडंफार खात इतकंच! अस्वच्छ, रुचिहीन, घाईघाईनं

आणि निरुपाय म्हणून गिळलेलं अन्न हें विषच होय, आणि तें यानं आपल्या आश्रयदात्यांना वर्षानुवर्षं चारलेलं आहे. शंभूराव, तूं हा अमानुष अपराध केला आहेस. मी केलेल्या या आरोपाबद्दल तुला कांहीं सांगायचं आहे काय ? ”

शंभूराव तिरसटपणें ओरडला:—

“ अरे जा ! तुझ्यासारख्या शेंकडोंजणांची बोंब ऐकत आलोंय् मी ! बोंबा मारण्यापेक्षां कोण कांहीं वाकडं करूं शकत नाहीं माझं ! खुशाल वाजवा हवं तितकं ! ”

शंभूरावाच्या या उर्मट उत्तराचा राग येण्याऐवजीं चित्रगुप्ताला हंसूंच आलें आणि तो म्हणाला:—

“ देवाधिदेवा, मघाशीं अवश्य सांगायची गोष्ट मी विसरून गेलों होतों. साध्या अन्नाला देखील प्रेमळ गोड बोलांची जोड मिळाली, तर त्यांत अमृताचं माधुर्य येतं आणि उत्तम अन्नाला कटु शब्दांचा वारा लागल्यास तें विषारी बनतं. गरीब गृहिणी कणीकोंड्याची भाकरी आपल्या माणसांना करून घालते. पण त्या भाकरीबरोबर तिचे प्रेमळ शब्द ऐकूं येत असल्यामुळं त्या कदन्नांत देखील पौष्टिकता निर्माण कशी होते, हें त्या माणसांच्या पुष्ट देहांवरून आणि प्रसन्न मुद्रेवरून दिसून येतं. शंभूराव ग्राहकांना अन्न देई तें हीन दर्जाचं तर होतंच, पण त्याबरोबर याची उर्मट उत्तरंहि त्यांच्या वांट्यास येत असल्यानं त्यांत अधिक विषारीपणा निर्माण होई. आतां माझ्याशीं तो किती मस्तवालपणें बोलला तें धर्ममहाराजांनीं आणि संपूज्य सदस्यांनीं प्रत्यक्षच ऐकलं. भूलोकच्या याच्या व्यावसायिक जीवनांत हा आपल्या नोकरचाकरांवर आणि आश्रयदात्यांवरहि दुःशब्दांचा वर्षाव सदैव करीत होता. दिसायला गरीब पण तापट प्रकृतीच्या एका प्रवासी ग्राहकानं याच्या उर्मट भाषेला चिडून एकदां याच्या श्रीमुखांत भडकाविली होती, पण तेवढ्यानं याची खोड सुटली नाहीं. शंभूरावाच्या तोंडून सौम्य व सभ्य शब्द सहसा बाहेर पडला नाहीं. पण आतां धर्माज्ञेनं मी याला नम्रतेनं बोलण्याची ताकीद देतों. ”

“ शंभूराव, हा मानवलोक नव्हे. ही देवसभा आहे. तिथली अमर्याद भाषा इथं क्षम्य ठरणार नाहीं. इथं तुझ्या उद्दाम शब्दांनीं देवसभेचा

मानभंग झाला, तर दंडपाणी कालभैरव तुला शासन करायला तुझ्यासमोर उभा आहे ही गोष्ट तूं विसरूं नको. ”

“ पण चित्रगुप्ता, ” एका सदस्य देवानें विचारिलें. “ चिरकाल जडलेली संवय हा देहस्वभाव बनतो असं म्हणतात ना ? दीर्घकालीन संवयीमुळं उर्मट भाषा हा शंभूरावाचा असा देहस्वभाव बनलेला असेल, तर तुझ्या सूचनेनं किंवा कालभैरवाच्या धाकानं तो एकाएकीं कसा बदलेल ? सहजगत्या याच्याकडून प्रमाद घडेल आणि त्यासाठीं याला कालभैरवाच्या सोटयाचे रट्टे बसतील. त्यापेक्षां याची जिव्हा अयोग्य शब्द उच्चारणार नाहीं असा मंत्रप्रयोग देवगुरूंनीं करावा अशी त्यांना विनंति करणं योग्य होणार नाहीं काय ? ”

“ या योजनेची आवश्यकता नाहीं. शंभूराव इतरांवर वाघासारखा गुरगुरला, तरी कोतवाल आणि त्याचे दूत यांच्याशीं तो शेळीसारखा लाचारीनं वागत होता. सध्यां हिंदुस्थानांत शंभूरावाच्या व्यवसायबंधूंना ‘ हाटेलवाले ’ या नांवानं ओळखतात. हे ‘ हाटेलवाले ’ आणि माणसांची वाहतूक करणारे टांगेमोटारवाले—तुरळक अपवाद वगळले तर—बहुशः दुःशब्दभाषी असतात. जे यांना पैसा देतात, त्यांच्याशीं हे सौजन्यानं कधीं बोलायचे नाहींत, पण जे यांना दंडुका दाखवितात त्या कोतवालांना आणि त्यांच्या हस्तकांना हे पैसा न घेतां खाऊंपिऊं घालतील, आपल्या वाहनांतून मिरवतील आणि वर अदबीनं मुजरा करतील. हाहि यांचा जन्मस्वभावच बनलेला असतो. शंभूरावाच्या डोळ्यांपुढं जोंपर्यंत काळभैरवाचा दंडुका आहे, तोंपर्यंत याच्या तोंडून विनयपूर्ण भाषाच निघेल असा मला तरी विश्वास वाटतो. ”

“ तथास्तु ” यमधर्मांनीं शंभुरावाकडे पाहून आज्ञा केली. “ चित्रगुप्तानं तुझ्यावर ठेवलेल्या विषप्रयोगाच्या आरोपाचं निरसन करण्यासाठीं तुला कांहीं सांगायचं असेल तर सांग. इथं फक्त सभ्य शब्दांचाच उपयोग तुला करतां येईल, हें जसं चित्रगुप्तानं सांगितलं, तसं मी हेंहि सांगून ठेवतों कीं, अवश्य असेल तेवढंच तुला सांगतां येईल. निरर्थक पाल्हाळ तूं करतां कामा नये. हं ! कर प्रारंभ. ”

" देवाधिदेवा, चित्रगुप्तांनीं माझ्याविरुद्ध मांडलेला दावा निराधार तर आहेच, पण तो माझ्याविरुद्ध द्वेषबुद्धीनं मांडलेला आहे, असें मला सांगायचं आहे. मुख्य आरोपाशीं ज्याचा कसलाहि संबंध नाहीं, अशा बाल्यावस्थेंतल्या गोष्टी चित्रगुप्तांनीं सांगितल्या, त्यांचं प्रयोजन काय होतं ? मी जन्मतःच दुर्गुणी आहे आणि त्यामुळ माझ्यावर कसलाहि आरोप केला तरी तो असंभवनीय वाटू नये, असं धर्मसभेचं मत कलुषित करण्याच्या उद्देशानंच चित्रगुप्तांनीं हा अव्यापारेषु व्यापार केला अशी त्यांच्याविरुद्ध माझी तक्रार आहे. दुर्गुणी मुलगा मोठेपणींहि दुर्गुणीच राहतो असं नाहीं. उलट वार्धक्यापर्यंत दुराचार करीत राहणाऱ्यांचंहि परिवर्तन होऊन ते जगद्वंद्य सत्पुरुष ठरतात. रामायणासारख्या अद्वितीय पुराणाची रचना करणारे महामुनि वाल्मीकि याची ग्वाही देतात. या पुण्यश्लोक महाभागांचा नामनिर्देश मीं केला, तो त्यांची बरोबरी करण्यासाठीं नसून, जगांत येणारा एक अनुभव धर्मसभेच्या निदर्शनास आणण्यासाठींच."

" देवाधिदेवा, आतां मी माझ्यावर चित्रगुप्तांनीं केलेल्या मुख्य आरोपाकड वळतों. कदन्नरूपानं मी भोजकांना विषप्रयोग केला ही गोष्ट निखालस खोटी. मी स्वतः खाद्यपदार्थ निर्माण करणारा नाहीं. बाजारांत मिळेल ती शिधासामुग्री विकत घेऊन ती शिजवून घालायची एवढंच माझं काम होतं. माझ्या ग्राहकांना निःसत्त्व अन्न खावं लागलं असलं, तर तो दोष माझा नसून त्या विक्रेत्यांचा आहे. शिवाय सर्वच भारतीय निःसत्त्व आणि अपुरं अन्न खातात, मग माझ्यावरच चित्रगुप्ताची वक्रदृष्टि कां ? या बाबतींत दोषी असला तर व्यापारी. त्यानं उत्तम जिन्नसच विकले असते, तर घालतों म्हणून तरी वाईट अन्न माझ्या ग्राहकांना मी खाऊं घालूं शकलों असतों कां ? "

" खाऊन निंदायची माणसांतल्या पुष्कळांना खोडच असते, तशी माझ्या ग्राहकांनाहि होती. प्रथम कांहीं दिवस ते गुण्यागोविंदानं जेवून जात. पण महिनाभर त्यांना मस्ती येई, आणि जेवणाबद्दल त्यांची कुरबुर सुरू होई. कित्येकजण माझे पैसे बुडवून नापत्ता होत. श्रम करून निंदा आणि नुकसान सोसण्याचा मला कंटाळा आला आणि लहान गांवातल्या

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

सामान्य माणसांचा नाद सोडून मी मोठ्या शहरांतल्या समजूतदार लोकांच्या सेवेला निघालों. मी अशा एका मोठ्या शहरांत उमराव उपहारगृह सुरू केलें.

“ भोजनालयापेक्षां उपहारगृहाची योजना पत्करण्यांत माझा दुसरा एक उदात्त हेतु होता. तो म्हणजे शहरवासीयांच्या धांवपळीच्या जीवनक्रमांत त्यांना भोजनाच्या भरतीला उपहाराची आवश्यकता असते. ती त्यांची गरज भागवून साधेल तितकी लोकसेवा करावी. या उदात्त हेतूमुळंच मी उपहाराचे नवेनवे पदार्थ तयार करूं लागलों आणि लोकांना ते आवडूंहि लागले. दूधताक म्हणजे भूलोकींचं अमृत, असं आरोग्यतज्ज्ञांनीं सांगितलं आहे. त्या ताकदुधाचीं संजीविनी आणि अमृतं मीं लोकांना प्यायला दिलीं. ज्यांत भरपूर जीवनसत्वं आहेत, अशा शाकभाज्यांच्या पचड्या मी तयार केल्या. त्याहि लोकांनीं आवडीनं चाखल्या. पावबिस्किटांच्या विदेशी आहारापेक्षां आंबोळ्या, थालीपीठं, धिरडीं, घावन मी लोकांना खाऊं घातले. माझ्या सदिच्छेचं आणि परिश्रमाचं चीज होऊं लागलं, आणि कांहीं दिव-सांनीं मी कंगाल शंभू आचाऱ्याचा धनमानसंपन्न शंभूराव होऊन स्थानिक स्वराज्याच्या आणि सहकारी पेढ्यांच्या कारभारी मंडळांत निवडून आलों. कांहीं धर्मादायनिधींच्या विश्वस्तांतहि माझी योजना लोकांनीं स्वयंस्फूर्तीनं केली. सार्वजनिक हिताच्या महत्कार्यांस मी यथाशक्ति द्रव्यसहाय्यहि केलेलं आहे. असा सत्प्रवृत्त माणूस विषप्रयोगासारखं अघोर कृत्य करील कीं काय, याचा या दयाशील धर्मपीठानं विचार करावा, अशी माझी प्रार्थना आहे.”

“ चित्रगुप्ता, शंभूरावाच्या सांगण्यावर तुझे कांहीं आक्षेप आहेत काय?” यमधर्मांनीं विचारिलें.

“ होय प्रभो; याच्याच तोंडून मी माझं शंकासमाधान करून घेणार आहे. अनुज्ञा असावी. शंभूराव, लोकांना आरोग्यविघातक अन्न खाऊं घालण्याचा दोष तूं व्यापारी वर्गावर ढकलला आहेस. त्यांनीं चांगली सामुग्री दिली असती तर तूं आपल्या ग्राहकांना तीहि खाऊं घातली असतीस अशी बढाईहि तूं मारली आहेस. आतां मला एका प्रश्नाचं उत्तर दे. जे पदार्थ आपल्या ग्राहकांना तूं वाढीत होतास, तेच तूं आणि तुझी बायकोमुलं जेवीत होतां काय? तुमचा जो स्वतंत्र स्वयंपाक होत होता,

त्याला लागणारं धान्य, भाजीपाला, दूधदुभतं तूं आपल्या परसांत पिकवीत होतास काय?"

"नाहीं. तें मला विकतच घ्यावं लागत होतं."

"कोणाकडून विकत घेत होतास?"

"गांवातल्या व्यापाऱ्यांकडून."

"म्हणजे तुझ्या गांवचे व्यापारी किडक्यानासक्या मालाप्रमाणं चांगला मालहि विकत होते असंच ना? बरं, ग्राहकांना घालायचं अन्न चांगलं असल्याचा तूं निर्वाळा देतोस. मग त्यांतलंच अन्न तुला कां चालत नव्हतं? कीं, तें महागाईचं होतं म्हणून त्याहीपेक्षां हलक्या दर्जाचं अन्न तूं आपल्या खास पंक्तीसाठीं तयार करीत होतास?"

"नाहीं. माझी बायको कोंकणची. तिला बंदरी तांदळाची संवय नव्हती. आणि ते तिला सोसतहि नसत. म्हणून तिच्यासाठीं मला देशी आंबेमोहोर किंवा जिरगे तांदूळ घ्यावे लागत. आणि दर माणसासाठीं वेगळा स्वैंपाक नको म्हणून आम्ही घरची सर्वत्र मंडळी त्याच भातावर भागवीत आलों. ज्वारीबाजरीची भाकरी मला मानवत नव्हती. म्हणून मला पोळी खावी लागे, आणि पंक्तिप्रपंच नको म्हणून सर्वांच्याच ती वांट्याला येई. डॉक्टरनीं बजावून ठेवलं होतं म्हणून मुलांना साईचं दही आणि ताकदूध भरपूर घालणं मला भाग पडलं आणि वाशेळ्या तूपानं खोकला होऊं लागलेला पाहून बायकोला ताज्या लोण्याचं साजूक तूप घालावं लागलं."

"म्हणजे, तुझ्या घरीं बाकीची मंडळी खात होती तें अन्न तुझ्या परिवाराला रुचकर आणि आरोग्यकारक वाटलं नाहीं असंच ना?"

"प्रत्येकाचा प्रकृतिधर्म वेगळा असतो त्याला काय करायचं?"

"बरं. तें राहूं दे. खानावळीऐवजीं शहरांतल्या उपाहारगृहांत तुझा उद्देश उच्च होता असं तूं म्हणालास. पण उपाहारगृहाची तुझी योजना केवळ स्वार्थी होती. खानावळींत घेतलेल्या पैशाचा बराच भाग लोक खाऊन जातात. दिलेल्या पैशाचा आणि खाल्लेल्या अन्नाचा हिशोब लोकांनाहि करतां येतो. आणि त्यामुळं त्यांची असंतुष्टता वाढते, ते वेळेवर पैसे देत नाहींत, पुष्कळदां बुडवतातहि. त्यापेक्षां ज्या पदार्थांची किंमत ग्राहकाला करतां येणार नाहीं, आवश्यक भोजनापेक्षां चैनीची गोष्ट म्हणूनच

ज्या शिजा घेतल्या जातील, आणि ज्यांची म्हणावी ती किंमत जिथल्या-तिथं वसूल होईल, अशा पदार्थांचं उपाहारगृह अधिक लाभदायक ठरेल अशी तूं आपल्या बायकोची समजूत घातली होतीस. खानावळीचा चालता धंदा कां मोडायचा, या तिच्या विरोधामुळं तुला आपलं हें हृद्गत तिला सांगावं लागलं. होय ना ?"

" धंदा म्हणून एकादी गोष्ट करायची तर इतर उद्देशांबरोबर नफा नुकसानीचा विचार करणं भागच आहे."

" तुझ्या उपाहारगृहांत नासक्या दुधाला सुटलेलं पाणी, दह्यांतून निघालेली निवळी यांचीच 'संजीवनी' आणि 'अमृतं' होत होतीं. उसळी, भाज्या शिजतांना निघालेल्या कढाचे 'सत्त्वरस' तयार होत होते, हें खरं ना ?"

" हीं व्यावसायिक गुपितं असतात आणि कोणताहि धंदेवाला आपलीं गुपितं दुसऱ्याला सांगणार नाहीं."

" कसल्यातरी पालेभाज्यांचा चुरा आणि कसल्यातरी फळभाज्यांचा खीस कालवून तूं पचड्या बनवीत होतास आणि चार दिडक्यांचे चार आणे करीत होतास. होय ना ?"

" मी बोलूनचालून धंदेवाईक माणूस. धंदेवाल्यानं मिळवतां येईल तितका नफा मिळवायलाच पाहिजे."

" होय. पण धंदेवाइकांनीं नफा मिळवायचा तो जास्तींत जास्त आणि समाधानकारक सेवा करून मिळविला तरच क्षम्य ठरेल."

" मग मी केलेली सेवा समाधानकारक नव्हती असं कशावरून म्हणतां तुम्हीं ? मी केलेली सेवा माझ्या गिऱ्हाइकांना समाधानकारक वाटली नसती, तर ते माझ्या उपाहारगृहांत गर्दी करीत राहिले नसते. मी कांहीं कोणाला ओढून आणीत नव्हतों आणि त्यांच्या खिशांतले पैसे काढून घेत नव्हतों. माझी 'संजीविनी' आणि 'अमृतं' रुचकर आणि आरोग्यदायक वाटलीं म्हणूनच ते आपल्या पायानं माझ्या उपहारगृहांत आले."

" बरं, तूं तयार केलेले हे पदार्थ आरोग्यदायक आहेत या तुझ्या म्हणण्याला वैद्यशास्त्राचा कांहीं आधार आहे कां ? भिषग्वरांच्या सांगण्या-वरून तूं हे पदार्थ करूं लागलास काय ?"

" आमच्या भरतभूमीपेक्षां पाश्चात्य राष्ट्रांत वैद्यविद्या आणि आरोग्यशास्त्राची अधिक प्रगति झाली आहे. भारतांतील भिषग्वरांपेक्षां तिकडील सामान्य नागरिकहि या विषयांत अधिक जाणता असतो. म्हणून पाश्चात्य गृहिणींनीं खाद्यपदार्थांच्या ज्या रीती आपल्या नियतकालिकांतून प्रसिद्ध केल्या त्यांच्या अनुरोधानं इथं उपलब्ध असलेल्या जिनसा घेऊन' मी माझे उपहार-पदार्थ बनवले."

" चित्रगुप्ता, आतां तुमचीं प्रश्नोत्तरं पुरे झालीं असं मला वाटतं. "

देवगुरूंनीं अशी सूचना दिली आणि यमधर्मांना उद्देशून ते बोलू लागले:–

" यमधर्म, शंभूराव पोटे यानं चित्रगुप्त म्हणतो त्या अर्थानं आपल्या बांधवांना विषप्रयोग केला आहे, ही गोष्ट त्या दोघांच्याहि निवेदनावरून सिद्ध होते, असं माझं मत आहे. पण या पातकाला सर्वस्वीं तोच जबाबदार नाहीं असं माझं म्हणणं आहे. प्रजाजनांना शीलसंपन्न आणि सद्वर्तनी करणं, परचक्रापासून त्यांचं रक्षण करणं, एवढंच शासनसंस्थेचं कर्तव्य नसून त्यांचं योग्यप्रकारें पोषण करणं हेंहि तिचं कर्तव्य आहे. प्रजाजन पूर्णभोजी आणि इष्टभोजी नसतील तर राज्ययंत्र योग्यप्रकारें चाललेलं नाहीं, असं मानलं पाहिजे. पण आज पृथ्वीतलावर–कांहीं अपवाद वगळल्यास–बहुतेक विभागांतील शासनसंस्थांनीं हा विषय आपल्या विचारांतच घेतलेला नाहीं. ज्या राष्ट्रावर राज्य करावयाचें, तें राष्ट्र ज्या घटकांनीं सिद्ध होतं ते घटक सुदृढ राखणं हें आपलं आद्य कर्तव्य होय, याची जाणीवहि त्या शासन–संस्थांना नाहीं. उदरभरण हा वैयक्तिक प्रश्न आहे, असं सांगून त्या संस्था त्या विषयीं उदासीन राहतात. "

" भारताची आजची शासनसंस्थाहि प्रजेच्या भरणपोषणाबाबतींत अशी उदासीन दिसते. राष्ट्रांतील प्रजा काय खाते, किती खाते, किंवा ती खाते कीं उपाशी मरते, याची तिला दाद नसते. पशुसुद्धां, ज्याला तोंड लावणार नाहींत, असे पदार्थ भारतांतल्या माणसांना खावे लागले तरी त्या शासनसंस्थेला लज्जा वाटत नाहीं ! मग शंभूरावासारखे लोक आपल्या बांधवांना अभक्ष्य भक्षण करायला लावीत असतील तर त्यांना शास्ते जाब विचारतील हें कसं शक्य आहे ? भारतांतील शास्ते भोजनोपहारगृह चालविण्याची मोकळीक देण्याबद्दल वाटलं तर कर वसूल करतील, आणि तीं

किती वाजतां बंद केलीं पाहिजेत तो निर्बंध घालतील. पण त्यांनीं ग्राह-कांना काय खावयाला दिलं पाहिजे याबद्दल काडीइतकी चौकशी करणार नाहींत ? ''

" शासनसंस्थेच्या या उदासीन वृत्तीमुळं शंभूरावासारख्याचं फावतं. अशा माणसांवर शिक्षणाचा संस्कार बेताचाच झालेला असतो, किंवा पुष्कळशा लोकांना मुळींच झालेला नसतो. त्यामुळं नीतिअनीतीची आणि नागरिक कर्तव्याची जाणीव त्यांना नसते. ' वैयक्तिक फायदा ' हेंच त्यांचं ध्येय बनतं. दुसऱ्याचा छळ किंवा घातपात झाला तरी त्याचा त्यांना विधिनिषेध वाटत नाहीं. सुचेल त्या व साधेल त्या मार्गानं ते आपली तुंबडी भरीत असतात. "

" यमधर्मा, या लोकांच्या या अमानुष वृत्तीला शासन संस्थेची उपेक्षा वृत्ति जशी उपकारक होते, तशी लोकांची मूर्खताहि होते, हें लक्षांत ठेविलं पाहिजे. उपहारगृहांत जाणारीं माणसं क्षुधापीडित असतात असं नाहीं. तर चैनीची चटक तृप्त करून घेणं हाच त्यांचा मुख्य उद्देश असतो. ही उपहारगृहं खाद्यपदार्थांपेक्षां जागेच्या सजावटीकडं अधिक लक्ष देतात. आरसे, दिवे, पंखे, संगमरवरी जमीन, तशाच तिपाया, चौपाया, नक्षीदार खुर्च्या आणि चकचकीत थाळया पेले, यांनीं सजलेल्या उमराव उपहार-गृहांत जाण्यानं आपण उमराव आहों कीं काय, अशी भुरळ त्यांना पडते, आणि त्यामुळं आपण काय खातों याची आणि त्याला काय मोल देतों, याची त्यांना शुद्ध राहात नाहीं. पदार्थांच्या रुचीपेक्षां त्याला दिलेल्या नांवावर आणि त्यांच्या ताटल्या पेल्यांच्या झगझगाटावर ते भाळतात; आयाबायकांना चटण्या कोशिंबिरी करतां येत नाहींत असं नाहीं, आणि त्या करीत नाहींत असंहि नाहीं. पण आईनं प्रेमानं केलेल्या किंवा बायकोनं अगत्यानं वाढलेल्या कोशिंबिरीला बोटहि न लावणारे लोक उपहारगृहांत जाऊन पचड्या मिटक्या मारीत खातात ! घरचं फोडणीचं ताक आणि मठ्ठा यांना रुचकर लागायचा नाहीं.तोच उपहारगृहांत लागतो ! आंबोळया, थालीपीठ आणि दहीपोहे काय घरच्या घरीं मिळत नाहींत ? पण ते देणाऱ्या आईला किंवा बायकोला धिःकारून उपहारगृहांत जाऊन तेच पदार्थ मिटक्या मारीत खाणारे लोक असतात, त्यांच्या या अडाणीपणाचा शंभूरावासारखे धूर्त

लोक फायदा घेतात आणि त्यांना फसवितां येईल तितकं फसवितात. शंभूरावानं लोकांना विष चारलं तें अशा अडाणी लोकांना आणि आपण होऊन ते त्याच्याकडं आले म्हणून. 'आपण कोणाला जबरदस्तीनं ओढून आणलं नाहीं' या शंभूरावाच्या म्हणण्यांत सत्यांश आहे."

"तरीपण यमधर्मा, सत्तेनं सवलत दिली म्हणून आणि अज्ञानी मनुष्य आपण होऊन पुढं आला म्हणून शंभूरावानं त्याचा घात करावा, ही गोष्ट कधींच न्याय्य ठरणार नाहीं. आपण ग्राहकांकडून पैसे घेऊन त्यांना जे अन्न घालतों तें हीन दर्जाचं आहे आणि प्रकृतीला मानवणारं नाहीं, हें याला माहीत होतं. कारण हा स्वतः आपल्यासाठीं वेगळं सात्त्विक अन्न तयार करून खात होता. जें अन्न आपणाला मानवत नाहीं आणि खाववत नाहीं, तेंच अन्न दुसऱ्याला चारणं हा अमानुष अत्याचार आहे. चांगलं अन्न, घेतलेल्या मोबदल्यांत देतां आलं नसतं असं याला हिशेबानं सिद्ध करतां येणार नाहीं. कारण त्या मोबदल्यांत भोजकांचा आणि आपलाहि अन्नखर्च भागवून यानं लाखो रुपयांची ऊर उरविली आहे. म्हणून कोणत्याहि दृष्टीनं याचं आचरण समर्थनीय होऊं शकत नाहीं. भूलोकांत धनसंचयावर सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होत असल्यानं शंभूराव 'नगरपित्या'सारखं श्रेष्ठ पद मिळवूं शकला, परंतु इथं त्या गोष्टीला काडीचंहि महत्त्व नाहीं. इथं कृतकर्माखेरीज प्राण्याची कोणतीच गोष्ट विचारांत घेतली जात नाहीं. तेवढं कृतकर्मच विचारांत घेऊन शंभूरावाचा योग्य तो निर्णय यमधर्मा, तूं दे."

देवगुरूंची आज्ञा शिरसामान्य करून धर्मराज म्हणाले, 'या शंभूरावाला यापुढील शतजन्म कोंबड्याचे यावे' अशी मी आज्ञा करतों. कुक्कुट जन्मांत उकिरडे उकरीत याला निर्वाह करावा लागेल. आणि आपल्याच जातिबंधूंशीं हा सदैव झुंजेल, त्याला घायाळ करील, आपणहि होईल. अखेर ज्या मानवजातीशीं यानं द्रोह केला, त्या मानवजातीच्या भक्ष्यस्थानीं याला पडावं लागेल. हें प्रायश्चित्त भोगून झाल्यावर याला पुढं कुठं पाठवायचं तें धर्मपीठ ठरवील. चित्रगुप्ता, पुढील प्राणी कोण आहे?"

---

“ देवाधिदेवा, आत्मक्लेश आणि पुत्रद्रोह हे आरोप ठेवून मी या बाप्पाजी धनंजयाला या धर्मपीठापुढं उभा करीत आहे. या आरोपांची सत्यासत्यता पाहून योग्य तो निर्णय द्यावा अशी मी प्रार्थना करितों.”

“ बाप्पाजी, चित्रगुप्तानं तुझ्यावर ठेविलेले हे आरोप तुला मान्य आहेत काय ? नसतील तर कां अमान्य आहेत, याचीं कारणं सांग आणि तुझ्या म्हणण्याच्या समर्थनार्थ तुला कांहीं दाखले द्यायचे असतील तर दे.”

“ धर्म महाराज, माझ्यावरील आरोप खोडून काढायला मला फारसे श्रम पडणार नाहींत. भूलोकांतलं माझं वास्तव्य पूर्ण सुखांत गेलेलं आहे. माझा संसार खरोखर सुख–समृद्धिपूर्ण झाला. दारिद्र्याची झळ मला लागली नाहीं, अर्थात् दारिद्र्यजन्य क्लेश सोसावे लागलेले नाहींत. माझ्या-बरोबर माझ्या कुटुंबियांनाहि सांसारिक सौख्य मी उत्तम प्रकारचं मिळवून दिलं. वैभव, मानमान्यता आणि सुशील परिवार या गोष्टी नशिबानंच मिळतात असं कांहीं लोक मानतात, पण मला मिळालेल्या गोष्टी नशिबानं मला दिलेल्या नसून मी त्या स्वतःच्या प्रयत्नांच्या आणि शहाणपणाच्या जोरावर संपा-दिल्या असं मी बिनदिक्कत सांगूं शकतों. ही गोष्ट धर्मसभेला पटवून देण्यासाठीं मी माझी थोडी जीवनकथा सांगितली तर मी अकारण पाल्हाळ लावून धर्मसभेचा बहुमोल काळ वाया दवडतों, असा गैरसमज कृपा करून करून घेऊं नये, अशी मी आधींच प्रार्थना करून ठेवतों.”

“ मला जन्म देणारे आईबाप सदाचारी होते आणि मनाचे प्रेमळ होते. माझ्यावर आणि माझ्या भावंडांवर त्यांनीं केलेलं प्रेम आठवलं, कीं अद्यापीहि ऊर भरून येतो. आमच्यासाठीं त्या दोघांनीं परमावधीचे कष्ट सोसले. मला एकदां ताप आला आणि रात्रीं तो बराच वाढला. वैद्याला बोलावणं अवश्य झालं. बाबा बंडी रुमाल घालून जायला निघाले, तों त्यांच्या अनवाणी पायाला विंचवानं डंख मारला. त्यांना विंचू मनस्वी चढतो हा मागील अनुभव, पण आज माझ्या औषधोपायापुढं आपल्या वेदनांची

त्यांनीं क्षिति केली नाहीं. शेजारच्या श्रीमंत मुलाचं पाहून माझ्या धाकट्या भावानं वेलबुट्टीच्या टोपीचा हट्ट घेतला, तर तो पुरविण्यापायीं बाबांनीं ठिगळं लावलेलीं जुनीं धोतरं नेसून सहा महिने काढले ! "

" माझी आई देखील आमच्यासाठीं असेच कष्ट सोशीत होती. कण्या भाकरीच कां असेनात, पण आम्हांला ती ताजं ताजं आणि भरपूर जेवूं घाली, आणि उरल्यासुरल्या खरपुड्यांवर स्वतः दिवस काढी. माझ्या बहिणीला हौसेची परकरचोळी शिवण्यासाठीं जिवाभावानं जतन करून ठेविलेली एकुलती एक पैठणी फाडायला तिनं मागं पुढं पाहिलं नाहीं. देवाधिदेवा, माझ्या आईबापांपाशीं मायेचं धन विपुल असलं तरी जगाचे व्यवहार ज्या मायेवर चालतात ती माया मुळींच नव्हती. कारकुनी नोकरीच्या दहा–वीस रुपयांवर दहा माणसांच्या प्रपंचाचा गाडा त्यांना ओढावा लागत होता. "

" माझ्या लहानपणीं मी असं निर्धन जिणं अनुभवलं आहे. वर्षांत एक पैरण मिळे. लोक हंसूं लागेपर्यंत मला धोतर नेसायला मिळालं नाहीं. लंगोटी नेसूनच मी कितीतरी दिवस शाळेला जात होतों. विद्यालयांतून महाविद्यालयांत जाईपर्यंत माझ्या पायाला पादत्राण लागलं नव्हतं. प्रवेशपरीक्षेच्या निमित्तानं आगगाडींतून शहरगांवीं जायचं होतं. आमच्या गांवापासून आगगाडीचं ठाणं चार कोस दूर. पण तिथपर्यंतची वाटचाल मला पायीं करावी लागली. गाडीभाड्याला पैसेच नव्हते. आगगाडीच्या तिकिटापुरते पैसे बाबांनीं कोणाकडून तरी उसने आणून दिले होते. "

" आमच्यासाठीं ही बाबांची चाललेली ओढाताण पाहून माझ्या मनांत एकच आकांक्षा प्रबळ होऊन राहिलेली होती. ती म्हणजे आपण खूप खूप पैसे मिळवायचे आणि आपल्या घरांत आज जो खडखडाट दिसतो आहे, तो दूर करून आपलं घर समृद्ध करायचं. देवाधिदेवा, ही आकांक्षा पूर्ण करून घ्यायची तर मन लावून शिकलं पाहिजे, मोठं काम मिळविलं पाहिजे हें मला कळत होतं आणि म्हणूनच मी मन लावून अभ्यास केला, परीक्षांत सुयश मिळवून शिष्यवृत्त्या पटकाविल्या आणि त्यांच्या सहाय्यानं मी पदवी पदरांत पाडून घेतली. "

" हा पहिला टप्पा चांगल्या प्रकारें पार पडल्यावर मला चांगला उद्योग मिळायला अवघड गेलं नाहीं. उद्योग मिळाला तरी तो भरपूर लाभदायक व्हायला अविश्रांत श्रमांची आणि अक्कलहुषारीची जोड पाहिजेच असते. मी आळसाला थारा दिला नाहीं. आणि हातून होतील तितके परिश्रम करीत राहिलों. काम अवघड म्हणून हातपाय गाळले नाहींत. अधिक श्रम केले, अधिक बुद्धि चालविली आणि दुःसाध्य वाटणारं कामहि साध्य करून दाखविलं. श्रम हे कधींच वायां जात नाहींत, असा माझा तरी अनुभव आहे. ज्यांत ज्यांत म्हणून मी डोकं आणि देह शिणविला त्यांत त्यांत मला पैसा मिळाला, केव्हां केव्हांतर अपेक्षेबाहेर मिळाला. प्रारंभीं चार पैसे तरी मिळतील कां, अशा फिकीरींत आम्ही होतों. पण पांच-दहा वर्षांत मी चार पैसे बाळगून राहूं लागलों. या मुदतींत मी प्रापंचिक झालों होतों. मला पत्नीहि माझं मन धरून राहणारी आणि प्रपंचदक्ष अशी मिळाली."

" मी आतां खरोखर सुखी झालों होतों. तरी मला एका गोष्टीचा खेदहि वाटत होता. माझं हें सुखी आणि समृद्ध जीवन पाहायला माझे आई नि बाबा या जगांत राहिले नव्हते. आमच्यासाठीं झिजून झिजून त्यांनीं आपले देह आधींच मृत्यूच्या हवालीं केले होते ! आईबापांची ही स्मृति मला निरंतर होत असल्यानं माझ्या प्रापंचिक जीवनाला आपोआपच चांगलं वळण लागलं, तें असं कीं माझ्या आईला जसे निर्धनतेचे चटके बसले तसें माझ्या पत्नीला कधींहि लागूं द्यायचे नाहींत आणि आम्हां भावंडांच्या वांट्याला आलेल्या दैन्याचा आपल्या मुलांबाळांना वारासुद्धां लागूं द्यायचा नाहीं. खूप पैसा कमवायचा आणि सर्वांना अगदीं रेलचेलींत ठेवायचं, हें माझं ध्येय ठरून गेलं. "

" देवाधिदेवा, आपल्या कृपेनं माझ्या या आकांक्षा खरोखरच पूर्ण झाल्या आहेत. मी गरिबाचा मुलगा, तशीच माझी बायकोहि गरिबाची मुलगी आहे. गरिबाघरचे हालवनवास बालपणीं तिच्याहि वांट्याला आले होते. पण तिचं माझ्या घरचं जीवन संपन्न झालेलं आहे. ती मागेल तें वस्त्र आणि मागेल तो अलंकार मी तिला घेऊन दिला आहे. तिची अमुक एक इच्छा आहे आणि ती रास्त आहे, असं मला कळलं, तर ती पुरी

करायला मी कधींच कुरबूर केली नाहीं. आम्हां पतिपत्नींचं जीवन दृष्ट लागण्यासारखं आहे, असं आजूबाजूचीं माणसं म्हणत आणि त्यांचे ते उद्‌गार निराधार नव्हते अशी माझी खात्री आहे."

"पत्नीच्या नादाला लागून इतर आप्त स्वकीयांकडं प्रापंचिक माणसं दुर्लक्ष करतात. पण मी हा आक्षेप माझ्यावर कधींहि येऊं दिला नाहीं. हरएक बाबतींत मी माझ्या नातलगांची नड भागविली आहे. माझ्या कांहीं नातलगांना माझ्याइतकी अनुकूलता नव्हती, तर त्यांच्या मुलामुलींच्या शिक्षणाची आणि लग्नाकार्यांची व्यवस्था मी चांगल्या प्रकारें लावली. आज तीं मुलं आनंदांत आहेत, मुलींचे संसार सुखाचे झाले आहेत आणि माझ्याकडं तीं कृतज्ञ आदरानं पाहात आहेत."

"देवाधिदेवा, मी माझ्या परिवारासाठीं माझ्या शक्तिबुद्धीप्रमाणं करतां येईल तेवढं केलं, आणि तें करतांना त्यांना उपकारांचा ओशाळेपणा न वाटेल अशा सावधगिरीनं केलं. कांहीं संपन्न लोक दुसऱ्यासाठीं कांहीं करीत नाहींत, असं मला म्हणायचं नाहीं. पण त्यांच्या त्या करण्यांत औदार्याची ऐट फार असते आणि तिची जाणीव ते उपकारबद्धांना फिरून फिरून देतात. त्यामुळं त्यांचे हे उपकार स्वीकारण्यापेक्षां नाकारूनच अधिक सुखी झालों असतों, असं त्यांना वाटूं लागतं. मी माझ्या आप्तेष्टांसाठीं जें केलं, त्याचा त्यांच्यापुढं तर नाहींच, पण इतरांपुढंहि मीं कधी गाजावाजा केला नाहीं. कारण उपकार म्हणून मी तें केलेलंच नव्हतं. गृहस्थधर्मांतलं एक कर्तव्य म्हणून मी माझ्या माणसांच्या अडीअडचणी निवारल्या."

"बाप या नात्यानं माझ्यावर पडलेली जबाबदारी मी यशस्वीपणें पार पाडली कीं नाहीं हें माझ्या चिरंजीव मंडळींच्या सद्यःस्थितीवरून कुणालाहि दिसून येणार आहे. माझे पांचहि मुलगे मी विद्यासंपन्न केले, अनुरूप मुलींबरोबर त्यांचीं लग्नं केलीं, त्यांना चांगल्या प्रतीचीं कामं मिळवून दिलीं; ते आज घोडागाडी बाळगण्याच्या स्थितींत आहेत. त्यांची चांगली तरतूद करून ठेवली आहे. काळवेळ कशी येईल याचा नेम नसतो, आणि एकाद्याचा चालता गाडाहि घुणा लागून पडतो. अशा अडचणींतहि माझ्या मुलांना चरितार्थाचं कोडं पडूं नये, म्हणून प्रत्येकाला दहावीस हजारांचा ऐवज आणि हजारभराचं जमिनीचं उत्पन्न मीं करून ठेवलं आहे."

" मुलांच्या पोटाची सोय करूनच बापाचं कर्तव्य पुरं होत नाहीं, याची जाणीव मला होती. मुलें शक्तिवंत व्हावींत म्हणून मी त्यांच्या बाल्यावस्थे-पासूनच जागरूकता ठेविली होती. बापाच्या दुर्लक्षामुळं मुलं उनाड, उच्छृंखल आणि उर्मट बनतात असं मी आजूबाजूच्या घरांत पहात होतों. म्हणूनच मी ही सावधगिरी ठेविली. माझीं मुलं माझ्या आज्ञेंत राहिलीं पाहिजेत, असं वळण मी त्यांना लावलेलं आहे. आज तीं स्वतंत्र सांसारिक म्हणून जगांत नांदत असलीं, तरी माझ्या दखलगिरीशिवाय आणि माझ्या अनुमतीवांचून कोणतीहि गोष्ट त्यांनीं आतापर्यंत केली नाहीं. मी हांक मारतांच आपलं कितीहि महत्त्वाचं काम असलं तरी माझ्याकडं तीं धावून येतील. आज्ञाधारकपणाबरोबरच शुद्धाचरणाचं वळण मीं मुलांना लावलं. माझ्या मुलानं सुपारी खाल्लेलीहि मीं कधीं पाहिलेली नाहीं, मग इतर घाणेरड्या संवयीचं नांव नको. साधा सोंगट्यापत्त्यांचा नाद देखील मी मुलांना लागूं दिला नाहीं. विद्यार्थीदशेंत अभ्यास, आणि व्यावसायिक जीवनांत उद्योग, याव्यतिरिक्त इतर गोष्टींकडं तीं चुकूनहि पाहाणार नाहींत, याबद्दल मी डोळ्यांत तेल घालून पहात आलों. याचा इष्ट तो परिणाम झाला. माझीं मुलं निरोगी, मितव्ययी आणि कर्तव्यदक्ष बनलीं."

" मुलींच्याविषयींचं माझं कर्तव्यहि मी चांगल्या प्रकारें पार पाडलेलं आहे. माझ्या चारांहि मुली आज विद्वान् आणि संपन्न नवऱ्याच्या बायका झालेल्या आहेत. चांगलं स्थळ मिळविण्यासाठीं मी पैशाकडं पाहिलं नाहीं. पांच पांच हजार रुपये हुंडा देऊन आणि त्या मानानं इतर खर्च करून मीं त्यांचीं लग्न केलीं. प्रसंगोपात्त त्यांना आणि जांवयांना देणग्याहि दिल्या. मुलाचं कौतुक आणि मुलीची हेळसांड अशी प्रतारणा मी केली नाहीं. केवळ पैशानं खरिदतां येतील अशाच देणग्या मी मुलींना दिल्या नाहींत, तर त्या आदर्श गृहिणी होतील असं वळण मी त्यांना लावलं. आज त्यांना विनयशील आणि कष्टाळू म्हणून त्यांच्या सासरचीं माणसंहि वाखाणत आहेत."

" देवाधिदेवा, अशा आनंदमय घरांत मी नांदलों याचा अर्थ मी आत्मक्लेश भोगले, असा होतो काय? आणि मी माझ्या कन्यापुत्रांना शील, विद्या, धन आणि जीवनाविषयीं निश्चितता प्राप्त करून दिली हा

मी पुत्र–द्रोह केला, असं ठरतं काय? प्रभो, देवलोकींचे नीतिनियम माहीत असणं मला शक्य नाहीं, पण माझ्या मानवी सदसद्विवेकबुद्धीला जें चांगलं दिसलं, तें मी करीत राहिलों. मी असत्याचा आश्रय घेऊन स्वार्थ साधला, दुसऱ्याचा विश्वासघात केला, मद्यपान, परदारागमनादिक पातकं माझ्या हातून घडलीं, असं चित्रगुप्तांनाहि म्हणतां येणार नाहीं, असा मला विश्वास वाटतो. देवाधिदेवा, एका वाक्यांत माझ्या भूलोकींच्या वास्तव्याचा आढावा घ्यावयाचा झाला तर लज्जेनं मान खालीं घालावी लागेल, असं कोणतंहि दुष्कर्म माझ्या हातून घडलेलं नाहीं; उलट सज्जनांनीं कौतुक करावं अशा प्रकारेंच मी माझी जीवितयात्रा पुरी केली आहे.”

“धर्म महाराज आणि सपूज्य सभासद महाभाग, बाप्पाजी धनंजय यानं आपल्या जीवितकार्याचं केलेलं वर्णन खरं आहे. दुष्कर्मांची लपवा-लपव आणि सत्कर्माविषयीं अतिशयोक्ति या बहुतेक मानवांच्या निवेदनांत येणाऱ्या गोष्टी बाप्पाजींच्या निवेदनांत नाहींत. खरोखरीच त्यानं म्हटलेलीं दुष्कर्मं याच्या खात्यांवर नोंदलेलीं नाहींत. आणि यानं आपल्या पत्नि-पुत्रांना दैन्य, दुर्वचन आणि अवहेलना यांनीं दुखवलेलं नाहीं. आपल्या परिवाराविषयींच्या याच्या सद्वासना आणि त्यांचं जीवन सुस्थिर करण्या-साठीं यानं घेतलेली दक्षता मलाहि कौतुकास्पद वाटते. आणि एवढ्याच गोष्टी विचारांत घेऊन निर्णय द्यायचा झाला तर या बाप्पाजीला पुनर्जन्माच्या यातनांत न पाठवितां याला देवलोकांतला सन्मान्य रहिवासी करावं, अशी मी धर्मपीठाला प्रार्थना केली असती.”

“पण प्राण्याला जेव्हां मनुष्य जन्म देण्यांत येतो, तेव्हां त्याच्याकडून कांहीं अपेक्षा करण्यांत येतात. त्यानं दीर्घोद्योग करून धन-मान मिळवावा अशी अपेक्षा असली, तरी हक्कानं प्राप्त झालेल्या विश्रांतीचाहि उपभोग घ्यावा अशी अपेक्षा असते. धनसंपादन हें माणसाचं ध्येय असलं तरी तें त्यानं आपलं व्यसन करूं नये. बाप्पाजींची धनसंपादनाची तळमळ ही व्यसनाच्या पल्ल्यापर्यंत पोंचली. आणि या व्यसनांत गुरफटल्यामुळं बाप्पाजीनं शक्तीबाहेर श्रम आणि अकारण चिंता या शिक्षा सोसल्या. जेव्हां याच्या शरिराला आणि मनाला विश्रांति घेण्याचा नैतिक अधिकार होता,

अनुक्रम ३०५११
क्रमांक २५५९

तेव्हांहि हा राबत राहिला, चिंतेच्या भारानं आपल्यानं मन व्याकुळ करून घेतलं. मी आत्मक्लेशाचा आरोप याच्यावर करतों, तो यासाठींच ! बाप्पाजी पांच वर्षांपूर्वींच तुझ्या प्रकृतींत हृदय विकाराचा प्रादुर्भाव झाल्याचा इशारा तुझ्या वैद्यांनीं तुला दिला होता. अतिश्रम आणि बारीकसारीक गोष्टींची चिंतचना करण्याची संवय तूं सोडिली पाहिजे, असंहि तुला त्यांनीं बजावलं होतं. वयोमानाप्रमाणं शरीर दुर्बल होतं, आणि दुर्बल शरिरांत रोगबीजं लवकर मूळ धरतात आणि फोफावतात. उतारवयांत शरिराची रोगप्रतिकार-शक्ति कमी होते. नवीन शक्ति निर्माण होत नाहीं. म्हणून आहे ती शक्तीच टिकवून ठेविली पाहिजे, या गोष्टीहि त्यांनीं तुला समजावून दिल्या होत्या. पण त्या तूं लक्षांत घेतल्या नाहींस, निदान त्या पाळल्या तरी नाहींस. पुण्यापेक्षां कोल्हापूरला पादत्राणं स्वस्त मिळतात म्हणून अंगांत कणकण असतांनाहि तूं कोल्हापूरला गेलास. मुंबईला गिरण्यांच्या दुकानांत कापड चांगलं आणि स्वस्त मिळेल अशा कल्पनेनं तूं मुंबईच्या वाऱ्याहि करीत होतास, आणि आल्यावर दगदगीनं अंग मोडून आलं अशी बायको-पाशीं कुरकूर करीत होतास, ह्या गोष्टी खऱ्या कीं खोट्या ?"

"केवळ याच कारणासाठीं मी ही धावपळ केलेली नाहीं. माझी तिकडं दुसरींहि कामं असत. वसंताचा वरिष्ठ साहेब कोल्हापूरला आला होता. त्याची माझी पहिली ओळख होती. 'रत्नागिरीसारख्या खराब भागांतून वसंताची बदली सातारा विभागांत करावी' अशी त्यांना विनंति करण्या-साठीं मी मुख्यत: कोल्हापूरला गेलों. येतांना दहा पंधरा वहाणांचे जोड आणले हें खरं. इतर ठिकाणापेक्षां कोल्हापूरला वहाणा चांगल्या आणि रुपाया आठ आण्यांनीं तरी स्वस्त मिळतातच! माझ्या सर्व चिरंजिवांना मी इकडूनच वहाणा पाठवीत आलों. प्रापंचिकांनीं पैपैशाचीहि अनास्था करूं नये, वांचविलेला पैसा हा मिळविलेल्या पैशासारखाच, असं शहाणे म्हणतात. मी शहाण्यांच्या उपदेशाप्रमाणं वागलों, यांत मी चूक केली काय ? आणि या गोष्टींत मला त्रास झाला असं तरी आपण कसं म्हणतां ?" माझं अंग मोडून आलं तें या दगदगीमुळंच कशावरून ? वायुमानांत थोडासा बदल झाला तर तेवढ्यानंहि वयस्कर माणसाला कसर येते. मलाहि तशी येत नसेल कां ?"

" आप्पाजी, रोज रात्रीं अंग मोडून आल्यासारखं वाटतं, हातापायाला वरचेवर मुंग्या येतात, म्हणून तूं दवाखान्यांत निघालास, पण रस्त्यावर सरकारी गोठ्यांतल्या म्हशींच्या लिलांवाची वर्दी लागली, त्यासरशी तूं तिकडं कोसभर चालत गेलास, हें तुला आठवतं काय ?"

" पण त्यामुळं गांवठी म्हशीच्या किंमतींत मला उत्तमपैकीं जाफराबादी म्हैस मिळाली. अजून ती आमच्या घरीं आहे. तिच्यामुळं दूधदुभत्याची चंगळ असते."

" पण या चंगळीसाठीं तूं आपल्या औषधयोजनेची टंगळमंगळ केलीस हें खोटं काय ? लिलांवांत घेतलेली म्हैस गोठ्यांत बांधण्याआधींच तूं चक्कर येऊन पडलास हें खरं ना ? तुझी अशी अवस्था व्हायला दुसरं कोणतं कारण सांगतां येण्यासारखं आहे ? आणखी एक गोष्ट विचारतों तुला बाप्पाजी. तूं सोनं विकत घेतलंस त्याच्या दुसरे दिवशीं सोन्याचा भाव चार आण्यांनीं स्वस्त झाला. एका दिवसासाठीं आपलं पंचवीस रुपयांचं नुकसान झालं या हळहळीमुळं तुला चार दिवस अन्न गोड लागलं नाहीं, कीं स्वस्थ झोंप आली नाहीं, हें खरं कां ?"

" पैसे गेले म्हणून मला थोडंसं वाईट वाटलं असेल, पण माझ्या अस्वस्थतेचं तें खरं कारण नव्हतं. 'अत्यंत व्यवहारदक्ष' अशी माझी भूलोकीं ख्याति असतांना मी यावेळीं व्यवहारशून्य ठरेन या भीतीनं मी खरा व्याकुळ झालों होतों."

" कशामुळं कां असेना, तूं व्याकुळ झालास. यालाच मी आत्मक्लेश म्हणतों. आतां या विषयाला आपण पूर्णविराम देऊं या. आतां तुझ्या मुलांच्या दृष्टीनं थोडा विचार करूं. तूं आपल्या मुलांना चांगलं शिक्षण दिलंस असं तूं म्हणतोस, पण त्यांना हवं होतं त्याच विषयांचं शिक्षण दिलंस कां ? तुझ्या वसंताच्या मनांत डॉक्टर व्हायचं होतं, पण तूं त्याला इंजिनियर बनविलंस. तुझ्या हेमंतची इच्छा प्राध्यापक व्हावं अशी होती, पण तूं त्याला व्यापारी बनविलंस. आणि तुझ्या बाकीच्या तिघांहि मुलांना कोणत्या विषयाची आवड आहे, हें न विचारतांच तुला आवडलेल्या विषयांत त्यांना बळें बळें कोंबलंस."

" पण मुलांपेक्षां मी दूरदर्शी होतों. त्यांच्या पुढच्या आयुष्यांत कोणचं शिक्षण त्यांना लाभदायक होईल हें त्यांच्याहून मला अधिक कळत होतं, म्हणूनच त्यांच्या शिक्षणाचीं सूत्रं मी माझ्या हातीं ठेविलीं. आणि ही गोष्ट त्यांनाहि हानिकारक झालेली नाहीं. आज मी शिकायला लावलेल्या विषयांतच ते चांगल्या प्रकारें पैसा मिळवत आहेत. "

" पण त्यांना आवडत होते त्या विषयांत पारंगत झाल्यावर, त्यांना आतांइतका पैसा मिळवितां आला नसता, असं तूं कोणत्या आधारावर ठरवलंस ? आवडीचा विषय मुलं अधिक मन लावून शिकतात आणि त्यांत उत्कृष्ट पारंगतता मिळवितात. नको असलेल्या विषयाची कशीबशी ओळख करून घेणं आणि आवडीच्या विषयांत हौसेनं ज्ञान संपादन करणं यांत इष्ट कोणतं व अनिष्ट कोणतं हें लहान मूलसुद्धां सांगेल. आणखी असं पहा, विद्यार्जन हा विद्यार्थ्याचा प्रश्न आहे. त्यांत त्याचा अधिकार वडीलकीच्या जोरावर कां धाब्यावर बसवावा ? आपणाला मुळींच शिकायचं नाहीं असा हट्ट धरला तर मुलाला बापानं धाक दाखवावा, त्याला शिकण्याची सक्ती करावी. पण ' मी म्हणतों तेंच तूं शिकलं पाहिजे ' असं बापानं मुलाला सांगणं म्हणजे शुद्ध बलात्कार होय, ही गोष्ट तूं लक्षांत घेतली नाहींस. बाप्पाजी, शिक्षण पूर्ण झाल्यावर तरी तूं आपल्या मुलांना इच्छेप्रमाणं वागूं दिलंस काय ? वसंतला स्वतंत्रपणें कॉंट्रॅक्टर व्हायची इच्छा होती, पण तूं त्याला नोकरी पत्करायला लावलंस. "

" पण ही नोकरी वरिष्ठ दर्जाची आहे. कमींत कमी सातशेंपर्यंत तो चढेल ! आणि सरकारी नोकरींत सेवानिवृत्तीनंतर वृद्ध–वेतनाचीहि तरतूद असते. स्वतंत्र धंदा म्हणजे सगळीच अनिश्चितता ! "

" म्हणजे अपयशसुद्धां अनिश्चित नव्हे काय ? वसंत स्वतंत्र व्यवसायांत अपेशीच ठरला असतां कशावरून ? त्या व्यवसायांत कितीतरी लोक अगणित पैसा आणि बहुमान संपादिलेले आहेत. तुझा वसंतहि तसा झाला नसता असं मानायला तुला कोणता आधार होता ? सातशें ऐवजीं दरमहा सात हजारहि त्यानं मिळवून दाखविले असते. आणि वृद्ध-वेतनावर भिस्त ठेवण्याची त्याला गरजच राहिली नसती. व्यवसाया-बाबतींतहि मुलांची महत्त्वाकांक्षा उद्दीपित करण्याऐवजीं तूं आपल्या इच्छाच

त्यांच्यावर लादल्यास. त्यांच्या वैयक्तिक जीवनांत तरी तूं त्यांना अवश्य तें स्वातंत्र्य दिलं होतंस काय ? आपली जोडीदारीण ज्याची त्यानं निवडली, कीं तूं पसंत केल्यास त्याच मुलींचं पाणिग्रहण त्यांनीं केलं ?"

"पण माझ्या पसंतीबरोबर मी त्यांचीहि पसंती मिळविली होती. माझी निवड त्यांना अमान्य असती, तर मी त्यांना सक्तीनं लग्न करायला लावल नसतं. ज्यांच्या पत्रिका उत्कृष्ट जमल्या, ज्या दिसायल्या बऱ्या आणि सुदृढ प्रकृतीच्या आहेत आणि ज्यांचे पालक जांवयाचं 'कोडकौतुक' भरपूर करतील, अशा मुलींची माझ्या मुलासाठीं मीं निवड केली. यांत मी त्यांचं हितच केलं असं मला वाटतं."

"पण आपली जोडीदारीण आपणच निवडण्याचं स्वातंत्र्य तूं मुलांना दिलं नाहींस, हा माझा आक्षेप तुझ्या या निवेदनावरून दूर होत नाहीं. महाविद्यालयांत समविचारी आणि समान अभिरुचीच्या मैत्रिणी तुझ्या चिरंजीव मंडळींनीं मिळविल्या असतील आणि परस्परांविषयीं त्यांच्यामधें आकर्षणहि निर्माण झालं असेल. तूं पुढं आणून उभी केलेली मुलगी जन्माची जोडीदारीण म्हणून मान्य करण्यापेक्षां चांगली ओळख झालेली एखादी मुलगी तुझ्या चिरंजीवानं स्वीकारली असती तर काय वाईट झालं असतं ?"

"माझे मुलगे मुलींच्या पाशांत पडायचे नाहींत, अशी माझी खात्री होती. मुलांनीं मुलींशीं आणि मुलींनीं मुलांशीं सलगी करतां कामा नये, असंच वळण मी त्यांना लावलेलं होतं. आमची वर्षा शेजारच्या शरद्‌बरोबर एकदां रस्त्यावर बोललेली दिसली, तर मी घरीं येतांच तिच्या श्रीमुखांत दिली. तसंच शशिकांत आपल्या एका वर्गभगिनीच्या घरीं पत्ते खेळायला जातो अशी मला कुणकुण लागतांच मी तिच्या घरीं जाण्याची त्याला मनाई केली."

"खेळाचा विषय निघाला म्हणून आठवण झाली. बाप्पाजी, वसंतला चेंडूफळीखेळाची आवड होती, शरद पटाईत पोहणारा होता, आणि हेमंताला नाटकाची हौस होती. पण तूं वसंताला क्रिकेट खेळूं दिलं नाहींस, शरदला पोहण्याच्या शर्यतींत भाग घ्यायला मनाई केलीस, आणि हेमंतला

सम्मेलनाच्या नाट्यप्रयोगांत काम करायची हौस तुझ्या आडकाठीमुळं मनच्यामनीं मारून टाकावी लागली हें खरं ना ?"

" क्रिकेटचा दगडासारखा घट्ट चेंडू लागल्यामुळं एकाचा डोळा फुटून गेल्याचं उदाहरण आमच्या शेजारींच घडलं होतं. पोहण्याच्या नादांत जलसमाधि मिळाल्याच्या बातम्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत होत्या आणि नाटकांत काम करणं, हें कुलशीलवानाचं काम नव्हे, असं माझं मत होतं. जायबंदी करणारे खेळ मी मुलांना खेळूं दिले नाहींत, ज्यांत अपघाताचा धोका अशा दांडगाया करूं दिल्या नाहींत, आणि शिष्ट लोक ज्याला हीन लेखतात असे नाटकासारखे नाद त्यांना लागूं दिले नाहींत, या गोष्टी त्यांच्या सुरक्षितपणाच्या दृष्टीनं मला अवश्य वाटल्या. त्यांत माझं काय चुकलं ?"

" बाप्पाजी, यांत तूं फार मोठी चूक केलीस असं माझं मत अधिकच दृढ झालेलं आहे. देवाधिदेवा, बाप्पाजीनं माझ्या प्रश्नांना दिलेलीं उत्तरं धर्मसभेनं ऐकलीं. त्यांवरून सर्वांना दिसून आलं असेल कीं, सर्व प्रकारची अनुकूलता असूनहि याची धनलालसा तृप्त होऊं शकली नाहीं आणि तिच्यापायीं यानं शरिराला आणि मनाला अत्यावश्यक असलेली विश्रांति मिळूं दिली नाहीं. कितीहि पैशानं ज्याची बरोबरी होणार नाहीं, तें आरोग्य व दीर्घायुष्य यानं द्रव्याच्या व्यसनामुळं गमावलं. ज्या समृद्ध परिस्थितींत माणसानं कृतार्थतेचं समाधान मानावं, अशी परिस्थिति सुदैवानं प्राप्त झाली असतांहि हा धापा आणि उसासे टाकीत जगत होता. म्हणून मी याच्यावर करीत असलेला आत्मक्लेशाचा आरोप याच्याच उत्तरांनीं सिद्ध होतो, असं माझं म्हणणं आहे."

" मानवी जीवनांत धन ही उपेक्षणीय गोष्ट नाहीं. प्रयत्नानं मिळवावी, दक्षतेनं सांभाळावी आणि शहाणपणानं खर्चावी अशीच ती चीज आहे. सौख्यप्राप्तीचं महत्त्वाचं साधन म्हणजे धन ! पण साधनालाच साध्य मानून मानव फसत असतो. मानवाचं खरं साध्य समाधान हें आहे. म्हणजे ' धन हें दास, आणि मनुष्य हा धनी ' अशी जाणीव माणसानं ठेवायला पाहिजे. माणूसच धनाचा दास झाला तर तें धन त्याला नुसतं राबवून घेतं, समाधान कधींच देत नाहीं. हा बाप्पाजी धनाचा दास होऊन

राहिला. वैभवाचं समाधान याला प्राप्त झालं नाहीं, धनदास्याचे क्लेश तेवढे याच्या वांट्याला आले."

"आतां मी याच्यावरील दुसऱ्या आरोपाकडे वळतों. मुलाविषयींची बापाचीं कर्तव्यं यानं उत्तमप्रकारें पार पाडलीं आहेत असं हा म्हणतो आणि लौकिकदृष्ट्या तें खरंहि असेल. असा ममताळू बाप मिळाल्याबद्दल मुलांनीं आपल्यास भाग्यवंत समजलं पाहिजे असंच लोक म्हणतील. पण यानं आपल्या चिरंजीव मंडळींवर हे लौकिक उपकार केले असले, तरी एका बाबतींत त्यांचं अमर्याद नुकसानहि केलं आहे. यानं त्यांचा आत्मविश्वास, स्वतंत्र प्रज्ञा नष्ट करून टाकिली. आपण सांगूं तेंच मुलांनीं केलं पाहिजे असं वळण—यालाच धाक म्हणतां येईल—यानं मुलांना लावलं. गाडीवान लगाम खेंचील त्या बाजूला धावत सुटायचं हें घोड्याचं जीवन याचीं मुलं जगत आलीं. आपल्या अशा कांहीं आकांक्षा असतात, आणि त्या स्वप्रयत्नानं आपण पूर्ण करून घ्याव्या, अशी जाणीवहि यानं मुलांच्या मनांत निर्माण होऊं दिली नाहीं. बालपणीं कडेखांद्यावर घेऊन यानं त्यांना हिंडवलं असेल, प्रौढपणीं आपल्या बुद्धीवर बसवून त्यांना नाचवलं. थोडक्यांत सांगायचं म्हणजे त्यांना यानं आपल्या बळावर चालूं दिलं नाहीं. अर्थात् तीं पंगु बनलीं, यानं ज्या गाड्याला जुंपलं तो गाडा ते तरुण योग्यप्रकारें ओढीत असले, तरी त्याव्यतिरिक्त कसलाहि भार शिरावर घेण्याची हिंमत त्यांना होत नाहीं. एक साधं उदाहरण सांगतों. आपापल्या बायकांना लुगडीं घ्यायचीं झालीं, तर याचे चिरंजीव स्वतः बाजारांत जाऊन त्यांची हौस पुरवूं शकले नाहींत! त्यांनीं बाप्पाजींना पत्र लिहायचीं, आणि बाप्पाजींनीं खरेदी करून पाठविलीं नाहींत आणि जिथल्या तिथंच विकत घ्यायची परवानगी दिली, तर त्यांनीं सांगितलं असेल त्या जातीचीं आणि त्या किंमतीची लुगडीं घेऊन मुलांनीं आपली गृहलक्ष्मी सजवायची, असा क्रम आतांपर्यंत चालत आला!"

"कोणाला वाटेल बाप्पाजीनं मुलांना आपल्या इच्छेच्या अंकित ठेवलं, पण मुलं कां राहिलीं? लहानपणीं कळत नव्हतं तेव्हां ठीक होतं. पण वयानं वाढलेल्या आणि शिकून शहाणे झालेल्या मुलांनीं असं परावलंबी कां

रहावं ? वरवर पहाणाऱ्याला असं वाटेल खरं, पण थोडा बारीक विचार केला तर हेंहि बापाजीच्या कृतीचं स्वाभाविक फळ होतं, असं दिसून येईल. हल्लीं जगांत हुकुमशाही नांवानं ओळखली जाणारी एक समाज-व्यवस्था कांहीं ठिकाणीं प्रस्थापित झाली आहे. कुटुंबांत एक कर्ता पुरुष असतो आणि त्याची एकट्याचीच सत्ता गृहराज्यावर चालू असते. ज्याची सत्ता त्याची इच्छा, हा नियम ओघानंच येतो. आपली सत्ता सर्व कुटुंबियांवर अबाधित चालावी, आपल्या इच्छेप्रमाणं सर्वांनीं बिनतक्रार चालावं, यासाठीं हे घरधनी सदैव सावध असतात. मुलं स्वतंत्रपणें विचार करूं लागलीं तर आपल्या सर्वाधिकाराला बाध येईल हा धोका त्यांना सर्वांहून अधिक हेरतां येतो आणि म्हणून मुलांच्या बालपणांपासून ‘ तुम्हांला कांहीं कळत नाहीं, कळायचं नाहीं, मी सांगतों तसं मुकाट्यानं करा ’ हा एक मंत्र ते त्यांच्यापुढं जपत असतात. एकच गोष्ट सतत कानांवर पडत राहिली तर ती खरी वाटायला लागते. धूर्तांनीं ‘ कुत्रा, कुत्रा ’ म्हटल्याबरोबर भटजी बावरला, आणि खांद्यावरील यज्ञीय बोकड कुत्रा म्हणून त्यानं टाकून दिला, अशी गोष्ट मानव लोकांत रूढ आहे. सतत कानांवर पडणारे शब्द मनावर संस्कार करतात. बाप्पाजीनं ‘ तुम्हांला कळायचं नाहीं ’ असं सतत म्हटल्यामुळं यांच्या मुलांनाहि वाटायला लागलं, खरंच, आपल्याला नाहीं कळायचं. बाप्पाजी सांगतील काय करायचं तें.’ बाप्पाजीनं आपल्या चिरंजिवांना वैचारिक पंगुत्व दिलं आणि त्यामुळंच ते सदैव याच्या अंकित राहिले. त्यांना असं पंगु करून ठेवणं हा त्यांचा द्रोहच होय, असं माझं स्पष्ट मत आहे. धर्मसभेनं याचा विचार करावा आणि योग्य तो निवाडा द्यावा अशी माझी प्रार्थना आहे. ”

चित्रगुप्तानं आपलं निवेदन पूर्ण केल्यावर यमधर्म म्हणाले—“ देवगुरो, चित्रगुप्ताचं निवेदन आपणाला पटलं काय ? या कामीं आपण मला मार्गदर्शन करावं अशी मी विनंति करतों. ”

“ यमधर्मा, ” देवगुरु म्हणाले, “ चित्रगुप्तानं आपलं निवेदन स्पष्ट आणि समर्पक केलं असून तें कोणाहि विचारवंताला पटेल असंच आहे. हा बाप्पाजी चित्रगुप्ताच्या म्हणण्याप्रमाणं आत्मक्लेशी आणि पुत्रद्रोही तर

आहेच, पण राष्ट्रद्रोही आहे असं मला म्हणावसं वाटतं. बाप्पाजीनं आपल्या उभ्या आयुष्यांत आपण, आपलं कुटुंब, यापलीकडील विचार आपल्या मनांत येऊं दिला नाहीं. दारिद्र्याचे आपणांस लागलेले चटके आपल्या परिवाराला लागूं द्यायचे नाहींत या एकाच उद्दिष्टामागं हा धावत राहिला. पण दारिद्र्याची बाधा होऊं शकणार नाहीं, इतका धनसंचय झाल्यानंतरहि तो अपुराच पडेल, अशी भीति याच्या मनांतून दूर झाली नाहीं. आणि आपण पहिल्याइतकेच धनदुर्बल आहों, या समजुतीनं हा बाबत काळजी करीत राहिला. त्यामुळं त्याचे आत्मक्लेश कधींच चुकले नाहींत.

"यमधर्मा, यानं मुलांसाठीं करतां येईल तितकी तरतूद करून ठेवली आणि त्यांच्या सुखस्वास्थ्यासाठीं घेतां येईल तितकी काळजी घेतली, हें खरं आहे. बापाची भूमिका घेणाऱ्या मानवप्राण्यांत हे गुण फारच अल्प प्रमाणांत आढळतात, असा अनुभव येतो. पण मघांशींच एका प्रकरणीं सांगितल्याप्रमाणं गुणसुद्धां अतिरेकामुळं दोष ठरतात आणि तशी या बाप्पाजीची स्थिति झाली आहे. याच्या वात्सल्याला वैराचं स्वरूप आलं आहे. यानं मुलांना फुलं समजून त्यांची जपणूक केली. हालअपेष्टांची झळ लागून तीं कोमेजतील, जगाच्या धांगडधिंग्यांत गेलीं तर तीं चुरगळतील, अशा भयानं त्यांना यानं आपल्या नजरेआड कधीं जाऊं दिलं नाहीं. आपल्या मायेच्या सांवलींतच तीं सुरक्षित राहतील ही याची कल्पना. पण ज्या जगांत मुलं जन्माला आलीं, त्या जगाला नुसतीं शोभेचीं फुलं नको असतात. त्याला सांवरून धरणारे आधारस्तंभ पाहिजे असतात. विशेषतः याच्या राष्ट्राला उद्यां ज्या पुरुषांची आवश्यकता आहे ते पुरुष वाडवडिलांच्या कृपाछत्राखालीं सुरक्षित राहूं पाहाणारे नसून स्वतःच्या सामर्थ्यावर स्वरक्षित राहतील असे हवे आहेत. त्यांच्या अंगीं फुलांचा नाजुकपणा नको असून पोलादाचा टणकपणा आणि चिवटपणा पाहिजे आहे. हा टणकपणा येण्यासाठीं त्यांना जगांतल्या ठेंचा लागूं दिल्या पाहिजेत, टक्केटोणपे खाऊं दिले पाहिजेत. बाप्पाजीच्या मनांत असा विचार कधीं आला नाहीं म्हणूनच त्याच्याकडून असा पुत्रद्रोह आणि राष्ट्रद्रोहहि घडला असं मी म्हणतों. प्रत्येक नागरिकावर राष्ट्रऋण असतं आणि तें त्यानं शक्त्यनुसार फेडलं पाहिजे, हें बाप्पाजीसारख्या सुबुद्ध माणसाला कळायला पाहिजे.

याला हें कळलं नसेलच असं नाहीं. पण कळूनसवरूनहि यानं कर्तव्याकडं डोळेझांक केली आहे."

"यमधर्मा बाप्पाजीच्या जीवितकार्याचा हा सारांश लक्षांत घेऊन तूं योग्य तो निर्णय देशीलच. पण मला तुला आग्रहानं सांगावंसं वाटतं कीं याच्याकडून प्रमाद घडले असले तरी ते दुर्बुद्धीमुळं घडलेले नाहींत. अतिरिक्त कुटुंबनिष्ठ व अमर्याद पुत्रप्रेम यामुळंच हा दोषांचा धनी झाला आहे, ही गोष्ट निर्णय देतांना तूं विसरूं नकोस."

"देवगुरूंनीं दिलेला सदुपदेश मी शिरोधार्य मानतों. बाप्पाजीचं जीवितकार्य सुष्टदुष्ट गुणदोषांनीं भरलेलं आहे. मनुष्यांत असावं काय हें त्यानं आपल्या चारित्र्यावरून प्रापंचिकांना दाखवलं, पण असूं नये काय, हें त्याला दाखवतां आलं नाहीं. तेवढ्यापुरतं याचं कर्तव्य अपूर्ण राहिलं आहे. तें पुरं करण्यासाठीं याची फिरून मानवलोकांतच स्थापना करावी असं मी इच्छितों. या दुसऱ्या मानवजन्मांत हा वाडवडिलांनीं सांचवून ठेवलेल्या वैभवाचा धनी होईल. याच्या अंगीं आळस घर करून राहील, अर्थात् याच्या हातून उद्योग मुळींच होणार नाहीं. यानं पहिल्या जन्मांत केलेल्या यातायातीबद्दल याला या सुस्त जीवनाची शिक्षा उचित होईल असं मला वाटतं. याच्या हातून विद्यार्जन होऊं शकणार नाहीं. निर्बुद्ध आणि अज्ञानी श्रीमंताची संपत्ति नष्ट होते, तशी याची होईल आणि आयुष्यांतल्या अखेरच्या भागांत दैन्यांतील दुःखं याच्या वांट्याला येतील. याची कींव करण्यापेक्षां नागरिक याचा उपहास करतील. स्वतःच्या हिंमतीवर जीवितयुद्ध लढणारे बहाद्दर आणि वाडवडिलांनीं जोपासलेला अजागल यांतला फरक त्याला उमगेल. आणि स्वतःपुरतंच निमग्न न राहतां राष्ट्रसेवा करणाऱ्या पुरुषांचा लौकिक पाहून आपली खंत करीत हा फिरून इथं येईल. माझ्या या निर्णयाला सर्व धर्मसभेची मान्यता असावी."

यमधर्माला उद्देशून देवगुरुप्रभृतींचा 'तथास्तु' असा उद्गार ऐकतांच बाप्पाजीला चित्रगुप्तानें बाजूला नेवविलें.

दुसरा प्राणी कोण येतो याकडे आम्ही डोळे लावून राहिलों.

---

"देवाधिदेवा, या स्त्रीचं नांव तापीबाई भाजेकर. पतिद्रोह, पुत्रनाश आणि आत्मघात असे तीन अपराध हिनं केले आहेत. आणि त्यांची न्याय्यान्याय्यता पाहून धर्मपीठानं योग्य तो निर्णय द्यावा अशी माझी प्रार्थना आहे."

"मुली, चित्रगुप्त म्हणतो ते अपराध तुझ्याकडून घडले आहेत का?"

यमधर्मांच्या या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजीं तापीबाई डोळ्याला पदर लावून मुसमुसून रडूं लागली. ती वर मान करून पाहीनासुद्धां! तें पाहून यमधर्म करुणापूर्ण अंतःकरणानें तिला धीर देऊं लागले:—

"वत्से, तुझ्या हातून अपराध घडले असतील आणि त्याबद्दल तुला पश्चात्ताप होत असेल, तर तसं निर्भयपणें सांगून मोकळी हो. प्रमाद करून वितंडवाद घालीत बसण्यापेक्षां आपली चूक मान्य करणं हें श्रेयस्कर असतं, त्यामुळं अपराध्याच्या हट्टीपणाबद्दल ग्रह दूषित होण्याऐवजीं त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल सहानुभूति निर्माण होते. आणि अवश्य तें शासन करतांनाहि धर्मपीठाचे सदस्य दयाबुद्धि धारण करितात. म्हणून वत्से, आरोपांचा स्वीकार करतांना तूं भिऊं नको. सांग बरं, चित्रगुप्तानं तुझ्यावर केलेले आरोप तुला मान्य आहेत का? ते तूं बुद्धिपुरस्सर केलेले नसून तुझ्या हातून ते नकळत घडलेले असतील, तर तसंहि सांग. भिऊं नको. तुझ्यासारख्या मुलीचा अकारण छळ व्हावा अशी इच्छा इथं कुणाचीहि नाहीं. उलट, तुला सुखी करतां आलं तरच आम्हां सर्वांना अत्यानंद होईल. मग सांगतेस ना?"

तरीहि तापीबाईनें मान वर केली नाहीं, कीं तोंडांतून शब्द बाहेर काढला नाहीं. तिच्या रडण्याला मात्र अधिकाधिक भरती येऊं लागली! तें पाहून चित्रगुप्त म्हणाला:—

"देवाधिदेवा, तापीबाई भूतलावरील हिंदुस्थानांत एका घरंदाज माणसाची पत्नी होती. स्त्रीजातीचा बोलघेवडेपणा आणि भांडखोरपणा तिच्या

अंगीं असला, तरी थोर पुरुषादेखत बोलायची तर राहोच, पण मान वर करून बघायचीहि हिला संवय नव्हती. बाहेरच्या पुरुषांची गोष्ट दूर राहिली पण आपल्या पतीपुढंहि मनमोकळेपणानं ही बोलली नाहीं. हिंदु स्त्रिया या सर्वस्वीं पुरुषाधीन असल्यामुळं, त्यांच्यापुढं तोंड मिटून राहणं हा स्त्रीचा मोठा सद्‌गुण मानला जातो. याला शालीनता किंवा मर्यादशीलपणा अशीं गौरवास्पद नांवं दिलीं जातात. पण यामुळं हिंदू स्त्रिया भितऱ्या, बुजऱ्या होतात आणि आपल्या अंतर्यामीं सलणारीं शल्यं बोलून दाखवायचं धारिष्टहि त्यांना होत नाहीं. तापीबाईची अशी अवस्था झाली असेल. कोणी कांहीं बोललं तर त्याचा स्पष्टपणें समाचार घेण्याऐवजीं मुळूमुळू रडायचं हा हिचा जन्मस्वभाव होऊन बसला असावा. म्हणूनच तिला आत्मनिवेदन करण्याची देवाधिदेवांची आज्ञा पालन करितां येत नसावी. हिच्या अंगीं भिनलेला भित्रेपणा नष्ट करून आत्मनिवेदनाचं सामर्थ्य हिला देवगुरूंच्या मंत्रप्रभावानं प्राप्त व्हावं अशी मी विनंति करतों.”

“तथास्तु!” असें आशीर्वचन उच्चारून देवगुरूंनीं तापीबाईच्या मस्तकावर मंत्रजलाचें सिंचन केलें आणि काय चमत्कार सांगावा! तापीबाई द्वंद्वाला सज्ज झालेल्या एकाद्या योद्ध्याच्या आवेशानें धर्मपीठापुढें सरसावून म्हणाली:—

“देवाधिदेवा, चित्रगुप्तांनीं केलेले एकूण एक दोषारोप मी अमान्य तर करतेंच, पण असे दोषारोप करून माझी बदनामी केल्याबद्दल त्यांना योग्य तें शासन करावें अशी मी मागणी करितें.”

“मुली,” यमधर्म गंभीरपणें म्हणाले, “आरोप अमान्य आहेत असं नुसतं म्हणून आरोपिताची सुटका होत नाहीं. ते कसे खोटे आहेत हें त्यानं सिद्ध करून द्यावं लागतं. तुझ्या जीवनकथेंत या आरोपाचं खंडन करूं शकतील अशा कांहीं गोष्टी असतील तर त्या तूं धर्मपीठाला दाखवून दे. त्या पटल्या तर तूं निर्दोषी ठरशील एवढंच नव्हे, तर तुझ्या निर्दोषीपणाला उचित असं मानाचं स्थान धर्मपीठाकडून तुला मिळेल. चित्रगुप्ताला शासन करण्याची तुझी मागणीहि अमान्य होणार नाहीं. आधार नसतांना आणि तुला त्रास व्हावा अशा असद्‌हेतूनं चित्रगुप्तानं तुझ्यावर

वृथारोप केले असतील, तर त्याला धर्मपीठ दयामाया न धरतां दण्ड करील. मग सांग पाहूं तुला आपल्यावरील आरोप कां अमान्य आहेत तें?"

"पण, देवाधिदेवा, माझ्यावरच ही सक्ती कां? ज्यांनीं आरोप केले त्यांनींच त्यांची सिद्धता कां करूं नये?"

"तापीबाई, ही तुझी मागणी मी आनंदानं मान्य करितों. मी तुझ्यावर पतिद्रोह, पुत्रनाश आणि आत्मघात असे तीन आरोप केलेले आहेत, आणि त्यांचा अर्थ स्पष्ट आहे. पण तो तुला उकलून दाखविण्याची आवश्यकता आहे. तूं स्वतःला स्वतःच्या हातानं जाळून घेऊन इकडं आली आहेस ही गोष्ट तुझ्यावरील आत्मघाताचा आरोप सिद्ध करीत नाहीं काय? तुझ्या अशा कृतीनं तूं जन्म दिलेल्या पुत्रकन्यांना पोरकं केलंस. पोरक्या मुलांची आबाळ होते. शरीराप्रमाणं त्यांचं मानसिक संगोपनहि होत नाहीं आणि तीं हीनदीन होतात. आई-वेगळ्या मुलांची दुर्दशा तूं जगांत पाहिलेली आहेस. तूं स्वाभाविक मरणानं मेली असतीस तर हा आरोप मी तुझ्यावर ठेवला नसता, पण तुझं मरण तूं बळेंच ओढवून घेतलं असल्यानं आपल्या अजाण लेंकरांना पोरकीं करण्याचा–म्हणजेच पुत्रनाशाचा–आरोप तुझ्यावर येत आहे. ज्या गोष्टीमुळं तूं आत्मघाताला प्रवृत्त झालीस ती गोष्ट म्हणजे तुझ्या नवऱ्याचं सान्निध्य तिला नकोसं वाटणार नाहीं. ज्या अर्थी तुला आपल्या पतीचं सान्निध्य नकोसं झालं, त्याअर्थी तूं तुझ्या पतीवर, आणि तुझा पति तुझ्यावर अनुरक्त नव्हता, ही गोष्ट सिद्ध होते. पतिपत्नी परस्परांवर अनुरक्त नाहींत याचाच अर्थ तीं परस्परद्वेष्टीं आहेत, असा होत नाहीं काय? तापीबाई, तूं आत्महत्या करून इकडं आलीस या एका गोष्टीनंच तुझ्यावर मी करीत असलेले तीन्ही आरोप सिद्ध होतात. तसे ते होत नसतील तर ते सिद्ध करण्याची जबाबदारी आतां तुझ्यावर आहे."

"देवाधिदेवा, चित्रगुप्तांनीं माझ्यावर आत्मघाताचा आरोप केला आणि तो सिद्ध झाला असं गृहीत धरून बाकीचे दोन आरोपहि आपोआपच सिद्ध होतात असं निवेदन केलं. हें एका अर्थी मला सोयीचंच झालं आहे. कारण आत्मघाताचा एक आरोप मी खोडून काढला कीं तदनुषंगिक म्हणून केलेले दुसरे दोन्ही आरोपहि आपोआपच दूर होणार

आहेत. प्रत्येक आरोपाचं निराकरण करण्याचे माझे कष्ट चित्रगुप्तांनीं वांचविले, याबद्दल मी त्यांचे आभारच मानतें आणि माझ्यावरील आत्मघाताचा आरोप कसा निराधार आहे एवढं धर्मपीठाला सांगतें. ”

“ देवाधिदेवा, मी आत्महत्त्या केलेली नसून माझ्या पतीनं माझी हत्त्या केलेली आहे. माझ्या पतीच्या हातानं मी मेलेली नसलें, तरी माझ्या पतीच्या कृतीनं मला मरायला लावलं आहे. माझ्या पतीची मी बायको जिवंत असतांना त्यानं दुसरी बायको केली. सवतीपेक्षां मृत्यू सुखाचा हें कोणीहि स्त्री मान्य करील. प्राणिमात्र दुःखांतून सुखाकडं धांवत असतो. सुख मिळण्यासारखं नसलं तर कमी दुःख म्हणजेच सुख अशी तो मनाची समजूत घालतो. आपल्या उरावर सवत नाचवून घेण्यापेक्षां मरणाच्या वेदना कमी दुःखदायक वाटल्या म्हणून मी पतकरल्या. स्वाभाविक अशीच गोष्ट मी केली. मी आपल्या हातानं स्वतःला जाळून घेतलं एवढ्या दृश्य गोष्टीवर मला आत्मघातकी ठरविण्यापेक्षां माझ्या पतीनं माझा खून केला याबद्दल धर्मपीठानं त्यालाच शासन केलं पाहिजे.”

“ देवाधिदेवा, तापीबाईची ही तक्रार सकृत्दर्शनीं खरी वाटण्यासारखी असली तरी खरोखर वस्तुस्थिति तशी नाहीं. ” चित्रगुप्त म्हणाला आणि त्यानें तापीबाईला प्रश्न केला—

“ तापीबाई, तुझा विवाह होऊन किती वर्षं झालीं ? आणि विवाह झाल्यापासूनच तुझ्या पतीनं तुझा छल केला काय ? ”

“ पहिलीं पांच वर्षं हे चांगले वागले. माझी हौसहि पहिल्या पहिल्यांदा पुरवीत असत. आमच्या मधूला बाबागाडी घ्यायची असं मी म्हटलं तर पुढचा पगार अगोदर घेऊन त्यांनीं ती आणली. मालीला डूल घ्यायचे म्हटल्यावरदिखील पैशाची अडचण यांनीं पाहिली नाहीं. कांहींतरी तजवीज करून मालीला डूल केले. मलाहि हौसेसारखीं लुगडीं पातळं घेऊन द्यायला यांनीं कधीं खळखळ केली नाहीं. पण वसंत झाल्यापासून पारडं फिरलं. यांचं घरांतलं लक्ष उडालं. ”

“ तापीबाई, तुझा नवरा तुझ्यावर प्रेम करतां करतां, करीनासा झाला, याला कांहीं कारणं असतीलच ? ”

"पुरुषांना कशाला हवं असतं कारण? वाटेल तें करायला पुरुष मोकळेच असतात. बायकांना मात्र सगळ्याची चोरी. अगदीं डोंगराएवढं कारण असलं तरी त्यांना रागावून रुसून चालत नाहीं. पुरुषांच्या रागाला तिळाएवढं निमित्तसुद्धां पुरतं. म्हणूनच एवढंतेवढं खुसपट काढून हे घरांत जिकीर करायला लागले."

"मुली, याचं एकादं उदाहरण सांगितलंस तर तुझ्या म्हणण्याचा अर्थ धर्मसभेला चटकन् समजेल. तुझा नवरा कोणत्या क्षुल्लक कारणांनीं नाखूष झाला तें सांग पाहूं?"

"वसंताच्या खेपेला मी बाळंतीण होतें, तेव्हां मला बारीक ताप आला महिनाभर. आणि बरीच अशक्त झालें मी. यांनीं माझ्यासाठीं डाक्टरला विचारून पौष्टिकाच्या बाटल्या आणल्या. तें औषध नुसतं बघितलं तरी मला मळमळायला लागायचं म्हणून मी तें घ्यायची नाहीं, तर त्याबद्दल यांचा माझ्यावर राग! चार पोरांच्या खस्ता मी एकटीनं खायच्या. नाहीं कां जाणार माझा जीव वैतागून! रागाच्या भरांत मी कधीं मुलांना मारलं, कधीं भांड्यांची आदळआपट केली आणि कधीं कुणांवर कावलें, तर यांचा राग भडकलाच! हाडं झिजवायची मी, आणि यांना फुकटचं रागवायला काय जातं? म्हणे, 'या रडारडींत राहण्यापेक्षां मसणांत जाऊन पडलेलं बरं.' यांचं असलं बोलणं ऐकलं म्हणजे माझाहि संताप अनावर झाल्याशिवाय राहील कां? मीहि कांहींतरी बोलायची मग."

"तापीबाई, तूं एकदां तीन दिवस उपाशी राहिलीस, मालीच्या हाताला डाग दिलास, आणि एकदां नवऱ्याला न विचारतां माहेरीं गेलीस, या गोष्टी तुला आठवतात कां?"

"माझ्या काळजांत घरं करून राहिल्या आहेत या गोष्टी! त्या मी कशी विसरेन? मी नको म्हणत असतांना हे भाऊबीजेला वन्संच्या गांवीं गेले. असल्या साध्या मागणीचासुद्धां मान होत नाहीं हें पाहून मला अन्न गोड लागेल तरी कसं? मालीच्या हाताला मी दिलेला डाग तेवढा दिसतो पण त्या कार्टीचे विध्वंसी चाळे कुठं दिसताहेत? शिवून महिनासुद्धां झाला नव्हता तर नव्या परकराला भोंकं पाडलीं बाईसाहेबांनीं! चांगली अद्दल घडेल अशी शिक्षा करायलाच पाहिजे होती तिला. आणि मी माहेरीं गेलें ती

कांहीं सुखासुखीं नव्हतें गेलें! यांच्या आणि पोरांच्या खस्ता खातां खातां मला जीव नकोसा व्हायचा आणि त्यांत दमेकरी सासूबाईंना माझ्या उरावर आणून ठेवायला हे निघाले. म्हटलं, समजून आणि आर्जवं करून नाहीं यांची समजूत पटायची. म्हणून उठलें, अंगावर पीत होती म्हणून मालीला तेवढी बरोबर घेतली. आणि चालती झालें माहेरीं! म्हटलं खुशाऽऽल रामाचं राज्य करा आपल्या घरांत."

"बरं. आज तूं जें अंगावर तेल ओतून घेऊन स्वतःला जाळून घेतलंस, तें नवऱ्याच्या कोणत्या अपराधाबद्दल?"

"एक कां दोन म्हणून सांगायचे? हे चोरून कारभार करीत होते तोंवर सोसलं मी कसं तरी. पण यांची त्या बयाबरोबर लगीन लावण्यापर्यंत मजल गेली. माझ्या घरांत माझ्यावर सत्ता गाजवायला दुसरी अवदसा आल्यावर कशाला राहूं मी तिथं?" असें म्हणून तापीबाई ओक्साबोक्शीं रडूं लागली.

"यांचीं कुजकीं बोलणीं मी जन्मभर सहन केलीं, घरचे राडे उपसले, पोरांच्या खस्ता खाल्ल्या. याउपरहि यांनीं मला मारलं असतं, डागलं भाजलं असतं तरी मी सोसलं असतं. पण माझ्या उरावर यांनीं सवत नाचवायला आणली! काय करायचं असलं जिणं जगून? माहेरचा आधार असता, तर गेलें असतें मी तिकडं, पण माझ्या बापाला नि भावाला तरी कुठं हवी होतें मी? मागं घर सोडून मी तिकडं गेलें होतें तेव्हांच त्यांनीं सांगितलं कीं 'नवऱ्याशीं भांडून आलेल्या मुलीला आम्हीं क्षणभरसुद्धां थारा देणार नाहीं म्हणून.' मग देवा, आपणच सांगा, इकडं धांव घेण्यावांचून दुसरा कोणता मार्ग होता मला? माझे हे धिंडवडे ऐकून माझ्यावरले चित्रगुप्तांनीं केलेले आरोप खरे ठरतील कां, याचा आपणच विचार करा. पदर पसरून मागणं मागतें मी!"

"देवगुरो, या मुलीची जीवनकथा आपण ऐकली. चित्रगुप्त हिच्यावर आरोप करीत आहे आणि ही त्या आरोपांची जबाबदारी आपल्या नवऱ्यावर ढकलीत आहे. अशा असहाय्य स्त्रीला सवतीचा जांच दुस्सह वाटला असेल तर तें साहजिक आहे असं म्हणतां येणार नाहीं कां? हिच्या पाणि-

ग्रहणाच्या वेळीं हिच्याशीं प्रतारणा न करण्याची देवब्राह्मणांच्या साक्षीनं हिच्या नवऱ्यानं प्रतिज्ञा केली होती. ”

“ यमधर्मा, हिच्या नवऱ्याचा कैवार मला घ्यायचा नाहीं. पण त्याचा विचार आपणांला यावेळीं करतां येणार नाहीं. आपल्या कृतकर्मांचा झाडा द्यायला तो धर्मपीठापुढं येईल तेव्हां त्याच्या गुणदोषांचा आपण योग्य तो निवाडा करूं. सध्यां तापीबाईपुरताच आपल्याला विचार कर्तव्य आहे. हिनं आत्मघात करावा अशी परिस्थिति निर्माण व्हायला हिचे प्रमाद कारणीभूत झालेले आहेत कीं हिचं आचरण निर्दोष आहे, एवढं आपण पहायचं आहे.

“ यमधर्मा, पति पत्नीचं पाणिग्रहण करतांना तिच्याशीं एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा करीत असला, तरी पत्नीकडूनहि त्याच्या कांहीं अपेक्षा असतात. आपलं जीवन तिनं आनंदमय आणि शांततापूर्ण राखावं, आपला वंश टिकवून धरतील अशा कन्यापुत्रांना तिनं जन्म द्यावा, चरितार्थासाठीं कराव्या लागणाऱ्या काबाडकष्टांचा शीण तिनं प्रोत्साहनाच्या, सहानुभूतीच्या, प्रीतीच्या मधुर बोलांनीं हलका करावा, या गोष्टी पति पत्नीकडून इच्छीत असतो. यमधर्मा, दुसरीहि गोष्ट पतीला पत्नीकडून पाहिजे असते. पुरुष हा विलासलोलुप असतो आणि त्याला आपली पत्नी सदैव टवटवीत असावी असं वाटत असतं. या तापीबाईनं चित्रगुप्ताच्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरावरून हिनं नवऱ्याच्या या अपेक्षा पूर्ण केल्या असं म्हणतां येईल काय ?

“ वैवाहिक जीवनाच्या प्रारंभकालीं हिचा नवरा हिच्याशीं चांगुलपणानं वागत होता. आणि तो मनाचा दुष्ट अथवा उच्छृंखल होता असं हिनं सांगितलेलं नाहीं. सरळमार्गी माणूस वाममार्गांत स्वयंप्रेरणेनं शिरलेला असणं शक्य नाहीं. त्याला तिकडं कोणीतरी ढकललं असलं पाहिजे. तापीबाईनं आपल्या नवऱ्याला तिकडं ढकललं असं मला वाटतं. संसारांत आपलीच इच्छा सदैव पुरी होत राहिली पाहिजे असा हव्यास धरणं वेडेपणाचं आहे. नवऱ्याचं सामर्थ्य पाहूनच पत्नीनं आपल्या आशाआकांक्षांचा बडेजाव माजवावा, तरच दोघांनाहि सुख लागतं. पण हा पोंच तापीबाईला नव्हता. ऋण काढून कां होईना पण नवऱ्याकडून आपली मागणी पुरी झाली म्हणजे झाल ही इची वृत्ति होती. हिचा जळफळाट व्हायला नको

म्हणून कांहीं काळ हिच्या नवऱ्यानं हिच्या इच्छा पुरवल्या तरी त्या मर्यादित मिळकतीच्या माणसाला नेहमीं तशी उधळपट्टी करणं कसं शक्य होणार ? साहजिकच हिच्या इच्छा अपुऱ्या राहूं लागल्या आणि हिच्या तामसी स्वभावामुळं गृहशांति नष्ट झाली. कावाकावी, मुलांना मारहाण आणि उपासांचा आततायीपणा, अशा गोष्टींमुळं हिचं घर हें पतिपत्नींचं आनंदभुवन होण्याऐवजीं त्याला क्लेशभूमीची अवकळा आली."

"दोन अपत्यांना जन्म देतांच हिची तारुण्याची टवटवी संपली आणि हिच्यावर वार्धक्याची छाया दिसूं लागली. पौष्टिक औषधांनीं हिचं तारुण्य टिकवून ठेवण्याचा हिच्या नवऱ्याचा प्रयत्नहि हिनं सिद्धीस जाऊं दिला नाहीं. यमधर्मा, पुरुष हा कामातुर असतो आणि कामार्त पुरुष सुंदर–असुंदराचा विचार करीत बसत नाहीं हें खरं असलं, तरी तो सौंदर्यलोभीहि असतो हें विसरून चालायचं नाहीं. कृश आणि तेजोहीन स्त्री विलासलोलुप पुरुषाला समाधान देऊं शकत नाहीं. तापीबाईनं आपल्या शरीरसौष्ठवाबद्दल दक्षता घेतली असती तर हिचा नवरा दुसऱ्या स्त्रीच्या मोहपाशांत सांपडला नसता. दुसऱ्या स्त्रीनं तापीबाईचा नवरा हिरावून नेला नसून, तापीबाईनंच त्याला दुसऱ्या मोहिनीच्या स्वाधीन केला अशी वस्तुस्थिति आहे. यमधर्मा, सवतीच्या भयानं हिनं आत्मघात केला असला तरी, ती सवत हिनं आपल्या अडाणीपणानं बोलावून आणली. म्हणून हिच्या आत्मघाताचा दोष हिच्याकडंच येतो असं माझं म्हणणं आहे."

"यमधर्मा, तापीच्या वर्गातल्या हिंदु स्त्रियांची स्थिति खरोखरच कष्टप्रद आहे. कुटुंबांतला समान-अधिकारी-घटक असा मान तिला मिळत नाहीं. गोठ्यांतल्या जनावराप्रमाणं धन्याच्या कृपेवर तिला आपलं जीवन कंठावं लागतं. घरधनी सौजन्यपूर्ण आणि दयाशील असला तर तो बायकोला सुखांत ठेवतो. पण असे लोक थोडे असतात. बायकोकडं स्वामित्वाच्या गुर्मीनं पहाणारे नवरेच जास्त. अशा नवऱ्यांच्या बायकांची हीनदीन अवस्था पाहून अंतःकरणांत अनुकंपा उत्पन्न होते आणि अशा बायकांकडंहि कांहीं दोष असूं शकतील असा विचारच उत्पन्न होत नाहीं. दुर्बलाविषयीं सहानुभूति वाटायचीच. पण धर्मपीठाच्या अधिकाऱ्यांचं

मन असं केवळ कोमल असतां कामा नये. अपराध्यांच्या अपराधाला आपण कठोर शासनच करायचं असं नाहीं. पण अपराध सिद्ध झाले असले तरीहि त्यांची दखल`घ्यायची नाहीं ही क्षमाशीलता न्यायाधीशाच्या कर्तव्यबुद्धीला शोभण्यासारखी नाहीं. यमधर्मा, तापीबाईसारखी मुलगी, जें थोडं आयुष्य तिला लाभलं त्यांत सुख उपभोगूं शकली नाहीं, तिच्या वांट्याला निरंतरची रडारड आली, याबद्दल माझ्या अंतर्यामींहि कालवाकालव झाल्यावांचून रहात नाहीं. तरीदेखील तिचं हें नष्टचर्य तिचं तिनंच आपल्यावर ओढवून घेतलं ही गोष्ट मला विसरतां येत नाहीं.

" यमधर्मा, पत्नीपद स्वीकारणाऱ्या स्त्रीची कांहीं कर्तव्यं असतात. आपण स्वत:साठीं नसून दुसऱ्यांच्या सुखांत आपलं सुख आहे याची जाणीव तिनं बाळगली पाहिजे. पति आणि पत्नी यांच्या संयुक्त परिश्रमानंच संसार सुखमय होऊं शकतो. स्वतः निष्क्रिय राहून पत्नीनं सर्व कष्ट केले पाहिजेत असं मानणाऱ्या पतीची किंवा पतीचं कांहीं कां होईना आपल्या मनाप्रमाणं झालं म्हणजे झालं, अशी पत्नीची वृत्ति संसारांतील सुखस्वास्थ्याला विघातक आहे. परस्पर कर्तव्याची अशी जाणीव नसलेल्या पतिपत्नींच्या संसाराचा खेळखंडोबा होतो. ही जाणीव दोघांनाहि असायला पाहिजे. संसार ही भागीदारी आहे. यांतला एक भागीदार कर्तव्यदक्ष असला, तरी दुसऱ्याच्या कर्तव्यशून्यतेमुळं त्याची कर्तव्यदक्षता निष्फळ ठरते. तापीबाईचा नवरा प्रारंभींतरी कर्तव्यविन्मुख नव्हता हें हिनंच मान्य केलेलं आहे. आपली आस्था आणि दक्षता, निष्फळ ठरूं लागलेली पाहून तो तिच्याविषयीं उदासीन बनला असं दिसून येतं."

" यमधर्मा, प्राणीमात्र सुखाकांक्षी आहे. सौख्यप्राप्तीसाठीं त्याची अक्षय्य धडपड चाललेली असते. एके ठिकाणीं निराशा पदरीं आली तरी दुसऱ्या ठिकाणीं इच्छापूर्ती करून घेण्याचा प्रयत्न तो करतो. अशा वेळीं त्याला सामाजिक नीतिनियम नडतात. पण कुठून तरी पळवाट काढून तो आपलं ईप्सित साध्य करून घेतो. तापीबाईकडून सुखाची आशा दिसेनाशी झाल्यावर तिच्या नवऱ्यानं दुसरं सुखस्थान स्वीकारलं. त्याचं हें कृत्य नैतिक दृष्ट्या योग्य कीं अयोग्य किंवा इष्ट कीं अनिष्ट, याचा यावेळीं विचार

करण्याचं कारण नाहीं. पण त्याचं हें कृत्य स्वाभाविक आहे हेंच मला दाखवायचं आहे. ज्या अवहेलनेला वैतागून तापीबाईनं आत्मनाश करून घेतला ती अवहेलना, तापीबाईच्या अडाणीपणांतून आणि हट्टीपणांतून निर्माण झाली आहे. नवऱ्याच्या सुखदुःखाची भागीदारीण ही होऊं शकली नाहीं. त्याच्या क्लेशावर सहानुभूतीचा फुंकर हिनं कधीं घातला नाहीं. त्याच्या कर्तबगारीला हिनं प्रोत्साहन दिलं नाहीं आणि अकालीं कोमेजून हिनं नवऱ्याच्या विलासलालसेचा हिरमोड केला. थोडक्यांत सांगायचं म्हणजे पत्नीपद मिळालं तरी तें टिकवून धरण्याचं कौशल्य आणि त्याची प्रतिष्ठा वाढविण्याचं शहाणपण स्त्रीच्या अंगीं असावं लागतं. तें तापीबाईच्या ठिकाणीं नव्हतं आणि त्याचा हा दुष्परिणाम झाला. तिनं आपला घात करून घेतला हा आरोप हिच्यावर सिद्ध होतो आणि त्याच्या अनुषंगानें पतिद्रोहाचा आणि पुत्रनाशाचा आरोपहि सिद्ध होतो असं मला वाटतं. माझं हें मत तुला मान्य झालं तर पहा."

"देवगुरो, आपण वस्तुस्थितीचं विश्लेषण इतकं स्पष्ट आणि सुसंबद्ध केलं आहे कीं, या प्रश्नावर आपल्यापेक्षां भिन्न मत कोणाला बनवितांच येणार नाहीं. आपला अभिप्राय शिरसामान्य करून चित्रगुप्तानं ठेवलेल्या आरोपाखालीं मी तापीबाईला दोषी ठरवितों. बहुमोल नरजन्म प्राप्त झाला असूनहि ही सुखी होऊं शकली नाहीं आणि दुसऱ्याला सुखी करूं शकली नाहीं. म्हणून मी हिला पुढील जन्म वानरीचा देतों. या जन्मांत दुष्प्या नाचवील तसं हिला नाचावं लागेल. पतीची एकमेव पत्नी म्हणून नांदण्याऐवजीं सवतींच्या घोळक्यांतच जीवित कंठणं हिला भाग पडेल. घर असं हिला मिळणार नाहीं. उघड्या अंगानं उघड्या जगांत हिला भटकावं लागेल. पोर पोटाशीं धरून कडेकपारींत किंवा रानावनांत हिला उड्या घ्यावा लागतील. रानांत गेल्यास हिंस्र श्वापदांचं आणि जनवस्तींत आल्यास माणसांचं भय, हिला सदैव बाळगावं लागेल. निर्भय जीवनाला ही पारखी होईल. चित्रगुप्ता, हिला नियुक्त स्थानीं पाठवून दुसरा प्राणी पीठापुढं सादर कर."

---

" या प्राण्याचं नांव वाग्भट दुभाषी. अन्यायप्रसार आणि देशबांधवांचं वित्तापहरण, असे आरोप याच्यावर आहेत."

चित्रगुप्तानें आरोप दाखल केल्यावर यमधर्म आरोपिताकडे वळून म्हणाले:—" वाग्भट, "......

" सर, वाग्भट ! न्यायाधीशांनींसुद्धां योग्य गौरवानंच मला संबोधिलं पाहिजे. माझा अनादर केल्याबद्दल मी जस्टिस केनेडी यांना माफी मागायला लावली होती."

" वाग्भट, आपल्या पदव्या, प्रतिष्ठा आणि मानसन्मानाचा भूतलावर त्याग करून एक सन्मान्य प्राणी म्हणून तूं इथं आला आहेस आणि तेवढ्याच नात्यानं तुझा खटला इथं चालायचा आहे. भूतलावरील रिवाज इथं पाळले जायचे नाहींत. म्हणून त्या सर्व गोष्टी तूं मनांतून काढून टाक आणि चित्रगुप्तानं तुझ्यावर ठेवलेले आरोप तुला मान्य कीं अमान्य याबद्दल तुला कांहीं सांगायचं असेल तर सांग."

" पण आरोप मान्य करायचे कीं अमान्य करायचे, हा प्रश्न पुढचा आहे. माझा खटला चालविण्याचा अधिकारच या न्यायालयाला नाहीं, अशी माझी तक्रार आहे. चित्रगुप्त म्हणतो ते अपराध मी केले असं वादापुरतं गृहीत धरलं तरी ते या कोर्टाच्या अधिकाराच्या कक्षेत येत नाहींत. जिथं गुन्हा घडला तिथल्या कोर्टातच त्याचा इन्साफ झाला पाहिजे, असं प्रोसीजर आहे. ' लॉ रिपोर्टर ' व्हॉल्यूम ८३ त फेडरल कोर्टाच्या ' फुलबेंचनं षण्मुखम् विरुद्ध किंग एम्परर 'च्या खटल्यांत दिलेलं जज्जमेंट असंच आहे. माझे गृहीत अपराध भूतलावर घडलेले आहेत, आणि तिथल्या कोर्टातच माझा खटला चालला पाहिजे."

" वाग्भट, पण मानवांनीं वरिष्ठ न्यायालयाला मान्यता दिलेली आहे. ज्या हिंदुस्थानचा तूं रहिवासी होतास त्या हिंदुस्थानांतील खटल्यांचे निवाडे इंग्लंडच्या प्रीव्हीकौन्सिलमध्यें होतात ही गोष्ट तूं नाकारूं शकतोस काय ? "

"पण इंग्लंडच्या प्रीव्हीकौन्सिलचे अधिकार कायद्यानं प्रस्थापित झालेले आहेत. शिवाय प्रीव्हीकौन्सिलकडे ओरिजिनल खटले चालत नाहींत. तिथं दाव्यांचे प्राथमिक निवाडे व्हावयाचे नसून प्राथमिक कोर्टांच्या निवाड्यांचे निवाडे व्हायचे असतात. तुम्ही इथं भरविलेलं कोर्ट कायद्यानं प्रस्थापित झालेलं नाहीं आणि जरी तुम्हीं आपलं कोर्ट हें वरिष्ठ कोर्ट आहे असं म्हटलं, तरी तुम्हांला प्राथमिक खटले चालवितां येणार नाहींत."

"या न्यायालयाला, तूं मानीत आलास त्या कायद्यांची मान्यता आहे, ही गोष्ट तुझ्या पद्धतीनं तुला पटवून देणं अशक्य नाहीं. ख्रिस्ती शकाच्या १९०६ चा हायकोर्टाचा निर्णय–संग्रह तूं काढून पाहिलास तर 'बाळ गंगाधर विरुद्ध किंग एंपरर' या खटल्यांत बाळगंगाधरनं 'या कोर्टानं मला दोषी ठरवलं तरी देवांच्या उच्चतम न्यायालयांत मी निर्दोषीच ठरेन' अशा आशयाचं निवेदन केलं आणि तें तिथल्या न्यायमूर्तीनीं आणि त्यांच्या मदतीस बसलेल्या सदस्यांनीं ऐकून घेतलं असं तुला दिसून येईल. म्हणजे या देवांच्या उच्चतम न्यायपीठाला मानवांची मान्यता असून मानवी न्यायाधीशांनींहि त्या निवेदनास विरोध केलेला नाहीं. मौन म्हणजे मान्यताच समजण्यांत येते. दुसरी गोष्ट प्राथमिक खटल्याची. तूं समजतोस तसा तुझा खटला प्राथमिक नाहीं. भूतलावरील कनिष्ठ न्यायालयांच्या कचाटींतून तूं निर्दोषी सुटला आहेस, पण एका न्यायालयांत अपराधी सुटला तरी त्यावर दाद मागण्याचा अधिकार सुव्यवस्था राखणाऱ्या कोतवालखात्याला असतो. चित्रगुप्त हा त्याच खात्याचा प्रतिनिधि म्हणून खालच्या न्यायालयांच्या निर्णयाविरुद्ध इथं दाद मागतो आहे. तुझ्या दोन्ही हरकती या धर्मपीठाला मान्य करतां येणार नाहींत."

"मला या कोर्टाचं लेखी रूलिंग पाहिजे. मी तुमच्या वरिष्ठ परमेश्वराकडे अपील करतों."

"देवाधिदेवा," चित्रगुप्त म्हणाला. "वाग्भट दुभाषी हा धंद्यानं वकील होता. सरळ गोष्टीबद्दलहि हुज्जत घालण्याची याला संवय जडली आहे युक्तिवादानं याची समजूत पटायची नाहीं आणि त्या उपायानं याला ताळ्यावर आणण्यांत धर्मपीठाचा पुष्कळसा वेळ वायां जाईल. त्यापेक्षां याच्यामधील वितंडवादाचा वकिली स्वभाव लुप्त होईल असा मंत्र-

प्रयोग देवगुरूंनीं करावा आणि सामान्य प्राणी म्हणून आपला निवाडा करून घेण्याचा समजूतदारपणा याला प्राप्त करून द्यावा अशी मी प्रार्थना करितों."

चित्रगुप्ताची ही मागणी देवगुरूंनीं मान्य केली आणि वाग्भट दुभाष्याच्या निवाड्याचें काम सुसूत्रपणें सुरू झालें:—

"देवाधिदेवा, चित्रगुप्तांनीं माझ्याविरुद्ध सादर केलेले दोन्ही दोषारोप मला अमान्य आहेत. माझ्यावरील पहिला आरोप अन्यायप्रसार आहे. हा आरोप माझ्यावर ठेवणं म्हणजे चंदनाला दुर्गंधी ठरवूं पहाण्यासारखं हास्यास्पद आहे. ज्या समाजाचा मी घटक झालों होतों, त्या समाजाच्या शासनसंस्थेनं समाज-स्वास्थ्यासाठीं करून ठेवलेले कायदे मी पूर्णत्वानं अभ्यासिले आणि 'निष्णात कायदेपण्डित' अशी मान्यता मिळविली. माझ्या या ज्ञानाचा लाभ माझ्या देशबांधवांना तर दिलाच पण न्यायाधीशांच्या न्यायदानाच्या कामींहि मी प्रशंसनीय सहाय्य केलेलं आहे. 'महिपति विरुद्ध भूपाल' या वरिष्ठ न्यायालयापुढं चाललेल्या अपिलांत मी वादीचं वकीलपत्र घेऊन तब्बल ६३ दिवस भाषण केलं आणि वस्तुस्थितीचा कायद्याशीं मेळ घालून वादीची मागणी कशी न्याय्य आहे हें न्यायाधीशांना पटवून दिलं. निकालपत्रकांत मीं न्यायदानाच्या कामीं केलेल्या बहुमोल सहाय्याबद्दल चीफजस्टिस कुक यांनीं गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. दुसऱ्या हायकोर्टमध्यें 'देशबंधु विरुद्ध बादशाह' या फौजदारी अपीलांत मीं आरोपीचा बचाव केला आणि खालच्या दोन्हीं कोर्टांत झालेली शिक्षा रद्द ठरवून त्याला दोषमुक्त म्हणून सोडवून आणलं. देशबंधूवर आलेल्या अपराधाच्या तोहमतीपासून मी त्याचा बचाव तर केलाच, पण निरपराधी नागरिकांवर खोटे आळ घालून त्याच्या त्रासाला कारणीभूत झाल्याबद्दल पोलिस अधिकाऱ्यांची कारवाईहि मीं उजेडांत आणली. जस्टिस सर शमदासानींनीं निकालपत्रकांत केलेल्या खरमरीत टीकेमुळं पोलीसखात्याला इन्स्पेक्टर जॉन्सन आणि सबइन्स्पेक्टर पोलादखान यांची चौकशी करावी लागली आणि जॉन्सनला सबइन्स्पेक्टर व पोलादखानाला जमादार करावं लागलं. हा खटला लोकांत अतिशय गाजला होता. आणि त्याच्या दैनंदिन कामाचे वृत्तांत वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होत होते.

" देवाधिदेवा, मी भूतलावर तीन तपं वकिलीचा व्यवसाय केला आणि देशबंधूंच्या न्याय्य अधिकारांचं रक्षण केलं. कित्येकांचीं कोसळूं पाहणारीं संकटं निवारलीं. श्रेष्ठ दर्जाचा कायदेपण्डित अशी कीर्ति संपादन केली. लोकांचीं कामं करून संपत्तीहि मिळविली. मिळविलेल्या संपत्तींतला थोडा-फार भाग सार्वजनिक हिताच्या कामीं खर्च केला. धनप्राप्ति हें एकच ध्येय मी डोळ्यापुढं ठेवलं नव्हतं. सामाजिक हिताच्या बहुविध चळवळींत मीं पुढाकार घेतला. प्रागतिक पुढारी असा माझा लौकिक झाला. लोकां-प्रमाणं राज्यकर्त्यांतहि मला मान्यता मिळाली. त्यांनीं सन्मानदर्शक पदव्या मला दिल्या. मी जर अन्यायी आणि जनतेचं स्वास्थ्य बिघडवणारा माणूस असतों, तर अशी मान्यता मी मिळवूं शकलों असतों काय ?

" लोकांना लुबाडण्याचा माझ्यावरील दुसरा आरोप खोडून काढण्यास मला मुळींच श्रम पडणार नाहींत. मी पक्षकारांकडून सक्तीनं पैसे वसूल केले असं एकतरी उदाहरण चित्रगुप्तांनीं दाखवावं. उलट, पैशाच्या थैल्या घेऊन पक्षकार माझींच आर्जवं करीत होते. लोकांनीं मला स्वेच्छेनं पैसे दिले आणि ते मी घेतले, याला लुबाडणूक म्हणतां येईल कां ? "

आपण बिनतोड युक्तिवाद केला अशा आविर्भावानं वाग्भट चित्रगुप्ताकडं पाहूं लागला पण आपण पेंचांत सांपडलों अशी चित्रगुप्ताची पराभूत चर्या दिसेना. तो स्मित करून म्हणाला:—

" वाग्भट, लोकांच्या न्याय्य हक्कांची तूं जपणूक केलीस असा तुझा दावा आहे. तूं आपल्या वकिली कारकीर्दींत जे दावे लढविलेस ते सगळे तूं जिंकलेस काय ? "

" कांहीं दावे बुडलेहि असतील. "

" म्हणजे, तूं केलेली लढत अन्याय्य ठरली असंच ना ? "

" असं कसं म्हणतां येईल ? न्यायदानाचा अधिकारी माणूसच असतो आणि माणसामाणसांचे मतभेद व्हायचेच. एकाद्या प्रश्नावर न्यायाधीशाचा माझ्याशीं मतभेद झाला म्हणून माझी मागणी अन्यायाची होती असं ठरत नाहीं. "

" माणसाचं मत नेहमींच बरोबर असत नाहीं, असाच तुझ्या म्हण-ण्याचा अर्थ ना ? हा अर्थ मीहि मान्य करितों. पण यावर अशी एक

शंका घेतां येईल कीं, तूं जिंकलेल्या खटल्यांतील निवाडेहि माणसानंच दिलेले असल्यानं ते बिनचूक आणि न्याय्य होते असं तरी कां म्हणायचं? अन्यायाची मागणी न्याय्य समजून तूं मागितलीस आणि न्यायाधीशानंहि तुझ्याशीं सहमत होऊन ती मान्य केली असं कां म्हणूं नये? आतां माझ्या दुसऱ्या एका प्रश्नाचं तूं उत्तर दे. अपराधी माणसांचा बचाव तूं कधींच केला नाहींस काय? माणसांच्या लबाड्यांवर न्यायीपणाचा छाप मारून घेण्यासाठीं तूं आपलं बुद्धिसामर्थ्य कधीं खर्ची घातलं नाहींस काय? ज्यांना तूं निर्दोषी ठरवून घेतलंस ते दंडगे फौजदार आणि काळूराम पाटील हे बलात्कारी आणि खुनी होते हे तुला ठाऊक होतं. अशा दुराचारी लोकांचा बचाव म्हणजे न्यायरक्षण होतं कीं अन्यायाचा प्रसार होतो?"

"पण फिर्यादीपक्षाला अपराधाचं माप पुरेपूर आणि निर्विवादपणें अपराध्याच्या पदरांत घालतां आलं पाहिजे. तसं घालतां येत नसेल तर त्याच्या कमकुवतपणाचा फायदा आरोपितानं घेणं साहजिकच आहे. आरोपांची पूर्णपणें सिद्धता होत नसेल आणि त्यांत संदिग्धता असेल तर न्यायाधीशांनीं आरोपीला अपराधी ठरवूं नये असा कायद्याचा दंडक आहे. अपुऱ्या आणि संदिग्ध पुराव्यावर न्यायाधीश आरोपिताला शासन करील तर तो अन्याय ठरेल. न्यायालयानंच असा अन्याय करूं नये म्हणून त्यांना मार्गदर्शन करणं हेंहि न्यायरक्षण आहे. आम्ही वकील ज्यावेळीं अपराधी माणसांची बाजू घेऊन मांडतों त्यावेळीं त्यांच्या कृत्यांचं समर्थन करणं असा आमचा उद्देश नसतो, तर निर्विवाद पुराव्याच्या अभावीं अपराध्याला शासन करून न्यायाधीशानं अन्याय करूं नये, याच बुद्धीनं आम्ही त्यांना मार्गदर्शन करीत असतों."

"वाग्भट, या तुझ्या समर्थनावरून कोणतंहि दुष्कर्म, सत्कर्म ठरवितां येईल. चोराच्या घरफोडीला हातभार लावणारा माणूसहि असं म्हणूं शकेल कीं 'प्रयत्नशील माणसाचे प्रयत्न निष्फल ठरूं नयेत' या सद्बुद्धीनं आपण त्याच्या प्रयत्नाला हातभार लावला.' पण हें समर्थन क्षम्य ठरणार नाहीं. आतां दुसऱ्या एका कसोटीवर तुझं जीवितकार्य पारखून पाहूं. 'ज्याचा परिणाम चांगला तें सर्वच चांगलं' असं मानण्यांत येतं. ज्यांना ज्यांना तूं सहाय्य केलंस, ते ते लोक शेवटीं सुखीच झाले असतील तरीहि

तुझं कार्य हितकारक ठरेल. पण तुझे पक्षकार न्यायमंदिरांत विजयी झाले किंवा निर्दोषी ठरले, तरी सुखी झाले काय? तपासणीसाठीं धरून आणलेल्या एका स्त्रीवर बलात्कार केल्याच्या अपराधाबद्दल दंडगे कोतवालाला तुझ्या वाक्चातुर्यामुळं न्यायदेवतेच्या चिमट्यांतून निसटतां आलं; पण त्याचा परिणाम काय झाला? तो अधिक बेदरकारपणें अत्याचार करायला तयार झाला आणि अखेर त्या अत्याचारांचा अतिरेक होऊन त्याचा खून होण्यापर्यंत मजल गेली! शासनसंस्थेनं निर्मिलेलीं न्यायालयं जेव्हां वाजवी न्यायदान करण्याला असमर्थ ठरतात, तेव्हां जनताजनार्दन शासनाधिकार आपल्या हातीं घेतो. त्याच जनताजनार्दनाच्या क्रोधाग्नींत दंडग्याची आहुति तूं घातलीस असं म्हटलं तर तें चुकीचं होईल काय? धरणीधर नांवाच्या एका इसमाचा जहागिरीचा दावा तूं जिंकलास पण टिकविलेल्या जहागिरीचं सौख्य त्याला किती उपभोगायला मिळालं? तुझी बिदागी भरतां भरतां तो मेटाकुटीला आला. त्यापायीं झालेल्या कर्जाची फेड जहागिरीच्या उत्पन्नांतून होणं जवळजवळ अशक्यच झालं आहे. त्याचे भाऊबंद मागत होते तो हिस्सा त्यांना देऊन टाकला असता तर अर्धी जहागीर तरी धरणीधरला उपभोगतां आली असती. पण त्याला सोळा आण्यांचा जहागिरदार म्हणवून घेण्याचं काल्पनिक समाधान देऊन तूं स्वतः मात्र त्याच्या संपत्तीचा धनी झालास. दावा जिंकून न्याय किती मिळविला असशील तो असो, पण ज्याच्यासाठीं तूं तो न्याय मिळविलास तो यत्किंचित्‌हि सुखी झालेला नाहीं. तुझी भर करण्यांत अन्नान्नदशेला पोंचलेले दुसरे अगणित हतभागी मानव मला माहीत आहेत. तुला पाहिजेच असतील तर मी त्यांचीं नांवं सांगेन."

"कोणतीहि गोष्ट विनामोबदला मिळूं शकत नाहीं. आपले हक्क मिळवण्यासाठीं आणि टिकवून ठेवण्यासाठीं माणसाला पैसा आणि परिश्रम खर्चावे लागणारच. माझ्या पक्षकारांचा पैसा अशाप्रकारें खर्च झाला तर त्याचा दोष माझ्याकडं कसा येईल? त्याच्यासाठीं मीं जे बौद्धिक आणि शारीरिक कष्ट केले त्याबद्दल मीं माझा मुशाहिरा घेतला तर मी दोषी कसा ठरेन? मी स्वतः एक संसारी मानव होतों. स्वतःचं आणि कुटुंबाचं पालनपोषण करणं मला आवश्यक होतं. द्रव्याभावीं ते मला करतां आलं नसतं. विनामोबदला लोकांना सहाय्य करून माझा निभाव लागला नसता. केलेल्या

कामाबद्दल दाम घेणं हा कोणाहि विचारवंताच्या दृष्टीनं अपराध ठरूं शकणार नाहीं."

"ही गोष्ट मलाहि मान्य आहे. पण तूं पक्षकाराकडून घेत होतास तो मोबदला योग्य होता कां हाच मुख्य प्रश्न आहे. तूं मोबदला घेतलास याबद्दल माझा मुळींच आक्षेप नाहीं. अन्यायपीडितांना न्याय मिळवून देणं हें तुझं ब्रीद होतं असा तूं दिमाख दाखवितोस. पण हें ब्रीद पाळतांना त्यांच्यावर झालेल्या अन्यायापेक्षां त्यांचा खिसा किती भरलेला आहे या-वरच तुझी नजर नव्हती काय? निर्धनावरील अन्यायाचा परिहार तूं करीत नव्हतास. उलट सधनांच्या अन्यायाचा पुरस्कार तूं करीत राहिला आहेस. आपल्या सावत्र मुलांकडून आपणांला निर्वाहापुरती पोटगी मिळवून देण्याबद्दल दयाबाई नांवाची एक निराधार विधवा तुझ्याकडं आली तर 'तुमच्यासाठीं दुसरे वकील आहेत' असा निष्ठुर जबाब देऊन तूं तिला वाटेला लावलंस. एवढंच करून तूं थांबला नाहींस तर भरपूर बिदागीची खात्री पटतांच तिच्या सावत्र चिरंजीवांचं वकीलपत्र घेऊन तूं दयाबाईला रडत बसवलंस. विधवेला पोटगी मिळणं हें न्यायाचं, कीं सावत्र कां असेना पण आईला उपाशी ठेवण्याचं अधिकारपत्र मुलाला मिळवून देणं न्यायाचं, याचा तूंच विचार कर. वाग्भट, तुला अधिक प्रश्न विचारून मी त्रास देत नाहीं. माझ्या म्हणण्यांतला आणि तुझ्या समर्थनांतला आशय धर्ममहाराजांच्या आणि अन्य सदस्यांच्या लक्षांत आला असेल असं मला वाटतं. धर्मपीठाला माझं सांगणं एवढंच आहे कीं, वाग्भट दुभाषी हा भूतलावर नामांकित कायदेपण्डित ठरला असला, त्यानं अगणित संपत्ति आणि विलोभनीय लौकिक मिळविला असला, तरी याचं चारित्र्य उदात्त हेतूवर आधारलेलं नव्हतं. अन्याय पीडितांना न्यायलाभ करून देणं या याच्या निव्वळ थापा आहेत. धनलालसा हें यांच्या जीवितनौकेचं सुकाणूं होतं आणि तें सुकाणूं फिरेल त्याप्रमाणं धडधडीत अन्यायाकडंहि ही नौका भरकटत गेली आहे. यानं लोकहित साधण्याऐवजीं आपल्या नादीं लागतील त्यांचं स्वास्थ्य कायमचं नष्ट करून टाकलेलं आहे. आणि या अपराधाबद्दल याला अवश्य तेवढं शासन धर्मपीठानं करावं अशी माझी प्रार्थना आहे."

चित्रगुप्तानं आपलं भाषण पुरं केल्यावर यमधर्म देवगुरूंना उद्देशून म्हणाले:—

"गुरुदेव, चित्रगुप्ताची मागणी सकृत्‌दर्शनीं रास्त वाटली तरी तिच्यामध्यें कांहींतरी सदोषता असावी असं मला वाटतं ! या वाग्भटाच्या जीवित कार्यांचे परिणाम चित्रगुप्त म्हणतो त्याप्रमाणं अनिष्ट असे झाले असले, तरी यानं आपला व्यवसाय विधिमान्य पद्धतीनं केला आहे. व्यावसायिक मर्यादांचं उल्लंघन यानं केलं असं चित्रगुप्तानं दाखवलेलं नाहीं. मानवी समाजांत मानवांनीं मान्य केलेल्या विधिनिषेधाच्या मर्यादेंत राहून वागणारा इसम दंडनीय कसा ? असा प्रश्न कोणीं विचारला तर त्याचं उत्तर काय द्यायचं ? या बाबतींत आपण मला मार्गदर्शन करावं अशी माझी विज्ञप्ति आहे."

"यमधर्मा, तुझी शंका वाजवी आहे. वाग्भटाचं अवतारकार्य लोकांच्या अधःपाताला कारणीभूत झालं असलं, तरी हा दोष त्याचा नव्हे असं मला वाटतं. ज्या समाजव्यवस्थेंत याला नांदायचं होतं, त्या समाजव्यवस्थेमुळंच या गोष्टी घडल्या असं म्हणावं लागेल. या समाजव्यवस्थेनं आचारधर्म सूत्रबद्ध केला आहे. यांच्या भाषेंत बोलायचं झालं तर कायदा कलमांनीं मर्यादित केला; समाजांतील प्रत्येक घटकाचा संपत्तींतला अधिकार किती, आचरणाचं स्वातंत्र्य किती, दुराचार कोणते आणि त्या दुराचाराबद्दल दण्ड कोणता, या गोष्टी कायद्याच्या कलमांनीं बांधून ठेवल्या. हीं कलमं शब्दांनीं घडवलीं. शब्द निश्चितार्थी नसतात. एकाच शब्दाचे विविध अर्थ माणसं काढूं शकतात. आचाराला मर्यादा पाहिजे, त्याशिवाय समाज-स्वास्थ्य टिकून राहणार नाहीं हें माणूस मान्य करतो; म्हणूनच आचार-धर्माला म्हणजे कायद्याला तो आवश्यक मानतो. परंतु मर्यादेंत न राहणं ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ति अद्यापि लुप्त झालेली नाही. या प्रवृत्ती-मुळं आचारधर्माच्या सूत्रांचा म्हणजे कायद्याच्या कलमांचा आपल्या सोयी-प्रमाणं तो अर्थ लावतो व कुठें ना कुठें पळवाट काढून तो कायद्यांची कोंडी फोडतो.

"यमधर्मा, सामान्य माणूस कायद्यांत अज्ञानी असतो. आपले हित-संबंध राखण्याइतक किंवा आपल्यावरील आरोपांचं निराकरण करण्याइतकं

कायद्याचं ज्ञान त्याला असत नाहीं. अशा सर्वसामान्य मानवांना योग्य न्याय मिळवून देण, हें न्यायदायकांचं कर्तव्य आहे. हे न्यायदाते आपल्या बुद्धीला ग्राह्य वाटेल असा कलमांच्या शब्दांचा अर्थ करतील आणि त्यामुळं संबंधी माणसांच्या हितसंबंधांची हानि होईल, म्हणून न्यायदानपद्धतींत वकील ही संस्था निर्माण झाली. न्यायाधीश निपःक्षपाती आणि निःस्पृह असावा ही जशी अपेक्षा, तशीच वकील हा निःस्वार्थी आणि निर्लोभी मनानं लोकहित साधून देणारा असावा अशी मूळ कल्पना. कायद्याचा अभ्यास करून जनतेच्या सेवेला वाहून घेणारे कायदेपण्डित न्यायाधीशाच्या सहाय्याला पुढं व्हावेत असा मुळांतला हेतु पण कालांतरानं हा उच्च हेतु विकृत झाला आणि निःस्वार्थी, निर्लोभी समाजसेवेऐवजीं द्रव्य आणि मान्यता मिळविण्याच्या धंद्याचं स्वरूप त्याला प्राप्त झालं.

" धंदा म्हटला, कीं तो यशस्वी करण्याचं तंत्र निर्माण व्हायचंच. ज्या कायद्याच्या ज्ञानावर हा धंदा चालवायचा त्याची नुसती माहिती अपुरी पडूं लागली आणि कलमांतील शब्दाचे विविध अर्थ करण्याची चतुराई ही अत्यावश्यक बाब झाली. शब्दांची कसरत करण्यांत जितकं जास्त प्राविण्य तितकं जास्त यश वकिलाच्या पदरांत पडूं लागलं. यमधर्मा, या शाब्दिक कसरतीमुळं न्यायाचा विचका किती होतो हें मानवी न्यायालयांत जाऊन पहाण्यासारखं आहे. कनिष्ठ, श्रेष्ठ. श्रेष्ठतर आणि श्रेष्ठतम अशी न्यायालयं मानवांनीं निर्माण केलीं आहेत. पण मौज अशी कीं, त्या न्यायालयांत न्यायाधीश म्हणून बसणाऱ्यांची पात्रता सामान्यतः सारखीच असते. कनिष्ठ न्यायालयांत न्यायाधीश कायद्याच्या ज्या परीक्षा देतो त्याच परीक्षा दिलेले लोक श्रेष्ठ, श्रेष्ठतर आणि श्रेष्ठतम न्यायाधिकारी म्हणून न्यायदान करतात. एकाच दाव्यांत, एकाच पुराव्यावर, एकाच कलमाच्या शब्दांचे वेगवेगळे अर्थ कल्पून वेगवेगळे निवाडे देतात आणि त्याकामीं पक्षकारांच्या हितसंबंधाला जपणारे वकील आपापल्या वाक्चातुर्यानं न्यायाधिकाऱ्यांचा गोंधळ उडवितात. वेगवेगळ्या प्रदेशांतले न्यायाधीश तर शब्दार्थाची ओढाताण कशी करतात हें पाहिलं म्हणजे आश्चर्य वाटतं ! एक न्यायाधीश ' विधवेला दत्तक घेण्याचा अधिकार आहे ' असं एका कलमाकडं बोट दाखवून म्हणतो, तर दुसरा न्यायाधीश त्याच शब्दांवर बोट

ठेवून ' तिला तसा अधिकार नाहीं ' असा निर्णय देतो ! ' शासनसंस्थेनं काढलेलं आज्ञापत्र कायदेशीर नाहीं ' अशी घोषणा एक न्यायाधीश करतो, तर तितकाच कायदेपंडित असलेला दुसरा न्यायाधीश तें आज्ञापत्र न्याय्य ठरवितो ! शब्दार्थांच्या आहारीं गेल्यामुळं परस्परांशीं विसंगत असे निवाडे न्यायालयांतून दिले जातात. मानवानं सुखशांतीचं दूध मिळावं म्हणून कायद्याची कामधेनू पैदा केली पण अनिर्बंध जीवनाच्या लालसेमुळं शब्दांच्या अर्थांचे अनर्थ करून त्यानं त्या कामधेनूचं ' गाढव ' बनवलं ! आजच्या मानव समाजाला आपल्या या आत्मघातकीपणाचं वैषम्यहि वाटत नाहीं. ' कायदा गाढव आहे ' असं कोडगेपणानं तो म्हणतो. कामधेनूचं गाढवांत रूपांतर केल्याबद्दल त्याला विषाद वाटत नाहीं. उलट आपल्या त्या करामतीची त्याला मौज वाटते ! यमधर्मा, कायद्याच्या या गाढवाचा गोंधळ घालणाऱ्या मानवाच्या वांट्याला लाथांचा सुकाळ आला तर त्यांत आश्चर्य कसलं ? '

" यमधर्मा, वाग्भटासारखे कायदेपंडित पक्षकाराचे हितसंबंध सांभाळतात आणि अपराध केले असूनहि शासनाची झळ त्यांना लागूं देत नाहींत याला त्यांचं वाक्चातुर्य तर उपयोगी पडतंच, पण न्यायदेवतेच्या भित्रेपणाचाहि ते भरपूर फायदा घेतात. मानवांची न्यायदेवता शंभर अपराधी विनाशासन सोडून द्यायला भीत नाहीं पण एका निरपराध्याला शासन होईल या भयानं तिची छाती धडधडते. या तिच्या भित्रेपणापायीं शंभर अपराधी सुटून जातात आणि पापभीरू निरपराध्याला शासन होत नाहीं असं मात्र नाहीं. वाग्भटासारखे कायदेपण्डित आपल्या पक्षकारांकडून अत्याचार घडला असला तरी तो अपराध या सदरांत पडूं शकत नाहीं अशी कलमांतील शब्दांची कसरत करितात, किंवा ' तो अत्याचार यानंच केला कशावरून ? ' असा संशय निर्माण करून त्याचा फायदा अपराध्याला देववितात. यामुळं अत्याचारी अधिकाधिक धुमाकूळ घालायला मोकळे सुटतात. ज्या प्रदेशांत वाग्भट वकीली करींत होता, त्या प्रदेशांत ' दिवसा खून करावा आणि वाग्भट वकील देऊन सुटून यावं ' असं लोक राजरोस म्हणत ही गोष्ट मला अंतर्ज्ञानानं कळली आहे. यमधर्मा, मानव खरोखर सत्प्रवृत्त व्हायला पाहिजे असेल तर त्याला न्यायाच्या दयाळूपणापेक्षां

न्यायाचा धाक वाटला पाहिजे. संशयित अपराध्यास शासन करावं लागलं तरी हरकत नाहीं, पण एकहि जातिवंत अत्याचारी अदंडित राहणार नाहीं असा कडकपणा न्यायदेवतेनं स्वीकारला पाहिजे असं मला वाटतं. अपराध करायची गोष्ट दूरच राहिली पण अपराधाचा आळहि न येऊं देण्याची दक्षता मानवाला घ्यावी लागली तर तो अधिक सुखी राहणार नाहीं काय ?

"यमधर्मा, वाग्भटाची जीवितयात्रा गाढव ठरलेल्या कायद्याच्या पाठीवरून झाली असल्यानं चित्रगुप्तानं सांगितलेल्या प्रकारचीं कर्मं त्याच्या हातून घडलीं. कलमबद्ध कायदा, आणि शब्दबद्ध कलमं आणि बव्हार्थी शब्द, या पापचक्रांचा खेळ दाखवून तो धनमानाचा अधिकारी झाला याबद्दल मी त्याला दोष देत नाहीं. पण मनुष्य या नात्यानं याचं जीवन निर्दोष होतं असं मात्र म्हणतां येणार नाहीं. प्रापंचिकाला द्रव्योपार्जन अवश्य असलं तरी सुखसमृद्धिपूर्ण प्रपंच झाल्यावरहि यानं पैशाच्या मागंच धांवत राहण्याची आवश्यकता नाहीं. संपन्नता प्राप्त झाल्यावर तरी दीनदुबळ्या अन्यायपीडितांना यानं सहाय्य करायला हरकत नव्हती. दयाबाईसारख्या निर्धन आणि निःसहाय हतभागिनीचे क्लेश याला खचित हलके करतां आले असते. एका महाराणीला पांच लक्षाऐवजीं दहा लक्ष पोटगी मिळवून देण्याऐवजीं दयाबाईला दहा रुपये तरी पोटगी मिळवून देण्यांत याची माणुसकी दिसली असती. पण द्रव्यलालसेच्या आहारीं गेल्यामुळं हा माणुसकीला पारखा झाला होता. देशभक्ति हा उच्च सद्‌गुण असला तरी वाग्भटाच्या देशांत तो दंड्य अपराध मानला जातो. अशा देशभक्तांना न्यायाच्या कचाट्यांतून सोडविणं याला शक्य होतं. त्याबद्दल याला पैसा फारसा मिळाला नसता. कदाचित् विनामूल्यहि काम करावं लागलं असतं. तें केल्यामुळं हा अपराधी ठरला असता असंहि नाहीं. तरी पण देशप्रेमी माणसाची वकिली केल्यास आपण शासनसंस्थेच्या अवकृपेला पात्र होऊं आणि शासनसंस्थेच्या कृपेनं मिळणाऱ्या पदव्या आणि मानमान्यता आपणांस मिळणार नाहींत, या भयानं हा त्या पुण्यकार्यापासून अलिप्त राहिला. आपल्या स्वदेशभक्त देशबांधवांशीं यानं ही प्रतारणा केली आहे. आणि ही अक्षम्य कर्तव्यच्युति आहे, असं माझं मत आहे.

" यमधर्मा, व्यावसायिक दृष्टया वाग्भट प्रवाहपतित होता आणि तो प्रवाहपतितासारखा वागला त्यांत याच्या हातून कांहीं सुष्ट कार्यं घडलीं असलीं तरी त्यांचं श्रेय जसं याला देतां येणार नाहीं, तसंच दुष्कर्मांचं पाप याच्याच गळयांत बांधणं उचित होणार नाहीं. पण मनुष्य या नात्यानं अवश्य अशीं सत्कृत्यं यानं केलीं नाहींत–शक्यता असूनहि केलीं नाहींत–हा याचा प्रमाद अक्षम्य आहे असं मला वाटतं. माझा हा अभिप्राय तुला मान्य होत असेल तर पहा आणि तुला योग्य वाटेल तो निर्णय तूं दे."

देवगुरूंनीं भाषण संपविल्यावर यमधर्मांनीं त्यांच्या उपदेशाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि नंतर आपला निर्णय सांगण्यास प्रारंभ केला:—

" वाग्भट, चित्रगुप्तानं तुझ्यावर ठेवलेले आरोप सिद्ध झालेले असले तरी त्यांचं कर्तृत्व सर्वस्वी तुझ्याकडं येत नाहीं. भूलोकींच्या न्याययंत्रांतील एक भाग तूं होतास पण त्या यंत्राची गति सर्वस्वी तुझ्या स्वाधीन नव्हती. म्हणून त्यांतील कर्माकर्माबद्दल मी तुला निरपराधी किंवा अपराधीहि ठरवीत नाहीं. तरी पण चित्रगुप्तानं आरोप न केलेले अपराध तूं केलेले आहेस. मनुष्य या नात्यानं तूं स्वदेशबंधूंना आणि असहाय दुःखग्रस्तांना जें सहाय्य करायला पाहिजे होतंस तें केलेलं नाहींस. हें कर्तव्य पाळण्याचं सामर्थ्य तुझ्या ठिकाणीं नव्हतं असंहि नाहीं. सामर्थ्य असून सत्कृत्य न करणं हें मानवाला न साजेसं दुष्कृत्य आहे आणि तें तुझ्याकडून घडलं. नरजन्मांत तुझ्या हातून घडलेलं एक पाप उल्लेखनीय आहे. तें म्हणजे बांधवांतला भांडखोरपणा तूं वाढीला लावलास. तुझ्या प्रोत्साहनामुळं ते एकमेकांचे अखंड दावेदार बनले. त्याबद्दल तुला शासन करणं धर्मपीठाचं कर्तव्य असल्यानं मी अशी आज्ञा करितों कीं:—

" वाग्भटाला शतसंवत्सरं श्वानयोनींत कंठावीं लागतील. भाकरीचा तुकडा टाकील त्याच्या दारांत भुंकत राहून हा इतरांना बुजवील. याला धन्यापुढं लांगूलचालन करावं लागेल. लाचारीचा सुंदर नमुना म्हणून लोक उपहासानं याच्याकडं बोट दाखवतील. श्वानजन्मांत हा स्वबांधवांचा दावेदार होईल. स्वजातीय दिसला कीं हा त्याच्यावर गुरगुरेल, तो आपल्याहून दुर्बल दिसला तर त्याच्यावर हल्लाहि चढवील. अशा झगड्यांत हा स्वबांधवांचे चावे घेईल, तेहि याचे चावे घेतील. याचा एकादा अन्न-

दाता ' हिऱ्या ' ' मोत्या ' सारखीं वैभवशाली नांवं देऊन याची नरजन्मांतील मानमरातबाची हाव पुरवील. पण त्याच्या मोबदल्यासाठीं याला शेंपटीला आणि कानाला मुकावं लागेल. धन्यानं याला कितीहि सात्विक अन्न खाऊं घातलं तरी पादत्राणाचं रुक्ष चामडं चावल्यावांचून आणि मृत पशूंचं शुष्क हाड चघळल्यावांचून याला राहवणार नाहीं. चित्रगुप्ता, वाग्भटाला योग्य जागीं पाठविण्याची व्यवस्था कर आणि दुसरा प्राणी निर्णयार्थ पीठापुढं येऊं दे. "

---

## चंद्रशेखर कुंडले

१०

" लोकांची दिशाभूल आणि आणि शक्तिक्षय असे आरोप असलेला हा शंद्रशेखर कुंडले मी धर्मपीठापुढं निर्णयार्थ सादर करितों. " एका गबाळ्या मध्यमवयी मानवाला पुढें सारीत चित्रगुप्त म्हणाला.

" चंद्रशेखर, तुझ्यावरील आरोप तूं ऐकलेस ना ? " यमधर्मांनीं विचारिलें. पण त्याचें तिकडे लक्ष नव्हतें. तो डोळे मिटून बोटें मोजण्यांतच गर्क होता. त्याचें लक्ष वेधण्यासाठीं चित्रगुप्तानें आवाज चढवून हांक मारली—

" चंद्रशेखर ! "

" काय ? " दचकून डोळे उघडून तो उद्गारला.

" धर्ममहाराजांच्या प्रश्नांचीं सावधपणें उत्तरं दे. "

" देतों. धर्ममहाराजांच्या चर्येवरून मी त्यांची कुंडली मांडली आहे. त्यांची सिंहराशि असून स्वगृहींचा रवि बलवान् आहे. पराक्रमस्थानीं मंगळ असून त्यावर शनीची दृष्टि आहे—"

" तुझी कुंडली तुझ्यापाशींच राहूं दे. धर्ममहाराजांना आणि धर्मपीठांतल्या सदस्यांना तुझ्या भविष्यकथनाची गरज नाहीं. तुझ्या भूतकालाची

माहिती त्यांना पाहिजे आहे. त्यासंबंधीं तुला विचारण्यांत येतील त्या प्रश्नांचीं उत्तरं तूं दे, आणि तींहि पाल्हाळ न करतां. विचारलेल्या किंवा न विचारिलेल्या प्रश्नांवरहि भारुड सांगत बसायची तुला खोड जडलेली आहे. एक दिवसाचं भविष्यकथन म्हणून एक दिवस पुरेल इतकं भरताड तूं सांगत आलास. तो गोष्टीवेल्हाळपणा इथं क्षम्य ठरणार नाहीं."

"पण असं मोजकं बोलण्याची सक्ती माझ्यावर कशासाठीं? कणाचा मण करून आणि त्याला तिखटमीठ लावून सांगितलेलं लोकांना रुचतं आणि पटतंहि; इथली तऱ्हा विचित्रच दिसते!"

"भूलोकाहून हा लोक वेगळा आहे आणि इथली पद्धतीहि वेगळी आहे. तुला ती विचित्र वाटली तर नवल नाहीं. पण आतां तुला इथल्या नियमांप्रमाणं चालल्यावांचून गत्यतर नाहीं. चंद्रशेखर, माझी सूचना स्मरणांत ठेवून धर्ममहाराजांच्या प्रश्नांचीं उत्तरं दे."

"चित्रगुप्तानं तुझ्यावर केलेले आरोप तुला मान्य आहेत काय?"

"कोणते आरोप केले आहेत चित्रगुप्तांनीं माझ्यावर! आणि केव्हां केले आहेत?"

"म्हणजे! तुला निर्णयार्थ सादर करतांना चित्रगुप्तानं केलेलं निवेदन ऐकलं नाहींस तूं?"

"देवाधिदेवा, हा त्यावेळीं शुद्धीवर नव्हता. देवाधिदेवांच्या ग्रहफलांचं गणित करण्यांत हा त्यावेळीं गुंग झाला होता असं वाटतं!"

"संभव आहे तसा. मग फिरून एकदां तुझे आरोप याला सांग."

"चंद्रशेखर, ज्या लोकसमुदायांत तूं आतापर्यंत होतास त्या लोकांची तूं दिशाभूल केलीस आणि त्यांच्या शक्तिक्षयाला तूं कारणीभूत झालास असा तुझ्याविरुद्ध माझा दावा आहे."

"असं होणं शक्य नाहीं. माझं आजचं ग्रहमान माझ्यावर खोटे आळ आणणारं नाहीं. उलट थोर पुरुषांकडून मला मानमान्यता मिळाली पाहिजे असं माझं गणित आहे. या महिन्यांत मला गुरुबळ भरपूर आहे आणि त्याचं फळ मला मिळालंच पाहिजे."

"देवगुरो, आपली सहानुभूति याला आहे हें याचं सांगणं खरं आहे काय?"

" यमधर्मा, बरं झालं तूं प्रारंभींच मला विचारलंस. याला माझ्या नांवावर लोकांना झुलविण्याची खोड जडली आहे. याच्यामाझ्यांत इतकं अमर्याद अंतर आहे कीं, माझी प्रसन्नता किंवा अप्रसन्नता याला समजणं अशक्य होतं. तरीसुद्धां जणूं काय मी याला रोज भेटून याच्याशीं हितगुज करितों, असं हा भासवीत होता. माझीच कांय, पण रविचंद्रादि ग्रहगणाची अनुकूल-प्रतिकूलता मनानं ठरवून आमची अपकीर्ति करीत होता. चित्रगुप्तानं ठेवलेल्या आरोपांचा निवाडा झाल्यावर ' आमचा बाजार मांडून यानं आमची बदनामी केली ' असा दावा मी याच्याविरुद्ध मांडणारच होतों. तो आतां मांडतों. यमधर्मा, पहिल्या दोन आरोपांबरोबर या आरोपाचाहि तूं निवाडा कर."

" चंद्रशेखर, तूं म्हणतोस तशी गुरुकृपा तुझ्यावर नाहीं. भलत्याच भ्रमांत राहूं नको आणि चित्रगुप्तानं तुझ्यावर आरोप ठेवले आहेत ही वस्तुस्थिति लक्षांत ठेवून तुला आत्मसमर्थन करितां येत असेल तर कर."

" देवाधिदेवा, माझी चूक आतां माझ्या लक्षांत आली. माझा मुलगा बुधमंगळ आहेना, त्याच्या पितृस्थानीं हल्लीं पापग्रह आले आहेत. त्याचं प्रायश्चित्त मला अशा तऱ्हेनं मिळत असलं पाहिजे."

" कोणत्या निमित्तानं तुझ्यावर आरोप आले तें आम्हांला पहायचं नाहीं. आलेले आरोप तूं मान्य करितोस कीं अमान्य करितोस हें आम्हांला समजून घ्यायचं आहे. सांग पाहूं तुझं त्याबद्दल काय म्हणणं आहे तें ? "

" देवाधिदेवा, माझ्यावरील आरोप मी फिरून विसरलों. वामनराव मास्तरला यावेळीं धनयोग असून मी त्याला सोडतीचं तिकीट घ्यायला सांगितलं होतं. तिचा आज निकाल जाहीर व्हायचा आहे. त्याला किती हजारांचं बक्षीस मिळालं असेल या विचारांत मी असल्यानं चित्रगुप्तांच्या बोलण्याकडं माझं नीटसं लक्ष नव्हतं."

" गुरुदेव ! " चित्रगुप्त हात जोडून म्हणाला. " प्राण्याचा जन्मस्वभाव जीवनसमाप्तीनंतरहि सुटत नाहीं हा आपला निरंतरचा अनुभव आहे. या चंद्रशेखर कुंडल्याच्या रोमारोमांत ' होरालंकार ' आणि ' मंत्रचूडामणि ' भिनून राहिला आहे. हे दोन्ही विकार झाडून काढल्यावांचून हा निर्णय

कार्य सुसूत्रपणें चालूं देणार नाहीं. आपण मंत्रबलानं याचं कुंडलीवेड आणि मंत्रश्रद्धा नष्ट करावी, अशी माझी प्रार्थना आहे."

" तथास्तु." म्हणून देवगुरूंनीं जलप्रोक्षण करितांच चंद्रशेखर सावध झाला आणि म्हणाला:—

" देवाधिदेवांची दासाला काय आज्ञा आहे ? "

" तूं लोकांची दिशाभूल आणि शक्तिक्षय केलास, असे आरोप चित्रगुप्तानं तुझ्यावर ठेवले आहेत. याशिवाय देवगुरूंसारख्या महात्म्यांचा बाजार मांडून तूं त्यांची विटंबना केलीस असाहि एक आरोप तुझ्यावर आलेला आहे. यासंबंधीं तुझं काय म्हणणं आहे तें धर्मपीठाला तूं निवेदन कर."

" देवाधिदेवा, हे आरोप चित्रगुप्तांनीं माझ्यावर कां ठेवले आहेत तें माझ्या लक्षांत येत नाहीं. चित्रगुप्तांनीं आपलं म्हणणं विशद करून सांगितलं तर मला माझ्यावरील आरोपांचा नीट बोध होईल आणि त्यानंतर मी माझं निवेदन धर्मपीठाला सादर करीन."

" चंद्रशेखर, ही तुझी मागणी मी मान्य करितों. चित्रगुप्ता, तुझ्या प्रतिवादीची तूं समजूत घाल."

ही धर्माज्ञा शिरसामान्य करून चित्रगुप्त म्हणाला:—

" धर्ममहाराज आणि सदस्य महाभाग, या मानवाची जीवनकथाच मी सांगतों म्हणजे माझे आरोप कोणते आणि ते कशावर आधारलेले आहेत हें आरोपितासह सर्वांच्याच ध्यानीं येईल. चंद्रशेखर हा एक गरीबाचा मुलगा. गरीबाचं तेज जगांत पडत नाहीं या अनुभवामुळं आपला मुलगा नांवापुरता तरी तेजस्वी असावा म्हणून याच्या पित्यानं याचं नांव चंद्रशेखर ठेवलं. पण नामदान करण्याचं सामर्थ्य त्याला असलं तरी तेजस्वी होण्याला लागणारे सद्गुण मुलाच्या अंगीं उतरविण्यांत तो असमर्थ ठरला. हा विद्यावान् आणि विक्रमी होऊं शकला नाहीं. उलट एक अजागळ पोर म्हणून लोकांत याची टर होऊं लागली. याचा परिणाम असा झाला कीं, बापाचं वात्सल्य नष्ट होऊन त्याची जागा तिरस्कारानं घेतली. आणि याची घरांतून हकालपट्टी झाली. पण उपटून टाकलेल्या एकाद्या रोपट्यालाहि मूळ धरण्याजोगी जागा मिळते तशी याची अवस्था झाली. कांहीं

काल भटकल्यावर याला एक गोसावी भेटला आणि हा त्याचा चेला होऊन कालक्रमणा करूं लागला. गोसावी गुरूंकडून हा कांहीं मंत्र शिकला. याला चरितार्थाचं एक साधन मिळालं. ”

“ पुढं गोसाव्याचं भिक्षेकरी जिणं याला कंटाळवाणं वाटलं आणि हा एका ज्योतिषीबुवांचा शिष्य झाला. यानं फलज्योतिषाची तोंडओळख करून घेतली. मंत्रविद्या आणि फलज्योतिष या जोडगोळीनं हा भावड्या लोकांचे बळी घेऊं लागला. आपल्या ग्राहकांचं क्षेत्र वाढवायला प्रसिध्दीकरणाची युक्ति याला सांपडली. हा एका वृत्तपत्रांतून सामुदायिक भविष्य वर्तवूं लागला. आपलं नांव गाजवायला वृत्तपत्र हें सुंदर साधन सांपडल्याच्या आनंदांत हा होता आणि वृत्तपत्राचा संपादक, आपला संपुष्टांत आलेला खप वाढविण्याची प्रभावी मात्रा मिळाली, म्हणून खुषींत होता. हा ‘ मंत्र-चूडामणि ’ आणि ‘ होरालंकार ’ संपादकाला चकविल्याचं समाधान मानीत होता आणि संपादक याच्याबरोबर ग्राहकांना बनविल्याच्या आनंदांत मग्न होता. संकट-भीति आणि सौख्यलालसा, या मानवाच्या सहजभावना आहेत. आणि त्या चिमट्यांत भावड्या मानवाला पकडून आपला स्वार्थ सुलभतेनं साधतां येईल ही याची आणि संपादकाची अंतर्यामींची इच्छा.”

“ हिमालयांतल्या तपस्वी महात्म्याच्या दिव्य मंत्रांनीं भरलेले आणि कसलीहि मनःकामना पूर्ण करणारे ताईत, दोरे, यंत्रं बनवून त्यांच्या जाहिराती हा वृत्तपत्रांत फडकावूं लागला. यानं वर्तविलेलीं भविष्यंहि वृत्तपत्रांचे रकाने अडवूं लागलीं. चंद्रशेखरनं मंत्राची आराधना किती केली असेल ती असो, आणि ज्योतिषशास्त्राचा याचा अभ्यास किती गाढ असेल तो असो, पण यानं चटकदार भाषाशैली कमावली हें मात्र खरं. आपलं भविष्यकथन हा अशा शब्दांनीं करी कीं, जिवाभावाचा एकादा मित्र आपल्याशीं सुखदुःखाच्या गोष्टी बोलतो आहे असा वाचकांस भास व्हावा. संकटांतून आपला बचाव करणारा हितचिंतक आणि सुखवृद्धीचा रामबाण उपाय सांगणारा उपकारकर्ता कोणी असेल तर हाच अशी सहानुभूतीची भाषा हा लिही.

“ निपुत्रिकांना पुत्रलाभ करून देणारा ताईत म्हणजे चांदीतांब्याचा पत्र्याचा तुकडा लोकांच्या गळ्यांत बांधून आणि गुप्तधन सांपडून देणारं

यंत्र म्हणजे एकादा कागदाचा कपटा दंडावर चिकटवून हा लोकांचं वित्त-शोषण करूं लागला. त्याबरोबरच कोणाला शनीचं तर कोणाला मंगळाचं भय दाखवून आणि कोणावर गुरूची तर कोणावर चंद्राची कृपा ओतून हा आपली तुंबडी भरूं लागला. 'नरानं करणी करून नारायण व्हावं' असा उत्कर्षप्रेरक सृष्टीचा संकेत असतांना तुम्ही मंत्रांच्या आणि ग्रहांच्या कुबड्या घेऊन चालणारे पांगळे आहां अशी मानवमनाची यानं दिशाभूल केली, मानवी विक्रमाचं सामर्थ्य नष्ट केलं. यानं आपली संपन्नता वाढविली, आपली टिमकीहि खूप वाजवून घेतली. पण यानं मानवांतला कर्तबगार माणूस ठार करून, त्याला दैवाच्या हातांतलं बाहुलं बनवलं. या चंद्रशेखर कुंडल्यावरील माझ्या आरोपांचं अधिक स्पष्टीकरण अवश्य नाहीं असं मला वाटतं."

चित्रगुप्तानं आपलं निवेदन पूर्ण केल्यावर यमधर्म म्हणाले:—
"चंद्रशेखर, चित्रगुप्तानं सांगितलेली तुझी जीवनकथा बरोबर आहे ना?"

"माझी जीवनकथा बरोबर आहे, पण देवाधिदेवा, त्या जीवनकथे-वरून चित्रगुप्तांनीं काढलेला निष्कर्ष मला मान्य नाहीं. मी गुरुमुखांतून जें मंत्रग्रहण केलं, त्याचं परिपालन गुरूनं सांगितलेल्या नियमानुसार कांटेकोर-पणें केलं आहे. आणि त्यांनीं जेवढी मंत्रसिद्धि सांगितली त्यांत मी अक्षरा-चीहि अतिशयोक्ति केलेली नाहीं. म्हणजे पदरच्या थापांनीं मी आर्त जनांची फसवणूक केली असा दोषारोप माझ्यावर कोणासहि करतां येणार नाहीं."

"दुसरी गोष्ट ज्योतिषाची. हें शास्त्रहि मी गुरूसन्निध राहून शिकलों. आणि मी स्वतंत्रपणें फलं वर्तवीत होतों तींहि शास्त्रवचनांच्या आधारानंच. मी संपादिलेल्या या ज्ञानसामर्थ्याचं प्रसिद्धीकरण मी आधुनिक पद्धतीनं केलं, याबद्दल चित्रगुप्तमहाशयांना विषाद वाटलेला दिसतो. पण यांत माझा निव्वळ स्वार्थच होता, असं त्यांना तरी कसं म्हणतां येईल? आपल्या ज्ञानाचा लाभ आपल्या जास्तींत जास्त बांधवांना मिळावा अशा सदिच्छेनं मी आत्मप्रसिद्धि केली असं त्यांनीं कां म्हणूं नये? मी संपन्न आणि सुप्रसिद्ध झालों याबद्दल माझं अभिनंदन करण्याऐवजीं चित्रगुप्त माझ्यावर दोषारोप लादीत आहेत हें पाहून मला खेद होतो आणि आश्चर्यहि वाटतं. स्व-

बांधवांची कामनापूर्ति, संकटनिवारण आणि सुखसाधन केल्याबद्दल त्यांनीं स्वखुषीनं दिलेली दक्षिणा मीं स्वीकारली तर मी गुन्हेगार कसा ठरतों ? ”

“ चंद्रशेखर, वृत्तपत्रांच्या साहचर्यामुळं हेतुविपर्यास आणि विसंगत वादंग करण्याची लकब, तुलाहि लागलेली दिसते. तूं धनवान् आणि लौकिकवान् झाल्याबद्दल मला विषाद वाटतो असं तूं ध्वनित केलंस. पण मला तुझ्या संपन्नतेचा विषाद कां वाटावा ? बाबा रे, वस्तुस्थिति याच्या अगदीं उलट आहे. आम्ही प्राण्याला मानवजन्म देतों, त्या जन्मांत त्यानं दैन्यांत आणि क्लेशांत खिचपत पडून कण्हत कुंथत आणि उसासे टाकीत जगावं म्हणून नव्हे, तर शक्तिबुद्धीनं सुखसंपादन करून हंसतखेळत जीवनांतला आनंद उपभोगावा म्हणून. तसा एकादा मानवप्राणी भेटला तर आम्हां देवलोकीयांना अत्यानंद होतो. तूं आपलं जीवन आनंदमय केलंस एवढ्यापुरतं मलाहि तुझं कौतुक वाटतं. आणि तुझा हा आनंद तूं आपल्या बांधवांचं जीवन आनंदमय करून संपादन केला असतास तर मीं तुझं अभिनंदनच केलं असतं. पण तुझ्या जीवनानंदाची प्राप्ति तूं दुसऱ्यांच्या दुःखांतून करून घेतली आहेस. दुसऱ्यांना दुर्बल करून आणि दुसऱ्यांच्या चिंता वाढवून तूं स्वतःचं वैभव साध्य करून घेतलंस, ही गोष्ट अभिनंदनीय नसून दोषास्पद नव्हे काय ? ”

“ पण स्वबांधवांचं दैन्य, त्यांच्या चिंता आणि त्यांचे क्लेश मीं वाढविले असा आरोप आपण माझ्यावर कसा करतां ? या गोष्टी मानव, दैवगतीमुळं ज्या ग्रहचक्रांत सांपडतो त्या ग्रहांच्या रागलोभानुसार, त्याला प्राप्त होतात असं ज्योतिषशास्त्रानं सांगितलं आहे. आणि या आपत्ति निवारण्याचे आणि कमी त्रासदायक करण्याचे उपाय त्याच ज्योतिष आणि मंत्रशास्त्रांच्या आधारानं मीं लोकांना सांगितले हे मी त्यांच्यावर उपकारच केले नाहींत काय ? ज्या बांधवांची मीं सेवा केली, त्यांच्या कष्टांची जबाबदारी माझ्याकडं नसून त्यांच्या दैवगतीकडं होती आणि त्या कष्टांच्या निवारणाचे मार्ग अनिष्ट ठरले तर तो माझा प्रमाद नसून शास्त्रांचा प्रमाद होता असं म्हणावं लागेल. चित्रगुप्तमहाशय, ज्योतिष आणि मंत्रशास्त्र, दोषपूर्ण आणि लोकपीडक आहे असं आपण म्हणूं शकाल काय ? ”

“ त्या शास्त्रांची निंदा मला करायची नाहीं. उलट ज्या कालीं, ज्या

महाभागांनीं, हीं शास्त्रं निर्माण केलीं त्यांची योग्यता मोठी होती आणि त्यांनीं मानवी बुद्धिसामर्थ्याची उत्कृष्ट प्रचीति आणून दिली याबद्दल त्यांना धन्यवादच दिले पाहिजेत. कोणत्याहि उपकरणांचं सहाय्य न घेतां केवळ निरीक्षण–शक्तीनं ज्यांनीं खगोलांच्या गति अचूक ओळखल्या आणि त्यांना गणिताच्या चौकटींत बसवलं, त्यांच्या बुद्धिमत्तेला कमी लेखणं हें पाप ठरेल. तरी पण प्राचीन पंडितांनीं निर्मिलेलीं हीं शास्त्रं आजच्या मानवांनीं किती विश्वसनीय मानायचीं हा विचार करायला नको काय? बुद्धिवान् मानव प्रत्यहीं नवेनवे शोध लावून ज्ञानवृद्धि करीत आहे. अनुमानाधिष्ठित प्राचीन शास्त्रं आतां चुकीचीं ठरत आहेत. पृथ्वी स्थिर असून सपाट आहे आणि ग्रहगण वाहनांत बसून मार्गक्रमण करतात हें प्राचीन पंडितांचं अनुमान आतां निखालस खोटं ठरलेलं आहे. प्राचीन पण्डितांना दिसूं शकले नाहींत आणि त्यांनीं निर्मिलेल्या शास्त्रांत ज्यांचा नामनिर्देशहि नाहीं असे नवनवे ग्रह आणि नक्षत्रं, आतां उपलब्ध होत आहेत. डोळ्यांना दिसणाऱ्या ग्रहांच्या सौम्य वा उग्र तेजावरून ते पुण्य-ग्रह किंवा पापग्रह आहेत याबद्दल त्यांनीं बांधलेलं अनुमानहि अनुमानच आहे. शनि, मंगळ पीडादायक कां आणि गुरु लाभकारक कां याला प्राचीन पण्डितांच्या अनुमानावांचून दुसरा आधार नाहीं. चंद्रशेखर, अनुमान हें शास्त्र होऊं शकत नाहीं. आणि जें शास्त्रांच्या कसोटीला उतरूं शकत नाहीं तें प्राचीन आहे म्हणूनच शास्त्र मानायचं, हें शहाण-पणाचं ठरणार नाहीं. अशा अविश्वसनीय शास्त्रांवर भिस्त ठेवून चालणं आणि दुसऱ्यांनाहि चालायला लावणं याला विचारवंत बुद्धिहत्या म्हणतील. मी तुझ्यावर आरोप ठेवतों तो याचसाठीं. अनुमानाधिष्ठित आणि अपुऱ्या ज्ञानाच्या फलज्योतिषाच्या नादीं तूं लागलास, आपल्या बांधवांनाहि लाव-लंस, ही त्यांची दिशाभूल नव्हे काय? आणि यांत त्यांची बुद्धिहत्या म्हणजेच ब्रह्महत्या तूं केली नाहींस काय?"

"पण मी ज्याची उपासना केली तें फलज्योतिषशास्त्र अपूर्ण ज्ञानावर आणि अनुमानावर अधिष्ठित असलं तरी प्रत्यंतरांच्या आधारावर त्याला विश्वसनीय शास्त्रांचा मान देणं उचित होणार नाहीं काय? कित्येक निष्णात ज्योतिषांनीं वर्तविलेलीं भविष्यं तंतोतंत बरोबर ठरतात. आत्म-

प्रौढीचा दोष पतकरूनहि मी असं सांगतों कीं माझींहि शेंकडों भविष्यं बरोबर ठरलेलीं आहेत. उदाहरणंच सांगायचीं झाली तर युवराज विक्रमरावांचं देतां येईल. त्यांच्या घोड्याला शर्यतींत बक्षीस मिळेल असं मी सांगितलं आणि तें मिळालं. रावबहादूर धनंजयांच्या चिरंजीवाला परदेशगमनाचा योग आहे हें माझं भविष्य बरोबर ठरलं आणि तो विलायतेस जाऊन बॅरिस्टर होऊन आला. भिकशेटच्या सुनेला कितीतरी वर्षं मूल होत नव्हतं पण मी तिची कुंडली परीक्षून सुमुहूर्तावर तिच्या गळ्यांत कामनापूर्ति ताईत नं. १ बांधला आणि एक वर्षाच्या आंत ती पुत्रवती झाली. शनिमंगळ अनिष्ट असल्यानं विद्याधराला परीक्षेस बसूं नको असं मी सांगितलं होतं, तरी वर्ष वांचविण्यासाठीं तो परीक्षेला बसला आणि अयशस्वी झाला. शांतारामाला बत्तीसाव्या वर्षीं द्विभार्यायोग आहे हें माझं भविष्यहि खरं ठरलं आहे. चांगली धट्टीकट्टी असतांना त्याची पहिली बायको विहीरींत पडून मेली. अशीं प्रत्यंतरं शास्त्र खोटं असतं तर आलीं असतीं काय ?"

"चंद्रशेखर, तात्त्विक विवेचनावरून तूं उदाहरणांवर आलास हें तुझ्या-पेक्षां माझ्याच सोयीचं झालं. तूं खरीं ठरलेलीं भविष्यं तेवढीं सांगितलींस, पण जर तुझं शास्त्र खरं असतं तर तुझीं सर्वच भविष्यं खरीं व्हायला पाहिजे होतीं. पण तशीं तीं ठरलेलीं नाहींत. खऱ्या ठरलेल्या भविष्यां-प्रमाणं तुझ्या खोट्या ठरलेल्या भविष्यांचीं आणि विफल झालेल्या मंत्र-प्रयोगांचीं उदाहरणं तूं विसरला असलास तरी मला अवगत आहेत. भोळाराम नांवाच्या तरुणाला सहा महिन्याच्या आंत आकस्मिक धनलाभ होण्याचा योग आहे असं तूं सांगितलं होतंस आणि या सुयोगाचं जास्तींत जास्त फळ प्राप्त व्हावं म्हणून तुझं नं. १ चं इच्छापूर्ती यंत्रहि त्याच्या दंडावर बांधलं होतंस परंतु भोळारामाला अचानक धनलाभ तर झाला नाहींच, उलट त्या नादाला लागल्यामुळं त्याची पोटापुरतं देणारी नोकरीहि गेली. कामण्णा नांवाच्या तरुणाला तूं ज्यावेळीं विवाहयोग असल्याचं सांगितलंस त्यावेळीं तर त्याचा विवाह झाला नाहींच, पण पुढं दोन वर्षां-तहि त्याची विवाहेच्छा पूर्ण होऊं शकली नाहीं. आणि त्या सक्तीच्या ब्रह्मचर्यामुळं त्याला फेंफऱ्याचा विकार जडून तो शेगडीवर पडला व भाजून

मेला. सट्टालॉटरींत फायदा होईल या तुझ्या भविष्यावर विसंबून हातचे पैसे गमावून बसणारे किती भोळे लोक तुला सांगूं? लाभदायक सट्ट्याच्या तुझ्या भविष्यवाणीनं लक्षाधीशाचा भिक्षाधीश झालेला श्रीधर सावकार तुला आठवतो का? वसंत–वासंती विवाह दुःखदायक ठरेल हें तुझं भविष्य-कथन त्यांनीं आपल्या सुखमय संसारानं खोटं ठरल्याचं सिद्ध केलं नाहीं काय? कोर्ट दरबारीं अपयश देणाऱ्या कुयोगांतच तुझा ग्राहक जयदेव आपला दावा जिंकून आला ही गोष्ट तुला अमान्य करितां येणार नाहीं. चंद्रशेखर, तुझं हें भविष्यकथन आणि मंत्रप्रयोग जितके खरे ठरले त्याहून अनंतपटीनें खोटे ठरलेले आहेत. खरीं ठरलेलीं भाकितं सांगायला लोक येतात, पण फसलेलीं झांकून ठेवतात. कारण त्यांचा बभ्रा करावा तर त्यांचीच फजीती होण्याची धास्ती असते. वस्तुस्थिति अशी आहे कीं, फलज्योतिष हें हुकुमी शास्त्र आहे अशी तुझीहि श्रद्धा नाहीं. तुझ्या मंत्रांच्या प्रभावाबद्दल तुझीहि खात्री नाहीं. पण त्यांच्या नांवावर आणि आपल्या अनुमानधपक्यावर तूं लोकांना चाळवीत राहिलास. चंद्रशेखर, तुझ्या चुकलेल्या भविष्यांचा हिशेब न करितां तूं जीं बरोबर आलीं म्हणतोस तींसुद्धां तुझी बाजू सांवरून धरणार नाहींत. ज्या युवराजांचा घोडा शर्यतींत विजयी झाला त्याच्या खेरीज दुसरे दोन घोडेहि विजयी झाले. त्यांचे ग्रहयोग आणि तुझ्या कच्छपीं लागलेल्या युवराजांचे ग्रहयोग एकच होते काय? खास नव्हते. यावरून एका फलप्राप्तीला एकच ग्रहयोग लागतो असं नसून भिन्न ग्रहयोगांतहि एकच प्रकारची फलप्राप्ति होते असं ठरत नाहीं काय? शेटजीच्या सुनेला पुत्रप्राप्ती झाली, त्यासाठीं तूं तिला मंतर-लेला ताईत दिलास हेंहि खरं. पण शस्त्रवैद्यांनीं तिच्या शारीरिक विकृती-वर त्याचवेळीं प्रयोग केले होते ही गोष्ट तूं कां जमेस धरीत नाहींस? तुझ्या ताईतांपेक्षां ती शस्त्रक्रियाच तिला उपकारक ठरली असं मी म्हटलं तर तें तुला नाकारतां येईल काय?"

"चंद्रशेखर, कोणत्याहि बाजूनं पाहिलं तरी तुझं भविष्यकथन आणि मंत्रप्रयोग तर्कशुद्ध ठरत नाहींत. अंदाजानं कांहींतरी सांगायचं, कांहीं अंदाज बरोबर येतात, कांहीं चुकतात. चुकलेले विसरायचे, जमलेले जतन करून ठेवायचे, असा तुमचा खाक्या आहे. गोष्टी घडतात त्या ग्रहयोगा-

मुळंच घडतात असं तुम्हांला छातीठोकपणानं सांगतां येत नाहीं. त्या तशा घडायला अन्य कारणंहि असूं शकतात, हें तुम्हांला दिसलं तरी तें तुम्हीं मान्य करीत नाहीं किंवा सोयीसाठीं विसरून जातां. "

" चित्रगुप्त महाशय, आपण म्हणतां त्यांतल्या कांहीं गोष्टी खऱ्या असल्या तरी आमच्या शास्त्रांवर आमचाहि विश्वास नाहीं हा आपला आक्षेप आम्ही मान्य करणार नाहीं. आमचीं भविष्यं चुकलीं तरी तो शास्त्रदोष नव्हे असा आमचा विश्वास असतो. एकतर आम्हीं वर्तविलेलीं भविष्यं चुकलेलीं दिसलीं तरी तीं खरोखर चुकलेलीं नसतात किंवा चुकलींच असलीं तरी त्याचा दोष आमच्या शास्त्राकडं किंवा आमच्या-कडं नसून अन्य कारणांकडं असतो. इष्ट काल बरोबर असेल तर भविष्य चुकण्याचा संभव नसतो. इष्ट कालांत पळाविपळांचा फरकहि शास्त्रांत क्षम्य नसतो. पण पृच्छकांची कुंडली अंदाजी कालावर रचलेली असते. आणि त्यामुळं फळं अचूक येत नाहींत. शिवाय आलेलीं फळं मानवाच्या स्थूल दृष्टीला दिसतीलच असं नाहीं. आम्हीं एकाद्याचा भाग्योदय होईल असं भविष्य वर्तविलं आणि त्यानंतर त्याची हानि झालेली दिसली तरी ती हानीच असेल असं निश्चित म्हणतां येणार नाहीं. विद्यार्जनांत यश मिळेल असं सांगितलेला विद्यार्थी सकृत्दर्शनीं परीक्षेत अयशस्वी झालेला दिसला तरी पुढं तो अधिक श्रेष्ठ प्रकारचं यश मिळविणार असतो. आम्ही अमुक वेळीं गंडांतर येईल म्हणून सांगितलं असून तें आलेलं दिसलं नाहीं, तरी तें आलंच नसेल असं म्हणतां येणार नाहीं. त्याच्या पायांतून अंधारांत साप गेला असेल तर तो त्याला दिसणार कसा ? चित्रगुप्त महाशय, आमचं भविष्य-कथन किंवा मंत्रप्रयोग मानवी स्थूल दृष्टीला चुकल्यासारखे वाटले तरी ते वस्तुतः चुकलेले नसतात म्हणून त्यांवर आमचा विश्वास दृढ असतो."

" चंद्रशेखर, हें तुझं समर्थनहि तुझ्या आंगलट येणार आहे. निःसंदिग्ध इष्टकालावांचून जर ग्रहगणित अचूक होऊं शकत नाहीं, तर तें तुम्हीं कर-तांच कां ? ज्यावरून कालमापन करायचं तीं यंत्रं म्हणजे घड्याळं एकाच गतीनं चालणारीं नसतात. तुम्हां ज्योतिषांचीं भविष्यं जशीं एका वेळचं एकच फल सांगत नाहींत, तशीं दोन घड्याळं एकच वेळ दाखवीत नाहींत ही गोष्ट तुम्ही मान्य करितां, म्हणजे तीं चुकीची वेळ दाखवितात असं

तुम्हांलाहि पटलेलं आहे. चुकीच्या साधनांवरून अचूक इष्टकाल मिळणं अशक्य आहे आणि अचूक इष्टकालावांचून फल वर्तविणं हें शास्त्रविरोधी आहे असा सरळ हिशेब तुम्ही कां करीत नाहीं? चुकीच्या आधारावर चुकीचं गणित तुम्ही बुद्धिपुरस्सर करतां हा शास्त्राचा अवमान आणि लोकांची फसगत नव्हे काय?"

"चंद्रशेखर, तुझं भविष्य प्रत्यक्षांत फसलं तरी अप्रत्यक्षत: साधलंच हा तुझा युक्तिवाद ऐकून हंसावं कीं रडावं हेंच समजत नाहीं! मुलाचा जन्म म्हणजे आगामी मृत्यूच आणि माणसाचा मृत्यु म्हणजे पुनर्जन्म म्हणून समाधान मानून घेण्यांतलाच हा प्रकार नाहीं काय?"

चित्रगुप्ताच्या या प्रश्नानं चंद्रशेखरचा गोंधळ माजलेला दिसला. तेव्हां त्याला प्रश्नोपप्रश्नांचा अधिक त्रास न देतां चित्रगुप्त धर्मपीठाला उद्देशून म्हणाला:—

"देवाधिदेवा, या होरालंकार मंत्रचूडामणि चंद्रशेखर कुंडल्यानं माझ्या प्रश्नांना दिलेलीं उत्तरं सर्वांनीं ऐकलीं. त्या उत्तरांवरून त्यानं उपासना केलेलीं शास्त्रं हीं अनुमानं आहेत असं सिद्ध होतं असं मला वाटतं. शास्त्र म्हणजे तर्कशुध्द आणि निर्विवाद असायला पाहिजे. या कसोट्यांना न उतरणारीं शास्त्रं जिज्ञासूंच्या अभ्यासाला विषय होऊं शकलीं, तरी मानवी जीवनाचं सुकाणू म्हणून त्यांचा उपयोग करतां येणार नाहीं. अंदाज म्हणजे खात्री नव्हे. आणि ज्यांत खात्री नाहीं त्याचा आधार घेतल्यास सुखप्राप्ती-पेक्षां तोंडफोड होईल हें समजूतदार माणसानं ओळखायला हवं. पण या डळमळीत आधारावर मानवांचीं जीवनमंदिरं उभारण्याचा अव्यापारेषु व्यापार या चंद्रशेखर कुंडल्यानं केलेला आहे. मानवी जीवनांत ढवळा-ढवळ करूं शकतील असं वादापुरतं मानलं तरी आपल्या जीवनाचीं सूत्रं ग्रहांच्या हातून हिसकावून घेण्याची हिंमत माणसानं बाळगली पाहिजे. ग्रह म्हणून कांहीं खटलं आहे याची दादहि न घेतां कित्येक नरवीर आपला अभ्युदय करून घेतात हें पाहूनसुध्दां कांहीं अजागळांनीं ग्रहदास्य पत्करावं हा शुध्द आत्मघात आहे. त्यांची दिशाभूल करून आणि आत्मविश्वासाचं त्यांचं बल नष्ट करून त्यांना आत्मघाताला प्रवृत्त करण्याचं अघोर पातक हे गणक करीत असतात. हा होराभूषण मंत्रचूडामणि चंद्रशेखर कुंडले या

बंधुघातकी पातक्यांपैकीं एक असल्यानं त्याला योग्य असं शासन धर्मपीठानं करावं अशी माझी प्रार्थना आहे."

चित्रगुप्त निवेदन पूर्ण करून आसनस्थ झाल्यावर यमधर्मांनीं देवगुरूंचें मत विचारलें तेव्हां ते म्हणाले:—

"चित्रगुप्ताची मागणी मला न्याय्य वाटते. या मागणींत मी केलेल्या आरोपाचाहि अंतर्भाव सहजच झालेला आहे. माझ्या आरोपाच्या समर्थनार्थ वेगळ्या खुलाशाची फारशी आवश्यकता उरलेली नाहीं. मी आणि रविचंद्रादि देवलोकीय जेव्हां ग्रहरूपानं खगोलांत भ्रमण करतों तेव्हां आमचा एकमेकाला संपर्क पोंचतो असं हे कोणत्या आधारावर मानतात तें आम्हांला ठाऊक नाहीं. भगवान् सूर्यनारायण आपल्या परिवारांतल्या भूगोलाला आपल्या प्रकाश—करानं स्पर्श करूं तरी शकतात. आमचे कर त्या भूगोलापर्यंत पोंचतात कीं नाहीं याचीच वानवा. आणि रविकराच्या स्पर्शामुळं भूगोलावरील सृष्टीवर होणारा परिणाम अनुभवसिद्ध असला तरी आमच्या भासमान् तेजःस्पर्शाचा कांहीं परिणाम होत असेल ही गोष्ट शास्त्रसंशोधकांनाहि अद्यापि तरी असिद्ध अशीच आहे. म्हणून मला आणि माझ्या खगोल—बंधूंना केवळ कल्पनेच्या बळावर सुष्ट अगर दुष्ट ठरविणं हा आमचा अवमान आहे. चंद्रशेखरानं जाणून किंवा अजाणतां तरी आमचा असा अवमान केलेला आहे. आणि आपल्या स्वार्थाबरोबर परार्थहानि केलेली आहे. यमधर्मा, ही गोष्ट देखील निर्णय देतांना तूं विचारांत घ्यावीस अशी माझी सूचना आहे."

"गुरुदेव, आपल्या आशीर्वादानं योग्य तो निर्णय देण्याचं सामर्थ्य मला प्राप्त होईल. भ्रामक कल्पनांच्या आहारीं जाऊन हा असत्योपासक बनला. आपली फसगत आपल्यापुरतीच ठेवून हा राहिला नाहीं, तर आपल्या वेडाच्या पकडींत आपल्या बांधवांना पकडून यानं त्यांचा बुद्धिनाश आणि कर्तृत्वहानि केली. शिरच्छेदानं एकदम जीव घेण्यापेक्षां दुसऱ्याला प्रज्ञाहत करून जिवंतपणीं मृतावस्थेला नेणं हा माझ्या मतें घोरतर अपराध आहे. असे घातकी प्राणी मानवसमूहांत राहूं देणं हितपरिणामी नाहीं. म्हणून या चंद्रशेखर होरालंकाराला प्रारंभीं मी सर्पजन्मांत पाठवितों. सर्व प्राणी याला आपला वैरी मानतील. या जन्मांत याला सामर्थ्य असून

प्राणिहत्या करतां येणार नाहीं. बाल्यावस्थेंतच हा गारुड्याच्या तावडींत सांपडेल आणि त्याच्याकडून आपले दांत पाडून घेईल. ज्या मानव-प्राण्याला यानं आपल्या बुद्धिचातुर्यानं खेळवलं, त्याच, मानवप्राण्याला हातचं खेळणं होऊन, तो घालील त्या अन्नावर आणि दाबून ठेवील त्या टोपलींत याला जीवन कंठावं लागेल. आपल्या अन्नदात्याला पैपैसा मिळवून देण्यासाठीं याला वळवळावं लागेल, फणा काढावी लागेल, फूत्कार करावे लागतील. पण याचं हें नागसामर्थ्याचं नाटक षंढाच्या वीरत्व-प्रदर्शनासारखं उपहासास्पद ठरेल. कालांतरानं या हतभागी जीवनाला हा वैतागेल आणि संधि साधून गारुड्याच्या टोपलींतून हा निसटेल. पण दीर्घ-कालीन बंदिवासानं याचं चापल्य क्षीण झाल्यामुळं हा दुसऱ्या मानवांच्या तावडींत सांपडून त्यांच्या सोट्याखालीं प्राणविसर्जन करील. अज्ञानविषानं स्वबांधवांची बुद्धिहत्या केल्याचं असं प्रायश्चित्त भोगून इथं पुनरपि आल्यावर याला अधिक शासनाची आवश्यकता आहे, कीं हा सद्गतीला पात्र झाला आहे, याचा धर्मपीठ विचार करील. चित्रगुप्ता, [illegible] खटला ज्या प्राण्याचा आहे त्याला पीठापुढं आण.

---

अनुक्रम ३०६९१ विभाग ... क्रमांक २५८९ नों. दि. ५/४/६१

## अशोक हर्षे

“ धर्ममहाराज, या मानवाचं नांव अशोक हर्षे. नो[illegible] विसंगीत-चारित्र्याचा उत्कृष्ट नमुना म्हणून याच्याकडं बोट दाखवितां येईल. प्रति-ष्ठित कुलांत संपन्न पित्यानं याला जन्म दिला. बऱ्यापैकीं बुद्धि आणि प्रयत्न-शीलता या सहजप्राप्त देणग्यांमुळं हा पदवीधर झाला. चांगल्या पगाराची आणि मोठ्या अधिकाराची नोकरी याला मिळाली. सुंदर आणि सेवातत्पर पत्नी, प्रेमळ आणि कौतुक करणाऱ्या माताभगिनी याला लाभल्या. मोजक्या मुलांनीं याचं घर सजलं. इतरांनीं हेवा करावा अशीं सुखं याच्या

अंवतीभंवतीं पसरलीं. पण याला कधीं हर्ष झाला नाहीं. हा कधीं तोंडभर हंसला नाहीं. नांवाचा अशोक पण सदैव शोकग्रस्तासारखा, आणि आड-नांवाचा हर्षे असून नेहमीं दुमुखलेला असा हा जगला. दुःखोत्पादन आणि दुःखसेवन हे दोन आरोप मी याच्यावर ठेवतों."

"अशोक, हा चित्रगुप्ताचा दावा तुला मान्य आहे काय?"

चित्रगुप्ताकडे क्रोधाचा आणि यमधर्माकडे विनवणीचा दृष्टिक्षेप करून अशोक हर्षे म्हणाला:—

"असे आरोप माझ्यावर करणारा शुद्ध गधडा असला पाहिजे. मी फिदीफिदी हंसलों नाहीं या माझ्या सभ्यपणाचं कौतुक करण्याऐवजीं तो दोष ठरवणं म्हणजे मूर्खपणाची कमाल नव्हे तर काय? आणि म्हणे, मी दुःखोत्पादन करून दुःखसेवन केलं! चित्रगुप्ताच्या वहींत प्राणिमात्राच्या यच्चयावत् कर्मांची नोंद असते ना? मग आपल्या वह्या चाळून त्यांनीं सांगावं कीं मी कोणापाशीं गेलों आणि कोणाच्या दुःखाला कारणीभूत झालों? धर्ममहाराज, मी घर आणि कचेरीबाहेर कधीं गेलों नाहीं. कचेरींत नियमाला धरून मी काम केलं. कुणाचा पक्षपात केला नाहीं. वशिल्याला थारा दिला नाहीं. लांचेचा अभिलाष धरला नाहीं. सरकारी कामांत कायदा हाच माझा मार्गदर्शक होता. कायदा ज्याच्या बाजूचा, त्याच्यावतीनंच माझा हुकूम सुटायचा. बेकायदेशीर मागण्यांना मी दाद दिली नाहीं म्हणून कांहीं लोकांना दुःख झालं असेल. पण त्या दुःखाला कारणीभूत झाल्याबद्दल मी दोषी ठरूं शकणार नाहीं. लोकांना चिकटायला न जाणं आणि लोकांना चिकटून न घेणं, असं धोरण मीं सदैव पाळलं. कुटुंबीयांशीं सुद्धां कारणापुरतंच सख्य मीं ठेवलं. लोकांना माझा संपर्कच जर नव्हता तर माझ्यापासून त्यांना दुःख तरी कसं झालं याचं उत्तर चित्रगुप्त देऊं शकतील काय?"

"धर्ममहाराज, दुःखसेवनाचा माझ्यावरला दुसरा आरोपहि असाच निराधार आहे. कुलाची प्रतिष्ठा आणि संपन्नता मला होती, मी विद्वान् झालों, माझी प्राप्तीहि भरपूर होती, मला मानाचं काम मिळालं होतं, माझ्याच इच्छेप्रमाणं चालणारा परिवार मला लाभला, या गोष्टी चित्रगुप्तांनींच निवेदन केल्या आहेत. त्यांनीं सांगितल्या नाहींत अशा दुसऱ्या

कांहीं गोष्टीहि सांगण्यासारख्या आहेत. मला कसलंहि व्यसन नव्हतं आणि व्यसनाधीनाच्या वांट्याला येणारं अनारोग्यहि माझ्यामागं लागलेलं नव्हतं. वायुमानांतील फरकामुळं किंवा अधिक कामाच्या शीणामुळं प्रकृती-वर परिणाम होतोसा वाटला कीं अंथरुणावर पडायची वाट न पाहतां मी औषध घेऊन ताजातवाना होई. विद्या, धन, मान्यता आणि अनारोग्य हीं दुर्मिळ सुखं सत्तेचीं असतांना मी दुःखसेवन केलं असं म्हणणं म्हणजे पावसांत भिजतांना अंग भाजून घेतलं असं म्हणण्यासारखं हास्यास्पद नाहीं काय ?"

आपलें निवेदन थांबवून अशोक हर्षे तोंडांतल्या तोंडांत पुटपुटला. "रड म्हणावं त्या गधड्या चित्रगुप्त्याला आतां रडायचं असेल तें !"

अशोकचें हें स्वगत भाषणहि धर्मसभेंतल्या सर्व उपस्थितांना ऐकूं आलें. त्यावर धर्मराज रागावून म्हणाले:—

"अशोक भूतलावर स्वगत आणि प्रगट असे भाषणप्रकार असतात तसे इथं नाहींत. इथं तुझं स्वगत भाषणहि प्रगट होतं. तूं चोरून बोललेले अवमानकारक शब्द आम्हांला ऐकूं आले आहेत. सन्माननीयाचा अव-मान केल्याबद्दल पुनरावृत्ति झाली तर मात्र गय केली जाणार नाहीं. चांगला शुद्धीवर राहून वाग. चित्रगुप्ता, हा अशोक तुझे आरोप अमान्य करतो आहे. यावर तुला कांहीं विचारायचं असेल किंवा सांगायचं असेल तर तसं कर अशी माझी आज्ञा आहे."

यमधर्मांना अभिवादन करून चित्रगुप्तानें अशोकला प्रश्न केला:—

"तूं आपला माणुसघाणेपणा जवळजवळ मान्य केलाच आहेस. तरी-पण मी तुला विचारतोंच. भूलोकांवर तुला किती मित्र लाभले होते ?"

"मला अगदींच मित्र नव्हते असं नाहीं. डॉ. शंभूराव, विठ्ठलराव कॉंट्रॅक्टर, पुंडोबा कोटणीस आणि—"

"कां अडखळलास ? तीन नांवानंतर चौथं नांव कुणाचं घ्यावं याची तुला अडचण पडली असंच ना ? पण या मंडळींखेरीज पांच चारजण तुझे मित्र असतील. तरीदेखील तुझा मित्रपरिवार अत्यंत चिमुकला होता असंच नाहीं कां सिद्ध होत ? बरं, मला असं सांग, हीं जीं दोनचार माणसं

तूं सांगितलींस तीं तरी तुझीं खरोखर मित्र होतीं असं तूं कशावरून म्हणतोस ? ”

“ हीं मंडळी अधूनमधून माझ्याकडं गप्पा मारायला येत. कधींकधीं आम्ही मिळून फिरायला जात असूं.”

“ गप्पा मारणं आणि फावल्यावेळीं फिरायला जाणं हींच कां मित्र-लक्षणं ! विद्यार्थीदशेंत मित्रलक्षणं सांगणारा एक श्लोक पाठ केलेला तुला आठवत असेल. त्या लक्षणांनीं युक्त असा तुझा मित्र कोणी होता काय ? आपल्या अंतर्यामींचीं सुखदु:खं ज्याच्यापुढं मोकळेपणानं बोलून दाखवावीं असा कोणी जिवाभावाचा स्नेही तुला लाभला होता काय ? कोणा मित्राच्या काळजीनं तुझ्या काळजाचं पाणी कधीं झालं होतं काय ? एखाद्या मित्राच्या हर्षानं तुझं अंत:करण कधीं उल्हसित झालं काय ? संकटकाळीं कोणा मित्राला मदतीचा हात द्यायला तू कधीं लगबगीनं धांवून गेलास काय ? फारां दिवसांत एखाद्या मित्राची गांठभेट नाहीं म्हणून तुझ्या मनाची कधीं तगमग झाली काय ? ”

“ ओळखीच्या माणसांबद्दल मनाची चलबिचल झाल्यावांचून कशी राहील ? मी झालों तरी मनुष्यच होतों.”

“ मी हें मान्य करितों. तुझ्या विशिष्ट देहरचनेमुळं प्राणिसृष्टींतलं मनुष्य हेंच नांव तुला देणं भाग आहे. धर्ममहाराज आणि सकल सभासदमहाभागांना माझी नम्र विनंति अशी कीं अशोकच्या या उत्तराचा अधिक लक्षपूर्वक विचार व्हावा. याच्या मित्रप्रेमाची ओढ किती होती अशा आशयाच्या माझ्या प्रश्नाला ‘ ओळखीच्या माणसांबद्दल मन हेलकावे खाय-चंच ’ असं उत्तर हा देतो. म्हणजे याच्या हिशेबांत मित्राची किंमत ’ ओळखीच्या माणसांहून अधिक नाहीं. अशोक, तुझ्या घराबाहेरच्या मित्र-परिवाराची कल्पना धर्मपीठाला आतां आली असेल, म्हणून तो विषय बाजूस सारून मी तुझ्या कुटुंबियांकडं वळतों. घरच्या मंडळींशीं तुझे संबंध स्नेहपूर्ण होते काय ? ”

“ मग शंका आहे कीं काय त्यांत ? माझ्या आईबापांची सेवाशुश्रुषा मी उत्तमप्रकारें केली. माझ्या भावांचे वाजवी हिस्से मी त्यांना देऊन टाकले, बहिणींना भाऊबीजेची ओंवाळणी नियमितपणें पाठविली, पत्नीला

वस्त्रांभूषणांचं दैन्य कधीं भासूं दिलं नाहीं. या गोष्टी स्नेहभावाशिवाय कोणी करील काय ? ”

“ करील. या गोष्टी केल्या नाहींत तर लोकांत हंसं होतं. त्याच्या भयानं माणूस पुष्कळदां या गोष्टी करितो. तूं देखील आपल्या कुटुंबीयांचं पालन-पोषण स्नेहभावाऐवजीं लौकिक दुष्कीर्तीच्या भयानं करीत होतास. प्रत्येका-बद्दल नांवनिशीवार मी तुला प्रश्न विचारीत नाहीं. पण प्रापंचिक पुरुषाला बायको हा खरा जीवाभावाचा स्नेही असतो. तुम्हां नवराबायकोंत खरा स्नेह होता काय ? तूं आपलं हृद्गत तिला कधीं सांगितलंस काय ? तिचं कधीं विचारून घेतलंस काय ? जास्ती नको. पण एकांतांत तरी तुम्ही नवरा बायको कधीं खदखदून हंसलां आहांत काय ? ”

“ संसारांत नवराबायको सहकारी असतात. पण सहकारी हे मित्र असलेच पाहिजेत असा आग्रह कशासाठीं ? आपल्या वांट्याचं काम व्यव-स्थितपणें करीत राहणं एवढंच त्यांचं कर्तव्य. नवऱ्यानं बायकोला अन्न-वस्त्राची वाण भासूं दिली नाहीं आणि बायकोनं नवऱ्याचं घर आणि चूल-मूल सांभाळलं म्हणजे झालं. आम्ही नवराबायको या गोष्टी व्यवस्थितपणें करीत होतों. नवराबायकोंनीं सभ्यतेच्या मर्यादा सदैव पाळल्या पाहिजेत, असं माझं मत आहे. एकांतांतसुद्धां फिदीफिदी हंसणं म्हणजे मला चटोर-पणा वाटतो. ”

“ तुझे हे विचार तुला लखलाभ असोत. तुझ्या मित्रशून्य जीवनाची धर्मपीठाला आतां कल्पना आली असेल म्हणून हा विषय इथंच संपवून तुझ्या आप्तेष्टांबद्दल कांहीं प्रश्न तुला विचारतों, तुझ्या बहिणीला ओवाळ-णीचे पैसे तूं न चुकतां पाठवीत होतास हें मान्य आहे. पण तुझं त्यांच्या-वरलं प्रेम सिद्ध करायला एवढी एक गोष्ट पुरेशी नाहीं. तुझी बहीण एकदां जिवावरच्या दुखण्यानं आजारी होती आणि त्यांत तुझ्या भेटीची तिची इच्छा प्रबळ झाली होती. पण तांतडीचं बोलावणं येऊनहि तूं गेला नाहींस. होय ना ? ”

“ तिच्या घरीं जाणं मला पसंत नव्हतं. कारण तिचा नवरा माझा नीट मान ठेवायचा नाहीं. मी एक अधिकारी. सर्व नागरिक ‘ रावसाहेब ’ अशा बहुमानानं मला संबोधतात पण हा गधडा मला नुसतं ‘अशोकराव’

म्हणायचा. बरं, हा कोणी बडा वकील डॉक्टर होता म्हणावं तर साधा दुकानदार. या लेकानं माझी बरोबरी करायची ? ”

“ तुझ्या भावाशींहि तूं फटकून वागत होतास म्हणे ? ”

“ तोहि त्याच लायकीचा होता. त्याला मी दहादां बजावलं असेल कीं, रस्त्यावर माझ्याशीं चिकटून चालूं नको. आणि बरोबरीच्या नात्यानं बोलत जाऊं नको म्हणून. पण हा लघळपणा करायचाच. त्यांतूनहि मीं ऐकून घेतलं असतं. पण याचा पोषाख काय ? माझ्या पुढं चालणाऱ्या पट्टेवाल्याचा पोषाख नीटनेटका असेल त्याच्यापेक्षां. ”

“ बरं, आपल्या इतर आप्तस्वकीयांशींहि तूं तुसडेपणानं वागत होतास असा लोकप्रवाद आहे. तुझे मामा एकदां तुला आगगाडींत दिसले तर त्यांना न पाहिल्यासारखं करून तूं दुसऱ्या डब्यांत जाऊन बसलास आणि तुझे चुलते वारलेले कळतांच तूं मागील दारानं घराबाहेर निघून गेलास ! शेवटीं त्यांची अखेरची व्यवस्था दुसऱ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं केली हें खरं का ? ”

“ माझे मामा भिक्षुक होते आणि त्यांची नेहमीं पैशाची ओढाताण असायची. भेटले म्हणजे कांहीं तरी देणं भाग. आणि दिलेला पैसा परत येण्याचीहि आशा नाहीं. म्हणून पैसे मागितल्यावर ‘ देत नाहीं ’ म्हणण्या-पेक्षां गांठच न घेतलेली बरी नव्हे कां ? आतां काका गेले तेव्हां मी बाहेर निघून गेलों हें खरं. घरीं असतों तर प्रेतयात्रेला जावंच लागलं असतं. मला प्रेताला खांदा द्यायची संवय नव्हती हें एक आणि माझ्यासारख्या अधिकारी माणसानं प्रेताला खांदा द्यायची पद्धत नाहीं हें दुसरं ! काका रात्रीं गेले असते तर मी गेलोंहि असतों पण ते दिवसाढवळ्या गेलेले. मग कसं जातां येईल मला ? ”

“ तुझी अडचण होती खरीच ! आतां शेजाऱ्यापाजाऱ्यांशीं तूं कितपत सलगीनं वागला असशील याची चौकशी करायचं कारण नाहीं. तरीपण एक प्रश्न विचारतोंच. तुझ्याशेजारचे दादासाहेब सावकार यांच्या टांग्याचं घोडं मेलेलं कळलं तेव्हां तूं त्यांचा समाचार घेऊन आलास आणि दुसरे शेजारी हणमंतराव मास्तर यांच्या मुलांच्या मुंजींत पानसुपारीलाहि तूं गेला नाहींस, होय ना ? ”

" दादासाहेब सावकार हे मोठे गृहस्थ. शिवाय माझ्या वरिष्ठ साहेबांवर त्यांचं वजन. तेव्हां त्यांच्याशीं फटकून राहणं कसं बरं दिसेल ? हणमंतराव काय माझ्या तोलाचा माणूस म्हणून मी त्याच्या घरीं जाऊं ? "

" तुझ्या जीवनग्रंथाचीं बरींच प्रकरणं धर्मसभेनं पाहिलीं. बाकी राहिलं प्रकरण तें तुझ्या नौकरीचंच ! तुझी नौकरी तूं कायद्याप्रमाणं केलीस, लांचलुचपतीच्या मोहांत तूं गुरफटला नाहींस या बाबतींत तुला काय सांगायचं होतं तें तूं सांगून टाकलं आहेस. पण तूं आपल्या वरिष्ठाशीं आणि कनिष्ठाशीं कसा वागलास हें धर्मपीठाला अद्यापि कळायचं आहे तें सांगशील का ? "

" माझ्या वरिष्ठांना मी अवश्य तो मान देत आलों. "

" एवढंच नव्हे तर अनावश्यक अशीं स्तुतिसुमनंहि त्यांच्यावर उधळीत होतास. आणि तोंडावर स्तुति करून माघारीं नालस्तीहि करीत होतास. ' आपला वक्तशीरपणा पाहून मंडलीकांची आठवण होते ' असं तूं रावबहादूर दाबके यांना म्हणायचास. दिवाणबहादूर गाडगीळांना ' न्यायमूर्ति रानड्यांचीं नि आपलीं मतं एक आहेत ' असं चढवायचास. आणि कॅप्टन शेलारांना ' तुम्हीं विलायतेंत जन्मलां असतां तर, लॉर्ड किचनेर झालां असतां ' असं वाखाणायचास. पण दाबके बदलून गेल्यावर " बैलें गेला बरं झालं ' असं तूं आपल्या कचेरींत बोललास. गाडगीळांना ' गळकं गाडगं ' म्हणून माघारीं तूं निंदीत होतास. आणि शेलारांना ' शेंदाड शिपाई ' अशी पदवी तूं दिली होतीस हें खरं काय ? "

" माझ्या कचेरींतल्या पांड्या फडणीसाचं हें काम दिसतंय्. तो गधडा मोठा चहाडखोर आहे. "

" अशोक, भूलोकींच्या चहाड्यावांचूनहि तिथलीं दुष्कर्मं आम्हांला कळतात. तुझा तोंडपूजेपणा आणि पाठमोरी निंदा तुझ्याच तोंडून मला ऐकूं आली, म्हणून मीं तिचा उल्लेख केला. आम्ही सांगावांगीवर कधींच भिस्त ठेवीत नाहीं. शिवाय, ही गोष्ट तूं लक्षांत घेतली नाहींस कीं, तुझ्या कचेरींतले पांडोबा फडणीस अद्यापि भूलोकींच आहेत. इथं न येतां तुझ्या चहाड्या ते कशा सांगतील ? आतां कनिष्ठांशीं तूं कसा वागलास तें मीच तुला सांगतों. माझं सांगणं खोटं असेल तर तसं सिद्ध करायचं स्वातंत्र्य

तुला आहे. तूं कितीहि कायदेशीरपणाचा आव आणलास तरी, हांजी हांजीखोर माणसांवर लोभ करून सरळमार्गी कारकुनांशीं दुष्टाव्यानं वागला आहेस. तुला ‘ रावसाहेब, रावसाहेब ’ म्हणणारा, तुझ्या पुढं पुढं करणारा, आणि रात्रीं अपरात्रींसुद्धां तुझ्या घरचीं कामं करणारा केसू वांकडे हा तुझा आवडता कारकून होता. ‘ हर्ष्यांचा कल्याण ’ असं बरोबरीचे लोक त्याला म्हणत असत हें तूंहि ऐकलं आहेस. पण त्याच्या लुब्रेपणाला दटावण्याऐवजीं तूं प्रोत्साहनच देत गेलास. हुषार आणि कामसू अशा पंडितरावांना बारनिशीवर बसवून त्यांच्याकडून महत्त्वाचं आणि पानसुपारी मिळवून देणारं दप्तर तूं आपल्या मर्जीतल्या केसू वांकड्याच्या हवालीं केलंस. आपल्याशीं अदबीनं वागत नाहीं असा समज करून घेऊन तूं हरिपंताला त्याच्या बायकोच्या बाळंतपणाची अडचण असूनहि रजा दिली नाहींस. तुझ्या स्तुतिप्रियतेची आणि पक्षपाताची अधिक उदाहरणं सांगायला हवींत काय ? ”

“ पण मी माझ्या कचेरींत माझ्या इच्छेप्रमाणं आणि सोयीप्रमाणं व्यवस्था ठेवली आणि ती ठेवतांना नियमबाह्य हुकूम सोडले नाहींत किंवा कोणाचं नुकसानहि केलेलं नाहीं. मला आवडत नव्हते अशा कारकुनांनाहि मीं कधी दंड केला नाहीं कीं त्यांची पगारवाढ अडवून धरली नाहीं.”

“ ही सुध्दां तुझी न्यायप्रियता किंवा क्षमाबुध्दि नव्हे. दंड किंवा पगारकाट केली तर हाताखालचे लोक वरिष्ठाकडं गाऱ्हाणं नेतील आणि त्यांत आपली शोभा होईल हें भय तुझ्या पोटांत होतं. म्हणून आपला खुनशीपणा तुला प्रगट करितां आला नाहीं.

“ धर्ममहाराज, यापुढं अशोकाला कांहींहि विचारायची आवश्यकता मला वाटत नाहीं. यानं सांगितलेल्या गोष्टीच याच्यावरील माझे आरोप सिध्द करायला पुरेशा आहेत असं मला वाटतं. याचं जीवन याला आनंदमय झालेलं नाहीं. याला विपुल सुख लाभलं होतं पण तें कशाना कशा रीतीनं सतत दुखत होतं. याच्या मनाची तगमग व्हायला स्वत:चं दु:खच लागे असं नाहीं, तर दुसऱ्याचं सुख पाहूनहि हा कासावीस होई. याला मुलगा झाला तेव्हां याच्या चुलत भावालाहि झाला. पण त्यावेळीं स्वत:च्या

पुत्रप्राप्तीचा आनंद चाखायच्याऐवजीं चुलतभावाला झालेल्या पुत्रलाभा-बद्दल हा हळहळत होता ! ‘ अशा दळभद्र्यांचीं लग्नं कशाला करतात आणि यांना पोरं तरी कशाला होतात ’ असे उद्गार यानं त्यावेळीं आपल्या घरच्या मंडळींच्या घोळक्यांत काढले. अशा प्रकारें हा सदैव जळत जळफळत जगला. भाग्यवंत असून यानं दुःखभोग भोगला म्हणूनच याच्यावर दुःख-सेवनाचा आरोप मीं केला आहे.

“ देवाधिदेवा, यानं दुसऱ्या लोकांशीं स्नेह जोडला नाहीं तर नाहीं, पण दुसऱ्यांना पाहून याच्या कपाळावर आंठ्याच कां पडाव्या ? याच्या सभोंवार पसरलेली मानवसृष्टि ही याच्यावरील मोठी आपत्ति आहे असे विकार लोकदर्शनानं याच्या चर्येवर उमटत होते. माणसाचं मन त्याच्या चर्येंत प्रतिबिंबित होतं, त्यामुळं त्याच्याबरोबर अक्षरहि न बोलतां त्याच्या अंतःकरणांतील अप्रसन्नता लोकांना दिसे. आणि याच्याबद्दल त्यांच्या अंतर्यामीं तिरस्कार उत्पन्न होई. दुसऱ्याचं आनंदमय मन हा उद्विग्न करी. यासाठींच दुःखोत्पत्तीचा दुसरा आरोप मीं याच्यावर ठेवला आहे. याचे हे प्रमाद सिध्द होतात कीं असिद्ध होतात हें देवाधिदेवांनीं ठरवावं आणि योग्य तो निर्णय द्यावा अशी माझी प्रार्थना आहे.”

चित्रगुप्ताच्या भाषणानें यमधर्मांची मुद्रा विचारमग्न झालेली दिसली. क्षणभर थांबून ते बोलूं लागले:—

“ चित्रगुप्ता, तुझ्या विधानांत सत्यांश नाहीं असं नाहीं. पण तुझं म्हणणं सर्वस्वीं खरं आहे असंहि मला वाटत नाहीं. अशोक हर्षे निर्भेळ सुख अनुभवूं शकला नाहीं हें पटतं, पण हा असुखीच होता असं तरी कां म्हणायचं ? व्यक्तिमात्राच्या सुखाच्या कल्पना भिन्न असतात. एकाद्याला पुष्पगंधानं आल्हाद होतो, दुसऱ्याला त्यांत स्वारस्य वाटत नाहीं. कुणाला माणसं हवीं असतात, कोणाला एकांतच सुखदायक वाटतो. तपस्वी गिरि-कंदरांत जातात आणि योगीजन लोकसंपर्कापासून अलिप्त राहतात, म्हणून त्यांना असुखी म्हणतां येईल ? आत्मानंद हें झालं तरी सुखच ना ? अशोकला त्या दृष्टीनं सुखी कां म्हणूं नये ? त्याचप्रमाणं दुसऱ्याच्या दुःखाला हा कारणीभूत झाला हा तुझा आरोपहि वादग्रस्त होईल. यानं दुसऱ्याचीं सुखसाधनं हिरावून घेतलीं, दुसऱ्यावर बलात्कार केला, असं कांहीं तूं सिद्ध

केलेलं नाहींस. उलट हा गृहमग्न असल्यानं उपद्रव देण्याच्या दुष्ट बुद्धीनं सुद्धां दुसऱ्याकडं गेल्याचं दिसत नाहीं. मग याला परदुःखकारक कसं म्हणतां येईल? या माझ्या शंकेचं निराकरण देवगुरूंनीं करावं अशी मी त्यांना विनंति करतों."

"यमधर्मा, मी तुझ्याशीं सहमत होऊं शकत नाहीं. चित्रगुप्तानं याच्यावर ठेवलेले आरोप सिद्ध होतात असा माझा अभिप्राय आहे. थोड्या वेळापूर्वीं शांताराम आनंदकराचा खटला आपण चालविला. त्याचीच सुधारून वाढविलेली आवृत्ति म्हणून या अशोक हर्षेकडं बोट दाखवितां येईल. शांतारामानं आपल्या स्नेहशून्य वर्तनानं घरांतील रमणीयतां नष्ट केली. कुटुंबीयांचं जीवन नीरस आणि उदासवाणं करून टाकलं. यानं आपल्या कुटुंबीयांचं जीवन कष्टप्रद केलं कीं नाहीं, याबद्दल झालेल्या प्रश्नोत्तरांवरून स्पष्ट बोध होत नसला, तरी त्यांचं जीवन आनंदपूर्ण नव्हतं असं अनुमान काढतां येण्याजोगं आहे. आणि याचं स्वतःचं जीवन तर निखालस असुखी होतं, असं माझं निश्चित मत आहे. तपस्वी आणि योगाभ्यासी लोकांशीं याची तुलना करतां येणार नाहीं. ब्रह्मानंदप्राप्ति हें उच्च ध्येय त्यांच्या डोळ्यापुढं असतं आणि त्यांचं साधन म्हणून ते एकांतवास स्वीकारतात. अशोक हर्षेपुढं तसं कोणतंहि ध्येय नव्हतं. आणि ध्येयप्राप्तीचं साधन म्हणून त्यानं लोकविन्मुखता स्वीकारलेली नव्हती. लोकांशीं तुसडेपणानं वागण्याचीं याचीं कारणं वेगळीं आहेत. तीं म्हणजे प्रबळ अहंकार आणि स्वतःचा न्यूनगंड.

"यमधर्मा, सुख विघातक म्हण किंवा दुःखकारक म्हण, अहंकारासारखी दुसरी गोष्ट नाहीं. मी शहाणा, मी प्रमुख, माझं मत बरोबर, मी मानाचा अधिकारी, असा ज्यांत त्यांत "मी" धुडगूस घालूं लागला कीं त्याच्या पायांखालीं सर्व सुखांचा चुराडा होऊन जातो. या अशोकचंच पहा. उभ्या जन्मांत याला मित्र जोडतां आला नाहीं. याला शाळासोबती असंख्य भेटले असतील, उत्तर आयुष्यांत हजारों लोक याच्याजवळ आले असतील, पण त्यांतल्या एकाचंहि अंतःकरण यानं वश करून घेतलं नाहीं. आपल्यापेक्षां बाकीचे सारे तुच्छ! आणि तुच्छ लोकांशीं सलगी करून करायचं काय, ही याची भावना! या भावनेच्या

जोडीला एक भीतीहि याच्या अंतःकरणांत ठाणं देऊन बसलेली होती. दुसरा जवळ आला आणि त्यानं आपणांला लुबाडलं तर? पैशाअडक्याची लुबाडणूक नाहीं झाली तरी त्याच्यासाठीं शारीरिक कष्ट करावे लागणार नाहींत असं थोडंच आहे? मित्र म्हणून एकाद्याला मानलं आणि समजा तो आजारी पडला, तर त्याला औषध आणून देण्याची दगदग तरी आपल्याला करावी लागणार—मनांतून नसलं तरी लोकलाजेखातर करावी लागणार! अशा भीतीनं हा सदोदित व्याप्त झालेला असे. म्हणूनच यानं कोणी मित्र जोडले नाहींत. अशा माणसांशीं मैत्री जोडण्याची लोकांना तरी हौस कशाला वाटेल? लोकांना आपल्या मोठेपणाचा गर्व नसला तरी स्वाभिमान असणारच. याच्याकडून ते तुच्छ काय म्हणून लेखून घेतील? 'प्रीतीला प्रीति साक्ष देते' तसा अहंकाराला अहंकार हुंकार देतो. म्हणूनच या घमेंडखोराशीं स्नेह जोडायला कोणी आले नाहींत. "ओळखीच्या माणसाला'च स्नेही मानून याला तृप्त रहावं लागलं. या गोष्टीकडं चित्रगुप्तानं मघाशीं आपलं लक्ष मुद्दाम वेधलं आहे.

मित्रशून्य मनुष्य हा त्याचा त्याला तर शाप आहेच, पण मानवी सृष्टीचा तो कलंक आहे. सृष्टिकर्त्या जगदीश्वरानं मानवप्राणी घडवितांना सच्चिदानंदस्वरूप कल्पिलेलं आहे. शुद्ध आनंद निर्मिणं आणि शुद्धानंदाचा आस्वाद घेणं असा मानवप्राण्याविषयीं त्याचा संकेत आहे. म्हणून आनंदाचं प्रतीक जें हास्य त्याचं वरदान त्या मानवाला एकट्याला मिळालं आहे. जो हंसू शकत नाहीं तो मानव-देहधारी असला तरी मानव नव्हे. हास्याची उत्पत्ति आनंदांतून होते, म्हणून जगदीशानं आनंदाचीं साधनंहि मानवाला विपुल देऊन ठेवलेलीं आहेत. कांहीं उच्च आहेत. कांहीं अधम आहेत. त्याग हें आनंदाचं श्रेष्ठ साधन आहे. दुसऱ्यासाठीं तन आणि मन अर्पण केल्यामुळं होणारा निर्मळ आनंद अनुपमेय आहे. हा आनंद स्नेहरूपानं अमर होतो. स्नेहाची थोरवी अशी कीं तो देणाऱ्याइतकाच घेणाऱ्यांना सुखदायक होतो, म्हणून स्नेहासाठीं मानव हपापलेला असतो. स्नेही जोडावा,—दोघांनींहि आनंदित व्हावं, आनंदाचं प्रतीक असं हास्य फुलवावं, अशी त्याची धडपड असते. स्नेह हें मानवी जीवनाचं मांगल्य आहे. पण अशोकसारख्या अहंकारी करंट्याला स्नेहशून्य

जीवनच बरं वाटतं. हास्यशून्य मुख हेंच भूषण वाटतं. याच्या मुखाला कधीं हास्याचा विटाळ झालाच तर तो अधम साधनांनीं निर्मिलेल्या विषारी हास्याचा. हें हास्य रुदनापेक्षांहि भेसूर वाटतं. वरिष्ठावर मनांतून चडफडत पण वरकरणीं स्तुतिस्तोत्रं गात अशोक कधीं कधीं कपटी हास्य चर्येवर उमटवी, तेव्हां या भेसूरतेचा चांगला प्रत्यय येई.

" यमधर्मा, जिनं याला सर्वस्व समर्पण केलं त्या आपल्या पत्नीशींहि अंतःकरण उघडं करून हा हंसला नाहीं. हा याचा करंटेपणा क्षम्य आहे काय ? सगळ्या जगानं दगा दिला असला, तरीहि अंतर देणार नाहीं असा जिव्हाळ्याचा एकच स्नेही माणसाला असतो आणि तो म्हणजे पत्नीला पति आणि पतीला पत्नी. पण हे स्नेही देखील मुंडावळ्या बांधल्या म्हणून आणि मंगळाष्टकं म्हटलीं म्हणून निर्माण होत नाहींत. परस्परांनीं परस्परासाठीं जिव्हाळा दाखविला तरच पतिपत्नी स्नेही होतात. नाहींतर सृष्टिकार्य चालविणारीं मानवी नरमादी एवढंच त्यांचं स्वरूप राहतं. अशोकला पत्नीचा स्नेह आणि त्यांतला दिव्यानंद घेतां आला असता, पण त्याला त्याची मातब्बरी वाटली नाहीं. अशोक हर्ष्यांच्या जीवननाटकाचं पर्यवसान शोकमय आहे आणि त्याची जबाबदारी त्याच्यावरच आहे.

" अशोकच्या मित्रशून्य जीवनाला याचा न्यूनगंड कारणीभूत आहे असं मी म्हटलं, त्याचाहि खुलासा केला पाहिजे. मी मोठा, मी शहाणा, असं मला वाटत असलं तरी दुसरेहि तितकेच मोठे आणि अधिक शहाणे असू शकतील हें मला माहीत होतं. आणि त्यांच्यापुढं गेल्यास आपल्या मोठेपणाला धक्का लागेल, आपल्या शहाणपणाला कमीपणा येईल हा बागुलबोवा याला सदैव भिववीत होता. म्हणूनच हा चारचौघांत जाण्याऐवजीं आपल्या घरट्यांत छपून रहात होता. अहंकाराप्रमाणं भ्याडपणाहि सुखविघातक आहे. अशोकचा भ्याडपणा स्वनिर्मित आहे. अहंकारामुळं भ्याडपणा, अहंकार आणि भ्याडपणामुळं मत्सर, दुष्टावा, असे दुष्ट विकार कदलीदल न्यायानं जन्म पावतात आणि त्यामुळं सुखहानि आणि दुःखनिर्मिति होते. अशोक हर्षेनं या गोष्टी केलेल्या आहेत. माझं हें मत ग्राह्य किंवा अग्राह्य वाटेल त्याप्रमाणं यमधर्मा, तूं आपला निर्णय दे. "

देवगुरूंना अभिवादन करून यमधर्म म्हणाले:—

" माझ्या शंकांचं निरसन करून गुरुदेवांनीं अशोक हर्षेचं सत्यस्वरूप मला दाखविलं याबद्दल मी गुरुदेवांचा ऋणी आहें. अशोक अपराधी आहे अशी आतां माझी खात्री झाली असल्यानं त्याला अंधारांत छपून राहणाऱ्या दिवाभीताचा जन्म प्राप्त व्हावा असा मी निर्णय देतों. या जीवनांत याला प्रकाशाचं सौख्य उपभोगतां येणार नाहीं. जगाचं सौंदर्य याला दिसणार नाहीं. जगहि याच्याकडं पहाणार नाहीं. कधींकाळीं याचं दर्शन झालं किंवा याचा शब्द कानीं पडला तर लोकहृदयांत अशुभशंका निर्माण होतील. लोकांच्या तिरस्काराचा हा विषय होऊन राहील. आणि दीर्घकाल अंधःकारमय जीवनाचा कंटाळा येऊन जेव्हां हा प्रकाशपूर्ण जगांत येण्याचं साहस करील तेव्हां कावळे चंचुप्रहार करून करून याची अवतारसमाप्ति करतील. "

" चित्रगुप्ता, धर्मनिर्णयाची याचना करण्यासाठीं यापुढं कोण प्राणी येणार असेल तो येऊं दे. "

---

## जिवाजी भस्मे

१३

" धर्ममहाराज, कर्तव्यच्युति, परधार्जिणेपणा आणि स्वजनहत्या अशीं पातकं केलेला हा जिवाजी भस्मे मी धर्मपीठाला सादर करीत असून याच्या अपराधाच्या घोरपणानुसार याला शासन करावं अशी माझी प्रार्थना आहे."

" या आरोपासंबंधीं तुझं कांहीं म्हणणं असेल तर तें सांग " ही धर्माज्ञा झाल्यावर जिवाजी बोलूं लागला:—

" देवा, चित्रगुप्तांनीं केलेले हे तीन्ही आरोप मी अमान्य करितों. मी कर्तव्यच्युति कधींहि केलेली नाहीं. मी माझ्या दवाखान्यांत रोज न चुकतां जात होतों. रुग्णपत्रिका, औषधमूल्याचा जमाखर्च, औषध उपचार साधनांचे हिशेब, कारकून कंपौंडरांकडून मी वक्तशीर आणि व्यवस्थित लिहून घेत होतों. माझ्या दवाखान्याची व्यवस्था मीं उत्तम प्रकारें ठेवल्याबद्दल

सिव्हिल सर्जनसारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं मला उत्तम शेरे दिलेले आहेत, हें माझ्या कर्तव्यच्युतीचं निदर्शक आहे काय? माझ्यावरील परधार्जिणेपणाचा दुसरा आरोप चित्रगुप्तांनीं कां केला आहे, हेंच माझ्या लक्षांत येत नाहीं. मीं माझ्या आप्तेष्टांकडून किंवा स्नेह्यासोबत्यांकडून फी घेतलेली नाहीं; उलट त्यांना पदरच्या पैशानं घेतलेलीं औषधं फुकट दिलीं आहेत. औषधापुरतंच नव्हे, तर दुसऱ्या हरएक गोष्टीत मीं त्यांना सहाय्य केलेलं आहे. माझ्या पुतण्याचं शिक्षण बेताचं झालं असतांना आमच्या म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष चुनीलाल शेटजी यांच्या गिरणींत त्याला नोकरी मिळवून दिली. माझ्या मेहुण्याला चीफ ऑफिसरकडं वशिला बांधून कंत्राटं देवविलीं. माझ्या मित्राच्या मुलाला स्कूलबोर्डाकडं संधान लावून तीन नंबरच्या शाळेतून एक नंबरच्या शाळेंत बदलून घेतलं. मी परधार्जिणा असतों तर आपल्या माणसांचीं अशीं कामं माझ्या हातून कधींच झालीं नसतीं. आतां सर्वांत घोर ठरेल असा माझ्यावरील जनहत्येचा आरोप तर परमावधीचा असत्य आणि हास्यास्पद आहे. वैद्यविद्येचा परिपूर्ण अभ्यास करून आणि 'डॉक्टर' ही पदवी मिळवून मीं जनतेच्या जीवितरक्षणाचा व्यवसाय पत्करला. त्यांच्या प्राणांवर घाला घालायला आलेल्या रोगांचं मी निवारण केलं. प्राणरक्षकांवर प्राणघाताचा आरोप सिद्ध होऊं शकेल काय? चित्रगुप्त महाशय, मी वैद्यशास्त्राचा अभ्यास केला नव्हता. रोगपरीक्षा आणि औषधयोजना यांचं मला ज्ञान नव्हतं, असं आपण म्हणूं शकतां काय?"

"मुळींच नाहीं. तुझ्या ज्ञानाबद्दल मला मुळींच शंका नाहीं. उलट वैद्यविद्येंत तूं निष्णात होतास आणि तुझ्या अचूक रोगनिदानाचं आणि परिणामकारक औषधयोजनेचं प्रत्यंतर कांहीं प्रसंगीं आलेलं आहे, हें मी मान्य करितों."

"मीं चुनीलाल शेटजींच्या चिरंजीवाला दुसऱ्या डॉक्टरनीं निराश होऊन हात टेकल्यावरसुद्धां बरं केलं. चीफ ऑफिसरच्या बायकोच्या पोटांतील प्राणांतिक कळा मीं बंद केल्या. हीं उदाहरणं आपल्या वहींत नमूद आहेत काय? यासारखीं दुसरीं अनेक उदाहरणं मी दाखवूं शकेन."

"त्यांची आवश्यकता नाहीं. तुझ्या ज्ञानाचं सामर्थ्य जेव्हां मी मान्य

केलं, तेव्हांच तूं अनेक रोगजर्जर लोकांना दुःखमुक्त केलंस हें मान्य केल्यासारखं होतं."

" मग मी रोगविमुक्त आणि दीर्घायुषी केलेले मानव आपल्याला दिसत असून आपण माझ्यावर कर्तव्यच्युतीचा आणि जनहत्येचा आरोप कसा करूं शकतां ? "

" जिवाजी, मनुष्य काशीयात्रा केल्याचा दिमाख तेवढा दाखवतो, पण त्याच्या आधीं केलेलं मांजर मारल्याचं पातक छपवून ठेवूं पहातो. तूंहि मनुष्य असल्यानं दोष दडवून ठेवून गुणांची तेवढी टिमकी वाजवणं स्वाभाविकच आहे. रोगपरीक्षा करून औषधोपायानं व्याधिमुक्त केलेलीं उदाहरणं तेवढीं तूं सांगितलीस. पण तुझ्याकडं आशेनं आलेल्या रुग्णांकडं तूं लक्ष दिलं नाहींस, फार काय कठोरपणानं त्यांना धुडकावून लावलंस, हेंहि माझ्या वहींत नोंदलेलं आहे. तुला गांवचे रस्ते झाडणारी ताई महारीण आपल्या लेंकराची प्रकृति दाखवायला आणि औषध मागायला तुझ्याकडं आली होती. पण तूं तिच्याकडं दुर्लक्ष केलंस. पूर्ण तपासणी न करितां कांहींतरी औषध दिलंस आणि शेवटीं तुझ्या अनास्थेचं यायचं तेंच फळ बिचाऱ्या ताई महारणीला मिळालं हें तुला आठवतं काय ? "

" ताई महारणीचं पोर त्यावेळीं मीं औषध दिलं असतं तरी गेलंच असतं. हीं भिकारडीं अडाणी माणसं अगदीं शेवटच्या घटकेला डॉक्टरकडं धांवतात. अशा स्थितींत आम्ही डॉक्टरच काय पण प्रत्यक्ष धन्वंतरी स्वर्गांतून उतरला, तरी त्याची मात्राहि त्यांचे प्राण वांचवूं शकत नाहीं. "

" तुम्हां डॉक्टरना तरी हा निराशावाद अक्षम्य आहे. मानवी शरीर यंत्र हे एक अनाकलनीय कोडं असून त्यांत कोणत्या क्षणीं काय चमत्कार घडेल याचा नेम नसतो. म्हणून वैद्यानं अखेरच्या क्षणापर्यंत प्रयत्नांत कसूर करूं नये असं वैद्यश्रेष्ठांचं म्हणणं असतं. कर्तव्यतत्पर वैद्य तसा प्रयत्न करतातहि. तूं देखील विशिष्ट व्यक्तीपुरता असा प्रयत्न करीत होतास, असा पुरावा माझ्यापाशीं आहे. तुझ्या गांवातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा मुलगा क्षयाच्या अखेरच्या अवस्थेंत असतांना, त्याच्या जीविताची आशाहि नाहीं अशी तुझी खात्री झाली असतांना, अगदीं अखेरच्या घटकेलाहि मध्यरात्रीं जाऊन तूं त्याच्या अंगांत

औषध टोंचलं होतंस. पण सयाजी नांगऱ्याच्या वांटणीला तुझी उपेक्षावृत्ति आली होती. एका गरीब शेतकऱ्याचा एकुलता एक मुलगा होता तो. नवज्वराच्या तावडींत सांपडला तेव्हां त्याचा बाप तुझ्याकडं आला, तुझ्या पायां पडला, दीनवाणीनं त्यानं तुझी करुणा भाकली. पण तुला दया आली नाहीं. तूं त्याच्याकडं गेला नाहींस, सयाजीची प्रकृति तपासली नाहींस. सयाजीबरोबर तूं त्याच्या बापाचाहि घात केलास. "

" त्यापूर्वींच सयाजीच्या आईला, बहिणीला आणि घरच्या दुसऱ्याहि माणसांना तपासायला मी त्यांच्या झोंपडींत गेलों होतों. औषधं दिलीं होतीं आणि बरंहि केलं होतं. पण या उपकाराची जाणीव त्यांनीं ठेवलेली नव्हती. माझं बिल त्यांनीं सरळपणानं दिलं नाहीं. हाकराठोकरी करून थोडीफार वसुली करावी लागली. कांहीं पैसे ' कृष्णार्पण 'हि म्हणावे लागले. गरजे-पुरतं गयावया करणाऱ्या आणि गरज सरल्यावर ' मर जा ' म्हणणाऱ्या कृतघ्न माणसांशीं वैद्यानं तरी सहानुभूतीनं कां वागावं ? "

" तुझ्या गांवांतल्या गोडसे वकीलांनीं तुझी बिदागी कधीं दिलेली नाहीं, अशी तूं आपल्या बायकोपाशीं कित्येकदां कुरकूर केली होतीस. पण त्यांचं बोलावणं आलं रे आलं कीं धांवून जात होतास, आणि तेंहि पडसं खोकल्यासारखं किरकोळ दुखणं बरं करायला ! "

" गोडसे वकीलांची गोष्ट निराळी आहे. ते आमच्या म्युनिसिपालिटीचे कार्यकारी सभासद आहेत आणि पुढंमागं ते अध्यक्ष निवडून येण्याचाहि संभव आहे. त्यांना दुखवलं तर एक पापग्रह तयार करून ठेवल्यासारखं व्हायचं. "

" दामोदर सावकाराला तूं किती दिवस औषध देत होतास ? "

" ते माझे कायमचे पेशंट होते. चार दिवस त्यांना बरं वाटलं तर आठ दिवस त्यांची कांहींना कांहीं तक्रार असायची."

" पण ती तक्रार उत्पन्न न होईल अशी औषध योजना तूं वेळींच कां करीत नव्हतास ? कीं, तुझी औषध–योजना निष्फळ ठरण्यासारखं कुपथ्य करून ते आपली प्रकृति बिघडवून घेत होते ? "

" तसं मात्र नाहीं. दामोदर सावकाराइतका प्रकृतीची काळजी घेणारा रोगी मला साऱ्या जन्मांत भेटला नाहीं."

" म्हणजे पकडलेल्या उंदराला आपल्या हौसेप्रमाणें खेळवीत खेळवीत मांजर त्याचा जीव घेतं, तसंच तूं सावकाराचं केलंस ना? श्रीमंताचा रोग बरा करण्याऐवजीं तो टिकवून ठेवण्याचा हा तुझा धूर्तपणा होता. 'हें आमचं पिकतं शेत आहे' तें हातचं सोडणं म्हणजे आपल्या हातानं आपल्या पायांवर धोंडा पाडून घेणं होय' असं तूं आपल्या मित्रांच्या मैफलींत मोठ्या बढाईनं म्हणत होतास हें खरं ना?"

" श्रीमंत लोकांचा नादिष्टपणा हें आमचं भांडवल असतंच नाहींतरी! त्यांना आजारी ठेवावं लागत नाहीं. त्यांना डॉक्टरांकडं धांवायला संशयाचा आजारसुद्धां पुरतो. त्यांना 'कसंसं' वाटायला लागतं आणि डॉक्टरनं साधं पाणी रंगीत करून आणि कसला तरी वास लावून दिलं तरी तें 'कसंसं' थांबतं. दामोदर सावकार हा त्याच जातींतला प्राणी आहे. मला त्याला लुबाडावं लागलं नाहीं. तो आपण होऊन माझ्या खिशांत पैसे भरीत होता."

" आणि तूं भरूं देत होतास! वस्तुस्थिति त्याला सांगून त्याची खोटी रोगभीति तूं कां दूर केली नाहींस?"

" ती कधींच गेली नसती. रोगच नाहीं आणि म्हणून मी औषध देत नाहीं असं त्याला मीं सांगितलं असतं तर तो दुसऱ्या डॉक्टरकडं गेला असता. आणि त्या दुसऱ्या डॉक्टरानं त्याला पाणी पाजून त्याचे पैसे काढले असते. मग मीं माझं नुकसान कां करून घ्यावं?"

" रणछोडलाल गुजराला पुत्रप्राप्ति होण्याचीं औषधं तारुण्यापासून वृद्धावस्थेपर्यंत तूं देत आलास आणि त्याचे हजारों रुपये तूं लाटलेस. पहिल्या परीक्षेंतच त्याच्या बाबतींत ती आशा करायला जागा नाहीं हें तुला दिसून आलं नव्हतं काय?"

" डॉक्टरानं कोणाला धक्का बसेल असं रोगनिदान सांगायचं नसतं!"

" मग खोटंच सांगायचं तर आपणांला नीटशी परीक्षा होत नाहीं, असं कां नाहीं सांगितलस? निरुपयोगी औषधं देऊन त्याची लुबाडणूक करण्यापेक्षां हा खोटेपणा तुला योग्य ठरला असता."

" पण हातचा पैसेवाला दुसऱ्या डॉक्टरच्या घरीं पोंचविण्याचा हाहि

आत्मघात झाला नसता काय ? दामोदर सावकाराला आजारी असायचं वेड होतं, तसं रणछोड गुजराला मुलाचा बाप होण्याचं वेड होतं."

" धोंडशास्त्र्याच्या विधवा भावजयीला तूं दिलेलीं औषधं नैतिक दृष्ट्या योग्य होतीं काय ?"

" धोंडशास्त्र्यासारख्या एका प्रतिष्ठित नागरिकाची आणि त्यापेक्षांहि एका असहाय्य विधवेची बेअब्रू मीं वांचविली. अशा प्रसंगीं नीतिअनीतीचा विचार करण्यापेक्षां दोन माणसांना बेअब्रूपासून वाचंविणं मला अधिक इष्ट वाटलं."

" चुकून एकादवेळ प्रमाद घडला तर तुझं हें म्हणणं अयोग्य असलं तरी खपवून घेतां आलं असतं. पण धोंडशास्त्र्याची आणि त्याच्या भावजयीची अब्रू तूं तीनचारदां वांचविलीस हें कसं क्षम्य ठरेल ? बाकी यावर तुझं मघाचं उत्तर आहेच. त्यांनीं दुसऱ्या डॉक्टरकडून आपलं काम करून घेतलं असतं—म्हणून तूंच तें करीत होतास असंच ना ? बरं. राहूं देत या घाणेरड्या गोष्टी. तूं आपल्या रुग्णांना घ्यायला सांगत होतास तीं औषधं एका ठराविक औषधविक्र्यांकडून आणि ठराविक जर्मन कारखानदाराचींच कां असत ?"

" जर्मन कंपनीचीं औषधं उत्कृष्ट गुणकारी आहेत अशी माझी खात्री पटली असल्यामुळं मी तींच घ्यायला लावीत होतों. टॉम मरेकडं त्या औषधांचा ताजा आणि भरपूर स्टॉक असे आणि तो किंमतहि वाजवी घेई."

" पुणेंमुंबईच्या आणि कलकत्त्याच्या औषधी कारखानदारांनीं बनविलेलीं औषधं उत्तम गुणकारी ठरतात, असा स्वानुभव तुझ्या व्यवसायबंधूंनीं तुला सांगितला होता. त्यांचा पुरस्कार करण्याबद्दल त्या कारखानदारांच्या प्रतिनिधींनीं तुला विनंतीहि केली होती. तुझ्या गांवच्या जोशी औषधविक्र्याच्या दुकानांत त्या औषधांचा सांठाहि होता आणि किंमतींतहि तीं औषधं स्वस्तच होती. देशी कारखानदारांचीं औषधं कमी गुणकारक कां आणि जर्मन औषधं अधिक गुणकारी कां, हें तुला सांगतां आलं असतं का ?"

" जर्मन मालाची सर देशी जिनसांना कालत्रयीं येणं शक्य नाहीं."

" धर्ममहाराज, डॉक्टर जिवाजी भस्मे यानं माझ्या प्रश्नांना दिलेलीं उत्तरं धर्मसभेनं ऐकलीं. जिवाजी हा एका शहरांतील स्थानिकस्वराज्याच्या दवा-

खान्यांत मुख्याधिकारी म्हणून काम करीत होता. नोकरीच्या ठराविक वेळां-व्यतिरिक्त याला खासगी रीतीनं वैद्यव्यवसाय करायला मोकळीक देण्यांत आली होती. स्थानिक स्वराज्यानं गरीब नगरवासीयांना वैद्यकीय मदत विनामूल्य मिळावी अशी योजना केली असली तरी ती फारच थोड्या गरीबांना मिळे. डॉक्टर भस्मे याच्या नोकरीचा बहुतेक वेळ नगरपालिकेचे कार्यकारी मंडळाचे सदस्य आणि नगरपालिकेंतील मोठे अधिकारी यांच्या तैनातींत खर्च होई. त्यांचं बोलावणं आलं कीं वाढलेलें ताट बाजूस सारून हा धांवत सुटे आणि त्यांना आणि त्यांच्या घरच्या माणसांनाच नव्हे, तर त्यांनीं पाळलेल्या मांजराकुत्र्यांनाहि हा औषधोपाय करी. आपण पशुवैद्य नव्हे, याचाहि त्याला त्यावेळीं विसर पडे. चुनीलाल शेटजींच्या कुत्र्याची जखम यानं आपल्या हातांनीं धुवून तीवर पट्टी बांधली आहे! नगर-पालिकेचे हे मानकरी रोगजर्जर झाले म्हणजेच याला बोलावीत, असं नव्हे, तर अगदीं क्षुल्लक कारणासाठींसुद्धां याला ताणून नेत. मुख्याधिकारी म्हणजे चीफ ऑफिसर यांच्या तृतीय सौभाग्यवतीच्या बोटाला गळपट्टा विणतांना थोडीशी सुई बोंचली, तर दहा घटका रात्रीला याला बोलावणं आलं आणि हा गेला. आणि बिब्ब्याच्या तेलाचा एक बारीकसा टिपका बाईसाहेबांच्या बोटाला यानं लावला ?"

" धर्ममहाराज, नगरपालिकेचा दवाखाना आणि डॉक्टर, दाखवाय-पुरता गरीब लोकांसाठीं असला, तरी त्यांचा खरा उपयोग या मानकऱ्यां-नाच होई. दवाखान्यांतलीं भारी किंमतीचीं आणि महत्त्वाचीं औषधं त्यांच्या-साठींच खर्च होत. दवाखान्यांतलीं उपकरणंहि त्यांच्या घरीं गुंतून पडलेलीं असत. त्यांची उस्तवारी करून वेळ उरला तर डॉ. भस्मे दवाखान्यांत धांवती खेप टाकी, आणि दीनदुबळ्या रोग्यांची उभ्याउभ्या पाहणी करून कांहींतरी तुरटखारट मिश्रणांवर त्यांची बोळवण करी. 'इथं कशाला आलांत ? तुमच्या बापानं ठेवलीं आहेत औषधं! गाढव लोक दुखणीं जडवून घेतात आणि आम्हांला त्रास द्यायला येतात' अशीं याचीं बोलणीं गरीबांना खावीं लागत आणि तीं त्यांना व्याधीपेक्षांहि अधिक दुःखदायक होत. कोणी फार आजारी आहेसा दिसला कीं 'इथं नाहीं बरा व्हायचास; साहेबाच्या मोठ्या दवाखान्यांत जा' असं तपासून न पाहतां आणि

स्वाधीनचे उपाय न करतां हा सांगून टाकी. आजारी माणसाला औषधांपेक्षांहि वैद्याच्या सहानुभूतीच्या शब्दाची आणि त्यानं धीर देण्याची अधिक आवश्यकता असते. पण या डॉक्टर भस्म्यांकडून धीराचे आणि सहानुभूतीचे शब्द कधीं ऐकायला मिळायचे नाहींत. 'तुला कशाला आतां औषध ?' असं यानं गरीब रोग्याच्या तोंडावर म्हणावं आणि त्या बिचाऱ्यानं उद्यांऐवजीं आजच 'राम' म्हणावं, असं शेंकडों वेळां झालं आहे. याच्या या अक्षम्य वर्तनाबद्दल जाब विचारूं शकतील अशा वरिष्ठांचीं तोंडं यानं आपल्या कर्तव्यतत्परतेनं बंद करून टाकलीं असल्यानं गरीबांविषयींची बेपर्वाई बिनधोकपणें चालू होती. "दुर्बल खरा, पण डॉक्टर जिवाजी भस्म्यांकडून सत्तेनं औषधोपचार करून घेणारा एक वर्ग होता. तो म्हणजे नगरपालिकेच्या कनिष्ठ नोकरांचा. त्यांच्याकडं लक्ष देत नाहीं म्हणण्याची डॉक्टर जिवाजीला सोय नव्हती. पण त्यांच्या बाबतींत करतां येईल तितकी चालढकल प्रारंभीं करायची आणि दुखणं विकोपाला गेल्यावर रोग्यापेक्षां स्वतःच घाबरं होऊन धांवपळ करायला लागायचं, असा याचा प्रकार होई. यानं प्रारंभींच योग्य ती दक्षता न घेतल्यामुळं अनेकांचीं दुखणीं विकोपाला जात आणि कांहींचीं प्राणघातक झाल्याचीं उदाहरणं आहेत. रामजी मुकादम पोटांत कळ येत असल्याची तक्रार घेऊन याच्याकडे आला आणि यानं त्याला तपासून न पाहतांच सारक औषधं देऊन बोळवण केली. पण खरोखर आंतड्यांत विकृति झाल्यामुळं त्याला दुःसह वेदना होत होत्या. चार दिवस त्याला त्याच अवस्थेंत पिचत ठेवून तो मरणोन्मुख झालेला पाहिल्यावर यानं त्याची शेजारगांवच्या मिशनऱ्यांच्या दवाखान्यांत रवानगी केली. पण तोंपर्यंत आंतडीं कुजून रक्तांत विषार भिनल्यामुळं शस्त्रक्रियेचाहि कांहीं उपयोग होऊं शकला नाहीं. 'दोन दिवस आधीं आला असता तरीहि रामजी वांचला असता' असं तिथल्या शस्त्रवैद्यांनीं याच्याचपाशीं बोलून दाखविलं.

"धर्ममहाराज, नगरपालिकेच्या दवाखान्यांत याचा असा हलगर्जीपणा चालत असला, तरी बाहेरच्या खासगी गिऱ्हाइकांना दाखवितां येईल तितकं अगत्य हा दाखवीत होता. आपला मुशाहिरा घेतांना यानं कधीं दयामाया दाखवली नाहीं. ठरलेली दक्षिणा घेऊन वर त्यांच्या मळया—

शेतांतल्या जिनसाहि हा लुबाडून आणी. पण पैसे घेऊन कां होईना, हा त्यांचं रोगनिवारण बऱ्या प्रकारें करी. यानं आजूबाजूच्या लोकांत 'डागदार चांगला नि हातगुणहि चांगला' असा लौकिक मिळवला होता हें जितकं खरं, तितकंच निर्धनांना याचा कधीं उपयोग झाला नाहीं हेंहि खरं. संभाजीचं उदाहरण धर्मपीठापुढं आहेच."

"ज्यांच्यासाठीं मुख्यतः याची खरोखर नेमणूक झाली होती त्या गरीब नागरिकांची सेवा करणं हें डॉक्टर जिवाजी भस्म्याचं मुख्य कर्तव्य होतं. पण त्या गरीब लोकांची अवहेलना करून ज्यांनीं याची नेमणूक केली होती त्या संपन्न मिजासखोरांची चाकरी हें आपलं प्रमुख कर्तव्य यानं मानलं. याबद्दलच मी याच्यावर कर्तव्यच्युतीचा आरोप करीत आहें. याच्या या कर्तव्यच्युतीमुळं कांहीं हतभागी जीव मृत्युमुखीं पडले. कांहींची रुग्णावस्था दीर्घकाळ टिकून त्यांना जिवंतपणीं प्राणांतिक वेदना सहन कराव्या लागल्या. म्हणजे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणें यानं जनहत्या केली. मी करीत असलेला जनहत्येचा आरोप घडलेलीं उदाहरणं देऊन मीं सिद्ध केला आहे. त्याबद्दल आतां कसलाच संशय अथवा संदिग्धपणा उरलेला नाहीं.

"धर्ममहाराज, डॉक्टर जिवाजी भस्मे स्वदेशी औषधांऐवजीं जर्मन औषधं आणि तींहि विदेशी व्यापाऱ्यांकडूनच घ्यायला लावीत होता, म्हणून मी याच्या-वर परधार्जिणेपणाचा आरोप करीत आहे. रोग्याला औषध द्यायचं तें उत्तम असावं अशी वैद्याची दृष्टि असली तर ती प्रशंसनीय ठरेल.पणडॉक्टर जिवाजीनं जर्मन औषधांची निवड केली, ती त्यांच्या गुणामुळं केलेली नसून आपल्या फायद्यासाठीं केलेली होती. हिंदी औषधं याच्यापुढं होती. त्या औषधांत कोणतीं द्रव्यं कोणत्या प्रमाणांत घातलेलीं आहेत हेंहि याच्यापुढं होतं. तीं द्रव्यं आणि तीं प्रमाणं चुकीचीं आहेत असं याला म्हणतां येण्यासारखं नव्हतं. मग हीं घरचीं औषधं अव्हेरून त्याच द्रव्यांचीं तोच गुण देणारीं जर्मन औषधं घेणं हा परधार्जिणेपणा नव्हे काय? जर्मन औषधांचा विदेशी विक्रेता याला आतून बट्टा पोंचवीत होता एवढ्यासाठींच याला त्या औषधांचा खरा लोभ होता. आपल्या दहापांच रुपये लाभासाठीं शेंकडों रुपये विदेशी लोकांच्या पदरांत टाकणं हें क्षम्य ठरेल काय? याचा विचार करून धर्मपीठानं योग्य तो निर्णय द्यावा अशी माझी प्रार्थना आहे."

"चित्रगुप्ता, तूं आपले आरोप चांगल्या प्रकारें सिद्ध केले आहेस आणि त्या आरोपाखालीं डॉक्टर जिवाजी भस्मे अपराधी आहे यांत शंका नाहीं. तरीपण तो नुसताच अपराधी आहे कीं अपराधाबरोबर सत्कृत्यहि त्यानं केलीं आहेत, याचा विचार करणं अवश्य आहे असं मला वाटतं. मनुष्य-बल मर्यादित असतं. एक मनुष्य अनेकांच्या अडचणी निवारूं शकेलच असं नाहीं. त्याचप्रमाणं मनुष्य प्रापंचिक असतो आणि त्याला प्रपंचपोषणार्थ द्रव्यसंपादनाची आवश्यकता असते या गोष्टी विचारांत घेतल्या तर हा जिवाजी भस्मे डॉक्टर असला तरी मनुष्य होता, त्याचं सामर्थ्य कांहीं लोकांच्या सेवेला पुरेसं असलं तरी अगणित रोगपीडितांच्या पीडा निवारण्याला तें अपुरं होतं. आणि तो प्रापंचिक असल्यानं त्यानं द्रव्यसंपादनावर दृष्टि ठेवणंहि साहजिक होतं. त्याचं पहिलं आयुष्य जें मला दिसतं तें निर्धन होतं आणि उपकाराचं आणि ऋणाचं ओझं डोक्यावर घेऊनच याला विद्यासंपादन करावं लागलं होतं. गरीबीचे चटके सहन केल्यानंतर श्रीमंतीचा अभिलाष मानवी मनांत निर्माण झाला तर तो स्वाभाविक नाहीं का? श्रीमंतीचा विचार सोडला तरी ऋणभार दूर करण्यासाठीं यानं द्रव्यदृष्टि ठेवली पाहिजेच होती, असं नाहीं कां म्हणतां येणार?

"चित्रगुप्ता, यानं कोणत्या कां निमित्तानं होईना, पुष्कळ मानवांना रोगविमुक्त केलं आहे. आणि त्यांचं आयुष्य वाढविलं आहे असं तूंहि मान्य केलं आहेस. याचे कांहीं रोगी दगावलेहि असतील. पण डॉक्टर झाला तरी तो सर्वज्ञ असला पाहिजे असं थोडंच आहे! त्याला त्यांच्या रोगांची परीक्षा झाली नसेल किंवा त्याचे अंदाज चुकले असतील हें मनुष्यबुद्धीला साहजिक असं नाहीं का? चित्रगुप्ता, धर्मपीठाचा निर्णय घोषित करण्यापूर्वी प्राण्याच्या जीवनकथेची एकच बाजू न पाहतां सर्व बाजूंनीं त्याची चिकित्सा करणं अवश्य आहे. त्या जीवनकथेंत सकृद्दर्शनीं महदपराध दिसले तरी तेवढ्यावरच न्यायदान न करितां ते अपराध कां घडले, ते त्यानं बुद्धिपुरस्सर केले कीं परिस्थितीनं ते त्याच्याकडून घडविले हेंहि पाहिलं पाहिजे. त्याचप्रमाणं त्यानं केलेल्या सत्कृत्यांचं योग्य तें फल त्याच्या पदरांत टाकलं पाहिजे."

"गुरुदेव, चित्रगुप्ताचा दावा, त्याचं त्यानं केलेलं समर्थन आणि

संग्रहालय, अनुक्रम ३०६१ विभाग पां. व. क्रमांक २६ नां. दि. ५१

त्यावर मला वाटणाऱ्या शंका आपण ऐकल्या. या सर्वांचा विचार करून आपण आपला अभिप्राय द्यावा अशी माझी प्रार्थना आहे."

" यमधर्मा, जिवाजी भस्मे हा सामान्य मानवाहून वेगळ्या व्यवसायांतला मानव असून त्या व्यवसायाचे उत्पादक नावाने धन्वंतरी या सभेंत उपस्थित आहेत. म्हणून या दाव्यांत त्यांचा अभिप्राय तुला अधिक मार्गदर्शक ठरेल. यासाठीं त्यांनीं याविषयींचं आपलं मत व्यक्त करावं अशी मी तुझ्यावतीनं त्यांना विनंति करितों.

" देवगुरूंची आज्ञा मला शिरोधार्य आहे." धन्वंतरि म्हणाले. " यमधर्मा, परमेश्वरानं समुद्रमंथन करून आमची उत्पत्ति केली. आणि आम्हां भावंडांना निरनिराळीं कार्यं वाटून दिलीं. आपण निर्माण केलेल्या प्राणिसृष्टीनं मिळालेल्या आयुर्मानांत आरोग्यसंपन्न रहावं यासाठीं त्यांना सहाय्य करण्याचं काम माझ्यावर सोंपविलं. हें कार्य दिसायला अवघड असलं तरी अत्यंत सोपं होतं. आरोग्य दूषित न होईल असे उपाय शोधून काढून तेवढे प्राण्यांना सांगितले आणि तेवढे त्यांनीं पाळले कीं त्यांना वैद्याची आवश्यकताच नाहीं हें ओळखून मी प्राणिसृष्टीला निरोगी राहण्याचा मंत्र पढविला. ' हितभुक् मितभुक् तो अरुक् ' हा तो महामंत्र आहे. प्राण हा अन्नमय असल्यानं अन्नाच्या गुणदोषांवर त्याचं स्वास्थ्य अवलंबून असणार हें स्पष्टच आहे. म्हणूनच, " हितकर आणि मित आहार म्हणजे आरोग्य " हा मंत्र मीं सिद्ध केला. मानवेतर प्राणिसृष्टीनं हा मंत्र स्वीकारला आणि तिला त्याचा फायदाहि मिळत असलेला दिसतो. विहित अन्नाचंच ते सेवन करितात आणि हवं तेवढंच खातात. अन्नदोषांमुळं आरोग्य बिघडवून घेतलेला प्राणी मानवेतर प्राणिसृष्टींत क्वचित्‌च आढळतो.

" पण यमधर्मा, मनुष्यप्राण्यानं अन्नसेवनाच्या कामीं अक्षम्य अनास्था चालविली आहे. त्याला प्राप्त झालेल्या बुद्धीचा हा परिणाम आहे कीं काय कोण जाणे ! अन्नसेवनाच्या कामीं तरी आपण निसर्गाचे निर्बंध कशासाठीं पाळायचे असं त्याला वाटतं. वाटेल तें आणि वाटेल तितकं खाण्याचं स्वातंत्र्य आपणांस असलंच पाहिजे, अशी तो निसर्गाशीं हुज्जत

घालूं लागला असून आपला हेका चालवूंहि लागला आहे. पण निसर्ग मानवाहून बलशाली आहे. तो या अत्याचाराची गय कशासाठीं करील ? ' अहितभोजी आणि अमितभोजी ' मानवांवर रोगास्त्र सोडून तो त्याला जर्जर करूं लागला आहे. जर्जर झाल्यानंतर मग त्याला आपली असहाय्यता उमगते, आणि आपलं रक्षण करण्याबद्दल तो माझा धांवा करायला लागतो. यमधर्मा, प्राण्याचं आरोग्य बिघडूं न देणं हें माझं कर्तव्य पण बिघडलेलं आरोग्य सुधारणं असा आतां उलटा प्रकार होऊन बसला आहे.

" यमधर्मा, मानवसृष्टीची वाढ होऊं लागली आणि मला एकट्याला त्यांच्या रोगनिवारणाचं काम उरकेना म्हणून मी वैद्यांच्या रूपानं माझे प्रतिनिधि भूतलावर पाठविले. त्यांना अलीकडं ' डॉक्टर ' ही संज्ञा प्राप्त झाली आहे. हे माझे प्रतिनिधि मानवांतीलच असल्यामुळं त्यांच्याकडूनहि मानवी प्रमाद घडतात. मुख्य कर्तव्याचा त्यांना विसर पडतो आणि साहजिकच त्यांच्याकडून अनाचार घडतात. मीं स्थापिलेल्या धन्वंतरि सांप्रदायांतील प्रत्येक व्यक्ति ही ईश्वरतुल्य पूजनीय व्हावी अशी माझी महत्त्वाकांक्षा होती. जगांतील सर्व हिरे माणकं देऊनहि जे विकत येणार नाहींत, आणि जे फक्त परमेश्वरच देऊं शकतो, असे अमोलिक प्राणरक्षण करण्याचं दिव्य कार्य या माझ्या प्रतिनिधींना करावयाचं असतं. मग यांच्याइतका दुसरा मोठा उपकारकर्ता कोण असूं शकेल ? प्राणसंकटांत सांपडलेला आर्त प्राणी दिसतांच धांवून जावं आणि त्याला दुःखमुक्त करून दुवा घ्यावा, अशी त्यांना माझी सांगी आहे. औषधापेक्षांहि रोग्याला आणि त्याच्या परिवाराला वैद्यांकडून सहानुभूतीचे, आशेचे शब्द पाहिजे असतात म्हणून त्यांनीं निराशेचे किंवा कठोर शब्द चुकूनहि उच्चारतां कामा नयेत असा हितोपदेश मीं त्यांना केला होता. हांकेसरशीं धांवून येणारा आणि रोग्याचं मन उल्हसित करणारा वैद्य अचूक औषधयोजना करणाऱ्या वैद्याइतका—कांकणभर जास्तच—लोकप्रिय होतो हें मी त्यांना सांगितलं होतं. पण माझा उपदेश मानवलोकांतले वैद्य अवमानूं लागले आहेत. रोगग्रस्तांच्या अनुकंपेपेक्षां धनमानाची लालसाच त्यांच्या मनांत प्रबल होऊन बसली आहे. रोगी गरजू आणि आपला उपकारकर्ता; उपकारकर्त्यानं उपकृतांशीं

वाटेल तसं बोललं चाललं तर तो त्याचा अधिकारच आहे, असा गैरसमज त्यांनीं करून घेतला आहे. यमधर्मा, या डॉक्टर जिवाजीसारखे माझे कांहीं प्रतिनिधि द्रव्यलंपट, कठोर आणि कटुभाषी झालेले पाहून माझ्या मनाला मनस्वी वेदना होतात.

" सज्जन कीं दुर्जन याचा विचार वैद्यानं करायचा नसतो. अधमाधम माणूस जरी रोगग्रस्त होऊन आला तरी वैद्यानं त्याला रोगमुक्त करावं. तरीपण स्वाभाविक शारीरिक व्यापाराला रोग समजून सद्वस्तूंचा विनाश वैद्यानं करतां कामा नये. तथापि द्रव्यलोभानं धोंडशास्त्र्यासारख्याच्या सोयीखातर डॉक्टर जिवाजीसारखे लोक, करूं नये त्या गोष्टी करतात. माझ्या सांप्रदायाच्या नियमाविरुद्ध आहे हें. वैद्यानं करूं नयेत असे प्रमाद या डॉक्टर जिवाजी भस्म्यानं केले आहेत, असा माझा एका वाक्यांत अभिप्राय आहे. तो मानवी नीतिनियमांप्रमाणं किती दंडनीय आहे हें माझ्यापेक्षां देवगुरूच विशद करून सांगतील. "

" यमधर्मा, मानवी नीतिनियमांचाहि यानं भंग केला आहे. द्रव्यलोभ हा याचा प्रमुख अपराध आहे. द्रव्य संपादन निषेधार्ह नाहीं. कुबेराचं भांडार आपल्या हातीं घ्यावं अशी महत्त्वाकांक्षाहि मानवानं बाळगावी आणि सन्मार्गानं प्रयत्न करून ती सफल करून घ्यावी, त्याबद्दल त्याचा गौरवच होईल. आपल्या दयामय वर्तनामुळं व कर्तव्यतत्परतेमुळं अमित धन आणि देवतुल्य मान मिळविणारे भिषग्वर आज भूतलावर आहेतहि. डॉक्टर जिवाजीचं मुख्य कर्तव्य गरीब नागरिकांची सेवा करणं हें होतं. त्यासाठींच याला निर्वाहापुरतं वेतन मिळत होतं. पण ज्यासाठीं वेतन घेतलं, तें काम यानं केलेलं नाहीं. निर्वाहाचं साधन सांभाळण्यासाठीं सावध असणं अवश्य असलं, तरी वरिष्ठांची खुशामतच केली पाहिजे असं नाहीं. ती करून यानं कर्तव्य न करण्याची सवड मिळविली. खासगी व्यवहारांतहि यानं पैशासाठीं आणि पैशापुरतीच धडपड केली. दुःखितांच्या दुःखनिवारणार्थ माणसानं लक्ष दिलं पाहिजे ही माणुसकी याच्या आचरणांत दिसत नाहीं. पापी जनांच्या पापक्रीडांना प्रोत्साहन न देणं हें मनुष्यकर्तव्य असून तें डॉक्टर जिवाजीनं पाळलेलं नाहीं. उलट धोंड-

शास्त्रांच्या पापग्रंथांच्या आवृत्त्यावर आवृत्त्या काढण्याला यानं हातभार लावला. पैसा मिळतो म्हणून निरोगी माणसांना नुसतं पाणी औषध म्हणून पाजलं. हा स्पर्धेचं भय सांगतो पण तें समर्थनीय नाहीं. ' दुसरा चोर चोरी करील त्यापेक्षां आपणच करून टाकली ' असं म्हणणं न्याय्य होईल काय ? याचा यमधर्मा, तूं विचार कर. विश्वबंधुत्व हें मानवाचं श्रेष्ठतम ध्येय ठरेल. पण तो दूरचा टप्पा गांठण्याआधीं स्वजनबंधुत्व सांभाळलं पाहिजे. स्वदेशी कारखानदारांना धिक्कारून जर्मन कारखानदारांची भर करणं हें या दृष्टीनं अपराधांत जमा होईल. यमधर्मा, कोणत्याहि दृष्टीनं पाहिलं तरी हा डॉक्टर जिवाजी भस्मे कर्तव्यच्युत, जनघातकी आणि परधार्जिणाच दिसतो. यमधर्मा, कांहीं सत्कृत्यं यानं केलीं म्हणून हा निरपराधी ठरूं शकत नाहीं. सहस्र सत्कृत्यं एकाच पापानं धुवून जातात. जन्मभर सदाचारी म्हणून वागलेल्या मानवानं एक चोरी, एक व्यभिचार किंवा एक हत्या केली तरी तें पापच तेवढं शिल्लक राहतं, आणि मानवाला त्याचं शासन भोगावं लागतं. म्हणून माझ्या मतें हा डॉक्टर जिवाजी भस्मे निर्विवाद दंडनीय आहे. तुला योग्य वाटेल तो निर्णय तूं दे. "

" देवगुरो, भगवान् धन्वंतरींनीं आणि आपण माझी संशयनिवृत्ति पूर्णपणें केली आणि आतां निःशंक मनानं मी माझा निर्णय देतों. याच्या चारित्र्याला अनुरूप असे रोगजंतूंचे शतजन्म मी याला देतों. सूक्ष्म पण घातकी जंतुरूपानं हा मानव शरीरांत घर करील आणि त्यांचा संहारकरितां करितां आपलाहि संहार करून घेईल, आणि तोहि मानव जन्मांतल्या आपल्या व्यवसायबंधूंकडून. ते याच्यावर विषवर्षाव करून याला ठार मारतील आणि तें विष पचवून टाकण्याइतका चिवटपणा याच्या अंगीं असला तरी ठार केलेल्या जीवाबरोबर या जंतुरूप जिवाजी भस्म्याचंहि भस्म होऊन जाईल.

" चित्रगुप्ता, दुसरा प्राणी धर्मपीठाला सादर कर. "

" धर्ममहाराज, याचं नांव कोमल नकले. हा भूलोकीं कवि आणि लेखक म्हणवून घेत होता."

" मग याचा इथंहि गौरव व्हावा अशी तुझी इच्छा आहे काय ? "

" नाहीं, गौरवार्ह कलावान् म्हणून याला मी धर्मपीठापुढं सादर केला नसून अपराधी म्हणून धर्मनिर्णयार्थ याला इथं उभा केला आहे."

" चित्रगुप्ता, तुझ्या मागणीचा अर्थ माझ्या लक्षांत येत नाहीं. कवि, लेखक होणं हा मानवाचा प्रमाद कसा होऊं शकेल ? रसिकांचं रंजन व शिणलेल्यांना उत्तेजन देण्याचं कार्य हे लोक करतात. सामान्य दृष्टीला दिसूं शकत नाहीं असं विश्वांतलं मांगल्य कवि पाहतो, आणि आपल्या बांधवांना दाखवितो. तेजाचीं स्तुतिस्तोत्रं तो गातो; विशुद्ध प्रेमाचं माधुर्य, वात्सल्याची कोमलता, सहानुभूतीची आर्द्रता, यांचा तो अनुभव घेतो, लोकांनाहि देतो. खचलेल्या खिजलेल्या मानवी मनावर स्फूर्तीची फुंकर घालून त्याला उत्कर्षगामी आणि पराक्रमी करण्याचं सामर्थ्य कवींच्या काव्यांत असतं. अशा कवींना अपराधी म्हणणं कसं उचित होईल ? त्याचप्रमाणें लेखकहि सन्मानार्ह प्राणी आहे असं मला वाटतं. मानवानं आतांपर्यंत केलेली ज्ञानविज्ञानाची संपादणी ग्रंथरूपानं चिरंजीव करण्याचं महत्कार्य लेखकच करीत आले आहेत. विश्वोत्पत्ति कशी झाली, तिचीं स्थित्यंतरं कशीं झालीं, आज विश्व कोणत्या अवस्थेंत आहे आणि उद्यां त्याचं स्वरूप कसं व्हायचं आहे, याचं दिग्दर्शन लेखक करतात. विशाल विश्वांतील मानवाचं स्थान कोणतं, त्याचं कर्तव्य काय, या गोष्टींची स्वबंधूंना जाणीव देतात ते लेखकच. भूतकालाचं चित्र मानवांना दाखवून उज्वल भविष्याकडं त्याला नेण्याचं कार्य लेखकांवांचून कोणीं केलं आहे ? भूतकालीन यातायातीनं आणि ठेंचा-ठोकरांनीं निरुत्साह झालेल्या मानव मनाशीं गुजगोष्टी बोलून, हास्यविनोद करून, त्याला नवचैतन्य आणण्याचं महत्कार्य करणाऱ्या लेखकाला अपराधी

म्हणून दंडण्याचं पातक कधीं कधीं भूलोकीय न्यायालयं करीत असलीं, तरी हें धर्मपीठ तेंच पातक करील अशी चित्रगुप्ता, तुझी अपेक्षा आहे काय ?"

"प्रभो, अशी भलतीच अपेक्षा हा दास करीत नाहीं आणि करणारहि नाहीं. प्रभूंनीं सांगितलं तें दिव्य कार्य ज्या महाभागांनीं केलं, आणि जे करीत असतात, त्यांच्याविषयीं माझ्या मनांतहि आदरच वसत असतो, हें प्रभू जाणत असतील. वेदव्यास, महामुनि वाल्मीकि, कालिदास आदिकरून प्राचीन कविलेखकांप्रमाणं विद्यमान कविलेखकांना मानाचं स्थान दिलं जावं, अशीच धर्मपीठाची प्रार्थना मी करीत आलों आहे. या कोमल नकल्याविषयींहि माझ्या मनांत हेवादावा नाहीं. तरीदेखील पात्रता नसतांना यास केवळ तज्जातीय म्हणून गौरविणं अन्यायाचं होईल अशी मला भीति वाटते. कोमल नकले याची जीवनकथा विचारून घेऊन तो सन्माननीय कविलेखकांत समाविष्ट करण्याच्या योग्यतेचा आहे असं प्रभूंनीं ठरवलं, तर मलाहि आनंदच होईल."

"चित्रगुप्ता, तुझं म्हणणं योग्य असंच आहे. कोमल, तुला कळूं लागल्यापासूनची तुझी जीवनकथा सांग पाहूं ?"

कोमल खांकरून घसा साफ करूं लागला. त्यानें आपली जीवनकथा कविताबद्ध केली होती कीं काय कुणाला ठाऊक ? गणपति उत्सवांतल्या कवितागायनाच्या वेळीं कवि करतात, तशी चुळबूळ आणि खोकणं खांकरणं कोमलनं सुरू केलं खरं ! पण त्यानें तोंड उघडायच्यापूर्वीच चित्रगुप्त म्हणाला—

"प्रभो, निवेदनाचं पूर्ण स्वातंत्र्य याला दिलं तर याला काव्यगायनाची उबळ येईल आणि हा एकेक शब्द घोळघोळून म्हणूं लागला, तर याचं निवेदन पूर्ण होण्याला अमर्याद कालक्षय होईल. त्यापेक्षां अवश्य ते प्रश्न विचारून उत्तररूपानं याचा इतिहास काढून घेणं श्रेयस्कर नाहीं कां ? तसं करायला मला आज्ञा असावी."

यमधर्मांनीं अनुज्ञा दिल्यावर चित्रगुप्तानें विचारिलें:—

"कोमल, तूं पहिला लेख किंवा कविता केव्हां लिहिलीस तें तुला आठवतं कां ?"

" न आठवायला काय झालं ? माझी पहिली कविता राजकुमाराच्या बारशादिवशीं झाली. राजपुत्राचा पाळणा जुळवला मीं !"

" तुझ्या धन्यानं तुला तो करायला सांगितला असेल ? "

" नाहीं. माझ्या शेजारी एक कवि रहात असत. त्यांनीं बारशाचा पाळणा केल्याचं मीं ऐकलं. त्यांना आपल्या कवितांची फार घमेंड असायची. मीं म्हटलं आपणहि कविता करून त्यांची घमेंड उतरवावी."

" म्हणजे तुझ्या कवितालेखनाचा उगम स्फूर्तीपेक्षां ईर्षेतून झाला, असंच ना ? "

" तसंच केवळ नाहीं. पाळण्याबद्दल राजेसाहेबांकडून बक्षीस मिळेल अशी आशाहि होती माझ्या मनांत."

" बरं, कविता लिहूं लागण्यापूर्वी रचनाशास्त्र, रसशास्त्र इत्यादींचा अभ्यास तूं केलास काय ? "

" त्या भानगडींत मी कधीं पडलों नाहीं, आणि त्याविना माझं कधीं अडलं नाहीं. मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या कविता वाचायच्या, दुसऱ्या कवींचीं कवितागायनं ऐकायचीं, एकादी कविता लोकप्रिय झालेली दिसली कीं, त्या थाटाची कविता आपण बनवायची, अशा रीतीनं मी छान कविता करायला लागलों आणि त्या प्रसिध्द व्हायला लागल्या."

" त्या लोकप्रिय झाल्या कां ? "

" तें मला कसं कळणार ? पण झाल्याच असल्या पाहिजेत. कारण मीं पाठविलेल्या कविता फार करून परत येत नसत. माझ्या कविता टाकाऊ असत्या तर संपादकांनीं त्या कशा स्वीकारल्या असत्या ? कांहीं दिवसांनीं मला सटासट कविता करायची एक झकास युक्ति सांपडली. माझ्या ओळखीच्या एका गृहस्थांनीं एक मासिक काढलं. त्याच्या कचेरींत पुष्कळ इंग्रजी आणि अमेरिकन मासिकं येत. त्यांतल्या इंग्रजी कवितांचं मराठीकरण मी करायला लागलों. इंग्रजी कल्पना मराठी चालीवर द्यायची हा माझा प्रयत्न संपादक मित्रांनाहि आवडला आणि माझ्या अशा कविता कितीतरी प्रसिद्ध झाल्या. "

" तुझ्या एकाद्या कवितेनं तुला स्वतःला गुंगवून टाकलं, असं तुला आठवतं कां ? "

" आठवतं. कवि जयवंत कवीची ' वात्सल्यविक्रास ' ही कविता फार गाजली. तिच्या ध्वनिमुद्रिकाहि निघाल्या. त्यानंतर त्याच चालीवर मीं ' मायामांगल्य ' ही कविता लिहिली. ती एका मासिकाच्या दिवाळीअंकांत प्रसिद्ध झाली. ती माझ्या बहिणींना म्हणून दाखवितांना त्यांच्या डोळ्यांतून पाणी आलं. माझाहि घसा दाटून आला. "

" तूं एकादं खंडकाव्य लिहिलं आहेस काय ? "

" लिहायचं मनांत होतं, पण तें जमलं नाहीं. मुख्य गोष्ट अशी कीं लिहिलं तरी तें प्रसिद्ध कोण करणार ? लांबलांब कविता मासिकांत छापीत नाहींत संपादक. "

" आतां तुझ्या गद्यलेखनाचा इतिहास सांग. तुझ्या गद्यलेखनाचा प्रारंभ कसा झाला ? "

" तरुणपणीं आम्ही मित्रमंडळी नाटकं करीत होतों. तीं करतां करतां नाटकी भाषा तोंडीं बसली आणि मला नाटकं लिहायची इच्छा झाली. एका पौराणिक आख्यानावर लिहिलं एक नाटक. आम्हीं मित्रमंडळींनींच तें बसविलं आणि गांवच्या उत्सवांत तें करून दाखविलं. गांवकऱ्यांना तें आवडलं. दुसरं नाटक लिहिलं, तें केलं, तेंहि त्यांना आवडलं. मग मला नाटकं लिहायचा नादच लागला. आतांपर्यंत पंचवीस तीस नाटकं लिहिलीं मीं. "

" नाट्यशास्त्राचा तरी तूं अभ्यास केला होतास काय ? "

" शास्त्र या दृष्टीनं मीं अभ्यास केला नाहीं. पण तंत्र माझ्या परिचयाचं झालं होतं. सुप्रसिद्ध नाटककारांचीं नाटकं करतांना कोणते प्रसंग प्रेक्षकांना आवडतात, कसली भाषा त्यांच्या मनावर परिणामकारक ठरते हें मी हेरलं होतं. आणि माझ्या नाटकांत तसले प्रसंग, तसले शब्दप्रयोग, घालण्याची सावधगिरी मी घेत होतों. कांहीं लोकप्रिय झालेल्या विदेशी नाटकांचीं मीं मराठी रूपांतरं केलीं. त्यांच्या लोकप्रियतेबद्दल तर प्रश्नच नव्हता. "

" नाटककाराचा निबंधलेखक, कथालेखक, कसा झालास ? "

" संपादकांच्या ओळखीमुळं. ते मला इंग्रजी मासिकं वाचायला देत आणि त्यांतल्या चांगल्या लेखांचा अनुवाद करायला सांगत. माझी आयती

प्रसिद्धी होणार असतांना मी कशाला मागं घेऊं? मी कित्येक लेख, कित्येक लघुकथा लिहून दिल्या संपादकांना–त्या एकाच नव्हे तर दुसऱ्याहि. कांहीं दिवसांनीं मी स्वतंत्र लेख लिहायला लागलों."

"स्वतंत्र लेखन कोणत्या प्रकारचं."

"वाटेल त्या. गोष्ट लिहावीशी वाटली; गोष्ट लिहिली. चरित्र लिहावंसं वाटलं; चरित्र लिहिलं. मुलाखत लिहावीशी वाटली; मुलाखत लिहिली. मला वाटलं तें आणि कोणी संपादक मागतील तें मी लिहून देऊं लागलों."

"आतांपर्यंतच्या लेखनकार्यापासून तुझा फायदा कोणता झाला?"

"लेखक म्हणून मला नांवलौकिक मिळाला हा खरा फायदा; आणि त्यामुळं माझ्या लिखाणाला बाजारभावहि थोडाफार यायला लागला, पुस्तकप्रकाशकांनीं माझीं पुस्तकं घेतलीं, छापलीं, विकलीं. त्यांचा धंदा चालला, मला चार पैसे मिळाले, माझा बोलबालाहि झाला. मला उत्सव-समारंभांत व्याख्यानाचीं आमंत्रणं यायला लागलीं. एकदोनदां मी अध्यक्षहि झालों. पांचसात पुस्तकं शिकलेल्या आणि खर्डेघाशी करणाऱ्या एका सामान्य माणसाची अशी भरभराट म्हणजे त्याचा लहानसहान कां लाभ म्हणायचा?"

"कोमल, तुझ्या भाग्योदयाचं कुणालाहि कौतुक वाटेल. पण त्याचा मोबदला म्हणून तूं लोकांना काय दिलंस?"

"मीं त्यांची वाचनाची भूक भागवली नाहीं काय?"

"अन्नसेवनानं बलप्राप्ति होते, तशी वाचनानं ज्ञानप्राप्ति व्हावी अशी अपेक्षा असते. तुझं लिखाण, लोकांची वाचनाची भूक भागवूं शकलं असेल कदाचित्! पण त्यामुळं त्यांचं बल किती वाढलं, हा माझा प्रश्न आहे. तुझ्या लिखाणानं त्यांचा ज्ञानविकास झाला असं तुला म्हणतां येतं काय? त्यांच्या अवतारकार्याची जाणीव तुझ्या लिखाणानं त्यांना करून दिली काय? तें कर्तव्य पार पाडण्याचा उत्साह आणि हिंमत त्यांच्या ठिकाणीं निर्माण केली काय? केलं पाहिजे काय, आणि करूं नये काय, याविषयींचा सारासारविचार तुझ्या लिखाणानं त्यांना सांगितला काय? आपला समाज, आपला देश, वैभवसंपन्न करण्या-

साठीं, निदान आत्मोद्धार करण्यासाठीं शक्तिबुद्धि वेंचण्याची प्रेरणा त्यांच्या मनांत तुझ्या लिखाणानं जागृत केली काय ? "

" यापैकीं कांहीं झालं आहे कीं नाहीं, हें मी कसं सांगूं ? तें लोकांचं लोकांना माहीत. पण तें झालंच नाहीं असं मानलं तरी लोकांच्या शिणल्या-भागल्या मनांचं रंजन माझ्या लेखनामुळ थोडं तरी झालं असलंच पाहिजे. मनुष्य अन्नसेवन करितो तें सगळंच कांहीं बलवर्धक असूं शकत नाहीं. घटकाभर आल्हाद देणारे शेवचिवड्यासारखे रुचकर पदार्थ त्याला हवे असतात. तितका जरी माझ्या लेखनापासून लोकांना आनंद झाला असेल तरी तें उपयोगीच ठरत नाहीं काय ?

" शिवाय मी असंहि म्हणेन कीं केवळ मनरंजनापुरतंच माझं लेखन होतं असं नाहीं. समाजाच्या सद्यःस्थितींतल्या अनिष्ट गोष्टींचं चित्रण मी माझ्या लघुकथाकवितादिकांत केलं आहे. पुरुषवर्गाची अरेरावी आणि स्त्रीवर्गाची कष्टप्रद अवस्था यांवर मी लेखनानं प्रकाश पाडला आहे. हास्यास्पद चालीरीति उजेडांत आणल्या आहेत. नैराश्य, दैववाद, अशा उत्कर्षविरोधक गोष्टींवर कोरडे ओढले आहेत. प्रयत्न, धारिष्ट, इत्यादि अभ्युदयकारक सद्गुणांची प्रशस्तीहि केली आहे. माझ्या लेखनाचा बारकाईनं अभ्यास केला तर त्यांत अशा गोष्टींचा प्रत्यय आल्यावांचून राहणार नाहीं. "

" कोमल, तुझं तुझ्या बायकोशीं वर्तन कसं होतं ? "

" अतिशय सलोख्याचं. आमच्यासारखं आनंदी जोडपं हुडकून सांपडायचं नाहीं, असं शेजारचे लोक म्हणत. "

" तिच्या सर्व इच्छा तूं पुरवीत होतास काय ? "

" बहुतेक पुरवीत होतों. आणि खरं सांगायचं तर ती समजूतदार असल्यामुळं मला ' नाहीं ' म्हणावं लागेल असं ती कांहीं मागायचीच नाहीं. "

" म्हणजे तिच्या समजूतदारपणामुळं अरेरावीच्या अपराधांतून तूं वांचलास. तिनं आपल्या मनांतली प्रत्येक इच्छा व्यक्त केली असती, तर रास्त असली तरीहि तूं मान्य केलीच असतीस असं नाहीं. महिनाभर माहेरीं राहण्याची तिची इच्छा असतांना आठवेच दिवशीं तूं तिला परत बोलावून घेतलं होतंस आणि तुझ्या चहाच्या वेळीं ती मैत्रीणींकडं बसायला

गेली म्हणून तूं तिच्याबरोबर चार दिवस अबोला धरला होतास हें खरं ना ?"

"माणसाला कधींतरी राग येतोच."

"चित्रगुप्ता, याच्या लेखनविषयापुरता आपणाला विचार करायचा आहे. याच्या गृहजीवनाबद्दल तुझा दावा नाहीं. मग हे तद्विषयक प्रश्न तूं कशासाठीं विचारतोस ?"

"माझ्या मुख्य दाव्याशीं संबंध येईल तेवढेच इतर प्रश्न मी याला विचारीन. हा संबंध मी प्रभूंना यथाक्रम विशद करून सांगेन. तोंपर्यंत मला प्रश्न विचारण्याची अनुज्ञा असावी."

"तथास्तु."

"कोमल, तुझे चिरंजीव व्यवसायार्थ दूर प्रांतीं निघाले, तेव्हां त्यांच्यावर तूं रागावला होतास. होय ना ?"

"बापाला मुलांबद्दल काळजी वाटली तर तो दोष ठरतो काय ?"

"ही गोष्ट वादग्रस्त आहे. पण कांहीं असलं तरी तूं त्यावेळीं मुलांवर रागावलास ही गोष्ट खरी. आतां असं सांग, मधूनमधून तुझ्या देशांत जीं आंदोलनं निर्माण होत, त्यांत तूं कधीं भाग घेतला होतास काय ? नाहीं ना ? उलट अशा आंदोलकांचा संबंध आपल्याशीं असल्याचा वहिम आपणांवर येऊं नये अशीच तुझी जपणूक असे. होय ना ?"

"कोतवालींतले लोक क्रूर वृत्तीचे असतात, संशयावरूनसुध्दां ते माणसाचा अमानुष छल करितात, असं मी ऐकलं होतं. म्हणून ते आपल्या वाटेला येणार नाहींत अशी दक्षता मी घेत होतों. शिवाय, आंदोलनांतले सर्वच कार्यक्रम मला मनापासून पटत नव्हते."

"धर्ममहाराज, कोमल नकलेला अधिक प्रश्न विचारण्याची आवश्यकता मला वाटत नाहीं. त्यांचं कविलेखकत्व मला दोषास्पद कां वाटतं, तें याच्या उत्तरांवरून धर्मपीठाला विशद करून दाखविण्याचा आतां मी प्रयत्न करितों. मला अनुज्ञा असावी. काव्य हें अंतर्यामींच्या उमाळ्यांतून उद्भूत व्हावं लागतं. कोमलच्या अंतःकरणांत तसा उमाळा कधींच आला नव्हता. सृष्टिसौंदर्य यानं मुळीं पाहिलंच नव्हतं ! आपल्या अंधेऱ्या खोलींत डांसढेंकणांचा मारा सोशीत असतांना हा वनदेवीची आणि कमलभृंगांचीं गाणीं

जुळवीत होता. अबलाछलाच्या, मातृप्रेमाच्या, प्रेमपूर्तीच्या, प्रेमभंगाच्या कठोर कोमल भावनांचा मनाला स्पर्शहि झाला नसतांना यानं त्यांचीं गीतं रचण्याचा उपद्व्याप केला. स्वतः ऐदी जीवन कंठीत असतांना यानं प्रयत्न-प्रशंसा चालविली. थोडक्यांत सांगायचं म्हणजे भावनांच्या संवेदना-पेक्षां, ईर्ष्येच्या टोंचणीतून याच्या कविता निर्माण झाल्या. काव्यशास्त्राचा अभ्यासहि यानं केलेला नव्हता. त्यामुळं दुसऱ्याची नक्कल करण्यावांचून याला गत्यंतर नव्हतं. म्हणजे याचं कवित्वं आपल्या पायानं चालत नव्हतं, दुसऱ्याच्या पांगूळगाड्यावर भार घालून तें पावलं टाकीतं होतं. चांगल्याची नक्कल करणंहि क्षम्य ठरेल. पण यानं केलेल्या कांहीं नकला निखालस हास्यास्पद ठरणाऱ्या आहेत. त्यांतलं एक उदाहरण नमुन्यापुरतं मी धर्मपीठाला सादर करितों. एका प्रसिध्द कवीची—

'**वत्स भेटला । माउलिचा विरहशोकसिंधु आटला ।।**" या काव्यपंक्तीचं याला दर्शन झालं. त्यासरशीं याची नकली प्रतिभा जागृत होऊन त्यानं कविता खरडली—

'**नयन बाटल्या । आईच्या रडुनि रडुनि दोन्हीं आटल्या ।।**'

"पुरचुंडी' नांवाच्या याच्या प्रकाशित कवितासंग्रहांतली ही कविता आहे. याच्या या असल्या कवितांवर टीका करितांना टीकाकारांनीं यांच्या नांवावरहि टीका केली होती. कोणीं याला 'नकल्या कवि' म्हणून हिणवलं, तर कोणी 'न कळे' अशी टिंगल केली.

"धर्ममहाराज, याला मानवलोकीं खरं महत्त्व मिळालं तें कवि म्हणून नव्हे; लेखक म्हणूनच हा विशेष गाजला. पण याला त्याबद्दलहि मी दोषी ठरवितों. नकला करूनच हा लेखकक्षेत्रांत घुसला. नामवंत लेखकांच्या लोकप्रिय झालेल्या लिखाणाची नक्कल करायला यानं सुरवात केली. एका-द्याची वसंत–वासंतीची प्रेमकथा प्रसिद्ध झालेली दिसली कीं हा माधव–मालतीची प्रेमकथा लिही. वसंत दुचाकीवर बसून वासंतीकडं जात असला, तर याचा माधव मोटारमधून जात असे. वासंतीच्या पायाला कांटा टोंचला असला, तर त्याच्या मालतीला विंचू चावे. वसंत–वासंतीच्या प्रेमपूर्तीला त्यांच्या वडिलांचा विरोध असला, तर माधव–मालती–मीलनांत कोणाची तरी सावत्र आई मोडता घाली. याचं निबंधलेखन पुष्कळसं अनुवादित

होतं, हें यानंच कबूल केलं आहे. म्हणजे तें बरं असलंच तर त्याचं श्रेय याला देतां येणार नाहीं. याला लेखनाची टगळ साधली होती. मधून मधून हास्यकारक कोटिक्रम याला करतां येत होते. आणि एवढंच याचं मुख्य भांडवल. याच्या सुदैवानं याला एक संपादक मित्र लाभले होते. चांगल्या मजकुराची वाण संपादकाला नेहमींच असते आणि पुष्कळदां कांहींतरी मजकूर घालून त्याला आपलं नियतकालिक सजवावं लागतं. साहित्य चांगलं आहे कां, हें पहाण्यापेक्षां तें वाईट नाहीं ना, अशा नजरेनं त्यांना मजकुराची भरती करावी लागते. आणि त्यासाठीं कोमल नकल्यासारखा कोणीतरी लेखक त्यांच्या हातांशीं असावा लागतो. अमुक एक प्रकारचा आणि अमूक एका लांबी रुंदीचा मजकूर पाहिजे म्हणतांच कोमल त्याची मागणी पुरी करूं लागला. साहजिकच याचं लिखाण वाचकांना वाचावं लागलं."

"देवाधिदेवा, माझा याच्याविरुद्ध दावा आहे तो इथूनच सुरू होतो. अभ्यासाचं नांव नसतां केवळ लेखनकर्म सफाईदार करतां येतं एवढ्याच जोरावर लेखक म्हणून वावरण्याचा माणसाला अधिकार पोंचतो काय? लेखक हा समाजाचा गुरु असतो. तो शास्त्रपारंगत नको काय? ज्याला शास्त्राचं पाठबळ नाहीं, असा उपदेश हा कल्याणकारक सदुपदेश ठरेल, कीं अकल्याणकारक दिशाभूल ठरेल?"

"देवाधिदेवा, मधेंच बोलल्याबद्दल क्षमा व्हावी. लेखक हा सर्वच वेळीं गुरु नसतो. बोधाप्रमाणं मनरंजनहि मानवाला पाहिजे असतं आणि तें त्याला देण्याचं कार्य कवि, लेखकाला करावं लागतं. देवाधिदेवा, सध्यां मानवलोकांतल्या पंडितांत साहित्यकला अनिर्बंध असावी, तिच्यावर ध्येयाचं बंधन नसावं, कलेसाठींच कलाविलास असावा, असा एक मतप्रवाह वाहत आहे. त्या मतानुसार कविलेखकांवर गुरुपणाची अपेक्षा लादतां येणार नाहीं. कविलेखक, मनःप्रेरणा होईल त्याप्रमाणं कलाविलास करतील. स्वतःचं मनरंजन हा प्रमुख उद्देश; त्यांच्या कलाविलासानं इतरांना आल्हाद होत असेल तर तो त्यांनीं उपभोगावा. कविलेखकांना लोकसेवा केल्याचं श्रेयहि नको, आणि त्यांनीं लोकसेवा केलीच पाहिजे अशी त्यांच्यावर जोखीमहि नको."

"देवाधिदेवा, कोमलचा हा आक्षेप निर्विवाद नाहीं. कलेसाठीं कला, कला सहेतुक कीं निर्हेतुक, हा मानवी पंडितांतला वाद अद्यापि अनिर्णित

आहे. ‘कलेसाठीं कला’ म्हणणाऱ्यांप्रमाणें ‘जीवनासाठीं कला’ म्हणणारे पंडितहि भूतलावर आहेत. हीं दोन्हीं टोकं ताणून धरणाऱ्यांच्या मधलाहि एक पंडितांचा वर्ग तिथं अस्तित्वांत आहे. ‘जीवनाशीं कलेचा संबंध असलाच पाहिजे असं जरी नसलं, तरी संबंध जोडल्यामुळं कलेची हानि होते असंहि नाहीं’ असं ते म्हणतात. कोमलसारखे लेखक या वादाच्या भानगडींत पडत नाहींत. ते आपल्याला सुचेल तें आणि साधेल तें लिहीत सुटतात. तें हेतुशून्य झालं तर ‘कलेसाठीं कला’ या मताचा आधार दाखवितात. त्यांत कांहीं ध्येयदर्शन घडलं तर ‘जीवनासाठीं कला’ या मतांत शिरतात. म्हणजे आधीं यांचं लेखन घडतं नि मग यांचं मत बनतं. ज्या लोकांसाठीं आपण वाङ्मयनिर्मिति करीत आहों त्यांना रुचतं काय, एवढंच हे पहातात. त्यांना आवश्यक काय आहे, याचा हे लोक विचारच करीत नाहींत. वाचकांनाहि करूं देत नाहींत. ज्या भूभागांत हा लेखक म्हणून मिरवला तिथल्या मानवसमाजांत बंधुता, ऐक्य, धारिष्ट, त्याग इत्यादि गुणांची कमतरता आहे आणि त्यामुळं त्या समाजाची अधोगति झाली आहे. या गुणांचा विकास त्यांच्यामध्यें करून त्यांना उत्कर्षगामी करणं हें तिथल्या कविलेखकांचं कर्तव्य आहे. पण कर्तव्याची त्यांना जाणीव नाहीं. हीन अवस्थेंतून आत्मोद्धार करून घेणारे मानवसमूह यांच्या शेजारीं भरभराटलेले पाहून त्यांच्या आचारविचारांचा पुरस्कार हेहि लोक करितात, नाहीं असं नाहीं. पण त्यांनीं ज्या शास्त्रशुद्ध पायावर आपला अभ्युदयमार्ग आंखला, त्या शास्त्राचं मर्म हे कधींच समजून घेत नाहींत. भरभराटलेल्या लोकांचं बाह्य स्वरूप तेवढं हे दाखवितात. लोकांना नवं कांहींतरी वाचायला मिळालं, एवढं समाधान मिळतं. पण अभ्युदय-साधनाचे मार्ग मात्र त्यांना समजत नाहींत. समजले तरी भलतेच कांहीं तरी समजतात. मार्गदर्शन केलं नाहीं तरी तें एकवेळ क्षम्य ठरेल, पण चुकीचे मार्ग दाखविणं हें खचित अक्षम्य आहे. या कोमलच्या लेखन-कार्याचा मार्गदर्शन हा हेतु नव्हता, असं याच्याच उत्तरावरून दिसतं. आणि निर्हेतुकपणें याच्या हातून कांहीं मार्गदर्शन झालं असेल तर तें कितपत परिणाम-कारक ठरलं असेल याची वानवाच! पण तें ठरावं तरी कसं? जो स्वतःच अंधारांत चांचपडत होता तो दुसऱ्याला कसलं मार्गदर्शन करणार?

" देवाधिदेवा, याच्या वैयक्तिक जीवनाविषयीं मीं विचारलेल्या प्रश्नांना यानं दिलेलीं उत्तरं या दृष्टीनं पारखून पहावीं, म्हणजे ते प्रश्न मी सकारण विचारले होते असं धर्मपीठाला दिसून येईल. स्त्रीवर्गाचं दास्य हें समाजाच्या प्रगतीला विरोधक आहे, असं मत यानं आपल्या लेखनांत व्यक्त केलं तरी आपल्या पत्नीला स्वातंत्र्य देण्याची उदारता याच्या अंतर्यामीं नव्हती. तरुणांना उद्यमशील आणि साहसी होण्याचा उपदेश यानं प्रसंगविशेषीं केला असेल, पण आपल्या तरुण पुत्रांना घराबाहेर सोडतांना याचं मन कच खात होतं. 'धारिष्टासारखा श्रेष्ठ गुण नाहीं' म्हणून यानं संदेश दिला असला तरी राष्ट्रीय आंदोलनांत आपल्या वांट्याला चुकून त्रास येईल या भयानं याची छाती सदैव धडधडत होती. लेखकाच्या लेखनाइतकंच त्याचं चारित्र्यहि लोक पहात असतात. जीवनाशीं विसंवादी लेखन परिणामशून्य होतं, अपकारक होण्याचाहि संभव असतो. म्हणून कोमल जातीय लेखक हे अपराधी आहेत असं माझं म्हणणं आहे. कोमल नकले या व्यक्तीपेक्षां लेखकवर्गाचा एक प्रतिनिधि म्हणून याच्यावर मी हा दावा मांडला आहे. धर्मपीठानं योग्य तो निर्णय द्यावा."

" देवगुरो, या प्रश्नावर मला आपला अभिप्राय कळावा अशी माझी विनंति आहे."

" यमधर्मा, चित्रगुप्तानं विचारलेला प्रश्न विचारार्ह आहे. काव्य आणि लेखन अधिकारी पुरुषानंच करावं हें म्हणणं सयुक्तिक आहे. पण अधिकारी कसा ठरवायचा हा प्रश्न मोठा अवघड आहे. शास्त्रनिपुण पुरुषच लेखनाधिकारी होऊं शकतो म्हणावं, तर शास्त्राची तोंडओळख नसणाऱ्यांनीं अलौकिक लेखनकार्य केलेलं आपण पाहतों. स्वतः शास्त्रकार हेच त्याचे पुरावे होत. निरीक्षण आणि प्रत्यक्षानुभव यांच्या सहाय्यानं उपयुक्त साहित्य निर्माण होऊं शकतं हें त्याचं उत्तर आहे. कोमलच्या भूमींत तुकारामादि संतग्रंथकार अमोलिक आणि अमर साहित्य निर्माण करून गेले, त्यांनीं कां प्रथम शास्त्राभ्यास केला होता ? निरीक्षण, अनुभव आणि लोककल्याणाची कळकळ, यांच्या बळावरच त्यांनीं ही साहित्यनिर्मिती केली. कोमलनं ज्या विदेशीय साहित्यावर आपला बराचसा लेखनसंसार उभारला, त्या विदेशीय साहित्याचे निर्माते शास्त्राभ्यासी होते असं निश्चयानं म्हणतां येणार नाहीं.

दुर्गम भूप्रदेश, अमर्याद महासागर, अनंत आकाश, यांतून ते भटकले, युद्धाच्या धुमश्चक्रींत ते शिरले, जुलमी राज्ययंत्राच्या कैदखान्यांतले कष्टहि त्यानीं अनुभविले. जग धुंडाळलं, छल सोसला, दुःख भोगलं. कष्टप्रद कोणतं, सुखवर्धक कोणतं, त्याचं निरीक्षण केलं. माणसंच, पण दुर्बळ जीव-जंतूंचं जिणं कोण जगतात आणि राक्षसी अत्याचार कोण करतात, याची पाहणी केली. आणि पाहिलं, अनुभवलं तें लिहिलं. यमधर्मा, शास्त्राभ्यासाला मी निरुपयोगी किंवा तुच्छ ठरवीत नाहीं. पण साहित्यनिर्मितीला तीच एक अवश्य गोष्ट आहे, असं मला वाटत नाहीं. म्हणून कोमलच्या लेखनाला शास्त्राभ्यासाचा आधार नव्हता ही चित्रगुप्ताची तक्रार विचारांत घेण्याचं कारण नाहीं असं माझं मत आहे.

"पण यमधर्मा, निरीक्षण आणि अनुभव या गोष्टी मात्र मुळींच उपेक्षणीय नाहींत. या सामुग्रीवांचून साहित्यनिर्मिती होऊं शकणार नाहीं. आजूबाजूला न पाहतां आणि सुखदुःखाचा अनुभव न घेतां, नुसत्या कल्पनेच्या सहाय्यानं शब्दसंभार निर्मितां येईल, पण त्याला प्रभावी साहित्याचा मान मिळणार नाहीं. कोमल आणि त्याच्या जातीचे लेखक निरीक्षणहि करीत नाहींत आणि अनुभवहि घेत नाहींत असं चित्रगुप्तानं सूचित केलं आहे. त्याची ही शंकाहि सर्वस्वीं खरी नसावी असं मला वाटतं. विश्वाचं विराट्-स्वरूप अवलोकन करणं आणि अमर्याद सुखाचा व तीव्रतम क्लेशांचा अनुभव घेणं, राष्ट्रीय परिस्थितीवर पुष्कळसं अवलंबून असतं. राष्ट्र संपन्न असो वा विपन्न असो, तें स्वतंत्र असेल तर त्याच्या रहिवाशांना मन मानेल तशा भराऱ्या मारतां येतात. पण कोमल परतंत्र राष्ट्राचा रहिवासी होता. त्याच्या राष्ट्रांत कारकून किंवा कामाठी मुख्यत: घडविले जात असल्यामुळें, त्यांचीच मुख्य वसति आहे. जेमतेम पोट भरलं म्हणजे कृतकृत्य झालं एवढ्यावर त्यांना समाधान मानून घ्यावं लागतं. हा कारकून कामाठी-वर्ग शरीरानं दुर्बळ तसा मनानंहि भित्रा आणि निरुत्साही झालेला असतो. भयानक संकटांत उडी टाकण्याची गोष्ट दूरच, पण अति सुखाची आशा करणंसुद्धां त्याला झेंपत नाहीं. अशा स्थितींत आपल्या अंधेऱ्या घरकुलाबाहेर तो कशाचं निरीक्षण करणार आणि विविध प्रकारच्या जीवनाचा अनुभव तरी कसा घेणार? तरी पण निसर्गनिर्मित लेखनप्रवृत्ति त्याला चैन पडूं देत

नाहीं. कोमल आणि त्याचे व्यवसायबंधु त्यांतल्यात्यांतच हातपाय झाडतात, टांचा उंचावून जेवढं दूरचं पाहतां येईल तेवढं जग पाहतात, आपले व आपल्याच अंगणापरड्यांतल्या माणसांचे अनुभव गोळा करतात आणि आपल्या लेखण्यांना गति देतात. त्यांच्या लेखनांत निरीक्षणाची विशालता नसली तरी त्याचा सर्वस्वी अभाव असतो असं मात्र मी म्हणूं शकत नाहीं. उलट स्वयंभू प्रजेपेक्षां निरीक्षणावरच यांची भर असते. मात्र या निरीक्षणांत वस्तूंचे अंतरंग हे पाहूं शकत नाहींत. एकादी घटना पाहिली तर ती काय घडली एवढंच ते पाहतात. ती कां घडली ही आंतली बाजू यांना दिसत नाहीं. यांचं कार्य नाडीपरीक्षक वैद्याचं न होतां छायाचित्रकाराचं होतं. बाह्यरूप तेवढं यांना दिसतं आणि तेवढंच हें वर्णितात. कोमल आणि तत्समान लेखकांच्या लेखनांत चित्रगुप्ताला निरीक्षणाचा अभाव दिसतो तो यामुळंच.

"यमधर्मा, कोमल हा नकल्या होता असं चित्रगुप्तानं म्हटलं आहे. त्याचं हें म्हणणंच अनिरीक्षणाचा आरोप खोडून काढायला समर्थ नाहीं काय? पाहिल्यावांचून नक्कल तरी कशी करितां येईल?"

"कोमलवर हा दावा आणण्यांत, कोमलच्या देशांत विद्वान् आणि अनुभवपूर्ण लेखक निर्माण व्हावेत अशी चित्रगुप्ताची सदिच्छा असावी असा माझा समज आहे. त्याची ही सदिच्छा सफल व्हावी असं मलासुद्धां वाटतं. पण अशा अधिकारी लेखकांचा अभाव म्हणजे कोमलचा अपराध म्हणणं हा अन्याय होईल असं माझं मत आहे. कोमलच्या देशबांधवांत विद्यावंत थोडे नाहींत. त्यांतील पुष्कळांना लेखनकौशल्याची देणगीहि असणं शक्य आहे. जगत्भ्रमण करून विक्रमी, पराक्रमी, बंधुप्रेमी किंवा जनद्रोही मानवसमूहांचं निरीक्षण करून सुष्टदुष्ट जीवनपद्धतींचा अभ्यास करण्याइतकी अनुकूलताहि अनेकांना असूं शकेल. अशा लोकांनीं आपलं ज्ञान आणि अनुभव लेखनद्वारां स्वबांधवांना सांगावें आणि त्यांना उत्कर्ष-गामी करावं हें इष्टच आहे. पण याच्या देशबांधवांचं ज्ञानसंपादन आणि जगत्-भ्रमण एक तर पोट भरण्याचं अधिक मोठं साधन या दृष्टीनं तरी होतं, किंवा केवळ चैनीखातर तरी होतं. त्यामुळं ते लोकांच्या आकांक्षा पूर्ण करूं शकत नाहींत. लोकांची ज्ञानपिपासा अतृप्तच राहते. अशा स्थितींत कोमलसारखे

लेखक आपल्या तुटपुंज्या सामुग्रीवर लेखनकार्य करण्याला पुढं सरसावतात हा त्यांचा दोष कसा मानतां येईल ? क्षुधापीडितांना अन्नदान करण्याला श्रीमंत लोक पुढं येत नसतांना एखाद्या गरीबानं चतकोर नितकोर माधुकरी वाढली तर तो त्याचा अपराध न मानतां त्याच्या उदारतेचं कौतुकच करावं लागेल. यमधर्मा, उलट बाजूनं विचार केला तर या प्रश्नाचं उत्तर अधिक स्पष्टपणें मिळेल. लोकांना गायन ऐकायला पाहिजे आहे. गंधर्व-अप्सरांचं गायन त्यांना ऐकायला मिळालं तर ते नको कां म्हणतील ? आणि असं दिव्य संगीत त्यांना लाधलं तर गोंधळ्याचं गाणं ऐकायला ते तरी कशाला जातील ? पण गंधर्वाप्सरा जेव्हां बाहेर येत नाहींत, तेव्हां गोंधळ्यांनाच पुढें होणं अवश्य होतं आणि दूध देतां आलं नाहीं तरी ताकानं लोकांची तहान शमवावी लागते. यमधर्मा, कोमलनं साहित्यक्षेत्रांत अनधिकारानं अतिक्रमण केलं हा चित्रगुप्तानं केलेला आरोप समर्थनीय नसून, तें क्षेत्र रिकामं राहूं नये म्हणून त्यांत यथाशक्य घस्त घातली, हें योग्यच झालं असं माझं मत आहे. तुला तें पटत असेल तर पहा."

"गुरुदेव, आपलं मत अयोग्य कसं असूं शकेल? तें मला पटतं. पण कोमलच्या बांधवांनीं सदैव अपुऱ्या आणि कोरड्या माधुकरीवरच निर्वाह करीत रहावं काय ? त्यांना विपुल आणि सात्त्विक अन्न मिळण्याची कांहीं तरी व्यवस्था करणं अवश्य ठरेल. यांसाठीं विद्यासंपन्न आणि अनुभव संपन्न लोकांची निष्क्रियता तरी झाडून काढली पाहिजे. किंवा कोमल सारख्यांचा तुटपुंजा ज्ञाससंग्रह आणि तोटकं निरीक्षण विपुल आणि दूर-गामी करण्याची अनुकूलता तरी निर्माण केली पाहिजे."

"यमधर्मा, विद्यमान विद्वान आणि समृद्ध लोकांना कार्यप्रवृत्त करणं हें सुलभ नाहीं. निष्क्रियता त्यांच्या अंगीं इतकी भिनून गेली आहे, कीं ती खरवडून काढतां काढतां तेच नामशेष होतील. त्यापेक्षां कोमल आणि तत्सम लोकांना अधिक ज्ञानदान, अधिक सुस्थिति, अधिक कौशल्य आणि अधिक कार्य करण्याची शक्ति देणंच सुलभ आणि इष्टहि ठरेल. यमधर्मा, तुला हंसूं आलेलं दिसतं ! माझ्या बोलण्यांत कांहीं चुकलं काय ?"

"नाहीं गुरुदेव. आपण सुलभ आणि इष्ट म्हणून सांगितलेला मार्ग साधा दिसला तरी मोठा व्यापक आहे हा विचार मनांत येऊन मला हंसूं

आलं. कोमल हा सामान्य वर्गाचा प्रतिनिधि आहे आणि विद्या-साधनाची आणि जगत्संचाराची अनुकूलता त्याला प्राप्त करून देणं म्हणजे सर्वच समाजाला समृद्ध करणं होय. विद्याकलांची उपासना करण्याची आणि उपजत गुणांचा विकास करून घेण्याची सुसंधि सामान्य माणसालाहि मिळवून देणारी समाजस्थिति उत्पन्न करणं म्हणजे विद्यमान समाजस्थितींत मोठीच क्रांति व्हायला पाहिजे. नाहीं कां ? ”

“ होय. क्रान्तीची आवश्यकता सूचित करण्याचाच माझा उद्देश होता. कोमलची जीवनकथा त्याला नुसती निमित्तमात्र झाली. आतां कोमलपुरता निवाडा देणं एवढंच कार्य उरलं. तें तू करावंस. ”

“ या कोमल नकलेला मी प्रथम मत्स्यजन्म देतों. सप्तसागरांतून याचा संचार होईल आणि पृथ्वीप्रदक्षिणा करून हा भूगोलाची माहिती करून घेईल. नंतर पक्षीरूपानं आकाशभ्रमण करून विविध मानवसमूहांचं जवळून निरीक्षण करील. शेवटीं गोवंश प्राप्त होऊन याला मानवसदनांतहि वास्तव्य करतां येईल. अशा प्रकारें दास्यबद्ध, दास्यमुक्त, पतित, उन्नत, विक्रमी, आक्रमी, ज्ञानी, अज्ञानी, कोमल आणि कठोर अशा सर्व मानवांचं परीक्षण करून ज्ञानानुभवानं संपन्न होत्साता असा हा पुनरपि मानव-जन्म स्वीकारून पुनरपि पहिल्याच स्थानीं आगमन करील आणि त्याच्या उत्कर्षाला वाणी लेखणीनं सहाय्य करण्याचं कार्य याच्या हातून घडेल.

“ चित्रगुप्ता, कोमलला नियोजित स्थलीं पाठव आणि दुसरा प्राणी निर्णयार्थ सादर कर. ”

---

## खंडेराव राजे

१५

“ देवाधिदेवा, अपराधी म्हणून या खंडेराव राजेविरुद्ध मला धर्म-पीठाचा निर्णय मागायचा नसून, यालाच आपल्यावर झालेल्या अन्याया-

अनुक्रम 30611
विभाग
क्रमांक
नों. दि.

विषयीं दाद मागायची आहे. याला आपलं निवेदन करायला अनुज्ञा असावी."

" खंडेराव, तुला सांगायचें असेल तें तूं निर्भयपणें सांग. तुला मानवलोकीं अन्यायानें वागविण्यांत आलं असं धर्मपीठाला दिसून आलं तर तुला सोसावे लागलेले क्लेश कमी होतील, असं नवं जीवन प्राप्त करून देण्यांत धर्मपीठाला आनंदच वाटेल."

" देवाधिदेवांच्या या दयामय आश्वासनाबद्दल मी धर्मसभेच्या सर्व सदस्यांना कृतज्ञतापूर्वक प्रणाम करतों."

धर्मपीठापुढं साष्टांग प्रणिपात घालून खंडेराव बोलूं लागला—

" मानवलोकींच्या एका हिंदुराजाचा मी चवथा मुलगा. मला राजमंदिरांतलीं सुखं अनुभवायला मिळालीं. वयांत आल्यावर मला सुंदर पत्नी प्राप्त झाली. तिच्या पसंतीला मी कितपत उतरलों होतों हें मला सांगतां येत नाहीं. पण माझ्या सुखांत तिनं कधीं कमतरता केली नाहीं. माझ्या वडीलबंधूंनीं माझ्याशीं स्नेहपूर्ण वर्तन केलं असं मी म्हणूं शकत नाहीं, पण ते माझ्याशीं दुष्टाव्यानं वागले नाहींत. माझ्या वडिलांनीं मी यावज्जीव सुखानं राहूं शकेन अशी तरतूद केली होती. माझी आईहि माझं भरपूर कोडकौतुक करीत असे. माझं कसं होईल ही सर्व मानवांना छळणारी चिंता मी इकडं येईपर्यंत माझ्या मनाला कधींहि शिवली नाहीं."

" खंडेराव, तुझ्या या निवेदनावरून तुझा छल झाला असं मुळींसुद्धा दिसत नाहीं ! "

" पण माझा छल झाला असं माझं गाऱ्हाणं तरी कुठं आहे ? माझ्या बाबतींत लोकांनीं अन्याय केला अशी माझी तक्रार आहे. देवाधिदेवा, अन्याय पीडादायकच असतो असं नसून सुखदायकहि असतो, हेंच मला धर्मपीठाच्या निदर्शनाला आणायचं आहे.

" धर्मराज, माझ्या जातीचे इतर राजपुत्र मीं पाहिले आहेत. दूरचं कशाला, माझेच बंधु मीं पाहिले आहेत. त्यांच्या अंगीं जडलेल्या घाणेरड्या संवयी आणि त्यांच्या हातून घडत असलेले वेडेचार किंवा अनाचार माझ्या हातून घडलेले नाहींत. ज्याला दुर्व्यसन म्हणतां येईल अशी कसलीहि संवय मी जडवून घेतली नव्हती. लोकांना उपद्रवकारक होईल

अशी कोणतीहि गोष्ट समजून उमजून तरी माझ्या हातून घडलेली नाहीं. तरीपण माझ्याकडून एखादं कौतुकास्पद असं सत्कृत्यहि घडलेलं नाहीं. अनुकूलता असून मी विद्या किंवा कला संपादन केली नाही. वेळ हवा तेवढा असून आणि रंजले गांजलेले लोक दिसत असून मी त्यांच्या मदतीला कधीं गेलों नाही. थोडक्यांत सांगायचं म्हणजे माणसांना भूषण वाटावं असं माझ्यापाशीं कांहीं नव्हतं. तथापि लोकांनीं मला सन्मानानं वागवलं. विद्येनं आणि वयानं मोठीं असलेलीं माणसं मला उत्थापन देत, अभिवादन करीत. माझा खेळगडी मनोहर पदवीधर होऊन आला तरी लोक त्याला 'मन्या' म्हणतात. माझा दुसरा एक बालमित्र चित्रकलेंत निष्णात होऊन आला, तरी त्याला 'शिन्या' म्हणायला लोकांना दिक्कत वाटत नाहीं. भर पुरांत उडी घालून बुडणाऱ्याचा जीव वांचवला तरी बाळकृष्णाला 'बाळक्या' म्हणतात आणि अडल्या–नडल्याची हांक येतांच मध्यरात्रींहि धावून जाणाऱ्या चिंतामणीची 'चिन्त्या' अशी संभावना होते. पण तेच लोक मी विद्याकलाहीन, निष्क्रिय आणि भेदरट असून मला मात्र खंडेराव दादासाहेब म्हणून गौरवतात! 'महाराज' 'सरकार' अशीं भव्य उपपदंहि माझ्यापुढं जोडतात! हा माझ्यावर अन्याय होतो असं माझं म्हणणं आहे. सत्पात्राला धिक्कारून अपात्राला गौरविण्याची ही प्रथा बंद कां केली जात नाहीं? भूलोकावर माझ्या वांट्याला आलेला अन्याय इथं तरी सुधारला जाईल काय? माझ्या निर्मूल्य जीवनाला योग्य अशी गति मला हें धर्मपीठ देईल काय?"

खंडेरावाच्या या लोकविलक्षण मागणीने यमधर्म विचारमग्न झालेले पाहून देवगुरु म्हणाले—

"यमधर्मा, खंडेरावाच्या मागणीनं तुला गोंधळांत पाडलेलं दिसतं. जे 'अन्याय' असं हा मानतो ते खरोखर अन्याय आहेत का? आणि हा स्वतःहि अपराधी असल्याचं दर्शवीत असल्यानं त्याबद्दल त्याला शासन केलं पाहिजे कीं काय, असे प्रश्न तुझ्यापुढं उपस्थित झाले असतील. खंडेरावाची मागणी थोडी विचित्र आहे खरीच!

"पण यमधर्मा ही मागणी खरोखर वैयक्तिक स्वरूपाची नाहीं. विकास पावत असलेल्या मानवी मनांतून ती उत्स्फूर्त होत आहे. मोठेपणा हा

कुलाधिष्ठित न राहतां गुणाधिष्ठित असावा ही जाणीव मानवमनांत जागृत होऊं लागली आहे. गुणसंपन्न असूनहि धनमानवंचना वांट्याला आलेले मानव चवताळून ही मागणी करूं लागले आहेत, आणि ही मागणी गुण्यागोविंदानं पुरविली गेली नाहीं, तर आम्ही आपल्या मनगटाच्या जोरावर ती पुरवून घेऊं अशी दटावणीहि देत आहेत. ही दरडावणी न्याय्य आहे तशी सामर्थ्यवतीहि आहे, हें पाहून धनमानाची गादी धरून बसलेल्या पिढीजात मानकन्यांचीं मनंहि हादरून जात आहेत. अमुक एका कुलांत दैवयोगानं आपणांला जन्म दिला, एवढ्यासाठींच आपण वैभवाचे आणि मानमरातबाचे अधिकारी ठरतों काय, हा संभ्रम त्यांच्या मनांत उत्पन्न होत आहे. खंडेरावासारख्याच्या वाणींतून तो असा प्रसंग विशेषीं प्रकट होतो इतकंच. यमधर्मा, खंडेराव व्यक्तिशः वाईट नाहीं आणि त्याच्यावर कुणी अन्यायहि केला नाहीं. मानव समाजाच्या विद्यमान जीवनक्रमांतील या साहजिक घटना होत्या. तरीपण उद्यांच्या मानवाला काय हवं त्याचं दिग्दर्शन खंडेरावच्या मागणींतून ध्वनित होत असल्यानं त्याचा योग्य वाटेल तो निर्णय तूं दे.".

"गुरुदेव, या विषयावर अधिक विचार होणं मला अवश्य वाटतं. एका प्राण्याच्या गतजीवनांतील योग्यायोग्य पारखतांना सकल मानव जातीय भविष्याचा निर्णय देणं पीठाच्या अधिकारकक्षेंत येऊं शकेल काय याबद्दलहि विचार व्हायला पाहिजे. परमेश्वराची आज्ञा जशी होईल त्यावर आपला निर्णय अवलंबून ठेवावा लागेल असं मला वाटतं. चित्रगुप्ता, खंडेरावाचा दावा स्थगित करून दुसऱ्या कार्याला आपण प्रारंभ करूं या."

"जशी प्रभूंची आज्ञा. पण भगवन् आतां संध्यावंदनाचा आणि सोमपानाचा समय समीप आला आहे. हीं आन्हिकं उरकून परत आल्यावर पुढील कार्याला प्रारंभ व्हावा अशी प्रार्थना आहे."

चित्रगुप्ताची ही प्रार्थना मान्य झाली आणि यमधर्मासह सर्व सदस्य आन्हिकानुष्ठानार्थ अंतर्धान पावले.

विभाग ... क्रमांक ... नों. दि. ...
म. ग्रं. ... वा. क्र. 2036

## — देशमुख आणि कंपनीचीं आगामी प्रकाशनें —

### वि. स. खांडेकर

१ माझ्या कादंबऱ्या
२ आजचीं स्वप्नें
३ सुवर्णकण
४ मंजिऱ्या
५ बुद्ध आणि हिटलर
६ कल्पलता
७ मराठीचा नाट्यसंसार
८ अश्रु
९ बडी मां
१० विसावें शतक
११ तिसरी भूक
१२ वर्षाकाल
१३ छाया
१४ चार भिंती
१५ चक्रवर्ती
१६ वालुका
१७ चल ये राणी
१८ उद्यांचीं स्वप्नें

### ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ति उदयन
५ उर्वशी
६ उमरखय्याम
७ विलापिका

### द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
१ साजणी—ना. ह. आपटे

### ना. धों. ताम्हनकर

१ गुजाताई
२ शेजारी

### प्र. के. अत्रे

१ दूर्वा आणि फुलें
२ 'मी' कसा झालों

### कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली

### काकासाहेब कालेलकर

१ स्मरणयात्रा

### अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

### चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार कथा
३ नटश्रेष्ठ
४ लंकावैभव

### दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी
२ कबुली जबाब

### साने गुरुजी

१ गोड निबंध भाग २–३